**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९३६
निर्णय दिनांक ०१-१२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मो. इफतेखारोद्दीन पी. मो.शरफोद्दीन<br>मुतवल्ली इनामदार, औढा नागनाथ,<br>ता.जि.हिंगोली. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, हिंगोली,<br>जि.हिंगोली | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपजिल्हाधिकारी, हिंगोली,<br>जि.हिंगोली. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे तिघेही अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १०.५.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर करण्याची कारणे खालीलप्रमाणे नमूद केली आहेत.

"इनाम जमीन जामे मस्जीद औंढाचे १९५२-५३ पासून अत्यात इनक्वायरी कायदा १९५२ नुसार जमीनी जप्त करण्यात आल्या होत्या व त्याची जमा रक्कम तहसील हिंगोली येथे

एन्डोमंटला जमा होती. त्यात इन्क्वायरी कायदाचा दुरुपयोग होवून जमीनी वर्षोगणीत लावनीत ठेवण्यात आल्या. व इनामदाराला व संस्थेला उतपन्ना पासून वंचीत ठेवण्यात आले. व सक्षेशमची कार्यवाही वर्षो गणीत प्रलंबीत ठेवण्यात आली. व संस्थेची पर्यायी व्यवस्था पण करण्यात आली नाही. इनामदाराने आपल्या परीने संस्थेची सेवा करीत राहीली त्याचा खर्चपण शासना कडुन देण्यात आला नाही. जमा रक्कमेची अफरातफर झाली त्याचा हिशोब इनामदार मागत आहेत, तेव्हा तहसील कडुन उडवा उडवीची उत्तरे मिळतात. संबंधीत इंन्डोमेंट चे कर्मचारी श्री. राजकुमार जैन यांच्या कडुन रेकॉर्ड गहाळ करुन जमा रक्कमेत अफरा तफर झाल्याचे बोलले जाते. कर्मचाऱ्याला पाठीमागे टाकण्यासाठी संबंधीत तहसीलदार व उपजिल्हाधिकारी हिंगोली यांनी वरील गोल गोल निर्णय दिला. तो अवलोकन व्हावा सोबत दिलेल्या नऊ दहा अर्जातुन एकाही अर्जाचे कोणत्याही कार्यालयातुन लेखी देण्याचे तसदी कोण्याही अधिकाऱ्याने घेतली नाही. व त्याने व्यथीत होऊन आपणाकडे अपील पोस्टा द्वारे सादर करीत आहे" व आपल्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपील अर्जाच्या हस्तलिखित प्रतीमध्ये 'माहितीचा तपशील' या सदरामध्ये असे नमूद केले आहे की, "जामा मस्जीद औंढाचे इनामी जमीनी सर्वेनंबर २०,२१,२२,२३,३२,३३ चे एकूण ४३ वर्षांचे जमा रकमेचा तपशील १९५२ - ५३ पासून १९९२-९३ पर्यंत ६ सर्वेनंबरच्या लावणीपत्रीका (रजिस्टर) वरुन ४३ मोसमच्या अंबराईचे असे एकूण ३०१ फाईली जाहीर प्रगटनसहीत जनरल किर्द व कोषागारातून तपशील तीसऱ्यांदा अपील दाखल आहे. १) लावणीचा जमा रकमेचा तपशील लावणी रजिस्टर लावणीपत्रीका,जाहीर प्रगटन जनरल किर्द वगैरे वरुन माहिती मिळणे,२) एन्डोमेंट विभाग

तहसीलदारकडून हयाची माहीती मिळणेबाबत नुसार जन माहिती अधिकारी यांनी जप्त करण्यात आली"

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की,अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ३१.७.२००६ रोजीच्या प्रथम अर्जान्वये मौ. औंढा येथील ईनामी जमिनीसंदर्भात काही माहिती मागितली होती. तथापि अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील विहित मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २१.९.२००६ रोजी प्रथम अपील केले असता, त्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १२.१०.२००६ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दि. २०.१०.२००६ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढून अपिलार्थीस अभिलेखे तपासणीसाठी उपलब्ध करुन देऊन त्यांना हव्या असलेल्या नकला नियमानुसार देण्यात याव्यात, असे  जन माहिती अधिकारी यांना सूचित केले.

आयोगास अपिलार्थी यांच्यातर्फे उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे अत्यंत अस्पष्ट असून, त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जावरुन त्यांना  ईनामी जमीन जामा मस्जीदचे सन १९५२-५३ पासून ते १९९२-९३ या कालावधीशी संबंधित जमिनीपासून मिळालेले वर्षनिहाय उत्पन्न व त्यातून झालेला वर्षनिहाय खर्च ज्या रजिस्टरमध्ये नोंदविला गेला आहे, त्या रजिस्टरच्या पृष्ठांच्या प्रती त्यांना आवश्यक असल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात त्यांना कोणताही प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देय ठरत आहे. जन माहिती अधिकारी यांची, अपिलार्थीस माहिती न देण्याच्या कृतीचे कोणतेही समर्थन असल्याचे आयोगास दिसून येत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित

करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची जिल्हाधिकारी, हिंगोली यांना शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३) जिल्हाधिकारी, हिंगोली यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०१-१२-२००८** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.मो. इफतेखारोद्दीन मो.शरफोद्दीन मुतवल्ली इनामदार, औंढा नागनाथ, ता.जि.हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, औंढा नागनाथ, जि. हिंगोली यांना या

निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, हिंगोली, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १९३१/२००७ व १९३२/००७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१९३१ व १९३२

निर्णय दिनांक ०१-१२-२००८

१ श्री. गणेश साहेबराव लांडगे, : अपिलार्थी
पंचशिलनगर (मंजरथ रोड),
माजलगाव, जि.बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार (महसूल),
तहसील कार्यालय, माजलगाव जि.बीड
२ जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, माजलगाव,
जि.बीड

**निर्णय**

वरील दोन प्रकरणांची सुनावणी आज दि. ०१.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित आहेत.

१. सौ.मंजूषा मुथा — जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, माजलगाव, जि.बीड

अपिलार्थी श्री. गणेश साहेबराव लांडगे हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.१०.२००७ रोजी दाखल झालेली द्वितीय अपिले क्र. १९३१/ २००७ व १९३२/२००७ आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

अपील क्र. १९३१/२००७ :

या प्रकरणी अपिलार्थीने अपील अर्जामध्ये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागितली असता, त्यांनी वेळोवेळी पाठपुरावा करुनही माहिती दिली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नाही, असे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे व संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) व (२) प्रमाणे कार्यवाही करण्याची विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ११.६.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कार्यालयाशी संबंधित राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजनेची सन २००६ ते २००७ या कालावधीशी संबंधित एकूण ३ मुद्यांद्वारे माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य लाभार्थ्यांची यादी,प्राप्त अनुदान,वाटप केलेला निधी, अर्जासोबत असलेल्या कुटुंबप्रमुखाचे मयत प्रमाणपत्र, दारिद्रय रेषेचे प्रमाणपत्र व वयाचे प्रमाणपत्र - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्याांच्याकडील दि. ७.७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे श्री. बोथीकर,अ.का.,संगायो विभाग यांना एक पत्र लिहून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्याचे सूचित केले. या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिल्याचे दिसून येते. अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.

८.८.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अनुक्रमे दि. २२.८.२००७ व २४.९.२००७ रोजी सुनावणी घेण्याचे प्रस्तावित केल्याचे त्यांच्या संबंधित सहायक माहिती अधिकारी यांनी दि. १४.८.२००७ व ५.९.२००७ रोजी अपिलार्थीस अग्रेषित केलेल्या पत्रावरुन दिसून येते. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे या प्रकरणी कोणतीही सुनावणी झाली नाही, असे अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे स्पष्ट केले आहे व या संदर्भातील कागदपत्रे उपस्थित तहसीलदार यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले, यावरुन अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नसल्याचे अनुमान काढून यासंदर्भात निर्णय देण्यात येत आहे.

उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथमतः उपलब्ध नव्हती. त्यांना सदर माहिती संबंधित अव्वल कारकुनाकडून घ्यावयाची होती. अव्वल कारकुन हे जन माहिती अधिकारी नाहीत, त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसाठीच्या अर्जावर विहित मुदतीत निर्णय देणे हे जन माहिती अधिकारी याचे प्रथम कर्तव्य ठरते, तथापि त्यांनी अपिलार्थीचा दि. ११.६.२००७ रोजीचा अर्ज संबंधित अव्वल कारकुन यांच्याकडे दि. ७.७.२००७ रोजी पाठविण्यास २६ दिवस इतका कालावधी लावला. एवढे करुनही आजतागायत अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिलेले आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ८.८.२००७ रोजीच्या अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दि. २२.८.२००७ व २४.९.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि ही सुनावणी देखिल जन अपिलीय अधिकारी यांनी घेतली नाही अथवा अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात त्यांच्याशी पत्रव्यवहार केला नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, ही

माहिती अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती'या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत असल्याने व अधिनियमाद्वारे माहिती देण्याचा विहित कालावधी आता व्यपगत झाला असल्याने, माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(६) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस ही माहिती आता विनामूल्य देय ठरते. उपरोक्त प्रकरणी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती तर दिली नाहीच परंतु अपिलार्थीच्या अर्जावर विलंबाने कार्यवाही करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. आपल्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना ज्या अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून सहाय्य घेणे गरजेचे असते, अशा सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांना माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी अधिनियमातील कलम ५(५) मध्ये तरतुद आहे, हे पाहता, या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या कर्मचाऱ्याच्या ताब्यात आहे, त्या कर्मचाऱ्याने अपिलार्थीस माहिती देण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याचे सिध्द होत आहे.

सबब असे आदेशित करण्यात येते की, संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय लावलेल्या विलंबाबाबत त्यांना एकूण रु. २५००० इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये,याचा खुलासा त्यांनी हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत आयोगाकडे सरळ सादर करावा, अन्यथा हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थीस माहिती देण्याच्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

<u>अपील क्र. १९३२/२००७:</u>

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) च्या तरतुदीनुसार दि.८.१०.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असता, त्याचा पाठपुरावा केला असता,जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नाही. आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून त्यांनी या अपील अर्जामध्ये आयोगास संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) व (२) प्रमाणे कारवाई करण्याची व जन अपिलीय अधिकारी यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, या प्रकरणी असे दिसून येते की, प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दि. ११.६.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे माजलगाव तालुक्यातील वाहन क्र.एमएच-२३-एफ २६ या शासकीय वाहनाच्या लॉगबुक संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. मात्र अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या विभागाकडे आहे, त्या पुरवठा विभागाकडे त्यांच्याकडील दि.७.७.२००७ रोजीच्या पत्रान्वये पाठविला. या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील पुरवठा विभागास अपिलार्थीस परस्पर माहिती देण्याचे सूचित करुन या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी करुनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ८.८.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २२.८.२००७ रोजी व २४.९.२००७ रोजी सुनावणी ठेवल्याचे, जन अपिलीय अधिकारी यांच्या अनुक्रमे दि. १४.८.२००७ व ५.९.२००७ रोजीच्या अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अग्रेषित केलेल्या पत्रावरुन दिसून येते.तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी या अपिलावर कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतली नसल्याचे आज रोजी अपिलार्थीने आयोगासमोर प्रतिपादन केले. उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांनी या संदर्भातील कागदपत्रे त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे आयोगास अवगत केले आहे, यावरुन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर सुनावणी घेतली नसल्याचे अनुमान काढण्यात येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व अपिलार्थींच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जाचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या ४ मुद्यावरील माहितीपैकी मुद्दा क्र.३ शी संबंधित माहिती अपिलार्थीस देय ठरत नाही. कारण सदर मुद्दा खालीलप्रमाणे आहे---

" गेल्या अनेक वर्षापासुन अद्यापपर्यंत MH 23 F026 वाहान खराब दाखवुन धान्याचा भ्रष्टाचार करण्याच्या उद्देशाने खाजगी वाहनात धान्य देण्याचे प्रकाराबद्दल जिल्हा पुरवठा अधिकारी/तहसिलदार यांनी लेखी खुलासा देण्यात यावा."

या मुद्याद्वारे असे दिसून येते की, अपिलार्थीस जिल्हा पुरवठा अधिकारी व तहसीलदार यांच्याकडून लेखी खुलासा अपेक्षित आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये 'माहिती' या शब्दाची व्याख्या पुरेशा प्रमाणात स्पष्ट करण्यात आली आहे. माहिती अधिकार अधिनियमामध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कोणत्याही

कृतीबद्दल अथवा निर्णयाबद्दल खुलासा मागणे अथवा स्पष्टीकरण मागणे अपेक्षित नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास त्यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे, ती माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत निर्णय घेणे, एवढयापूरती ही प्रक्रिया सीमित आहे. मात्र उर्वरित मुद्यावरील (मुद्दा क्र.१,२ व ४ शी संबंधित) माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय ठरत आहे. अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती प्राप्त होण्याचा हक्क असूनही या हक्कापासून अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याचे आयोगाचे मत आहे, किंबहुना अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, अशाप्रकारची माहिती, माहिती अधिकार अधिनियमाची अंमलबजावणी सुरु होऊन अंदाजे आठ महिन्याचा कालावधी होऊनही अपिलार्थीस न देण्याच्या जन माहिती अधिकारी यांच्या कृतीचे कोणतेही समर्थन होऊ शकत नाही, हे म्हणणे या ठिकाणी जास्त रास्त ठरत आहे.

उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या इतर सहाय्यकांचे सहकार्य घेणे गरजेचे होते. ज्या अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून अशा प्रकारचे सहाय्य घेणे गरजेचे असते, अशा सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांना माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी अधिनियमातील कलम ५(५) मध्ये तरतुद आहे, हे पाहता, या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या कर्मचाऱ्यांच्या ताब्यात आहे, त्या कर्मचाऱ्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवले आहे, असे आयोगाचे मत आहे.

सबब असे आदेशित करण्यात येते की, संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक यांनी अपिलार्थीस माहिती

देण्यासाठी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय लावलेल्या विलंबाबाबत त्यांना एकूण रु.२५००० इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये,याचा खुलासा त्यांनी हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत आयोगाकडे सरळ सादर करावा, अन्यथा हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थीस माहिती देण्याच्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थी यांची दोन्ही अपिले मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील क्र. १९३१/२००७ व अपील क्र. १९३२/२००७ मान्य करण्यात येत आहेत.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या दोन्ही मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे देय होणारी संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३) दोन्ही प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक यांना प्रत्येक प्रकरणी रु. २५००० इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये,याचा खुलासा त्यांनी हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत आयोगाकडे सरळ सादर करावा.

४) जन अपिलीय अधिकारी यांनी प्रत्येक प्रकरणी उपरोक्त आदेश क्र.३ चे

अनुपालन होईल, असे पहावे.

**औरंगाबाद** **(वि.बा.बोरगे)**
**दिनांकः ०३.१२.२००८** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गणेश साहेबराव लांडगे, पंचशीलनगर (मंजरथ रोड) माजलगाव, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, माजलगाव जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, माजलगाव, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९२७
निर्णय दिनांक ०१-१२-२००८

१ श्री. मो. अन्वरुल्लाखान मो.बरकतुल्ला खान, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
सार्वजनिक बांधकाम विभाग,
नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा
आयुक्त,
नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः उपअभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड-
वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

जन अपिलीय अधिकारीः शहर अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड-
वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.मो.कलीम परवेज | जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड वाघाळा शहर, मनपा,नांदेड |
| २. | श्री.चंद्रकांत केशवराव लाटकर | जन अपिलीय अधिकारी तथा शहर अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड वाघाळा शहर मनपा,नांदेड |

अपिलार्थी श्री. मो. अन्वरुल्लाखान मो.बरकतुल्ला खान हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ११.०६.२००६ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १४.३.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भात कोणतीही माहिती दिली नाही, त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २४.४.२००६ रोजी प्रथम अपील अर्ज केला असता, त्यावर अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा जन माहिती अधिकारी यांच्यावर कोणतीही कारवाई केली नाही, परंतु त्यांना दि. ११.५.२००६ रोजी म्हणजेच ५९ व्या दिवशी, जन माहिती अधिकारी यांच्याकडून पत्र प्राप्त होऊन त्याद्वारे अर्धवट, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती देण्यात आली. त्यांना प्राप्त झालेल्या माहितीबद्दल त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या, त्यांच्याकडील दि. १७.५.२००६ रोजीच्या पत्राद्वारे, ही बाब निदर्शनास आणली होती. जन माहिती व अपिलीय अधिकारी या दोन्ही अधिकाऱ्यांचा बेजबाबदारपणा व अपिलार्थीच्या अर्जास व अपिलाकडे दुर्लक्ष करण्याची वृत्ती त्यांनी या अपील अर्जाद्वारे आयोगाच्या निदर्शनास आणण्यात येत असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दि. १४.३.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.११ मधील हॉट मिक्स हॉट लेड (बी.टी.) रोड, बरकत कॉम्प्लेक्स ते नगरसेवक श्री. शफी अहेमद कुरेशी यांच्या घरांपर्यंतच्या कामासंदर्भात एकूण ७ मुद्यांवर माहिती विचारली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१)

च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २४.४.२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही व त्याप्रमाणे सध्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी आज आयोगासमोर तसे कबूल केले आहे. अपिलार्थीच्या अपील अर्जावर सुनावणी न घेता जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ११.५.२००६ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस काही माहिती दिल्याचे दिसून येते. सदर पत्र अपिलार्थीस दि. १२.५.२००६ रोजी प्राप्त झाल्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणले. याप्रित्यर्थ त्यांनी त्यांच्या दि. ११.५.२००६ रोजीच्या पत्रावर अपिलार्थीची दि. १२.५.२००६ रोजीची पोचसही आयोगास दाखवली.

अपिलार्थी यांच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती संमिश्र स्वरुपाची असून, त्यातील काही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १, मुद्दा क्र.३, मुद्दा क्र.४ व मुद्दा क्र.५ अंशतः, ही माहिती अपिलार्थीस देय होत नाही, कारण अपिलार्थीने या मुद्यांद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे स्पष्टीकरण व खुलासे अपेक्षित केले आहेत, म्हणून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून या मुद्यांवरील माहिती देय होत नाही. मात्र उर्वरित (मुद्दा क्र.२,५ अंशतः, ६ व ७ या मुद्यांशी संबंधित) माहिती कलम २(च) च्या तरतुदीशी सुसंगत असल्याने जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय ठरत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे इंग्रजीमध्ये अर्ज केला असून, त्याचे उत्तर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस मराठी भाषेमधून दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ द्वारे -गतीरोधक हे सा.बां.विभाग/आय.आर.सी.च्या प्रमाणकाप्रमाणे

नसल्यास सदरील गतीरोधकाचे डिझाईन कोणी तयार केले? ही माहिती अपिलार्थीस देय ठरते, तथापि त्यांच्या या मुद्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी सरळ उत्तर न देऊन, न्यायालयाच्या आदेशानुसार रस्त्यावरील गतिरोधक काढून टाकण्याचे काम हाती घेण्यात आले असल्याचे त्यांना कळविले आहे. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. ६ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून संबंधित कंत्राटदाराची या कामाकरिता लावलेल्या मजूरांच्या हजेरीपटाची प्रत मागितली होती. तथापि या मुद्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस संबंधित कंत्राटदाराकडून माहिती प्राप्त होताच आपणास देण्यात येईल, असे उत्तर दिले, जे चुकीचे आहे. अपिलार्थीस या मुद्यासंदर्भात माहिती देताना जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ११ चा आधार घेऊन कार्यवाही करणे अपेक्षित असताना जन माहिती अधिकारी यांनी अशाप्रकारची कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. ७ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून तांत्रिक मान्यता प्राप्त झालेल्या अंदाजपत्रकाची झेरॉक्सप्रत आणि या कामाच्या मोजमापपुस्तिकेची झेरॉक्स प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितली असता त्यांनी या मुद्यासंदर्भात अपिलार्थीस उत्तर देताना जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाप्रमाणे सत्यप्रतिसाठी नियमानुसार फीचा भरणा करावा, असे सूचित केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या या मुद्यावरील उत्तर पूर्णतः चुकीचे आहे. अपिलार्थीस माहिती देण्याचा अधिनियमाद्वारे विहित ३० दिवसांचा कालावधी व्यपगत झाला असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस  या मुद्यावरील माहिती अधिनियमातील कलम ७(६) च्या तरतुदीनुसार विनामूल्य देणे भाग असूनही त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती केली नाही.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांचा प्रथम अर्ज व प्रथम अपील करतेवेळी ते

या पदावर नव्हते. तसेच त्यांच्याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यपध्दतीनुसार काम करण्याकरिता महानगरपालिकेने मंजूर केलेला कोणताही निश्चित ठराव अथवा आदेश उपलब्ध नाहीत, मात्र पूर्वपरंपरेप्रमाणे चालू असलेल्या पध्दती व संकेतांप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रथेप्रमाणे ते नियमित काम करीत असतात.

वरील परिच्छेदात वर्णिल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमातील विहित तरतुदीमध्ये कोणत्याही प्रकारचा सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. तसेच अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेली माहिती ही अर्धवट , चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये माहिती न देऊन व जी माहिती अपिलार्थीस अंतिमतः पुरवली गेली, ती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे वर स्पष्ट केल्याप्रमाणे सिध्द झाल्यामुळे, जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस नि:संशयपणे पात्र ठरत आहेत.

वरील परिच्छेदात वर्णन केल्याप्रमाणे उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न देऊन, विलंबाने माहिती पुरवूनही ती अर्धवट व दिशाभूल करणारी देण्याच्या, त्यांच्या या कृतीद्वारे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. अधिनियमातील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याचे अधिकार आयोगास नाहीत, हे पाहता या प्रकरणी केवळ जन माहिती अधिकारी हेच अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत. सबब जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस २७ दिवस इतक्या विलंबाने माहिती पुरविल्याबद्दल त्यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- या प्रमाणे रु. ६७५०/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या

आत आयोगास सरळ सादर करावा, सदर खुलासा जन माहिती अधिकारी यांच्याकडून या मुदतीमध्ये प्राप्त न झाल्यास या प्रकरणी त्यांचे काही म्हणणे नाही, हे गृहित धरुन हेच आदेश अंतिम करण्यात येतील. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबाबतची नोंद आयुक्त, नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचविण्यात येत आहे.

माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व मागणी केलेली, देय होत असलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच वीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

४) अपील मान्य करण्यात येत आहे.

५) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच वीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

६) संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- या प्रमाणे रु. ६७५०/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी आयोगास हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसांच्या आत सरळ सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०१-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मो. अन्वरुल्लाखान मो.बरकतुल्ला खॉन,९-४-४५५,कय्युम प्लॉट,मॅफ्कोजवळ,नांदेड-४३१ ६०४.

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शहर अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९२८
निर्णय दिनांक ०१-१२-२००८

१ श्री. दत्तात्रय ज्ञानोबा घुमरे : अपिलार्थी
रा.पारगाव (घु),ता.पाटोदा,जि.बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
जोगानंद विद्यालय, पारगाव (घुमरा)
ता.पाटोदा जि.बीड

२ जन अपिलीय अधिकारी तथा
सचिव,
श्री.बंकटस्वामी शिक्षण संस्था, खडकीघाट
ता.जि.बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.शहाजी बाबासाहेब मोटे | जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जोगानंद विद्यालय, पारगाव (घुमरा) ता.पाटोदा,जि.बीड |
| २. | श्री.रावसाहेब हरिभाऊ भोसले | जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, श्री.बंकटस्वामी शिक्षण संस्था,खडकीघाट,जि.बीड |

अपिलार्थी श्री. दत्तात्रय ज्ञानोबा घुमरे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २५.०६.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना नियमाप्रमाणे माहिती दिली नाही, जन अपिलीय अधिकारी यांनी जाणीवपूर्वक कर्तव्यात कसूर केल्याने संबंधितांवर अधिनियमातील कलम २० (१) प्रमाणे कार्यवाही करुन त्यांना विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा दि. २०.१.२००७ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ३१.१.२००७ रोजी प्राप्त झाला. या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २०.२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे अंदाजे रु.२००/- इतके शुल्क त्यांना त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. त्यानंतर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ८.३.२००७ रोजी रु.२००/- इतक्या शुल्काचा भरणा केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १३.३.२००७ रोजी ४२ पृष्ठांची माहिती दिली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झ ालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(३) अन्वये दि. २०.३.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा सचिव,श्री.बंकटस्वामी शिक्षण संस्था,खडकी(घाट) ता.जि.बीड यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना रु. २५०/- इतकी शास्ती लावण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही. मात्र त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. ३०.४.२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे असे कळविले की, -त्यांना जन

माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली ४२ पृष्ठांची माहिती त्यांनी या अपील अर्जासोबत जोडली नाही त्या माहितीच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीने स्वतःच्या स्वाक्षरीने प्रमाणित करुन पाठवाव्यात म्हणजे पुढील कार्यवाही करता येईल. - जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापही माहिती प्राप्त न झाल्याने, त्यांच्यावर अधिनियमानुसार कारवाई व्हावी.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी हे त्यांच्या शिक्षण संस्थेत शासनाकडून कोणतेही अनुदान मिळत नसतानाच्या कालावधीमध्ये सहायक शिक्षक या पदावर कार्यरत होते व ते सध्या या शिक्षण संस्थेत कार्यरत नाहीत, त्यामुळे अपिलार्थी हे त्यांच्या शिक्षण संस्थेच्या शाळामध्ये वेळोवेळी वेगवेगळ्या प्रकारच्या माहितीची मागणी करीत असतात अपिलार्थीचे नोकरीविषयक प्रकरण शाळा न्यायाधिकरणाकडे विचाराधीन असून या संदर्भात वेगळी सुनावणी शाळा न्यायाधिकरणाकडे चालू आहे.

अपिलार्थीच्या मूळ अर्ज व प्रथम अपील अर्जासंदर्भात अनुक्रमे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला पत्रव्यवहार पाहता, प्रथमतः या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण २ मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यापैकी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती अपिलार्थीस त्यांनी आवश्यक ते शुल्क भरणा केल्यानंतर दि. १३.३.२००७ रोजी दिलेली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र.२ द्वारे मागणी केलेली माहिती त्यांनी काही

अंशी मोघम स्वरुपात केली असल्याने, ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत नाही. मात्र याच मुद्यातील उर्वरित भाग -माता-पालक संघ मेळावा रजिस्टरची प्रत -ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय ठरते. तथापि आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी, माता-पालक संघ मेळाव्यासंदर्भात कोणतेही रजिस्टर त्यांच्याकडे ठेवले जात नसल्याचे व अशाप्रकारचे माता-पालक मेळावे घेण्याची पध्दत त्यांच्याकडे रुढ नाही, असे मेळावे यापूर्वी झालेले नाहीत, मात्र त्यांच्या शिक्षण संस्थेमध्ये शिक्षक-पालक संघाचे मेळावे नियमितपणे वर्षातून दोन वेळा घेतले जातात, असे आयोगास सांगितले. यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितलेल्या माहितीपैकी सन २००० ते २००७ या कालावधीतील शालेय समितीच्या ठरावाची सत्यप्रत एवढीच माहिती त्यांना देय ठरते व ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडून रु.२००/- इतके शुल्क आकारुन त्यांना दिलेली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या दि. २०.२.२००७ रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविताना या शुल्काचा तपशीलवार हिशोब या पत्रामध्ये दिलेला नाही. त्यांनी या पत्रामध्ये अपिलार्थीस देण्यात येणाऱ्या माहितीच्या एकूण पृष्ठांची संभाव्य संख्या व ती देण्यासाठीचा प्रतिपृष्ठ दर, अपिलार्थीस कळविला नाही. अपिलार्थीस अंतिमतः ४२ पृष्ठांची माहिती पुरविली असून त्यांनी रु.२००/-इतके शुल्क अपिलार्थीस कसे आकारले याची जन माहिती अधिकारी यांना आयोगाने विचारणा केली असता,अपिलार्थीस त्यांच्याकडून घेतलेल्या शुल्कापैकी रु. ५०/- इतके शुल्क त्यांनी मनिऑर्डरने अपिलार्थीस परत पाठविल्याचे सांगितले. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी अपिलार्थीस मनिऑर्डरने रु.५०/- पाठविल्याची पोस्टाची मनिऑर्डरची पावती आयोगास दाखवली. यावरुन त्यांनी अपिलार्थीस मनिऑर्डरने रु.५०/- इतके शुल्क परत केल्याचे सिध्द

होत आहे. मूळात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २०.२.२००७ रोजी पाठविलेल्या पत्रामध्ये अधिनियमातील कलम ७(३)(क) चा अवलंब न केल्याने, सदर पत्र अवैध ठरत आहे. हे पाहता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती विनामूल्य देय होत आहे.त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीकडून घेतलेले शुल्क रु.१५०/- त्यांना हे आदेश प्राप्त होताच सात दिवसांच्या आत परत करावे.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या संदर्भात, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस योग्य ती माहिती पुरविलेली असल्यामुळे, कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

७) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

८) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडून घेतलेले शुल्क रु.१५०/- हे आदेश प्राप्त होताच सात दिवसांच्याआत परत करावे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०१-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दत्तात्रेय ज्ञानोबा घुमरे,मु.पो.पारगाव (घुमरा) ता.पाटोदा जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जोगानंद विद्यालय, पारगाव (घु) ता.पाटोदा जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव श्री. बंकटस्वामी शिक्षणसंस्था,खडकीघाट,ता.जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९२९
निर्णय दिनांक ०१-१२-२००८

१ श्री. दत्तात्रय ज्ञानोबा घुमरे : अपिलार्थी
रा.पारगाव (घु),ता.पाटोदा,जि.बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा, : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (माध्य.),
जिल्हा परिषद, बीड.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य.),
जिल्हा परिषद, बीड.

त्रयस्थ पक्षः सचिव, बंकटस्वामी शिक्षण संस्था,खडकीघाट,बीड

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः उपशिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, बीड.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित आहेत.

१. श्री.डी.टी.सोनवणे, — जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प.बीड व प्र.जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य),जि.प.बीड

२. श्री.रावसाहेब हरिभाऊ भोसले — त्रयस्थ पक्ष-सचिव,श्री.बंकटस्वामी,शिक्षण संस्था,खडकीघाट,जि.बीड

अपिलार्थी श्री. दत्तात्रय ज्ञानोबा घुमरे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १४.०९.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे -ज्या शिक्षण संस्थेने संस्थेच्या स्थापनेसाठी वापरलेल्या मूळ दस्तऐवजाची (मेमोरँडम) माहिती मागितली होती, ती माहिती न देता जन माहिती अधिकारी यांनी त्यांना ही माहिती, या प्रकरणी ते माहिती अधिकारी नसल्याचे नमूद करुन, संबंधित संस्थेच्या सचिवांकडून माहिती प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. या संदर्भात संस्थेच्या सचिवांनी त्यांच्याशी कोणताही पत्रव्यवहार केला नाही. माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याने त्यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, बीड यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) प्रमाणे दि.२७.७.२००७ रोजी अपील केले या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.या अपिलावर शिक्षणाधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३१.७.२००७ रोजीच्या पत्रान्वये संबंधित संस्थेच्या अध्यक्षांना पुढील कार्यवाही करण्यासंबधी कळविले. त्यानंतर संबंधित संस्थेच्या अध्यक्षांनी त्यांच्याकडील दि. २५.८.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस सध्या संस्थेमध्ये विविध स्तरावर मा.न्यायालयात प्रकरणे चालू आहेत. संस्थेचे माजी सचिव कै.प्रविण भोसले यांचे वडिल श्री. बी.के.भोसले यांच्याकडे पूर्वीचे महत्त्वाचे सर्व रेकॉर्ड आहे. याबाबत त्यांच्याकडील रेकॉर्ड परत देण्यासाठी त्यांना मागणी करण्यात आलेली असून त्यांच्याकडून उपलब्ध होताच आपणास विनामूल्य देण्यात येईल असे कळविले व या पत्राची प्रत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.बीड यांना पाठविली.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २२.५.२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जाद्वारे श्री.बंकटस्वामी शिक्षण संस्था, खडकी घाट,ता.जि.बीड या संस्थेच्या

स्थापनेच्या वेळी वापरलेल्या मूळ मसूद्याची (मेमोरँडम) प्रत मागितली होती. अपिलार्थीने हा अर्ज शिक्षणाधिकारी (माध्य.),जि.प.बीड यांच्याकडे केला होता, तथापि अशाप्रकारची माहिती शिक्षणाधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याने दि. १३.७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी त्यांनी अपिलार्थीस या संदर्भात श्री. बंकटस्वामी शिक्षण संस्थेच्या सचिवांशी संपर्क साधण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दि. २७.७.२००७ रोजी परत शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प.बीड यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले.हा अपील अर्ज शिक्षणाधिकाऱ्यांनी संबंधित संस्थेच्या सचिवांकडे दि. ३१.७.२००७ रोजी पाठविला. या अपील अर्जासंदर्भात संबंधित संस्थेच्या अध्यक्षांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. २५.८.२००७ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधित संस्थेचे माजी सचिव कै. प्रविण भोसले यांचे वडील श्री.बी.के.भोसले यांच्याकडे असून संस्थेने त्यांच्याकडे या रेकॉर्डची मागणी केली असता, संस्थेच्या पत्राास त्यांनी प्रतिसाद दिला नाही. तथापि ही माहिती उपलब्ध होताच ती अपिलार्थीस तात्काळ उपलब्ध करुन देण्याचे आश्वासित करुन त्यांनी अपिलार्थीचे अपील तूर्त फेटाळल्याचा त्यांचा निर्णय या पत्राद्वारे पारित केला.

उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्षासंदर्भात माहिती मागितली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २२.५.२००७ रोजी प्रथमतः माहितीचा अर्ज केला होता. तथापि संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा सदर अर्ज अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीप्रमाणे संबंधित त्रयस्थ पक्षाकडे, जे एक स्वतंत्र सार्वजनिक प्राधिकरण आहे, त्यांच्याकडे पाठविला. परंतु अधिनियमातील कलमामध्ये ५ दिवसांची मुदत असताना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जाची प्रत दि. १३.७.२००७ रोजी म्हणजेच

अंदाजे पावणेदोन महिने इतक्या विलंबाने पाठविली. या प्रकरणी संबंधित संस्थेच्या सचिवांनी आज रोजी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधित संस्थेचे माजी सचिव कै.प्रविण भोसले यांचे वडील श्री.बी.के.भोसले यांच्या ताब्यात असून त्यांना वेळोवेळी पत्रव्यवहार करुन त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने ते अपिलार्थीस माहिती देऊ शकले नाहीत. संस्थेने आता आपल्या घटनेमध्ये बदल केला असून नवीन घटना दि. १७.३.२००७ रोजी तयार झाली आहे व ती अपिलार्थीस देण्यास ते तयार आहेत. तथापि अपिलार्थी यांचा असा युक्तिवाद आहे की, त्यांना श्री. बंकटस्वामी या शिक्षण संस्थेच्या स्थापनेसाठी वापरलेल्या मूळ मसूदा दस्तऐवजाची (मेमोरँडम) आवश्यकता आहे. मूळ दस्तऐवज संबंधित संस्थेकडे आज रोजी उपलब्ध नाही, ही संस्था धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणीकृत झालेली संस्था आहे, हे पाहता, श्री.बंकटस्वामी शिक्षण संस्थेची स्थापना झाली त्यावेळी मेमोरंडम करताना ती कागदपत्रे धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयात उपलब्ध असणे अपेक्षित आहे. संस्थेच्या सचिवांनी या संदर्भात धर्मादाय आयुक्त यांचेशी पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही किंवा संस्थेच्या सचिवांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती कशी देता येईल यासंदर्भात देखिल काही कार्यवाही केली असल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीने मागितलेली माहिती अधिनियमातील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत असल्याने संबंधित सचिवांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प.बीड यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा मूळ अर्ज संबंधित प्राधिकरणाकडे अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीमध्ये न पाठवून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव

स्पष्ट केला आहे. सबब शिक्षणाधिकारी (माध्य.) यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी या प्रकरणी त्यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याचा विचार करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

९) अपील मान्य करण्यात येत आहे.

१०) सचिव,श्री.बंकटस्वामी शिक्षण संस्था यांनी,अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०१-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दत्तात्रय ज्ञानोबा घुमरे रा. पारगाव घुमरा ता.पाटोदा जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.),जि.प.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव, श्री.बंकटस्वामी शिक्षण संस्था,खडकीघाट,ता.जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९३०
निर्णय दिनांक ०१-१२-२००८

१ श्री. दत्तात्रय ज्ञानोबा घुमरे : अपिलार्थी
रा.पारगाव (घु),ता.पाटोदा,जि.बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (माध्य.),
जिल्हा परिषद, बीड.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य.),
जिल्हा परिषद, बीड.

त्रयस्थ पक्षः सचिव, श्री बंकट स्वामी
शिक्षणसंस्था,खडकीघाट,बीड

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः उपशिक्षणाधिकारी (माध्य.),
जिल्हा परिषद, बीड.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.डी.टी.सोनवणे, | जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्य.) व प्र.जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य),जि.प.बीड |
| २. | श्री.रावसाहेब हरिभाऊ भोसले | त्रयस्थ पक्ष-सचिव,श्री.बंकटस्वामी,शिक्षण संस्था,खडकीघाट,जि.बीड |

अपिलार्थी श्री. दत्तात्रय ज्ञानोबा घुमरे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २७.०४.२००७ रोजी नोंदणी झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना संबंधित संस्थेने दि. २३.१.२००७ रोजी दिलेली माहिती अपूरी असून या माहितीमध्ये संस्थेला नॉन टिचिंग फंड संदर्भात डिसेंबर २००६ पर्यंत शासनाकडून कसलेही अनुदान मिळालेले नाही, असे चुकीचे कळविलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देणे बंधनकारक असताना देखील अद्यापपर्यंत माहिती दिली नाही. जन माहिती अधिकारी यांची कृती कायद्याच्या विरोधात असल्याने त्यांच्यावर कायद्यातील कलम २० प्रमाणे कार्यवाही करण्याची त्यांनी या अर्जामध्ये आयोगास अंतिमतः विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने दि. ४.१२.२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे बंकटस्वामी शिक्षण संस्थेविषयी काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या संस्थेशी संबंधित होती ती संस्था सार्वजनिक प्राधिकरण असल्याने, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज दि. २८.१२.२००६ रोजी संबंधित संस्थेकडे पाठविला. अपिलार्थीच्या या अर्जास उद्देशून संबंधित संस्थेने अपिलार्थीस दि. १७.१.२००७ रोजी संपूर्ण माहिती विनामूल्य पुरविली. संस्थेकडून सदर माहिती प्राप्त झाल्याचे आज सुनावणीमध्ये अपिलार्थी यांनी कबूल केले आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांना एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितली होती. या ४ ही मुद्यांची माहिती श्री. बंकटस्वामी शिक्षण संस्था या संस्थेने अपिलार्थीस दि. १७.१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे पुरविली आहे. या पत्रामध्ये संबंधित संस्थेने अपिलार्थीस मुद्दा क्र. २ च्या संदर्भात असे म्हटले आहे की, त्यांच्या संस्थेला आजपर्यंत शासनाकडून नॉन टिचिंग फंड या शीर्षाचे अनुदान मिळालेले नाही. अपिलार्थीचे म्हणणे असे

आहे की, संस्थेने केलेले सदर विधान चुकीचे असून त्यांच्या माहितीप्रमाणे संस्थेला शासनाकडून नॉन टिचिंग फंड उपलब्ध झाला आहे. या संदर्भात अपिलार्थीकडे काही पुरावा आहे काय, असे अपिलार्थीस आयोगाने विचारले असता, अपिलार्थी यांनी त्यांच्याकडे सध्या या संदर्भात कोणताही पुरावा उपलब्ध नसल्याचे आयोगास स्पष्ट केले. या संदर्भात उपशिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प.बीड यांनी असा खुलासा केला की, नॉन टिचिंग फंड या नावाने कोणतेही अनुदान शिक्षण संस्थेस शासनाकडून कधीही दिले जात नाही, मात्र "वेतनेतर" या शीर्षाखाली काही अनुदान शिक्षण संस्थेला शासनाकडून पूर्वी प्राप्त होत होते. तथापि सन २००३-२००४ या आर्थिक वर्षापासून शासनाकडून अशाप्रकारचे अनुदान देण्याचे बंद झाले आहे.

या प्रकरणी संबंधित संस्थेकडे शिक्षणाधिकाऱ्याने अपिलार्थीचा मूळ अर्ज पाठविल्यानंतर संस्थेने अपिलार्थीस विहित मुदतीत त्यांच्याकडील उपलब्ध माहिती पुरविल्यामुळे व ही माहिती संबंधितांनी हेतुपूर्वक देण्याचे टाळल्याचे निःसंशयपणे सिध्द न झाल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर कोणत्याही कारवाईचे आदेश आयोग देत नाही.

उपरोक्त वस्तुस्थिती पाहता व अपिलार्थी त्यांच्या "संस्थेने अपूर्ण व चुकीची माहिती दिली" या अभिप्रायापृष्ठयर्थ कोणताही पुरावा आयोगाकडे सादर करु न शकल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला असून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

११)अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०१-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दत्तात्रय ज्ञानोबा घुमरे रा. पारगाव घुमरा ता.पाटोदा जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९३३
निर्णय दिनांक ०१-१२-२००८

१ श्री. मो. अन्वरुल्लाखान मो.बरकतुल्ला खान : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागी अभियंता,
विशेष प्रकल्प विभाग,नांदेड
२ जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
विशेष प्रकल्प मंडळ,औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.सुरेश तुकाराम राऊत, | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>विशेष प्रकल्प विभाग,नांदेड |
| २. | श्री.हेमंत संपतराव पगारे | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता,<br>विशेष प्रकल्प मंडळ,औरंगाबाद |

अपिलार्थी श्री. मो. अन्वरुल्लाखान मो.बरकतुल्ला खान उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०५.०३.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधित माहितीची मागणी त्यांच्या दि. २५.०९.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे केली असता, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३०.१०.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहितीपोटी रु.१४६४/- चा भरणा त्यांच्या कार्यालयाकडे करण्याचे कळविले. जन माहिती अधिकारी यांनी ३० दिवसांच्यानंतर हे पत्र पाठविल्याने, त्यांना विनामूल्य माहिती देय ठरते, असे वाटल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१४.११.२००६ रोजी अधिनियमातील कलम १९(१) मधील तरतुदीअन्वये प्रथम अपील केले असता, त्यांनी दि. ६.१२.२००६ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्वरित माहिती देण्याचे आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून दिलेल्या आदेशाप्रमाणे दि. ६.१२.२००६ रोजी त्यांना प्राप्त झालेली माहिती अपूर्ण व चुकीची आहे, त्यावरुन त्यांनी हे अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. ६.१२.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणीच्या वेळी झालेल्या निर्णयाप्रमाणे विनामूल्य माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये ही माहिती अपूर्ण व चुकीची असल्याचे म्हटले आहे, परंतु आज सुणावणीमध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण व बरोबर माहिती मिळाल्याचे कबूल केले आहे. त्यांचा या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विलंबाने दिलेल्या प्रतिसादाबद्दल मुद्दा असून संबंधितांना शास्ती लावण्याची त्यांनी आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगास विनंती केली.

उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे एकूण ६ मुद्यांवर माहिती मागितली होती. यापैकी मुद्दा क्र.६

शी संबंधित माहिती अपिलार्थीस देय होत नाही. कारण या मुद्याद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांचे उत्तर व मत अपेक्षिले आहे, जे माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन केले असता, अपिलार्थीस देय होत नाही, असे दिसून येते. मूळात या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २४.१०.२००६ रोजी अगर तत्पूर्वी अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भातील आपला निर्णय देणे अपेक्षित असताना त्यांनी आपला निर्णय दि. ३०.१०.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस पुरविण्यात येणाऱ्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याबाबत कळवून त्यांना दिला. जन माहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची आहे. उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विहित कालावधीपेक्षा ४८ दिवस इतक्या विलंबाने माहिती पुरविली असल्याने ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस निःसंशयपणे पात्र ठरत आहेत.

आज रोजी सुनावणीसाठी उपस्थित असलेल्या जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत करुन दिले की, ज्या वेळी अपिलार्थीने माहितीची मागणी केली, त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते, सबब वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे तत्कालीन जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरविण्यासाठी जबाबदार असल्याचे सिध्द झाल्याने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना, या प्रकरणी अपिलार्थीस ४८ दिवस इतक्या विलंबाने माहिती पुरविल्याबद्दल त्यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे ४८ दिवसांसाठी एकूण रु.१२,०००/-इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसांचे आत आयोगास सरळ सादर करावा.विहित मुदतीत खुलासा प्राप्त न झाल्यास त्यांना याबाबत काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरुन हेच आदेश कायम करण्यात येतील.

अपिलार्थीस आता संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून पूर्ण माहिती मिळाली असल्याने त्यांना माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१२) अपील मान्य करण्यात येत आहे.

१३) संबंधित जन माहिती अधिकारी यांना एकूण रु.१२,०००/-इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसांचे आत आयोगास सरळ सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०१-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मो. अन्वरुल्लाखान मो.बरकतुल्ला खान,९-४-४५५,कय्युम प्लॉटस्, मॅफ्कोजवळ, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, विशेष प्रकल्प उपविभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,विशेष प्रकल्प मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प अभियंता, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९३४
निर्णय दिनांक ०१-१२-२००८

१ श्रीमती प.गं.कोदरकर, : अपिलार्थी
औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
करमूल्य निर्धारण विभाग,
महानगरपालिका,औरंगाबाद
२ जन अपिलीय अधिकारी
महानगरपालिका,औरंगाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः वॉर्ड अधिकारी,
औरंगाबाद महानगरपालिका,वॉर्ड 'फ',
उल्कानगरी, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारीः करमूल्य निर्धारण अधिकारी,
महानगरपालिका,औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. महावीर माणिकचंद पाटणी | जन माहिती अधिकारी तथा वॉर्ड अधिकारी, औरंगाबाद महानगरपालिका,वॉर्ड 'फ', उल्कानगरी,औरंगाबाद |
| २. | श्री. तुकाराम गोपीचंद जाधव | जन अपिलीय अधिकारी तथा करमूल्य निर्धारण अधिकारी,महानगरपालिका,औरंगाबाद |

अपिलार्थी श्रीमती प.गं.कोदरकर यांचे प्रतिनिधी श्री.दे. म.अकोलकर उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १९.१०.२००६ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि.२७.४.२००६ रोजी पैसे भरणा करण्याचे सूचित केले तथापि किती पैसे भरावयाचे याची त्यांच्या दि. ६.५.२००६ रोजीच्या पत्राद्वारे त्यांनी विनंती करुनही, जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती कळविली नाही. या अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्याकडील दि. ४.४.२००६ रोजीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण १० मुद्यांद्वारे महानगरपालिका आयुक्तांकडील कर आकारणी निर्धारणासंदर्भात काही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २७.४.२००६ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस "आपल्या संदर्भीय पत्रानुसार माहीती या विभागात उपलब्द आहे.आपण अभिलेख कक्षात संपर्क साधुन देय असलेली रक्कम व टपालाचा खर्च रोख भरणा करावा जेणेकरुन सदर माहीती आपल्या विनंतीनुसार टपालाद्वारे पाठविण्यात येईल", असे कळविले. यावरुन अपिलार्थीने त्यांच्या दि. ६.५.२००६ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांना या संदर्भात निश्चितपणे किती रक्कम भरावयाची याची विचारणा केली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडून या पत्रास प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दि.२६.०६.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी

कोणतीही सुनावणी घेतली असल्याचे अथवा अपिलार्थीशी यासंदर्भात पत्रव्यवहार केल्याचे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती आवश्यक असल्याचे आयोगासमोर स्पष्ट केले. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचे कथित दि. ६.५.२००६ रोजीचे पत्र व त्यांचे दि. २६.६.२००६ रोजीचे अपील औरंगाबाद महानगरपालिकेकडे प्राप्त झालेले नाही. त्यामुळे अपिलार्थीस ते निश्चित शुल्काची रक्कम कळवू शकले नाहीत व अपिलार्थीच्या अपील अर्जावर त्यांना निर्णय घेता आला नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे संमिश्र स्वरुपात माहिती विचारली होती. या माहितीचे स्वरुप मोघम असे आहे. त्यांचा महानगरपालिकेने त्यांच्या घरासंदर्भात केलेल्या कर आकारणीवर आक्षेप असल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तयार असल्याचे आयोगास सांगितले व सदर माहिती आयोगास दाखविली. जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने केलेल्या माहितीच्या मागणीचे अवलोकन करता, या माहितीने अपिलार्थीची मूळ अर्जातील माहितीची मागणी सर्वसाधारणतः पूर्ण होऊ शकेल, असे आयोगास वाटते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे स्पष्ट केले की, ही माहिती त्यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थी यांच्या घरी स्वतः जाऊन देऊ केली असता, अपिलार्थीने सदर माहिती स्वीकृत करण्याचे नाकारले. अपिलार्थीने या संदर्भात आयोगाकडे असा खुलासा केला की, त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे या संदर्भात द्वितीय अपील केले असल्याने त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती स्वीकारली नाही. अपिलार्थी यांची ही कृती चुकीची असून जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य देऊ केलेली माहिती नाकारुन अपिलार्थीने स्वतःच्या मूळ अर्जाबाबत आयोगाच्या

मनात शंका निर्माण केली आहे. येथून पुढे अपिलार्थीने अशाप्रकारची कृती करु नये, अशी समज आयोगातर्फे त्यांना देण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली देय माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१४) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

१५) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे देय होणारी संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०१-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्रीमती प.गं.कोदरकर,द्वारा श्री. दे.म.अकोलकर,३३ (अ), 'रेणूका', छत्रपतीनगर, गारखेडा परिसर,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा वॉर्ड अधिकारी, औरंगाबाद महानगरपालिका,वॉर्ड 'फ', उल्कानगरी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा करमूल्य निर्धारण अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९३५
निर्णय दिनांक ०१-१२-२००८

१ श्री. बाबाराव परशराम कंधारे, : अपिलार्थी
रा. वाई (बा) ता.माहूर जि.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत वाई (बा)
ता.माहूर जि.नांदेड.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती माहूर,
जि.नांदेड.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित आहेत.

१. श्री. संजय दादाराव लेंडे, ग्रामसेवक, ग्रामपंचायत वाई (बा) ता.माहूर जि.नांदेड
२. श्री. सुरेश गणपत कांबळे गट विकास अधिकारी, पंचायत समिती माहूर, जि.नांदेड

अपिलार्थी श्री. बाबाराव परसराम कंधारे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २३.३.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याचे नमूद करुन आपल्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २९.११.२००६ रोजीच्या प्रथम अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून ग्राम पंचायत कार्यालय वाई (बा) यांच्या कार्यालयाशी संबंधित वेगवेगळया प्रकारची माहिती एकूण ४ मुद्यांद्वारे मागितली होती. या अर्जाद्वारे त्यांनी- "वर्ष २००१ ते २००६ पर्यंत आलेले एकूण घरकुल किती ? वाटप करण्यात आलेल्या सर्व घरकुल लाभार्थ्यांची नावे, घरकूल वाटपाचे निकष व वाटपादरम्यान त्यावेळीच्या ग्रा.पं.सरपंच किंवा सदस्य किंवा त्यांच्या नातेवाईकाचा लाभार्थ्यांमध्ये समावेश आहे का? किंवा नाही, २) दलित वस्तीसाठी आलेले समाजमंदिर ग्रा.पं. ने B.S.N.L.ला भाडयाने दिले. त्या ठरावाची, प्रोसिडींग बुकाची नक्कल द्यावी व भाडे किती आकारण्यात आले यासंबंधी सविस्तर माहिती द्यावी, ३) ग्रा.पं.शिक्षक क्वार्टरची भाडेवाढ रु.१५०/- वरुन थेट ५००/-रु. करण्यात आली याची प्रमुख कारणे व क्वार्टरसाठी (दुरुस्तीसाठी) करण्यात आलेल्या मागील दहा वर्षापासूनचा खर्च देण्यात यावा व भाडेवाढीच्या ठरावाची प्रोसिडिंग बुकातील नक्कल देण्यात यावी, ४) ग्रामपंचायत समोरील गाळे बांधकाम कोणत्या निधीतून होत आहे व आलेला एकूण निधी किती ? बांधकाम पूर्ण झाल्यावर गाळयाचे वाटप कुणाला अथवा कोणत्या तत्त्वावर किंवा कोणत्या निकषावर करण्यात येणार आहे,याबाबत सविस्तर माहीती विहीत नमुन्यात देण्यात यावी" - अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती

अधिकारी यांनी त्यांना अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २२.१.२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा निर्णय घेतल्याचे अथवा अपिलार्थीशी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्यावेळी विचाराधीन माहितीची मागणी केली होती, त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. श्री. आय.एन.फड (सध्या पंचायत समिती, माहूर येथे कार्यरत) हे जन माहिती अधिकारी म्हणून कार्यरत होते. ते या पदावर दि. १८.१.२००७ रोजी रुजू झाले त्यानंतर लगेचच अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी बहुतांश माहिती त्यांच्याकडे तयार करुन ही माहिती त्यांनी अपिलार्थीस दि. ३०.१.२००७ रोजी व्यक्तिशः देऊ केली होती, तथापि अपिलार्थी यांनी ही माहिती स्वीकारली नाही. अपिलार्थीच्या या कृतीसंदर्भात त्यांनी दि. ३०.१.२००७ रोजी गावातील पाच ग्रामस्थांच्या उपस्थितीत पंचनामा केला असून या पंचनाम्याची प्रत त्यांनी आयोगास सादर केली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी देऊ केलेल्या माहितीचे अवलोकन करता, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ शी संबंधित माहितीचा समावेश या माहितीमध्ये नसल्याचे दिसून येते. ही माहिती गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माहूर यांच्याकडे उपलब्ध असल्याचे गट विकास अधिकारी,पं.स.माहूर यांनीआयागासमोर कबूल केले. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असा युक्तिवाद केला की, ते या पदावर रुजू होण्यापूर्वी श्री. फड नावाचे ग्राम विकास अधिकारी या पदावर कार्यरत होते, त्यांनी स्वतःचा

कार्यभार जन माहिती अधिकारी यांच्याकडे पूर्ण स्वरुपात हस्तांतरित केला नसल्याने त्यांनी अपिलार्थीस देऊ केलेली माहिती काहीशी अपूरी आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.४ शी संबंधित माहिती त्यांनी गट विकास अधिकारी,पं.स.माहूर यांच्याकडून उपलब्ध करुन घेऊन अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांच्याकडे हे आदेश प्राप्त होताच, पंधरा दिवसांच्या आत तयार ठेवावी व त्याप्रमाणे अपिलार्थीस परत कळवून ही माहिती अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

या प्रकरणी सध्याचे कार्यरत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सकारात्मक प्रयत्न केला आहे, परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.फड यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जावर अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. तसेच त्यांनी आपला कार्यभार सध्याच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यवस्थितरित्या सोपविलेला नाही, अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०१-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.बाबाराव परशराम कंधारे, रा.वाई(बा) ता.माहूर जि.नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत वाई (बा) ता.माहूर जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माहूर जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९५६
निर्णय दिनांक ०२-१२-२००८

१ श्री. शिवदास दामोधर शहाणे, : अपिलार्थी
रा. अंबड जि.जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग,अंबड,
जि.जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
बांधकाम विभाग,
जिल्हा परिषद, जालना

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः उपविभागीय अभियंता,
जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग,अंबड,
जि.जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. पठाण रईस अहमद खान अली मोहमद खान | जन माहिती अधिकारी तथा प्र.उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, अंबड,जि.जालना |
| २. | श्री. शशीशेखर लक्ष्मीकांतराव शेळगावकर | जन अपिलीय अधिकारी तथा प्र.कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, जालना |

अपिलार्थी श्री. शिवदास दामोधर शहाणे हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २२.०३.२००७ रोजी नोंदवलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. १.७.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे "मोरे साहेब जे.ई.अंबडला आल्यापासून रोजगार हमीचे काम सी.आर.एस.आर.,मस्टर, इस्टीमेट, एल.ओ.सी. (L.O.C.) याची मस्टरची झेरॉक्स प्रती देण्यात यावी (मोरेचा गैरव्यवहार पडताळणी करिता) " ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती व या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्रयरेषेखालील असल्याचे नमूद करुन या संदर्भातील आवश्यक तो पुरावा जोडलेला आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १४.८.२००६ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी या अपिलाची सुनावणी दि. ५.९.२००६ रोजी ठेवली असता, या सुनावणी मध्ये जन माहिती अधिकारी यांनी दि. २५.९.२००६ पूर्वी माहिती देण्याचे आश्वासित केल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांच्यासमोर कबूल करुनही अपिलार्थीस मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन व आज रोजी आयोगासमोर उपस्थित असलेल्या जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या युक्तिवादावरुन असे सिध्द झाले आहे की, आजच्या सुनावणीपर्यंत देखिल जन माहिती अधिकारी यांनी

अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना पुरविलेली नाही. आज रोजी युक्तिवादाच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे उपलब्ध असल्याचे व ती अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे मान्य केले. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उपविभागीय पातळीवर ठेवण्यात येते, असे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले व त्यास उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांनी दुजोरा दिला, हे पाहता, अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न पुरविण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी हे निःसंशयपणे जबाबदार ठरत आहेत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती देणे फारसे जिकीरीचे अथवा अवघड होते, असे आयोगास वाटत नाही, मात्र अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती श्री. मोरे, कनिष्ठ अभियंता यांच्या कार्यकाळातील म्हणजे दि. १५.७.२००३ ते १.७.२००६ या कालावधीची होती. अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न देण्यासाठी उपस्थित जन माहिती अधिकारी हे कोणतेही समर्थन करु शकत नाहीत. यावरुन संबंधित (तत्कालीन) जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती प्राप्त होण्यापासून दीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांना, त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेल्या असमर्थनीय विलंबाबाबत विलंबाच्या प्रतिदिनी रु. २५०/- प्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत आयोगास सरळ सादर करावा, या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास हेच आदेश अंतिम करण्यात येतील.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती

अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. ही माहिती याच मुदतीमध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः उपलब्ध करुन घ्यावी. या मुदतीनंतर अपिलार्थीस सदर माहिती विनामूल्य देय राहणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३) संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेल्या असमर्थनीय विलंबाबाबत विलंबाच्या प्रतिदिनी रु. २५०/- प्रमाणे एकूण रु.२५०००/-इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत आयोगास सरळ सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शिवदास दामोधर शहाणे,मु.पो.नुतन वसाहत, अंबड ता.अंबड, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, अंबड जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९३७
निर्णय दिनांक ०२-१२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. विक्रम रंजितराव घुमरे,<br>रा.पारगाव घुमरा, ता.पाटोदा<br>जि.बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी, बीड,<br>जि.बीड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, बीड | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित आहेत.

| | |
|---|---|
| १. श्री. प्रविण धरमकर | जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी, बीड<br>जि.बीड |
| २. श्री. अरुण म्ह.कागदे<br>अव्वल कारकुन | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, बीड यांचे प्रतिनिधी |

अपिलार्थी श्री. विक्रम रंजितराव घुमरे हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.१०.२००७ रोजी नोंदवलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांनी दि.०७.८.२००७ रोजी माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथम अर्ज केल्यानंतर तो जन माहिती अधिकारी यांना दि. १३.८.२००७ रोजी प्राप्त झाल्याने ती माहिती अपिलार्थीस दि. १२.९.२००७ रोजी देय असताना देखील ती त्यांनी अपिलार्थीस दिली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. १ व २ शी संबंधित माहिती, दिली नाही व फक्त मुद्दा क्र. ३ शी माहिती वकीलामार्फत प्राप्त झाली व मुद्दा क्र. १ व २ ची माहिती माहिती अधिकारी यांनी जाणुनबुजून नाकारल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) प्रमाणे कार्यवाही करावी तसेच अपिलार्थीने, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीपोटीचे शुल्क रु.१००/- त्यांनी मनिऑर्डरने पाठविले असता जन माहिती अधिकारी यांनी ही मनिऑर्डर स्वीकारण्यास नकार दिला, त्यामुळे त्यांना विनामूल्य माहिती द्यावी, अशी विनंती केली आहे.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या दि. ७.८.२००७ रोजीच्या अर्जास त्यांनी दि. २३.८.२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन, या पत्राद्वारे त्यांनी अपिलार्थीस नियमाप्रमाणे आवश्यक ती फी त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे सूचित केले होते. त्यानंतर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अथक प्रयत्न करुन, दि. ९.१०.२००७ रोजी प्रत्यक्षतः अपिलार्थी यांच्या वकीलामार्फत उपलब्ध करुन दिली. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने याच प्रकरणामध्ये अधिनियमातील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २४.९.२००७ रोजी प्रथम अपील केले होते. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ९.१०.२००७ रोजी सुनावणी घेऊन या अपिलासंदर्भातील आपले आदेश दि. ११.१०.२००७ रोजी पारित केले असून या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीचे

प्रथम अपील फेटाळून लावले आहे. या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी असे नमूद केले आहे की, दि. ९.१०.२००७ रोजीच्या सुनावणीच्या दिवशी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती कोर्टासमक्ष अपिलार्थी यांच्या वकीलाना दिली आहे व वकीलांना सदर माहिती मिळाली म्हणून त्यांनी लेखी दिले असल्याने, अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले आहे.

उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. ०७.०८२००७ रोजीच्या प्रथम अर्जाद्वारे एकूण ३ मुद्यांवर माहिती मागितली आहे. त्यापैकी मुद्दा क्र.१ व ३ हे दोन मुद्दे सारखेच आहेत, या मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ९.१०.२००७ रोजी विनामूल्य दिलेली आहे.अपिलार्थीने त्यांच्या वरील अर्जातील मुद्दा क्र. २ द्वारे- नकलांसाठी अर्ज आल्यानंतर त्यांचा निपटारा किती दिवसात व कसा करावा- या बाबत शासन आदेशाची व नियमाची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा खुलासा करण्यात आला की, नक्कल मागताना निश्चितपणे कोणत्या पध्दतीचा अवलंब करावा, यासंदर्भात शासनाचे कोणतेही आदेश अथवा परिपत्रक (शासनाचे अथवा त्यांच्या वरिष्ठांकडून) आजपावेतो निर्गमित केले गेले नाही, त्यामुळे या मुद्यावरील माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील जी प्रमुख मागणी -फाईल क्र.६९/MLRC –App.४९ ची नक्कल - ही माहिती त्यांनी अपिलार्थीस विनामूल्य दिली असल्याने अपिलार्थीचा कार्यभाग साधला गेला आहे. अपिलार्थीने पाठविलेली मनिऑर्डर न स्वीकारण्याचे कारण जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी, सदरची मनिऑर्डर घेऊन पोस्टमन त्यांच्या कार्यालयात उपस्थित झाला नव्हता, असे सांगितले. अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या मनिऑर्डरच्या फॉर्मच्या

झेरॉक्स प्रतीचे अवलोकन करता असे दिसून येते की, सदर मनिऑर्डर घेऊन संबंधित पोस्टमन जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ८.९.२००७ रोजी गेला होता. दि. ८.९.२००७ रोजी दुसरा शनिवार असल्याने शासकीय कार्यालयाला सुटी होती, त्यामुळे त्यांचे कार्यालय बंद होते. पोस्टमनने मनिऑर्डरच्या फॉर्मवर "ऑफीस बंद"असा शेरा दिलेला आहे. याच प्रतीवर "घेण्यास इन्कार सबब परत", असा अभिप्राय दि. ११.९.२००७ रोजी संबंधित पोस्टमनने दिल्याचे दिसून येते. तथापि दि.११.९.२००७ रोजीच्या घडामोडीच्या संदर्भात उपस्थित जन माहिती अधिकारी यांना काहीही माहिती नसल्याचे त्यांनी आयोगास सांगितले.

उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २३.८.२००७ रोजी दिलेल्या पत्राचे अवलोकन करता, असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस निश्चित किती शुल्क भरावयाचे व या शुल्काच्या हिशोबाचा तपशील अपिलार्थीस दिला नाही.अधिनियमातील कलम ७(३)(क) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारांने मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविताना, या शुल्काचा हिशोब देणे अनिवार्य आहे.

जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः दि. ९.१०.२००७ रोजी अपिलार्थीस विनामूल्य माहिती दिली असल्याने, अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काच्या रकमेबाबत त्यांनी उपस्थित केलेला मुद्दा आयोग लक्षात घेत नाही. मात्र मुद्दा क्र. २ संदर्भात अपिलार्थीस माहिती न दिल्याने जन माहिती अधिकारी यांना आता असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ द्वारे विचारलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ३६ वर्षांपूर्वीची जुनी होती. याकरिता जन माहिती अधिकारी यांनी विशेष कष्ट घेऊन अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती

देण्यासाठी कोणत्याही टप्प्यावर नाकारल्याचे नि:संशयपणे सिध्द न झाल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विक्रम रंजितराव घुमरे, मु.पो.पारगाव (घुमरा), ता.पाटोदा जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, बीड जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९३८
निर्णय दिनांक ०२-१२-२००८

१ श्री. सदाशिव सटवा रायबोळे, : अपिलार्थी
मु.पो. किनवट जि.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्था.स्तर) विभाग,
नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
लघुपाटबंधारे (स्था.स्तर) मंडळ,
औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. कृष्णकुमार दत्तात्रय मसारे, उपकार्यकारी अभियंता | जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) विभाग, नांदेड यांचे प्रतिनिधी |
| २. | श्री. गुलाब नामदेव सोनवणे, सहायक अधीक्षक अभियंता | जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) मंडळ, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी |

अपिलार्थी श्री. सदाशिव सटवा रायबोळे हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०४.०५.२००७ रोजी नोंदवलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी निश्चित स्वरुपाची कोणतीही विनंती आयोगास केली नसून त्यांच्या अर्जाचे अवलोकन केले असता त्यांना, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्या दि. २६.१२.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन २००० ते २००६ या कालावधीतील काही माहिती मागवली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - तलावाच्या कामाचे नाव, गाव,तालुकासहीत सर्व प्रकारच्या तलावांचे कामाची व इतर कामाची माहिती, तसेच रोहयो योजनेत केलेल्या संपूर्ण जिल्हयाच्या तलावांची माहिती, तलावांच्या अंदाजित किमतीची माहिती, कुशल-अकुशल कामावर झालेल्या खर्चाची माहिती, सर्व तलावावरील उपस्थित मजूरांच्या हजेरीपटाची छायाप्रत- ही माहिती मागितली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्रय रेषेखालील व्यक्ती असल्याचे म्हटले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १५.१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे त्यांनी त्यांच्या अधिपत्त्याखालील सर्व उपअभियंता (उपविभाग नांदेड,कंधार,मुखेड,भोकर,नायगाव व किनवट) यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती परस्पर अपिलार्थीस देण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली आहे. यानंतर अपिलार्थीस संबंधितांकडून प्राप्त झालेली माहिती अपूरी असल्याचे वाटल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १२.२.२००७

रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ११.४.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भात आपले आदेश दि. २४.४.२००७ रोजी पारित केले आहेत. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ५ महिन्यापूर्वी विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. तर जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने माहिती मागितली, त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते, त्यावेळी या पदावर श्री. कोतापल्ले, कार्यकारी अभियंता हे जन माहिती अधिकारी म्हणून कार्यरत होते. सध्या ते नांदेड येथे उपविभागीय अभियंता या पदावर कार्यरत आहेत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ते अपिलार्थीस तीस दिवसांच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न पुरविण्याचे कोणतेही कारण ते आयोगास स्पष्ट करु शकले नाहीत.अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १२.२.२००७ रोजी प्रथम अपील केले असता, त्यांनी देखिल अधिनियमातील कलम १९(६) प्रमाणे कार्यवाही न करुन अपिलार्थीच्या अपील अर्जावर दि. ११.४.२००७ रोजी सुनावणी ठेवली व आपले आदेश दि. २४.४.२००७ रोजी पारित केले, या आदेशामध्ये देखील त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ५ महिन्यामध्ये माहिती देण्याचे सूचित केले. माहिती अधिकार अधिनियमाप्रमाणे माहिती देण्याकरिता विहित केलेला कालावधी पहाता जन अपिलीय अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी व त्यांच्या

अंमलबजावणीसंदर्भात आवश्यक तेवढे ज्ञान नसल्याचे येथे दिसून येते. उपरोक्त कागदपत्रांवरुन असे सिध्द झाले आहे की, आजतागायत अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी पुरविली नाही व सध्या कार्यरत असलेल्या जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती तीस दिवसाचे आत देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी जरी तीस दिवसांच्या आत ही माहिती देण्याचे कबूल केले असले तरी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी लावलेला विलंब दुर्लक्षित करण्यासारखा नाही. आज रोजी देखिल संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याकरिता कोणतीही कार्यवाही केल्याचे आयोगास त्यांच्या युक्तिवादावरुन आढळून येत नाही. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीपेक्षा जास्त कालावधीसाठी वंचित ठेवण्यासाठी जन माहिती अधिकारी हे नि:संशयपणे जबाबदार असल्याचे येथे दिसून येत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता अशाप्रकारची माहिती जलसंपदा विभागातील क्षेत्रीय अधिकाऱ्याकडून, रोहयो योजनेची अंमलबजावणी संदर्भात संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी, महसूल आयुक्त व शासनाकडे नियमितपणे सादर केली जाते. असे असताना देखिल ही माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणतीही अडचण असावी, असे आयोगास वाटत नाही. केवळ त्यांच्यातील ईच्छाशक्तीच्या अभावामुळे त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती न पुरवून स्वत:ला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरवले आहे. सबब सचिव, जलसंपदा यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवा नियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३) सचिव (जलसंपदा) यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सदाशिव सटवा रायबोळे,द्वारा ॲड.जी.एस.रायबोळे,सरस्वती कॉलनी,किनवट जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) नांदेड जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (जलसंपदा) मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५.. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपीले क्रमांक १९३९/२००७ व १९४०/२००७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९३९ व १९४०
निर्णय दिनांक ०२-१२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. गणेशसिंह प्रकाशसिंह रघुवंशी,<br>रा.सेलू जि.परभणी. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगरपरिषद, सेलू जि.परभणी | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपआयुक्त (सा.प्र.)<br>विभागीय आयुक्त कार्यालय,<br>औरंगाबाद. | | |

**निर्णय**

वरील दोन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक ०२.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | सौ. आशा पि. श्रीधरराव दिक्षीत<br>प्रमुख लिपीक | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद,<br>सेलू,जि.परभणी<br>(प्रतिनिधी) |
| २. | श्री. सोमनाथ गुंजाळ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपआयुक्त (सा.प्र.),<br>विभागीय आयुक्त कार्यालय,ओरंगाबाद |

अपिलार्थी श्री. गणेशसिंह प्रकाशसिंह रघुवंशी हे उपस्थित आहेत.

आज रोजी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे व मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांच्याकडे अनुक्रमे दि. ०२.०८.२००७ व दि.४.९.२००७ रोजी नोंदवलेली द्वितीय अपिले आयोगाच्या विचाराधीन आहेत.

सदर दोन्ही अपिले अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या दि. १३.३.२००७ रोजीच्या प्रथम अर्जाच्या संदर्भात केलेली आहेत.या दोनही अपिलांमध्ये मूळ माहितीची विनंती व त्यांना आवश्यक असलेली माहिती एकच असल्याने दोन्ही अपिलांची एकत्रित सुनावणी घेण्यात येत आहे.

अपिलार्थीच्या आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपील अर्जांचे अवलोकन करता, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः त्यांनी दि. १३.३.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"दि.२८-११-२००३ सर्वसाधारण सभे मध्ये विषय पत्रिकेमध्ये समाविष्ठ नसलेला विषय मिनिटबुकात लिहण्यात आल्या बाबत दि. २६-१२-२००३ रोजी नगरसेवकांनी तक्रार दिली होती त्या तक्रारीची प्रत तसेच जिल्हाधिकारी परभणी यांनी याबाबत काही कार्यवाही केलेली असल्यास त्याची माहितीची प्रत, तसेच दिलेल्या अर्जावर मुख्याधिकारी साहेबांनी काय कार्यवाही केली. सर्व माहिती संबंधित अधिकारी व मुख्याधिकारी यांच्या स्वाक्षरीत द्यावी",अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील एका

मुद्यावरील माहिती अपिलार्थीस पुरवली. सदर पत्र अपिलार्थीस दि. ५.४.२००७ रोजी प्राप्त झ ाल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती प्राप्त झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १६.५.२००७ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी या अपिलावर दि. ५.६.२००७ रोजी अंतिम सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. ४.७.२००७ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य करुन जन माहिती अधिकारी यांना सात दिवसांचे आत अपिलार्थीस माहिती पुरविण्याचे आदेशित केले.जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे द्वितीय अपिले दाखल केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये अपेक्षित केलेल्या माहितीमध्ये नगरसेवकांनी दि. २६.१२.२००३ रोजी दिलेल्या तक्रारीची प्रत, त्यावर जिल्हाधिकारी,परभणी यांनी केलेली कारवाई व मुख्याधिकारी, नगरपरिषद, सेलू यांनी केलेली कार्यवाही, अशा ३ मुद्यांचा समावेश होता. मात्र अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी आजतागायत दिलेल्या माहितीमध्ये फक्त नगरसेवकांच्या तक्रारीची प्रत व जिल्हाधिकारी,परभणी यांच्याकडून नगरपरिषद,सेलूकडे प्राप्त झालेले पत्र याचाच उल्लेख त्यांच्याकडील दि. ३.४.२००७ व १२.६.२००८ रोजीच्या पत्रामधील 'माहिती'च्या मजकूरात केलेला आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुख्याधिकारी, नगरपरिषद, सेलू यांनी काय कार्यवाही केली, या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस अद्याप प्राप्त झाली नसल्याचे या प्रकरणी दिसून येत आहे. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, नगरपरिषदेचा विषयाधीन ठराव जिल्हाधिकारी यांनी दि. ३०.१२.२००३ रोजी पुढील आदेशापर्यंत तहकुब ठेवला होता. जिल्हाधिकाऱ्यांच्या सदर

आदेशाची प्रत त्यांनी आयोगास दाखवली असून ती पाहता जिल्हाधिकाऱ्याने या आदेशाची प्रत नगरपरिषद, सेलू यांना देखिल अग्रेषित केल्याचे दिसून येते. ही प्रत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास सांगितले. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः अर्धवट माहिती दिल्याचे सिध्द होत आहे.हा सर्व घटनाक्रम विचारात घेतल्यास, अद्यापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस एका मुद्यावर माहिती दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत संपूर्ण माहिती न पुरवून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याचे सिध्द होत असून त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवा नियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भातील अधिनियमाद्वारे विहित केलेला कालावधी आता व्यपगत झाला असल्याने, जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जातील उर्वरित माहिती, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३) संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, म.रा.मुंबई यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गणेशसिंह प्रकाशसिंह रघुवंशी ,गणपती गल्ली, घडी टॉवरजवळ,सेलू, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, सेलू,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.),विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, म.रा., शासकीय परिवहन सेवा इमारत,३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग,सी-फेस,वरळी मुंबई-३० यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९४१
निर्णय दिनांक ०२-१२-२००८

१ श्री. चुन्नीलाल कन्हैयालाल पाटणी, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
पोलीस अधीक्षक कार्यालय,
जालना.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
विशेष पोलीस महानिरीक्षक,
औरंगाबाद.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः पोलीस उपअधीक्षक (गृह),
जालना

जन अपिलीय अधिकारीः पोलीस अधीक्षक,
जालना.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित आहेत.

१.श्री. सुभाष भानुदास जोशी जन माहिती अधिकारी तथा
(प्र) पोलीस उपअधीक्षक (गृह), जालना

अपिलार्थी चुन्नीलाल कन्हैयालाल पाटणी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०७.०७.२००६ रोजी नोंदणी झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी अशी विनंती केली आहे की, लोक आयुक्त, मुंबई यांनी पोलीस अधीक्षक, जालना यांना पोलीस ठाणे गोंदीच्या अधिकाऱ्यांना अपिलार्थीच्या दि. १९.६.२००४ च्या अर्जाप्रमाणे क्रि. प्रो. कोड कलम १४५ ते १४८ अंतर्गत गुन्हा नोंदवून कारवाई करण्याचे आदेश द्यावे. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (गृह),जालना यांनी कोणतेही वाजवी कारण नसताना विहित मुदतीत माहिती दिली नाही, कर्तव्यात कसूर केला व माहिती देण्यास टाळाटाळ, दिरंगाई केल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) प्रमाणे कारवाई करावी. तसेच जन अपिलीय अधिकारी व पोलीस अधीक्षक यांनी दि. १९.६.२००४ च्या अर्जाची चौकशी करण्यास विलंब लावल्याबद्दल त्यांच्यावर सेवानियम ॲक्टप्रमाणे कारवाई करण्याचे व त्याची नोंद सर्व्हीस बुकमध्ये घेण्याचे आदेश देण्याची व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे केलेल्या अपिलावर आपला निर्णय देताना पक्षपाती धोरण स्वीकारले व निर्णायक निर्णय/आदेश दिला नाही म्हणून त्यांच्यावर कारवाई करण्याची विनंती या अर्जामध्ये त्यांनी अंतिमतः आयोगास केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्या दि. २२.१२.२००५ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे-"पोलीस उपनिरीक्षक, पोलीस ठाणे, गोंदी तालुका अंबड जिल्हा जालना यांचे कार्यालयास श्री.माणिकचंद कपूरचंद चांदीवाल रा. धाकलगाव ता.अंबड जि.जालना यांच्याविरुध्द तक्रार अर्ज वरील संस्थेच्या जमीनीचे बांध नष्ट करणे व जमिनीत अतिक्रमण करणे व जमिनीचे अपहरण करणे यासाठी केलेल्या अर्जावर कारवाईबाबत."- अशी माहिती मागवली होती. अपिलार्थी यांच्या प्रथम अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलार्थीने पोलीस उपनिरीक्षक पोलीस ठाणे, गोंदी यांच्याकडे श्री.माणिकचंद कपूरचंद चांदीवाल यांच्याबाबत दि. १९.६.२००४ रोजी केलेल्या अर्जाद्वारे या जमिनीसंदर्भात

त्यांच्या धाकलगाव येथील गट क्र.९२ पोटहिस्सा क्र.२ मधील जमिन फेरफारसंदर्भात एक तक्रार केली होती. या तक्रारीवर पोलीस उपनिरीक्षक, गोंदी यांनी काय कार्यवाही केली, तसेच याच अर्जाची प्रत त्यांनी पोलीस उपअधीक्षक,जालना, विशेष पोलीस महानिरीक्षक,औरंगाबाद,सचिव(गृह),व उपमुख्यमंत्री यांच्याकडे दिली होती यावर काय कार्यवाही केली, असे नमूद केलेले आहे. यावरुन या कार्यवाहीबाबतची माहिती अपिलार्थीस आवश्यक असल्याचे दिसून येते. अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त इ ााल्यानंतर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दूरध्वनीद्वारे पोलीस ठाणे, गोंदी यांना सदर प्रकरणाबाबत माहिती घेऊन काय कार्यवाही केली, याची अपिलार्थीस माहिती देण्याबाबत सूचित केले. सदर सूचना प्राप्त झाल्यानंतर पोलीस निरीक्षक, गोंदी यांनी दि. १८.१.२००६ रोजीच्या पत्राद्वारे त्यांनी केलेली कार्यवाही अपिलार्थीस कळविली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार ज्या अधिकाऱ्याची जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्ती केली गेली आहे, त्या अधिकाऱ्याकडे अपील न करता, जन अपिलीय अधिकारी, पोलीस महासंचालक,म.रा.मुंबई कार्यालय यांच्याकडे दि. ७.२.२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, जालना यांनी त्यांच्या कार्यालयात दि. ०६.०५.२००६ रोजी या संदर्भातील कागदपत्रे अपिलार्थीस दि. ८.५.२००६ रोजी पाठविली आहेत. या पत्रामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. मात्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पाठविणे आवश्यक होते, असे त्यांचे अभिप्राय त्यांनी या पत्रामध्ये नमूद केले आहेत. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात म्हटल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांच्या मालकीच्या जमिनीची मोजणी करुन घेण्यासाठी, जेणेकरुन अपिलार्थीचा जमिनीचा हक्क निश्चित करता येईल, पोलीस स्टेशन गोंदी यांच्याकडून श्री वर्धमान बहुविध दान संस्थेच्या जमिनीची मोजणी करण्यासंदर्भात सूचना दिली होती. परंतु अपिलार्थी हे या संस्थेच्या मालकीच्या जमिनीची मोजणी करुन न घेता, इतर गैरअर्जदारांविरुध्द पोलीस स्टेशनने या जमिनीच्या सीमा निश्चितते संदर्भात कारवाई करण्याचे अपेक्षित करतात. जन माहिती अधिकारी यांच्या या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आज उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. २२.१२.२००५ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी स्वतः उत्तर दिलेले नाही, त्यांच्या सूचनेनुसार सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे गोंदी यांनी अपिलार्थीस दि. १८.१.२००६ रोजीच्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी नंतर त्यांच्याकडील दि. ७.३.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस पुरविली आहे. जन माहिती अधिकारी व सहायक पोलीस निरीक्षक, गोंदी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे दिसून येते. अपिलार्थीस मूळात, त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये म्हटल्याप्रमाणे पोलीस अधीक्षक, जालना यांच्याकडून पोलीस ठाणे, गोंदीच्या अधिकाऱ्यांना क्रि.पो.कलम १४५ ते १४८ अंतर्गत गुन्हा नोंदवून कार्यवाही करण्याचे आदेश आयोगाने देणे अपेक्षित आहे. तसेच त्यांनी केलेल्या तक्रार अर्जावर जिल्हा पोलीस अधीक्षक, जालना व त्यांचे अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची कार्यवाही न केल्याने त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याची अपेक्षा त्यांनी आयोगाकडे व्यक्त केली आहे. यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी त्यांचे

वैयक्तिक काम करुन घेण्यासाठी माहिती अधिकार अधिनियमाचा उपयोग करु इच्छित आहेत. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेली अशाप्रकारची विनंती मान्य करणे राज्य माहिती आयोगाच्या अधिकारितेच्या कक्षेत नसल्याने, अपिलार्थीची त्यांनी द्वितीय अपील अर्जाद्वारे केलेली सदर विनंती आयोगास मान्य करता येत नाही.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात असे आढळून आले आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथम प्रतिसाद देण्याऐवजी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील विषयाशी संबंधित सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे गोंदी ता.अंबड जि.जालना यांच्यामार्फत त्यांच्या दि. १८.१.२००६ रोजीच्या पत्राद्वारे तो दिला आहे, मात्र अपिलार्थीच्या दि. ७.२.२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, जालना यांच्याकडून, सुनावणी घेण्यासाठी अधिनियमातील कलम १९(६) मध्ये विहित केलेल्या मुदतीमध्ये सुनावणी न घेतली जाऊन, कलम १९(६) चा भंग झाल्याचे दिसून येते. अपिलार्थीने त्यांचे प्रथम अपील, मूळात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचा आवश्यक तो अभ्यास न करुन वेगळया प्राधिकारणाकडे केले असल्याने हा कालावधी लागला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदाराने मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या सहीने अर्जदारास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत त्यांनी देणे अभिप्रेत होते, तथापि या प्रकरणी अपिलार्थीस विहित मुदतीत ही माहिती ज्या कार्यालयाच्या ताब्यात होती, त्या कार्यालयाच्या प्रमुखाने जे माहिती अधिकारी म्हणून नियुक्त केले गेलेले नाहीत,त्यांच्या सहीने अपिलार्थीस पुरविली आहे व ही माहिती प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने दिली आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, येथून पुढे त्यांनी माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त

होणाऱ्या प्रत्येक अर्जास माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सतर्कतेने कार्यवाही करावी.

या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य प्राप्त झालेली आहे. जन माहिती अधिकारी अथवा पोलीस अधीक्षक कार्यालय यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात अपिलार्थीस माहिती देण्याचे हेतुपूर्वक टाळले असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याचे कोणतेही आदेश नाहीत. तसेच अपिलार्थीने द्वितीय अपील अर्जामध्ये अपेक्षित केलेली उर्वरित कार्यवाही करण्याची राज्य माहिती आयोगाला अधिकारिता नसल्याने अपिलार्थी यांचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. चुन्नीलाल कन्हैयालाल पाटणी,द्वारा डॉ.सी.के.पाटणी,यश सुपर मार्केट, तिसरी मंजील सराफारोड, औरंगाबाद-४३१००१

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (गृह), जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक (ग्रामीण), जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९४२
निर्णय दिनांक ०२-१२-२००८

१ सौ. रेखा मर्दानसिंग पाकळ : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपअभियंता,
मुख्य अभियंता यांचे कार्यालय,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,प्रादेशिक विभाग,
अमरावती.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,प्रादेशिक विभाग,
अमरावती.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (बांधकाम),
बुलढाणा

जन अपिलीय अधिकारीः अधीक्षक अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ,
अकोला.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित आहेत.

१.श्री. वसंत मांगोजी सरकटे जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, (बांधकाम)बुलढाणा

२. श्री. देवेंद्र चंपतलाल लांडगे जन अपिलीय अधिकारी तथा

अधीक्षक अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, अकोला.

अपिलार्थी सौ. रेखा मर्दानसिंग पाकळ व त्यांचे पती श्री. मर्दानसिंग पाकळ उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०७.११.२००६ रोजी नोंदणी झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना चुकीची, अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याचे नमूद करुन जन माहिती अधिकारी हे स्वतः माहिती देण्यास टाळाटाळ करीत आहे, त्यांनी अनावश्यक कागदपत्रे पुरविल्यामुळे रु. ३०/- अधिकचा भूर्दंड पडला आहे, तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी मागितलेली माहिती न देता त्यांचे अपील अन्य अधिकाऱ्याकडे वर्ग करुन त्यांना आवश्यक असलेली माहिती देण्यास टाळाटाळ केली आहे, असे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १६.६.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांचे पती, श्री. एस.एम.पाकळ, शाखा अभियंता या पदावर ते बुलढाणा व चिखली विभागात कार्यरत असताना त्यांनी केलेल्या सोळा महिन्यांच्या मंजूर प्रवासभत्ता देयकासंदर्भात एकूण सहा मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. सदर अर्ज संबंधित जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीस त्यांनी सरळ माहिती न देता अपिलार्थीच्या मूळ अर्जाच्या संदर्भात असलेली माहिती त्यांनी दि. ३०.६.२००६ रोजीच्या पत्राद्वारे मुख्य अभियंता,म.जी.प्रा.अमरावती प्रादेशिक विभाग,अमरावती यांच्याकडे पाठविली. मुख्य

अभियंता,म.जी.प्रा.अमरावती प्रादेशिक विभाग,अमरावती यांनी त्यानंतर अपिलार्थीस त्यांच्या दि. ४.७.२००६ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१५५/- त्यांना भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने दि. ७.७.२००६ रोजी आवश्यक त्या शुल्काचा भरणा केल्यानंतर दि. १०.८.२००६ रोजी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) नुसार दि. ३०.८.२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी, या संदर्भात दि. १३.११.२००६ रोजी आपले आदेश पारित करुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीस सहमती दर्शविली व जन माहिती अधिकारी यांनी कसूर केला नसल्याचे अनुमान काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी दि. १६.६.२००६ रोजी माहितीसाठीचा प्रथम अर्ज केला होता. तथापि अपिलार्थीने सदर अर्ज चुकीच्या प्राधिकरणाकडे केल्याने अपिलार्थीस ही माहिती दि.२०.७.२००६ (अधिनियमातील कलम ६(३)(एक) प्रमाणे) रोजी देय ठरत होती.अपिलार्थीच्या दि. १६.६.२००६ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी (जे या प्रकरणी जन माहिती अधिकारी म्हणून नेमले गेले आहेत) यांच्याकडून दि. ४.७.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविण्यात आले. अपिलार्थीस लिहिलेल्या दि. ४.७.२००६ रोजीच्या पत्राचे अवलोकन केले

असता, यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(३)(क) प्रमाणे आवश्यक असलेला तपशीलवार हिशोब कळविला नसल्याचे दिसून येते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे त्यांचे पती श्री.एम.एस.पाकळ यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांची प्रवासभत्ता देयके ज्या नियमानुसार दप्तरी दाखल करण्यात आली, त्या नियमाची प्रत जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पुरविली नाही, तसेच मुख्य अभियंता,म.जीवन प्राधिकरण,अमरावती यांच्या दि. २०.१२.१९९९ च्या पत्रावर जन माहिती अधिकारी यांनी काय कार्यवाही केली याची माहिती त्यांना हवी आहे. तसेच त्यांनी दाखल केलेली प्रवासभत्ता देयके व्याजासह अदा करण्यामध्ये जन माहिती अधिकारी यांना निश्चित काय अडचण आहे, याबाबतची माहिती, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आजही आवश्यक आहे. तसेच त्यांच्या १६ महिन्याच्या प्रवासभता देयकांपैकी काही देयके गहाळ करणाऱ्यांवर काय कारवाई केली, याची माहिती त्यांना आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने दाखल केलेल्या १६ महिन्याच्या देयकांपैकी आठ देयके तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी दप्तरी दाखल केली आहेत. कार्यकारी अभियंता यांनी अशाप्रकारची कार्यवाही करण्याचे कोणतेही नियम अस्तित्त्वात नाहीत. अपिलार्थीच्या उर्वरित ८ महिन्याच्या प्रवासभत्ता देयकांपैकी ७ महिन्याची प्रवासभत्ता देयके त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाहीत मात्र एका महिन्याचे प्रवासभत्ता देयक त्यांच्या कार्यालयाकडे जमा झाले असे त्यांना वाटत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र. २, ३ व ६ वगळता, अपिलार्थीस देय ठरत आहे. अपिलार्थीने त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र. २ द्वारे त्यांनी, विहित मुदतीत सादर केलेली प्रवासभत्ता देयके नियमबाहय पध्दतीने दप्तरी दाखल करण्यास जबाबदार कोण, अशी प्रश्नार्थक माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारली आहे. तर अपिलार्थीने त्यांच्या

मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ द्वारे मुख्य अभियंता,म.जीवन प्राधिकरण,अमरावती कार्यालयाच्या दि. २०.१२.१९९९ च्या पत्रामधील सूचनेचे पालन न केल्यामुळे संबंधितांवर काय कारवाई केली आहे, अशी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितली आहे. परंतु आज युक्तिवादामध्ये त्यांनी मुख्य अभियंता यांच्या दि. २०.१२.१९९९ च्या पत्राबाबत निश्चित कोणती कार्यवाही केली गेली आहे, याबाबतची माहिती त्यांना अपेक्षित असल्याचे स्पष्ट केले. अपिलार्थीने माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती व आज केलेल्या युक्तिवादातील अपेक्षित माहिती यामध्ये विसंगती दिसून येते तसेच या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी संबंधितांवर कोणतीही कारवाई केली नसल्याचे त्यांनी आज युक्तिवादामध्ये स्पष्ट केले आहे. त्याचबरोबर अपिलार्थी यांची गहाळ झालेली प्रवासभत्ता देयकांसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद आयोगास मान्य नाही. अपिलार्थीने जर त्यांची प्रस्तावित देयके जन माहिती अधिकारी अथवा त्यांची अधिपत्त्याखालील इतर कार्यालयात सादर केली असतील तर त्या प्रवासभत्ता देयकांबाबत संबंधितांना आपले निर्णय लेखी स्वरुपात देणे जरुरीचे आहे. तथापि या प्रकरणी अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. या प्रकरणी मुख्य अभियंता, जीवन प्राधिकरण मंडळ, अमरावती यांनी या प्रकरणामध्ये या टप्प्यावर वैयक्तिक लक्ष घालणे गरजेचे आहे, असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मुद्दा क्र. ४ चे संदर्भात कोणतीही ठोस माहिती न देता, "वरिष्ठ कार्यालयाच्या सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल", असे अपिलार्थीस आश्वासित केले आहे. तथापि अपिलार्थीची प्रवासभत्ता देयके मंजूर करण्यात कोणत्या नियमांचा अडसर होता, त्या नियमांचा त्यांनी उल्लेख केलेला नाही. यावरुन उपरोक्त मुद्दा क्र.४ शी संबंधित माहिती दिलेली नाही, असे दिसून येत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या मूळ

अर्जातील मुद्दा क्र. ४ च्या संदर्भात अपिलार्थीस हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसांच्या आत संपूर्ण माहिती विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती ही अपिलार्थी यांच्या मूळ अर्जाशी काहीशी सुसंगत असल्याचे दिसून येते. मुद्दा क्र. ६ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून पाठविलेल्या दि. ४.७.२००६ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापोटी लागणाऱ्या शुल्काचा तपशील न देऊन अधिनियमातील कलम ७(३)(क) चा भंग केल्यामुळे, अपिलार्थीकडून त्यांनी माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.१५५/- त्यांना अपिलार्थीस परत करावे लागेल. सदर शुल्क त्यांनी हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसांच्या आत अपिलार्थीस परत करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१)अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या मूळ माहितीच्याअर्जातील मुद्दा क्र. ४ शी संबंधित संपूर्ण माहिती, अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीकडून माहितीपोटी स्वीकारलेले शुल्क रु.१५५/- त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत परत करावे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ.रेखा मर्दानसिंग पाकळ, इ-२०१,तुलसी आर्केड,कॅनाट प्लेस,सिडको,औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (बांधकाम),बुलढाणा यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (बांधकाम), अकोला यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९५३
निर्णय दिनांक ०२-१२-२००८

१ श्री. गजानन संतुकराव देशमुख, : अपिलार्थी
मु.पो.पिंपळगाव (रेणुकाई),
ता.भोकरदन, जि.जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उप अभियंता, जि.प.सिंचन उपविभाग,अंबड,
जि.जालना
२ जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे विभाग,जिल्हा परिषद,
जालना.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. बाळासाहेब नाथाजी सानप | जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जि.प.सिंचन उपविभाग,अंबड, जि.जालना |
| २. | श्री. उदय दिनकरराव पुराणकर | जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग,जिल्हा परिषद, जालना. |

अपिलार्थी श्री. गजानन संतुकराव देशमुख हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम

१९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २५.७.२००७ रोजी नोंदवलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नसल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले, तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यावर कोणत्याही स्वरुपात सुनावणी ठेवली नसल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २८.३.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून- "शाखा अभियंता, सानप, ठाकूर व कांबळे यांनी सन २००५-२००६, २००६-२००७ या कालावधीत संपूर्ण ग्रामीण रोजगार अंतर्गत कोल्हापूर बंधारा दुरुस्ती, मजूर उपस्थिती, गहू, कुपने तपशील व गावनिहाय यादी" - ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २९.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा त्यांना बोध होत नसल्याचे अपिलार्थीस कळविले. सदर पत्र जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून अपिलार्थीस पाठविल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केलेल्या जावक नोंदवहीवरुन सिध्द होत आहे, तथापि हे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. त्यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ८.५.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.७.२००७ रोजी सुनावणी घेतली, असे जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे आहे. तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, ते या सुनावणीस कधीही उपस्थित नव्हते. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. ३१.७.२००७ रोजीच्या पत्रामध्ये असे

कळविले आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती कोणत्या स्वरुपातील आहे, हे त्यांच्या अर्जावरुन कळून येत नाही, त्यावरुन त्यांनी अपिलार्थीस दि. ६.८.२००७ रोजी जिल्हा परिषद लघुपाटबंधारे उपविभाग, अंबड जि.जालना यांच्या कार्यालयात हजर राहून माहिती उपलब्ध करुन घेण्याचे सूचित केले. तथापि हे पत्र देखिल अपिलार्थीस मिळाले नसल्याचे अपिलार्थी यांनी आयोगास सांगितले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी माहितीसाठी केलेल्या मूळ अर्जाच्या संदर्भात त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारचा लेखी प्रतिसाद प्राप्त झाला नाही, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही. जर ते सुनावणीस हजर राहिले असते तर, त्यांची सही जन अपिलीय अधिकारी यांच्या रोजनाम्यावर असणे आवश्यक होते. त्यांच्यामते जन माहिती अधिकारी हे जी योजना राबवित आहेत, त्या योजनेमध्ये मजूरांना अन्नधान्य वाटपाचा समावेश आहे, संबंधित मजूरांना धान्याचे कुपनाच्या स्वरुपात वाटप केले जाते, त्या कुपन वाटपासंदर्भात त्यांना माहिती हवी आहे. त्यामुळे उपस्थित मजूरांना ज्या मस्टरद्वारे जन माहिती अधिकारी यांनी कुपन पुरविली आहेत, त्या मस्टरच्या झेरॉक्स प्रती त्यांना हव्या आहेत. अपिलार्थीस दि. ८.५.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर अधिनियमातील विहित मुदतीत सुनावणी न घेण्याचे कारण जन अपिलीय अधिकारी यांना विचारले असता, ते याबाबत आयोगास कोणताही युक्तिवाद करुन शकले नाहीत.

वरील घटनाक्रम,दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीच्या मांडणी स्पष्टपणे न केल्याने अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यास वंचित राहिले आहेत.अपिलार्थीस संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत केल्या गेलेल्या कामाच्या हजेरी पत्रकाच्या सत्यप्रती हव्या असल्याचे आयोगाकडे त्यांनी केलेल्या युक्तिवादावरुन समजून

येते. तथापि त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मागविताना "मजूर हजेरी, गहु कुपन तपशील व गाव निहाय यादी" अशा मोघम स्वरुपात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितल्याचे दिसून येते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप अत्यंत मोघम असल्याने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत नाही. मात्र अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीपैकी (कामाची) 'गावनिहाय यादी' ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय ठरते. ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज रोजी उपलब्ध असल्याचे त्यांनी आयोगास सांगितले आहे, हे पाहता, संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी आणि अपिलार्थी यांच्यातील झालेला पत्रव्यवहार योग्य तऱ्हेने झाला नसल्याने पत्रव्यवहाराची नोंद योग्य तऱ्हेने ठेवली गेली नाही. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या प्रथम अपील अर्जाच्या संदर्भात दिलेल्या दि. ३१.७.२००७ रोजीच्या आदेशाचे अवलोकन करता सुनावणीसंदर्भात कशातऱ्हेने आदेश देऊ नयेत, याचा उत्तम नमुना दिसून येतो व या आदेशामध्ये त्यांनी सुनावणीच्या वेळी कोण उपस्थित होते, दोन्ही बाजूंनी आपली बाजू काय मांडली, याचा काहीही उल्लेख न करता अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात त्यांनी एक पत्र लिहून संबंधित उपविभागाकडे उपस्थित राहून माहिती उपलब्ध करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांची ही कृती चुकीची असून यापुढे अधिनियमातील विहित तरतुदीद्वारे दाखल होणाऱ्या प्रत्येक अपिलावर योग्य प्रकारे निर्णय घ्यावा, असे त्यांना या टप्प्यावर सूचित करण्यात येते.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली तलावांच्या यादीची संपूर्ण माहिती, त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गजानन संतुकराव देशमुख,मु.पो.पिंपळगाव(रेणुकाई),ता.भोकरदन, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जि.प.सिंचन उपविभाग,अंबड,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९५४
निर्णय दिनांक ०२-१२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. सुधीर नानाभाऊ शरणांगत,<br>मु.पो.मंगरुळ, ता.घनसावंगी, जि.जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र. २, जालना | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ,<br>औरंगाबाद. | | |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित आहेत.

| | |
|---|---|
| १. श्री. देविदास दिंगबर चाटे | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, जालना |
| २. श्री. बलभीम रामभाऊ देवने<br>सहायक अधीक्षक अभियंता | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ,औरंगाबाद<br>(यांचे प्रतिनिधी) |

अपिलार्थी श्री. सुधीर नानाभाऊ शरणांगत हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०५.०६.२००७ रोजी नोंदणी झालेले

द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी कोणतीही विशिष्ट अशी विनंती आयोगास केली नसून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील त्यांनी या अपील अर्जामध्ये नमूद केला आहे. या अर्जामध्ये त्यांना 'आवश्यक असलेल्या माहितीचा विषय आणि स्वरुप' या सदरापुढे २००५ ते २००७ या कालावधीत काम वाटप संस्थेने वाटप केलेल्या कामांच्या मोजमाप पुस्तिकांची झेरॉक्स प्रती, कामावरील मजूरांच्या याद्या व काम करणाऱ्या संस्थांच्या याद्या-ही माहिती त्यांना आवश्यक असल्याचे दिसून येते. आज रोजी आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २२.१.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००५ ते २००७ या कालावधीशी संबंधित एकूण ३८ कामांच्या सविस्तर माहिती बरोबरच सर्व कामांच्या सन २००५ ते २००७ मधील मजूरांची व संस्थांची यादी अशी विस्तृत स्वरुपातील माहिती अपेक्षिली होती. तसेच या अर्जासोबत अपिलार्थीने ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याबाबतचे प्रमाणपत्र प्रथम अर्जासोबत जोडले होते. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १३.२.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मोठया प्रमाणात असल्याने, अधिनियमातील कलम ७(९) च्या तरतुदीन्वये अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) नुसार दि. २०.३.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २७.४.२००७ रोजी सुनावणी ठेऊन दि. ११.५.२००७ रोजीच्या आदेशान्वये अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले, त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेताना त्यांना बोलावले नव्हते.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती विस्तृत प्रमाणात होती. अपिलार्थीस द्यावयाच्या माहितीच्या पृष्ठांची संख्या अंदाजे ७००० इतकी आहे. संबंधित माहिती व्यापक असल्यामुळे,ती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांच्या कार्यालयाची साधनसामग्री मोठया प्रमाणात वळवावी लागत होती, त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस ही माहिती दिली नाही. अपिलार्थीने मागणी केल्यास, या संदर्भातील अभिलेखे, ते अपिलार्थीस तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्यास तयार आहेत.

अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दोन वर्षाच्या कालावधीतील एकूण ३८ कामांच्या संदर्भात त्या कामाची मोजमापपुस्तिका, मजूरांची यादी, बीलाच्या झेरॉक्स प्रती व काम करणाऱ्या संस्थांची यादी अशी मोठी व्याप्ती असलेली माहिती मागितली आहे, यात शंका नाही. अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस ही माहिती देण्याची जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयाची साधनसामग्री मोठया प्रमाणात वळवावी लागत असल्याचा त्यांचा दावा, अपिलार्थीस पुरविण्यात येणाऱ्या संभाव्य पृष्ठांची संख्या लक्षात घेता योग्य आहे, असे आयोगाचे मत आहे. तसेच अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस पाहणीसाठी कधीही उपलब्ध करुन देण्यास तयार आहेत, हे पाहता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जाऊन संबंधित अभिलेख्यांची तपासणी करणे, जन माहिती अधिकारी व अपिलार्थी यांच्या दृष्टीने सोयीचे होईल, असे आयोगास वाटते. सबब अपिलार्थी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील त्यांना आवश्यक असलेल्या

अभिलेख्यांची स्वतः तपासणी करावी व त्यातील त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घ्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप मोठे असल्याचे व त्यांना ही माहिती पुरविण्याप्रीत्यर्थ जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयाची आवश्यक ती साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी  लागणार असल्याची आयोगाची खात्री पटल्याने अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१)अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक :    ०२-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुधीर नानाभाऊ शरणांगत, मु.पो.मंगरुळ ता.घनसांवगी,जि.जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२,जालना  यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९५५
निर्णय दिनांक ०२-१२-२००८

१ श्री. सुधीर नानाभाऊ शरणांगत, : अपिलार्थी
मु.पो.मंगरुळ, ता.घनसावंगी, जि.जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर,
जि.जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी
जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित आहेत.

| | |
|---|---|
| १. श्री. उमेश रमाकांतराव घाटगे | जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर, जि. जालना |
| २. श्री. संजिव गोवर्धन पडवळ | जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, जालना |

अपिलार्थी श्री. सुधीर नानाभाऊ शरणांगत हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०५.०६.२००७ रोजी नोंदवलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांच्या विभागामार्फत केल्या गेलेल्या रो.ह.यो.कामांची यादी, मजूरांची यादी, बीलाच्या पावत्यांच्या झेरॉक्स प्रती, मोजमाप पुस्तिकांच्या झेरॉक्स प्रती,तालुक्याचे प्राप्त वार्षिक बजेट, वार्षिक बजेट किती खर्च झाले,किती शिल्लक आहे,कोणकोणत्या योजना राबविण्यात आल्या -ही माहिती अपेक्षित असल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्या दि. २४.१.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे - त्यांच्या विभागामार्फत सन २००५ ते २००७ या कालावधीमध्ये झालेल्या रोजगार हमी योजनेच्या कामांची यादी व कामावरील मजूरांच्या याद्या,बिले फाडलेल्या पावत्यांच्या झेरॉक्स कॉपीज, मोजमाप पुस्तिकांची झेरॉक्स व विभागाअंतर्गत येणाऱ्या तालुक्याच्या वार्षिक बजेटची प्रत, वार्षिक बजेट किती खर्च झाले व शिल्लक किती आहे, उपविभागात कोणकोणत्या योजना राबविण्यात आल्या त्यांच्या तालुकानिहाय याद्या, कृषि विस्तार अनुदान व खर्च, ठिबक सिंचन अनुदान वाटपाची माहिती, पॉलीहाऊस अनुदान वाटप, ईतर वेगवेगळया प्रकारचे अनुदान - या योजनांसंदर्भात माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ६.२.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. जन माहिती अधिकारी यांनी सदर पत्र तालुका कृषि अधिकारी परतूर,मंठा,अंबड व घनसावंगी यांना उद्देशून लिहिलेले असून, या पत्रामध्ये त्यांनी सर्व तालुका कृषि अधिकारी यांच्याकडून माहिती मागविल्याचे दिसून येते व या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिल्याचेही दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २३.३.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे अथवा या संदर्भात अपिलार्थीशी

कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केल्याचे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व तिची व्याप्ती पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर या टप्प्यावर प्रथमतः सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते, सबब जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २३.३.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन त्यावर आपला निर्णय पारित करावा. सदर निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास अपिलार्थी अधिनियमातील कलम १९(३) नुसार राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.२३.३.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत सुनावणी घेऊन त्यावर आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुधीर नानाभाऊ शरणांगत, मु.पो. मंगरुळ, ता.घनसावंगी जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर जि.जालना यांना

या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९५१
निर्णय दिनांक ०३-१२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. हनुमंत वसंतराव देशमुख,<br>रा.परळी वैजनाथ जि.बीड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>वालचंद महाविद्यालय, सोलापूर. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्राचार्य, वालचंद महाविद्यालय, सोलापूर | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे सर्व अनुपस्थित आहेत.

आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, दि. १९.११.२००८ रोजीच्या सूचनापत्राव्यतिरिक्त राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयातून संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातील अधीक्षक श्री. कस्तुरकर यांच्याशी दि. २८.११.२००८ रोजी दुपारी १२.५० वा दूरध्वनीवर संपर्क करुन आज रोजीच्या सुनावणीसाठी हजर राहण्यासंबंधी सूचना देऊनही जन माहिती व अपिलीय अधिकारी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत, याची आयोगाने सखेद नोंद घेतली असून त्यांनी आयोगाच्या सुनावणीस इतःपर आयोगाच्या पूर्वपरवानगीशिवाय गैरहजर राहू नये, अशी त्यांना सक्त ताकीद देण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १४.०३.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. ६.१.२००७ रोजीच्या पत्रानुसार दिलेली माहिती अपूर्ण, त्रोटक व चुकीची असून ही माहिती सत्यप्रतीच्या स्वरुपात नाही. तसेच हे पत्र प्राचार्यांच्या स्वाक्षरीने प्राप्त झाले असून त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या अपील अर्जावर विहित कालावधी ओलांडून गेल्यानंतरही कोणताही निर्णय दिला नाही. त्यांच्या या कृतिद्वारे त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ ची पायमल्ली केली आहे व अधिनियमाची क्रुर चेष्टा करुन कायद्याचा विश्वासघात केला आहे. या अपील अर्जासोबत त्यांनी त्यांच्या माहितीचा दि. ८.१२.२००६ रोजीच्या मूळ अर्जाची व दि. २७.१.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपीलाची प्रत जोडली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ८.१२.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ६ मुद्यांवर, दि. ३० जानेवारी, २००० रोजी समाजकार्य विषयाच्या अधिव्याख्याता या पदाकरिता सेट/नेट समाजकार्य उत्तीर्ण उमेदवारांच्या निवडीबाबत व निवड समितीने दिलेल्या अभिप्राय अहवालाची प्रत, यासंदर्भात काही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती २००० ते दि. ८.१२.२००६ या कालावधीतील होती.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ६.१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या मूळ अर्जातील सहाही मुद्यांवर माहिती दिलेली

आहे. अपिलार्थीच्या मते ही माहिती अपूर्ण, त्रोटक, चुकीची असून ती सत्यप्रत न करता त्यांना प्राचार्यांच्या सहीने पुरविण्यात आली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती साक्षांकित स्वरुपात मागितल्याचे दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती त्यांच्या मूळ अर्जातील माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे दिसून येते. अपिलार्थीस ही माहिती त्रोटक व चुकीची का वाटते, याचे स्पष्टीकरण देण्यासाठी अपिलार्थी हे आज आयोगासमोर उपस्थित नाहीत. विचाराधीन कागदपत्रावरुन, असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत दिली आहे. त्यांनी दिलेली माहिती अपिलार्थीस कोणत्या मुद्यावर त्रोटक व चुकीची वाटते, हे अपिलार्थी सुनावणीस गैरहजर असल्यामुळे, आयोगास कळू शकत नाही.अशा परिस्थितीत अपिलार्थीच्या विचाराधीन द्वितीय अपील अर्जावर वेगळयाने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१)अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०३-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. हनुमंत वसंतराव देशमुख,द्वारा कनकदंडे निवास,सरकारवाडा अंबावेस,

मु.पो.ता.परळी वैजनाथ, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी वालचंद कला व विज्ञान महाविद्यालय,वालचंद-हिराचंद मार्ग,अशोक चौक, सोलापूर-४१३ ००६ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, वालचंद कला व विज्ञान महाविद्यालय,वालचंद-हिराचंद मार्ग,अशोक चौक, सोलापूर-४१३ ००६ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १९४८/२००७ व १९४९/००७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१९४८ व १९४९

निर्णय दिनांक ०३-१२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मनोहर माधवराव थोरात,<br>रा. नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा),<br>तहसील कार्यालय, लोहा,<br>जि.नांदेड. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, लोहा,<br>जि.नांदेड. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. ०३.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. देशमुख आहेमद मोहियोद्दीन, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) तहसील कार्यालय, लोहा, जि.नांदेड, जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, लोहा, जि.नांदेड यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. मनोहर माधवराव थोरात (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २३.०४.२००७ रोजी नोंदणी झालेली द्वितीय अपिले क्र. १९४८/ २००७ व १९४९/२००७ आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर आहेत. सुनावणीच्या सुरुवातीसच संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) श्री. आहेमद मोहिनोद्दीन देशमुख हे हजर आहेत. त्यांनी अपिलार्थी यांच्या दि. २०.११.२००६ रोजी केलेल्या दोन वेगवेगळ्या अर्जासंदर्भातील माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याचा संदर्भ आयोगासमोर दाखल केला असून सदर संदर्भ म्हणजे, तहसीलदार, लोहा, यांनी अपिलार्थीस दि. २१.५.२००७ रोजी लिहिलेले एक पत्र दिले असून, या पत्राद्वारे त्यांनी अपिलार्थीस दि. २१.५.२००७ रोजी माहिती पुरविल्याचे दिसून येते. याच पत्रावर अपिलार्थीने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेली द्वितीय अपीले मागे घेत असल्याचे नमूद करुन या अभिप्रायावर आपली दि.२१.५.२००७ रोजी स्वाक्षरी केली आहे.

अपिलार्थीच्या या अभिप्रायावरुन तसेच अपिलार्थीच्या आजच्या अनुपस्थितीवरुन अपिलार्थीस ही अपिले चालवण्यामध्ये स्वारस्य नसावे, म्हणून अपिलार्थी त्यांची उपरोक्त दोन्ही अपिले मागे घेत असल्याचे अनुमान काढून अपिलार्थीची दोन्ही अपिले खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील क्र. १९४८/२००७ व अपील क्र. १९४९/२००७, दि.२३.४.२००७ खारीज करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांकः ०३.१२.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मनोहर माधवराव थोरात,घर नं.२-२-१२४, देगावचाळ,नांदेड ता.जि.नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, लोहा, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, लोहा, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१९५२

निर्णय दिनांक ०३-१२-२००८

१ श्री. गणेशराव गंगाराम काळे-पाटील, : अपिलार्थी
जि.हिंगोली.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत, येहळेगाव (तुकाराम)
ता.कळमनुरी जि.हिंगोली
२ जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिति, कळमनुरी,
जि.हिंगोली.

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. ०३.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. गणेराव गंगाराम काळेपाटील (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. विलास अण्णाराव मेहत्रे, जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत येहळेगाव (तुकाराम),ता.कळमनुरी,जि.हिंगोली (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. साहेबराव द.कांबळे, जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी, जि.हिंगोली (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३१.०५.२००७ रोजी नोंदणी झालेले द्वितीय अपील क्र. १९५२/२००७ आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

आज रोजीच्या सुनावणीस अपिलार्थी यांनी, त्यांच्या सहीचे दि. ३.१२.२००८ रोजीचे एक निवेदन आयोगास सादर केले असून या निवेदनामध्ये त्यांना मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्याने ते, विचाराधीन अपील स्वखुशीने परत घेत असल्याचे म्हटले आहे.

खुद्द अपिलार्थीने त्यांचे आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील ते मागे घेत असल्याने आज रोजी अपिलार्थीचे सदर अपील क्र. १९५२/२००७ खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील क्र. १९५२/२००७, दि.३१.०५.२००७ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः ०३.१२.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गणेशराव गंगाराम काळेपाटील, मु.पो.येहळेगाव (तुकाराम),ता.कळमनुरी जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, येहळेगाव (तुकाराम) ता.कळमनुरी जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९४३
निर्णय दिनांक ०३-१२-२००८

१ श्री. महेश के.राठी, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,
औरंगाबाद.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र
औद्योगिक विकास मंडळ, मुंबई.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित आहेत.

| | |
|---|---|
| १. श्री. अशोक ना.चौधरी | जन माहिती अधिकारी तथा<br>प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,<br>औरंगाबाद |
| २. श्री. राजेश नार्वेकर | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी,<br>महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ, मुंबई |

अपिलार्थी श्री. महेश के. राठी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.०९.२००७ रोजी नोंदवलेले द्वितीय अपील आज

रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नसल्याचे नमूद करुन त्यांना माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ३०.०३.२००७ रोजीच्या प्रथम अर्जान्वये अतिरिक्त वाळुज औद्योगिक क्षेत्रासाठी औरंगाबाद तालुक्यातील करोडी, शाहजापूर, धरमपूर,शेकापूर इ. गावाच्या संदर्भातील प्रस्तावित जमिनीच्या गट क्रमांकाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - एम. आय. डी. सी. च्या प्रस्तावित अतिरिक्त क्षेत्राच्या या गावातील लेआऊटच्या प्रती - या मुद्याचा समावेश होता. अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १०.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये या प्रकरणी अंतीम निर्णय न झाल्याने अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या उत्तराने समाधान न झ ााल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २५.४.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २३.४.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. १३.६.२००७ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम ठेवला.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले आहे.

अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ३०.३.२००७ रोजी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी नाकारली, याच माहितीकरिता त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २५.४.२००७ रोजी अपील केले असता, त्यांनीही माहिती देण्याचे नाकारले. त्यांनी मागणी केलेली माहिती, ही राज्याच्या सुरक्षिततेसंबंधी नव्हती, तसेच कोणत्याही व्यापाऱ्याचे गुपित त्यामध्ये दडलेले नव्हते. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीस माहिती नाकारण्याची कृती अवैध आहे. जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती नाकारुन थांबले नाहीत तर विचाराधीन क्षेत्राच्या भूसंपादनाची नंतर अधिसूचना प्रसिध्द होऊनही त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले आहे. त्यांनी या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २८.९.२००८ रोजी एक अर्ज केला होता. सदर विचाराधीन भूसंपादनाच्या प्रस्तावाची अधिसूचना दि. १० ऑगस्ट २००७ रोजी प्रसिध्द होऊनही त्यांना अद्याप जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती मिळाली नसल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे जास्तीत जास्त दंडाची शिक्षा व्हावी व जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती त्यांना हवी आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून ते ती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत. अपिलार्थीने ज्या क्षेत्रातील भूसंपादनाच्या प्रस्तावासंदर्भात त्यांच्याकडे माहिती मागितली होती, तो प्रस्ताव अंतिम होऊन, त्याची अपिलार्थीने मूळ अर्ज करते वेळी,अधिसूचना प्रसिध्द न झाल्याने त्यांनी ही माहिती सुरुवातीस अपिलार्थीस पुरविली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी त्याचवेळी अपिलार्थीस पुरवली असती तर,

एम.आय.डी.सी. ला ज्या क्षेत्राचे भूसंपादन करावयाचे प्रस्तावित होते, त्या क्षेत्राच्या भूसंपादन प्रक्रियेमध्ये अडथळे निर्माण होऊ शकले असते. त्यांचा अनुभव असा आहे की, ज्यावेळी अशाप्रकारची अधिसूचना प्रसिध्द केली जाते, त्या अधिसूचनेच्या प्रसिध्दीपूर्वीच संबंधित जमिनीचे खरेदी-विक्री व्यवहार होऊन पुढे संबंधित भूखंडधारक न्यायालयात जाऊन अंतिमतः एम.आय.डी.सी. ला त्यांचे उद्दिष्ट विहित कालावधीत पूर्ण करण्यास अडचणी निर्माण होतात.

जन माहिती अधिकारी यांचा वरील युक्तिवाद पाहता, त्यांनी अपिलार्थीस माहिती देताना भूसंपादन प्रक्रियेत अडथळे निर्माण होऊ शकतील, असे वाटल्याने व अपिलार्थीस दि. १०.४.२००७ रोजी दिलेल्या पत्राच्या वेळी वरील प्रकरणी सदर प्रस्तावाचा अंतिम निर्णय निश्चित झाला नव्हता या कारणामुळे त्यांनी अपिलार्थीस माहिती दिली नाही. जन माहिती अधिकारी यांचा हा युक्तिवाद जरी वादाच्या प्रयोजनार्थ ग्राहय धरला तरी शेवटी या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिल्याने, अधिनियमातील कलम ८(१) व ९ मधील कोणत्याही तरतुदीचा भंग होत नसल्याचे दिसून येत आहे. तसेच लेखी माहिती मागण्याऐवजी या प्रकरणातील अभिलेख्यांची तपासणी करण्यासाठी अपिलार्थीने त्यावेळी मागणी केली असती तर अशी तपासणी नाकारण्याचे कोणतेही कारण, त्यावेळी लागू झाले नसते कारण असे केल्याने अधिनियमातील कलम ८ व ९ च्या तरतुदीचा कोठेही भंग होणे त्यावेळी संभवत नव्हते. याचबरोबर शासकीय प्राधिकरणामार्फत भूसंपादन करताना प्रत्येक टप्प्यावरील प्रक्रियेमध्ये पुरेशी पारदर्शकता भूसंपादन कायद्यातील तरतुदीमध्ये ठेवली गेलेली असते, हे पाहता अपिलार्थीस माहिती नाकारण्याची जन माहिती व अपिलीय अधिकारी यांची कृती सर्वथा चुकीची ठरत असून, ही माहिती अपिलार्थीस देय ठरत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य देण्याची तयारी दर्शविली आहे, हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने

त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने सदर माहिती त्यांच्या मूळ अर्जात म्हटल्याप्रमाणे, जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः उपलब्ध करुन घ्यावी.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अनुक्रमे त्यांच्या दि. १०.४.२००७ रोजीच्या पत्रात व दि. १३.६.२००७ रोजीच्या निर्णयामध्ये अपिलार्थीस माहिती नाकारण्याची कारणे नमूद केली आहेत. यामध्ये त्यांनी अपिलार्थीपासून कोणत्याही असद्हेतूने माहिती दडवून ठेवली नाही. त्यांच्या कार्यालयीन कामामध्ये, कामाचे उद्दिष्ट पूर्ण करताना अडथळे निर्माण होऊ नयेत, (जी शंका त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केली आहे) म्हणून त्यांनी माहिती न देण्याचा निर्णय घेतला, हा निर्णय त्यांचा असद्हेतू असल्याचे होत नाही तसेच अधिनियमातील विहीत कालावधीमध्ये त्यांनी हे निर्णय घेतले असल्याने, त्यांच्यावर शास्ती लावण्याची अपिलार्थीची मागणी आयोग मान्य करीत नाही.

अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांनी दि. २८.९.२००८ रोजी केलेल्या अन्य अर्जाचा उल्लेख केला आहे. आज रोजी आयोगापुढे अपिलार्थीचा फक्त दि. ३०.३.२००७ रोजीचा मूळ माहितीसाठीचा अर्ज असल्याने अपिलार्थीच्या या मुद्यावर आयोगाचे कोणतेही भाष्य नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात

दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०३-१२-२००८** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. महेश के.राठी, द्वारा तुलसी प्रोव्हीजन, कुंभारवाडा,औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, स्टेशनरोड,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई, 'उद्योग सारथी', महाकाली केव्हज्, अंधेरी (पूर्व),मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९४४
निर्णय दिनांक ०३-१२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शहाजीराव आप्पाराव डोके,<br>रा.बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, भूम,<br>जि.उस्मानाबाद. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी, भूम,<br>जि.उस्मानाबाद. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित आहेत.

| | |
|---|---|
| १. श्री. धोंडीराम हिराजी राठोड | जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, भूम,जि.उस्मानाबाद |
| २. श्री. ज्योतिराम लक्ष्मण कोरे, अव्वल कारकून | जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, भूम जि. उस्मानाबाद यांचे प्रतिनिधी |

अपिलार्थी श्री. शहाजीराव अप्पाराव डोके उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २९.१०.२००७ रोजी नोंदवलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना प्रथमतः चुकीचे व मोघम स्वरुपाचे उत्तर ते देखिल विलंबाने दिल्याचे नमूद करुन जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास विलंब लावल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ३०.०७.२००७ रोजीच्या प्रथम अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे - श्री.संतोष वेणीकर तहसिलदार भूम यांनी २००२ ते २००६ या कालावधीत भूम तालुक्यातील सर्व गावाचे तहसीलदार,भूम म्हणून मंजूर केलेल्या फेरफार नोंदीचा तपशील/यादी" विवरणपत्राच्या मसुद्यामध्ये देण्यात यावी, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २७.८.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ग्रामपातळीवरील असल्याने अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती तालुकानिहाय संबंधित तलाठयाकडून प्राप्त करुन घेण्याचे सूचित करुन अपिलार्थीचा प्रथम अर्ज निकाली काढला. जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीन्वये दि. १४.०९.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०१.१०.२००७ रोजी सुनावणी घेऊन, त्याचदिवशी आपले आदेश पारित केले आहेत. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील अंशतः मंजूर करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पुरविण्यासाठी आठ दिवसांच्या आत कार्यवाही करण्याचे सूचित केले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, भूम तालुक्यात एकूण ९५ गावे असून त्यापैकी ६० गावांची माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने प्राप्त झाली आहे. सदर माहिती अर्धवट असून उर्वरित ३५ गावांमधील फेरफाराच्या प्रती त्यांना अद्याप प्राप्त झाल्या नाहीत. जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना विलंबाने व अपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ग्रामपातळीवरची होती. ग्रामपातळीवर संबंधित गावाचे तलाठी यांची जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली आहे.त्यामुळे त्यांनी अपिलार्थीचा प्रथम अर्ज प्रथमतः निकाली काढला. अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे दि. ३.८.२००७ रोजी प्राप्त झाला.त्यावर त्यांनी अपिलार्थीस दि.२७.८.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद दिला आहे.तथापि अपिलार्थीस माहिती पुरविण्याच्या दृष्टीने अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सर्व तलाठयांकडून गोळा करुन घेण्याचे त्यांनी ठरविले व त्याप्रमाणे, तालुक्यातील सर्व तलाठयांना दि. १७.८.२००७ रोजी लेखी सूचना निर्गमित केल्या होत्या. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पूर्ण स्वरुपात त्यांच्याकडे दि.२८.९.२००७ रोजी तयार होती. त्याचदिवशी त्यांनी अपिलार्थीस ही माहिती का पाठविली नाही, असे त्यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, त्यांनी ही माहिती अपिलार्थीस व्यक्तिशः देऊ केली होती, तथापि अपिलार्थीने त्यांना ही माहिती पोस्टाने पाठविण्यास सांगितले.जन माहिती अधिकारी यांनी पुढे आयोगास असेही सांगितले की, अपिलार्थीने म्हटल्याप्रमाणे भूम तालुक्यात एकूण ९५ गावे असून त्यांनी अपिलार्थीस एकूण ६० गावांची माहिती पुरविली आहे. उर्वरित ३५ गावांमध्ये जमिनीच्या अभिलेख्यात २००२ ते २००६ या कालावधीमध्ये कोणत्याही फेरफाराची नोंद झालेली नाही. श्री. संतोष वेणीकर,तहसीलदार यांनी २००२ ते २००६ या कालावधीमध्ये उर्वरित ३५ गावांमध्ये एकही फेरफार मंजूर केलेला नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीचा मूळ अर्ज तहसीलदार,भूम यांना केला होता. तथापि अपिलार्थीने मागितलेली माहिती ज्या प्राधिकरणाच्या प्रत्यक्ष ताब्यात होती, ते प्राधिकरण 'तलाठी' असल्यामुळे अपिलार्थीच्या प्रथम अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) प्रमाणे कार्यवाही करणे गरजेचे होते. त्यांनी अपिलार्थीच्या अर्जाच्या प्रती मूळ अर्ज त्यांना प्राप्त झाल्यानंतर पाच दिवसांच्या आत त्यांच्या तालुक्यातील सर्व गावातील तलाठयांना पाठवून त्यांच्या या पत्राच्या प्रती अपिलार्थीस देणे, अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अभिप्रेत आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याच्यादृष्टीने सर्व तलाठी यांना दि. १७.८.२००७ रोजी पत्र पाठवल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येते. यावरुन अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहीत केलेल्या मुदतीत माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी फारसे गंभीर नसावेत, असे अनुमान काढण्यास हरकत नाही. अपिलार्थीस त्यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांना भूम तालुक्यातील एकूण ९५ गावांपैकी एकूण ६० गावांची माहिती मिळाल्याने व उर्वरित गावांची माहिती न मिळाल्याने त्यांना प्राप्त झालेली माहिती अपूर्ण आहे, असे त्यांना वाटत आहे. या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे खुलासा केला आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता, अपिलार्थीस सर्व गावांसंदर्भातील माहिती हवी होती, असे दिसून येते. मात्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या कथित माहितीमध्ये उर्वरित गावांच्या माहितीसंदर्भात कोणताही उल्लेख नाही, सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित गावांची माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील घटनाक्रमाचे अवलोकन करता संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) व ७(१) चा भंग करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य

परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित गावांची माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३) जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंग विषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०३-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शहाजीराव आप्पाराव डोके,स्वराज्यनगर, बार्शीरोड,बीड-४३१ १२२.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, भूम जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९४५
निर्णय दिनांक ०३-१२-२००८

१ श्री. गुरुनाथ संभाजीराव इंदुलकर, : अपिलार्थी
रा.परभणी.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कुलसचिव,
मराठवाडा कृषि विद्यापीठ,परभणी
२ जन अपिलीय अधिकारी तथा
कुलगुरु,
मराठवाडा कृषि विद्यापीठ,परभणी

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: उपकुलसचिव (आस्था),
मराठवाडा कृषि विद्यापीठ,परभणी
जन अपिलीय अधिकारी: कुलसचिव,
मराठवाडा कृषि विद्यापीठ,परभणी

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. शिवाजीराव नामदेवराव काकडे | जन माहिती अधिकारी तथा<br>उपकुलसचिव (आस्था),<br>मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी |
| २. | श्री. व्यंकटेश महिपतराव इनामदार,<br>सहायक कुलसचिव (प्रशा) | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कुलसचिव,<br>मराठवाडा कृषि विद्यापीठ,परभणी<br>यांचे प्रतिनिधी |

अपिलार्थी श्री. गुरुनाथ संभाजीराव इंदुलकर हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २०.०५.२००७ रोजी नोंदवलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २०.१.२००७ रोजी प्राप्त झालेल्या माहितीने त्यांचे समाधान झालेले नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. २७.२.२००७ रोजी त्यांच्या कार्यालयात बोलावून घेऊन त्यांना मागणी केलेली माहिती सोडून देण्यास सांगितले. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांनी चर्चा न करता त्यांच्या अधिकाराचा गैरवापर करुन त्यांच्या मर्जीनुसार त्यांचे अपील निकाली काढले व त्यावर अपिलार्थींची सही घेतली. त्यांच्याकडूनही अपिलार्थीस समाधानकारक माहिती मिळाली नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्यावर दबाव आणण्यात येत आहे तसेच अपिलार्थी ५ दिवस उपोषणास बसूनसुध्दा माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी हे साधी विचारपूस करण्यास देखिल येत नाहीत, अशाप्रकारचे निवेदन केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः दि. २६.१२.२००६ रोजीच्या प्रथम अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून एकूण १० मुद्यांद्वारे त्यांच्या स्वतःच्या कृषि सहायक या पदावर नियुक्तीकरता जन माहिती अधिकारी यांच्याकडे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २०.१.२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस या पत्राद्वारे दिली व अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१० संदर्भात माहिती देण्यासाठी रु.२२/- शुल्क भरणा करण्याचे त्यांना सूचित केले. या शुल्काचा भरणा करुन अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात

दि. २५.१.२००७ रोजी केल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस दि. ३१.१.२००७ रोजी मुद्दा क्र.१० संदर्भात व्यक्तिशः माहिती पुरवली. अपिलार्थीस ही माहिती प्राप्त झाल्याची पोचसही, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील अपिलार्थीने त्यांना लिहिलेल्या दि. २५.१.२००७ रोजीच्या पत्रावर घेतल्याचे दाखवले. या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २९.०१.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १६.०३.२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. या निर्णयामध्ये त्यांनी अपिलार्थीस एकूण २ मुद्यांवरील माहिती दिल्याचे दिसून येते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथे सन १९८४ पासून निरीक्षण मदतनीस म्हणून रोजंदारीवर कार्यरत आहेत. त्यांना त्यांच्या वेतनातील थकबाकी मराठवाडा कृषि विद्यापीठाकडून हवी आहे.तसेच मराठवाडा कृषि विद्यापीठातील नियमित रिक्त पदावर त्यांना सामावून घेण्याची त्यांची विनंती आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दि. २०.१.२००७ व ३१.१.२००७ रोजी दिलेली आहे. त्यांनी आयोगास असेही अवगत करुन दिले की, अपिलार्थी हे कृषि पदविकाधारक असून ते सध्या धारण करीत असलेल्या पदावर त्यांना इतर कृषि पदवीधारकांप्रमाणे वेतन हवे आहे. अपिलार्थीने उपस्थित केलेल्या वेतन थकबाकीसंदर्भात, शासनाशी त्यांचा पत्रव्यवहार चालू आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता व वरील दोन्ही बाजूंनी केलेल्या युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस मूळात मराठवाडा कृषि विद्यापीठात नियमित पदावर त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार नियुक्ती हवी आहे

व विद्यापीठाकडून त्यांच्या वेतनाची कथित थकबाकी त्यांना आवश्यक आहे. या दोन्ही बाबी पूर्णतः प्रशासकीय स्वरुपाच्या असल्याने व अशा बाबी माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदींच्या बाहेर असल्यामुळे, अपिलार्थीची विनंती आयोगास मान्य करता येणार नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीच्या प्रथम अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलार्थीने एकूण १० मुद्यांवर माहिती मागितली असून यापैकी मुद्दा क्र. ८ द्वारे त्यांनी मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची असून या मुद्याद्वारे अपिलार्थीस नेमकी कोणती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे, याचा बोध होत नाही. मुद्दा क्र. २ व १० वगळता इतर सर्व मुद्यांवर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासे व कारणे अपेक्षित केल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन केले असता माहिती अधिकार अधिनियमामध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाबद्दल त्यांना कारणे, खुलासे अथवा स्पष्टीकरण विचारणे व ते जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास देणे, अशाप्रकारच्या प्रक्रिया अभिप्रेत नाहीत. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील  सात मुद्यांवरील (मुद्दा क्र. १,३,४,५,६,७ व ९)  माहिती देय होत नाही. मुद्दा क्र.२ व मुद्दा क्र.१० शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अनुक्रमे दि.२०.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये व दि.३१.१.२००७ रोजी प्रत्यक्ष पुरवली असल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असलेली माहिती अधिनियमातील तरतुदीप्रमाणे त्यांना मिळाल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची छाननी करता, असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांचा वैयक्तिक प्रश्न माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचा वापर करुन सोडवून घेण्याचा या ठिकाणी प्रयत्न केला आहे, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देय असलेली

माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली आहे, या पार्श्वभूमीवर अपिलार्थीच्या द्वितीय अपील अर्जावर विचार करण्याचे कोणतेही कारण आयोगास दिसत नाही यामुळे सदर अपील अर्ज फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला असून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०३-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गुरुनाथ संभाजीराव इंदुलकर,(कृषि पदविकाधारक) कापूस संशोधन योजना, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव (आस्था), मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९४६
निर्णय दिनांक ०३-१२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. रेवणसिध्द बसवणप्पा हविले,<br>रा.लातूर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगरपरिषद, लातूर | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपआयुक्त (सा.प्र.),<br>विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित आहेत.

| | |
|---|---|
| १. श्री. अनिल ह. मुळे | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगरपरिषद, लातूर |
| २. श्री. सोमनाथ गुंजाळ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपआयुक्त (सा.प्र.),<br>विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद |

अपिलार्थी श्री. रेवणसिध्द बसवणप्पा हविले अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १०.०४.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना माहिती देण्याचे चुकीच्या कारणास्तव नाकारले असल्याचे नमूद करुन, जन अपिलीय अधिकारी यांनी

अधिनियमातील कलम ८(ख) प्रमाणे अपील नाकारले असल्याने त्यांची कृती ही दिशाभूल करणारी आहे. कारण त्यांच्या मूळ अर्जातील मागितलेली माहिती देण्यास माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८ 'माहिती प्रकट करण्याबाबत अपवाद'अशा शीर्षकाचा आहे, या शीर्षकाखालील एकूण १० अपवादांपैकी कोठेही न्यायप्रविष्ट असा उल्लेख केलेला नाही तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती नाकारण्यासाठी वापरलेले कलम ८(ख) चा, त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाशी काहीही संबंध नाही. त्यांच्या दि.२०.९.२००६ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १९.१०.२००६ रोजी अगर तत्पूर्वी माहिती देणे आवश्यक होते. तथापि राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करेपर्यंत जन माहिती अधिकारी यांनी त्यांना त्यांच्या अर्जासंदर्भात कोणताही निर्णय दिला नसल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) प्रमाणे कारवाई करण्याची विनंती आयोगास केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः दि. १९.०९.२००६ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे - अ.भा.वि.प. विवेकानंद संस्कार संस्थेच्या लक्ष्मी कॉलनी, जुना औसा रोड, लातूर येथील प्लॉट नं. ६ वरील बांधकामासंदर्भात एकूण ६ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली. सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः त्यांच्याकडील दि. १९.१०.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांच्याकडून १५ दिवसांची मुदतवाढ घेण्यात येत आहे, असे कळवले, तर दुसऱ्या एका दिनांक नसलेल्या पत्रान्वये अपिलार्थीकडून पुनःश्च् ८ दिवसांची मुदतवाढ अपिलार्थीकडून घेतल्याचे अपिलार्थीस कळवले. त्यानंतर अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. ४.१२.२००६ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८(ख) नुसार नाकारली. जन माहिती

अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ९.१२.२००६ रोजी या संदर्भात प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.१२.२००६ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भात आपले आदेश दि. ११.१.२००७ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले. या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची छाननी करता असे दिसून येते की, मूळात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १९.९.२००६ रोजीच्या अर्जास दिलेला प्रथम व द्वितीय प्रतिसाद चुकीचा असून, माहिती अधिकार अधिनियमामध्ये माहिती देण्यास मुदतवाढ देण्याची अथवा अपिलार्थीकडून ती घेण्याची, अशाप्रकारची कोणतीही तरतुद नाही. अधिनियमातील तरतुदीप्रमाणे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ४.१२.२००६ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस अधिनियमातील कलम ८(ख) प्रमाणे माहिती देण्याचे नाकारले आहे.अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता यामध्ये, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे सर्वसाधारणपणे प्रश्नार्थक स्वरुपात व जन माहिती अधिकारी यांना भविष्यात करावयाच्या कार्यवाहीसंबंधीची माहिती अपेक्षित करणारी, अशाप्रकारची माहिती विचारली आहे. सदर प्रकरण दिवाणी दावा क्र.आरसीएस ६३२/०६ अन्वये न्यायप्रविष्ट आहे, त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील बरीचशी माहिती अपिलार्थीस न्यायालयाने दिलेल्या निर्णयामध्येच मिळू शकेल. मात्र अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १,२,३ व ६ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देय ठरते.

आयोगासमोरील उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती सात दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगासमोर आज कबूल केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे नीट अवलोकन न करता केवळ या प्रकरणामध्ये अनेक वाद असल्याने व प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने अपिलार्थीस अधिनियमातील कलम ८(ख) प्रमाण माहिती देण्याचे नाकारले आहे, या प्रकरणी अधिनियमातील ८(ख) हे " कोणत्याही न्यायालयाने किंवा न्यायाधिकरणाने जी प्रकाशित करण्यास स्पष्टपणे मनाई केली आहे किंवा जी प्रकट केल्यामुळे न्यायालयाचा अवमान होऊ शकेल, अशी माहिती " - पुरवण्यास जन माहिती अधिकारी यांच्यावर आबंधन असणार नाही. अपिलार्थीच्या अर्जातील संदर्भिय प्रकरण पाहता, या प्रकरणामध्ये न्यायालयाने कोणतीही माहिती उघड न करण्याचे कोणतेही आदेश या घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर व आजपर्यंत देखिल दिले नसल्याचे आढळून येते.अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये या अनधिकृत बांधकामाबद्दल संबंधितांवर काय कारवाई करण्यात येणार आहे, मनपाने कोणती कायदेशीर कारवाई केली आहे, कार्यवाही केली नसेल तर का करण्यात येत नाही, अशाप्रकारचे अधिनियमातील तरतुदींशी विसंगत मुद्दे देखिल त्यांच्या मूळ अर्जात उपस्थित केले आहेत. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ मधील अंशतः - "एखाद्या जागेवर सार्वजनिक सभागृह बांधावयाचे असेल, तर त्या सभागृहाच्या इमारतीच्या सभोवताली चारी बाजूनी किती जागा मोकळी सोडणे आवश्यक आहे", मुद्दा क्र. ५ मधील अंशतः "शहरामध्ये अनधिकृत बांधकामावर लक्ष ठेवण्यासाठी नगर परिषदेने केलेली नेमणूक" व मुद्दा क्र. ६ मधील उपमुद्दा १,२ व ३ ही माहिती, जी अधिनियमातील कलम २(च) शी सुसंगत असल्याने व ही माहिती दिल्याने अधिनियमातील कलम ८(१) व ९ चा कोणत्याही प्रकारे भंग होण्याची शक्यता संभवत नसल्याने अपिलार्थीस देय ठरत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी

अपिलार्थीच्या या अर्जातील वरील मुद्यांची संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी माहिती अधिकार अधिनियमाचा आवश्यक तो अभ्यास न करुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः चुकीचा व नंतर उशिरा प्रतिसाद देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवा नियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.४ व ५अंशतः व मुद्दा क्र.६ मधील उपमुद्दे १,२ व ३ शी संबंधित माहिती हे आदेश प्राप्त होताच, सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३) संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवा नियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०३-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रेवणसिध्द बसवणप्पा हविले,'साधना',लक्ष्मी कॉलनी, जुना औसा रोड, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.),विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, म.रा., शासकीय परिवहन सेवा इमारत,३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग,सी-फेस,वरळी मुंबई-३० यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९४७
निर्णय दिनांक ०३-१२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ सौ. सुनिता शामराव देशमुख,<br>परभणी | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>प्राचार्य,स्वातंत्र्य सैनिक कै.रामराव कान्हेकर<br>निवासी मुकबधीर विद्यालय,परभणी | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>समाज कल्याण अधिकारी ,गट-अ<br>जिल्हा परिषद,परभणी | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित आहेत.

| | |
|---|---|
| १. श्री. विजय विठ्ठलराव कान्हेकर | जन माहिती अधिकारी तथा<br>प्राचार्य,स्वा.सै.कै.रामराव कान्हेकर<br>निवासी मुकबधीर विद्यालय, परभणी |
| २. श्री. मझहर अहमद पठाण | जन अपिलीय अधिकारी तथा<br>समाजकल्याण अधिकारी, गट-अ<br>जिल्हा परिषद, परभणी |
| ३. श्री. शैलेंद्र शा.कान्हेकर | सचिव,<br>रेणूका शिक्षण प्रसारक मंडळ, परभणी |

अपिलार्थी सौ. सुनिता शामराव देशमुख या उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०.०४.२००७ रोजी दाखल झालेले

द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झ ालेल्या दि. ९.१.२००६ च्या उत्तराने त्यांचे समाधान झाले नसल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी, या प्रकरणी कोणताच निर्णय न दिल्याने त्यांनी हे द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे. त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसंदर्भात त्यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३ मधील परिच्छेद २ व ३ द्वारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही आवश्यक असल्याचे म्हटले आहे. अपिलार्थीच्या दि. २१.१२.२००५ रोजीच्या अर्जाचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून "मूळ सेवापुस्तक व त्यांना कोणत्या कालावधीत कोणत्या दराने नियत रकमेचे प्रदान करण्यात आले, त्याविषयीच्या प्रमाणपत्राच्या प्रती" सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक असल्याचे दिसून येते. आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी याच माहितीच्या मागणीची पुनरुक्ती आयोगासमोर केली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी या स्वा.सै.कै.रामराव कान्हेकर निवासी मुकबधीर विद्यालय, परभणी येथे 'सहशिक्षिका' या पदावर सन १९९५-२००४ या कालावधीमध्ये कार्यरत होत्या. अपिलार्थीने मागणी केलेल्या त्यांच्या मूळ सेवापुस्तिकेची प्रत त्यांनी समाजकल्याण विभागामार्फत महालेखापाल,नागपूर यांच्याकडे पाठविली असून ती अद्यापपावेतो त्यांच्याकडे प्राप्त झालेली नाही. अपिलार्थीस त्यांनी अपिलार्थीच्या सेवापुस्तिकेची सत्य-छायाप्रत दि. १७.७.२००६ रोजी दिलेली आहे. तसेच अपिलार्थी यांनी त्यांच्या मुद्दा क्र.२ द्वारे मागणी केलेली माहितीची झेरॉक्स प्रत सोबत आणली आहे व सदर माहिती ते अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत.

या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस त्यांच्या मूळ सेवापुस्तिकेची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे. अपिलार्थी यांची मूळ सेवापुस्तिकेची प्रत जिल्हा समाजकल्याण अधिकारी,गट-अ, जि.प.परभणी यांच्या कार्यालयास महालेखापाल, नागपूर यांच्याकडून परत प्राप्त झाली असून ती मूळ प्रत सध्या समाजकल्याण अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. त्यांनी सदर प्रत संस्थेकडे पाठविल्यास संस्था अपिलार्थीस ही प्रत काही अटींवर देण्यास तयार आहे. तेव्हा जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागणी केलेल्या मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस त्यांच्या सेवापुस्तिकेची मूळ प्रत देऊ नये अशा अर्थाचे कोणतेही बंधन शासनाकडून अथवा संस्थेकडून घालण्यात आलेले नाही. तथापि अपिलार्थीस त्यांच्या मूळ सेवापुस्तिका हस्तांतरित करताना या सेवापुस्तिकेची द्वितीय सत्यप्रत (Duplicate) जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या संस्थेकडे ठेवणे योग्य राहील. अपिलार्थीने मागणी केलेली मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती, जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणीच्या दिवशी त्यांच्यासोबत आणली असून त्यांनी ती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच सात दिवसांच्या आत उपलब्ध करुन द्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस ही माहिती अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत का दिली नाही, असे जन माहिती अधिकारी यांना विचारले असता, त्यांनी अपिलार्थीकडे या प्रती पूर्वीच अनौपचारिकरित्या हस्तांतरित केल्या असल्याने त्या अपिलार्थीस परत पुरवल्या नाहीत, असे आयोगास सांगितले.अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागविली असल्याने याअधिनियमाच्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देणे अनिवार्य आहे, तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जापूर्वीच त्यांना अनौपचारिकरित्या माहिती दिली असल्याने अपिलार्थीने अर्ज केल्यानंतर या कारणास्तव अपिलार्थीस माहिती न

देण्याची, जन माहिती अधिकारी यांची ही कृती सर्वथा गैर असून ही कृती त्यांच्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणा स्पष्ट करते, असे आयोगाचे मत आहे.त्यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीबाबत त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती हे आदेश प्राप्त होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३) जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०३-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. सुनिता शामराव देशमुख,नारायण चाळ, मु.पो.ता.जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य , स्वा.सै.कै.रामराव कान्हेकर निवासी मुकबधीर विद्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९५०
निर्णय दिनांक ०३-१२-२००८

१ श्री. मनोहर पिलाप्पा भवानकर, : अपिलार्थी
रा.वसमत जि.हिंगोली.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर,जि.हिंगोली.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ,
नांदेड.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. गणेश वसंतराव व्यवहारे | जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर, जि.हिंगोली. |
| २. | श्री. सय्यद सिकंदर हाशमी, सहा. अधीक्षक अभियंता, श्रेणी-२ | जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांचे प्रतिनिधी |

अपिलार्थी श्री. मनोहर पिलाप्पा भवानकर अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २७.०८.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने 'अपिलाची कारणे' या सदरासमोर- "महालेखाकार नागपूर-II यांचे P.P.O. चे रक्कम अप्राप्त आहे",असे नमूद केले असून 'हव्या असलेल्या माहितीचे स्वरुप व विषय' या सदरासमोर अपिलार्थीने "P.P.O.No./१३६८ दि. २७/०७/२००६ मुद्दत १-१-९६ ते ३०/६/९९ हा दूसरा प्रकार आहे. या आगोदरचे अपील क्र. २००७/१८७ बाबत विद्यमान कोर्टात प्रकरण प्रलंबीत आहे" असे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. ८.६.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे पीपीओ च्या आदेशासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"P.P.O.क्र. १३६८/२७/९/२००६= २७/०७/२००६"

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

याच विषयावर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ११.७.२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपील अर्जावर त्यांनी "रिव्हाइज पेन्शनचे बाकी येणे आहे", असे नमूद केले आहे. अपिलार्थीच्या या विषयासंदर्भात त्यांनी जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी व राज्य माहिती आयोगाकडे केलेले अर्ज पाहता, अपिलार्थीस निश्चित कोणती माहिती हवी आहे, याचा बोध होत नाही. त्यांनी या संदर्भात आयोगाकडे दाखल केलेल्या लोकआयुक्त यांना उद्देशून लिहिलेल्या त्यांच्या दि. १४.११.२००६ रोजीच्या पत्रानुसार अपिलार्थीस त्यांच्या सेवानिवृत्तीची थकबाकी हवी असल्याचे दिसून येते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, त्यांच्याकडून अपिलार्थीस सेवानिवृत्तीसंदर्भात पीपीओ क्र. १३६७ दि.२७.६.२००७ हा प्राप्त झाला असून पीपीओ क्र. १३६८ व १३६७ हे दोन्ही क्रमांक एकच असून पीपीओची रक्कम रु.३५७५/- संबंधितांस प्रदान करण्यात आली आहे. त्यांनी

अपिलार्थीच्या वेतनपटाची प्रत आयोगास दाखवली, यावरुन अपिलार्थीच्या मूळ गाऱ्हाण्याचा निपटारा झाला असावा. तथापि वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जाद्वारे, अपील अर्जाद्वारे व आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जाद्वारे नेमकी कोणती माहिती त्यांना आवश्यक आहे, याचा बोध होत नसल्याने व आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी गैरहजर असल्याने आयोगासही अपिलार्थीस निश्चित कोणती माहिती हवी आहे, याचा बोध होत नाही. जन माहिती अधिकारी यांनी नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ गाऱ्हाण्याचा आता निपटारा झाला असल्यामुळे व वरील वस्तुस्थिती पाहता अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले द्वितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१)अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०३-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मनोहर पिलाप्पा भवानकर,निवृत्त द.का.सा.कारखाना रोड, म.बसवेश्वर कॉलनी, मु.पो.ता. वसमत, जि.हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर जि. हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९६२
निर्णय दिनांक ०४-१२-२००८

१ श्री. शालीग्राम शंकरराव देशमुख, : अपिलार्थी
रा.परभणी.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याधिकारी, नगरपरिषद,
परभणी

२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (सा.प्र.),
विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २५.०९.२००७ रोजी नोंदणी झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२९.३.२००७ रोजी केलेल्या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.

२९.४.२००७ रोजी प्रथम अपील केले असता, त्या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ४.७.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. ११.७.२००७ रोजी पारित केले. या आदेशामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करुनही त्यांनी आजपर्यंत अपिलार्थीस माहिती दिली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथमतः दि. २९.३.२००७ रोजी मौ.परभणी येथील सर्वे नं.३०१ ले-आऊटसंदर्भातील - एकूण ३ मुद्यांद्वारे काही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे सर्वसाधारण टपालाद्वारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताच प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) नुसार दि. २९.४.२००७ रोजी (प्रथम अपील अर्जावर दि.२९.४.२००७ व ३०.५.२००७ अशा दोन तारखांचा उल्लेख आहे.) प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी या अपिलावर दि. ४.७.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. ११.७.२००७ रोजी पारित करुन या आदेशाद्वारे अपिलार्थीचे अपील मान्य केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ७ दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी या आदेशाद्वारे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांना आदेश देऊनही त्यांच्याकडून अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने व्यथित होऊन वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः दि. ११.६.२००७ रोजीच्या पत्राद्वारे,

अधिनियमाद्वारे विहित केलेली मुदत टळून गेल्यानंतर, काही माहिती दिली. ही माहिती त्यांना दि. १२.६.२००७ रोजी प्राप्त झाली. तथापि त्यांना प्राप्त झालेल्या माहितीवर मुख्याधिकारी नगर परिषद, परभणी यांची सही नव्हती. तसेच त्यांना प्राप्त झालेली माहिती अर्धवट आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की,अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज करतेवेळी जन माहिती अधिकारी या पदावर श्री. के.एन.कुंभार (सध्या सातारा,नगरपरिषद येथे मुख्याधिकारी या पदावर कार्यरत) नावाचे अधिकारी कार्यरत होते.अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना दोन टप्प्यामध्ये देण्यात आली असून, प्रथमतः त्यांना दि. १२.६.२००७ रोजी व त्यानंतर दि. ३०.६.२००७ रोजी माहिती पुरविण्यात आली आहे. ही माहिती त्यांना विनामूल्य दिलेली आहे.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला असता, असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील विहित कालावधी व्यपगत झाल्यानंतर विनामूल्य माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस ही माहिती अर्धवट वाटत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी त्यांच्या मूळ अर्जातील नेमकी कोणती माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही, असे आयोगाने विचारले असता अपिलार्थीने, त्यांना प्राप्त झालेल्या माहितीमध्ये अंदाजे २०-३० भूखंडाबाबतच्या माहितीचा समावेश नसल्याचे सांगितले. सुनावणीच्या वेळी त्यांना प्राप्त न झालेल्या माहिती संबंधाने निश्चित आकडा ते आयोगास सांगू शकले नाहीत. सबब त्यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून या अर्जातील निश्चित कोणत्या भूखंडाची माहिती मिळाली नाही हे तपासावे व त्याची यादी जन माहिती अधिकारी यांना द्यावी. जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील अद्यापपावेतो त्यांना द्यावयाची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस विहित मुदतीत संपूर्ण माहिती न पुरवून संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कृतीद्वारे दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबाबत त्यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस संचालक, नगर पालिका प्रशासन यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३) संचालक, नगर पालिका प्रशासन यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शालीग्राम शंकरराव देशमुख,शिवराम नगर, परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय,

औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, म.रा., शासकीय परिवहन सेवा इमारत,३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग,सी-फेस,वरळी मुंबई-३० यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९६३
निर्णय दिनांक ०४-१२-२००८

१ श्री. बलभीम (बप्पा) जगन्नाथ जाधव, : अपिलार्थी
रा.दारफळ ता.जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (जलस्वराज्य प्रकल्प) जिल्हा परिषद,उस्मानाबाद
२ जन अपिलीय अधिकारी तथा
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (जलस्वराज्य प्रकल्प) जिल्हा परिषद,उस्मानाबाद
प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः सचिव, पाणी पुरवठा स्वच्छता समिती, जलस्वराज्य प्रकल्प,दारफळ, ता.जि.उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.१०.२००७ रोजी नोंदणी झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही, तसेच त्यांच्या प्रथम अपिलामध्येही त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त झाली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १२.६.२००७ रोजीच्या प्रथम अर्जाद्वारे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (जलस्वराज्य),जिल्हा परिषद,उस्मानाबाद यांच्याकडे मौ.दारफळ येथील जलस्वराज्य प्रकल्पातील पाणीपुरवठा विहिरीच्या खोदकामाची खोली व रुंदीच्या एम.बी.ची छायाप्रत नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती. तथापि या प्रकरणी त्यांची जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली नसल्याने त्यांनी अपिलार्थीचा हा अर्ज दि. १५.६.२००७ रोजी ग्राम पाणीपुरवठा समितीकडे पाठविला. सदर समितीने अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २६.७.२००७ रोजी प्रथम अपील केले असता, या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.९.२००७ रोजी आपले आदेश निर्गमित केले असून या आदेशाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस तीन दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. तथापि सदर निर्णय होऊनही अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे दि. १७.१०.२००७ रोजी द्वितीय अपील केले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो आवश्यक असलेली माहिती त्यांना दिली नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. २३.१०.२००७ रोजी पाठविलेली माहिती चुकीची

असून ती माहिती त्यांना अपेक्षित नसून त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून एम.बी.ची छायाप्रत हवी आहे.

संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्याकडे या विषयासंदर्भात जी माहिती उपलब्ध होती, ती त्यांनी श्री. गिरवलकर, तांत्रिक सेवा पुरवठादार यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस जशीच्या तशी पुरविली आहे. त्यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती १३ इतक्या पृष्ठांची आहे. उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची छाननी करता, असे दिसून येते की, अपिलार्थीस मूलतः जन माहिती अधिकारी यांच्याकडून जलस्वराज्य प्रकल्पातील पाणीपुरवठा विहिरींच्या खोदकामाच्या मोजमाप पुस्तिकेची प्रत अपेक्षित होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती म्हणजे, तांत्रिक सल्लागाराने मोजमापपुस्तिकेमध्ये लिहिलेल्या बीलाची नक्कल आहे. अपिलार्थीस बीलाची नक्कल या प्रकरणी अपेक्षित नाही. या बीलामध्ये निश्चित करण्यात आलेली परिमाणे ज्या कागदपत्रांच्या आधारे केली आहेत, त्या कागदपत्रांच्या प्रती (मोजमापपुस्तिकेच्या) अपिलार्थीस अपेक्षित आहेत. अपिलार्थीने अपेक्षित केलेली माहिती व अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविण्यात आलेली माहिती या दोन्ही पूर्णतः भिन्न आहेत, त्यामुळे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या मोजमापपुस्तिकेची माहिती आताही त्यांना देय ठरत आहे. सबब उपमुख्य कार्यकारी अधिकारी (जलस्वराज्य), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधितांकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

सुनावणीच्या वेळी आयोगास असे अवगत करुन देण्यात आले की, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी जलस्वराज्य प्रकल्पासंदर्भात प्रत्येक गावपातळीवर नेमल्या गेलेल्या समितीच्या सचिवांना माहिती अधिकारी म्हणून नेमले आहे.

मूळात ही समिती गावकऱ्यांच्या मधून निवड केलेल्या (लोकप्रतिनिधी) व्यक्तिंमधून तयार केलेली असते. अशा व्यक्तींची जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक करणे योग्य नाही, कारण माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीचा वापर या खाजगी व्यक्तींच्या संदर्भात करता येणार नाही. प्रत्येक जन माहिती अधिकारी हा सार्वजनिक प्राधिकरणाचा नियमित सेवक असणे गरजेचे आहे, त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कोणतीही कारवाई आयोगास, त्यांच्याकडून या प्रकरणी प्रमाद घडला असताना देखिल करता येणार नाही, हे पाहता, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी जलस्वराज्य प्रकल्पाकरिता माहिती अधिकारी व सहायक माहिती अधिकारी म्हणून त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेल्या संबंधित कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यासंदर्भात विचार करावा.

या पार्श्वभूमीवर उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांना आता अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधितांकडून हस्तगत करुन घेऊनती अपिलार्थीस देणे श्रेयस्कर राहिल, असे आयोगाचे मत आहे. त्यामुळे उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.उस्मानाबाद यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत संबंधितांकडून प्राप्त करुन घेऊन विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे, .

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे

**आदेश**

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (जलस्वराज्य), जि.प.उस्मानाबाद यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, हे आदेश निर्गमित होताच, तीस दिवसांच्या आत संबंधितांकडून प्राप्त करुन घेऊन विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बलभीम (बप्पा) जगन्नाथ जाधव,रा.दारफळ ता.जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव, पाणी पुरवठा समिती, दारफळ,ता.जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (जलस्वराज्य), जलस्वराज्य प्रकल्प कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. अध्यक्ष, पाणी पुरवठा समिती, दारफळ,ता.जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१६
निर्णय दिनांक ०४-१२-२००८

१ श्री. महेश फुलारी, : तक्रारदार
रा. लातूर.

**विरुध्द**

१ सहा.सचिव, : उत्तरवादी
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण विभागीय मंडळ, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी उत्तरवादी हे उपस्थित आहेत, तर तक्रारदार श्री. महेश फुलारी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दि. १६.०६.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे अशी तक्रार केली की, लातूर विभागीय मंडळ (महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, लातूर ) लातूर येथील जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार श्री.महेश फुलारी, श्री. विश्वास दोरवे व श्री. दिलीप बट्टेवार यांच्या माहितीसाठीच्या अर्जास कोणतेही उत्तर दिले नाही. तसेच विविध कारणे देऊन ते तक्रारदाराच्या माहितीच्या अर्जातील कोणतीही माहिती देत नाहीत.

या संदर्भात उत्तरवादी यांनी तक्रारदारास दि. १०.११.२००६ रोजीच्या पत्राद्वारे, " अर्ज विहित नमुन्यात नाही, त्यामुळे दखलपात्र नाही, अर्जामध्ये कुठेही तारखेचा उल्लेख नाही" असे नमूद करुन, "माहिती मागविण्याचे कारण कोर्ट दर्शविण्यात आले असुन, कुठल्या कोर्टात कोणत्या क्रमांकानी प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे याचा उल्लेख नाही", असे नमूद करुन माहिती दिली नसल्याचे दिसून येते.

उपरोक्त प्रकरणाबाबत आयोगाचे कार्यालयातून दि. २६.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे उत्तरवादी यांच्याकडून स्वयंस्पष्ट अभिप्राय मागविण्यात आले होते. उत्तरवादी यांनी त्यांच्या दि. १९.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे आपला खुलासा आयोगास सादर केला असून त्यामध्ये त्यांनी असे स्पष्ट केले आहे की, श्री. फुलारी यांनी सादर केलेला अर्ज विहित नमुन्यात नसून त्यांच्या अर्जामध्ये माहितीचा विशिष्ट कालावधी,महिना,वर्ष याबाबतचा उल्लेख नाही, तसेच सदर माहिती मागविण्याचे कारण कोर्ट दर्शविले असून कोणत्या कोर्टात प्रकरण न्यायप्रविष्ट आहे, याचा उल्लेख केला नसल्याने तक्रारदार यांना दि. १०.११.२००६ रोजीच्या पत्राद्वारे त्यांच्या अर्जातील मजकूर त्यांचे कार्यालय अमान्य करीत असल्याचे कळविले आहे. अशाप्रकारे त्यांच्या या पत्राद्वारे त्यांनी तक्रारदारास माहिती देण्याचे नाकारले. उत्तरवादी यांनी केलेला हा खुलासा असमर्थनीय असून माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार माहितीचा अर्ज जरी विशिष्ट परिपत्रकामध्ये निश्चित केला नसला तरी, माहितीसाठीच्या अर्जास रु.१०/- चे कोर्ट-फी-स्टॅम्प लावून, आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन स्पष्ट केलेले असल्यास (उदा.कोणती माहिती, कोणत्या कालावधीसाठी इ.) अशी माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार देणे जन माहिती अधिकारी यांना अनिवार्य असते. या प्रकरणी माहिती नाकारण्याची उत्तरवादी यांनी दिलेली कारणे लक्षात घेता, त्यांनी माहिती नाकारताना दर्शविलेली कारणे चुकीची असून, माहिती नाकारण्याच्या कारणामध्ये उत्तरवादी यांनी

तक्रारदारास कोणत्या कोर्टात प्रकरण न्यायप्रविष्ट आहे व त्या प्रकरणाचा क्रमांक नमूद केला नाही, या कारणास्तव अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले आहे. त्याचप्रमाणे तक्रारदाराच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची प्रत पाहिली असता, विहित नमुन्यात आवश्यक असलेला संपूर्ण तपशील या अर्जामध्ये त्यांनी दिला असल्याचे दिसून येते. अधिनियमातील कलम ६(२) च्या तरतुदीनुसार माहिती मागण्यासाठी अर्जदारास कारण देण्याची तरतुद नाही, त्यामुळे ते अर्जात कारण नमूद केलेले नसेल तरीही अर्जदारास, त्यांनी मागितलेली माहिती, अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देण्याचा निर्णय विहीत मुदतीत घेणे, उत्तरवादी यांना भाग आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे, उत्तरवादी यांचा युक्तिवाद पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, उत्तरवादी यांनी तक्रारदार यांच्या अर्जासंदर्भात कोणत्याही टप्प्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार सकारात्मक कार्यवाही केलेली नाही, हे निःसंशयपणे सिध्द होत आहे.

या संदर्भात उत्तरवादी यांना असे सूचित करण्यात येते की, तक्रारदाराने त्यांच्या तक्रार अर्जामध्ये उल्लेख केलेल्या सर्व अर्जदारांच्या प्रत्येक अर्जावर तक्रारदाराच्या प्रत्येक अर्जासंदर्भात उत्तरवादी यांनी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत करुन, त्यावर निर्णय घ्यावा. तसेच उत्तरवादी यांनी, यापुढे त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर अधिनियमाप्रमाणे कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी. असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर तक्रारदाराची तक्रार निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. तक्रारदाराची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२. उत्तरवादी यांनी, तक्रारदाराने त्यांच्या तक्रार अर्जामध्ये उल्लेख केलेल्या सर्व अर्जदारांच्या प्रत्येक अर्जावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत करुन त्यावर निर्णय घ्यावा.

**औरंगाबाद**
**दिनांक ०४-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. महेश काशिनाथराव फुलारी, द्वारा दुधले निवास,सिंहगड सोसायटी, कन्हेरी रोड, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा सहा.सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण विभागीय मंडळ, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/५५
निर्णय दिनांक ०४-१२-२००८

१ श्री. अमर अंबादास कदम (परमेश्वर), उस्मानाबाद : तक्रारदार

**विरुध्द**

१ तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,तुळजापूर, जि.उस्मानबाद. : उत्तरवादी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी उत्तरवादी व तक्रारदार हे अनुपस्थित आहेत.

या प्रकरणी उपरोक्त तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दि. १३.०९.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे अशी तक्रार केली की, राज्य माहिती आयोगाने दि. ५.१.२००७ रोजी त्यांच्या द्वितीय अपिलाची सुनावणी घेऊन, त्यामध्ये तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,तुळजापूर यांना अपिलार्थीस तीन दिवसांच्या आत माहिती देण्याचे सूचित केले होते व संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द प्रचलित सेवानियमानुसार प्रशासकीय कारवाई करण्याचे आदेश दिले होते. राज्य माहिती आयोगाने आदेश देऊनही त्यांना दि. १६.१.२००७ रोजी त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र.२ शी संबंधित माहिती चुकीची देण्यात आली व एका पृष्ठाच्या माहितीकरिता त्यांच्याकडून रु.१६/-

इतके शुल्क आकारण्यात आले.जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती दिल्याबद्दल त्यांच्यावर रु.२५,०००/-दंड आकारण्याची त्यांनी अंतिमतः आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी तक्रारदार व उत्तरवादी हे दोघेही गैरहजर आहेत. आयोगास, उत्तरवादी यांनी तक्रारदारास दि. १६.१.२००७ रोजी निश्चित कोणती माहिती दिली हे कळावयास कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कोणताही मार्ग नाही.

माहिती अधिकार अधिनियमाद्वारे प्राप्त अर्जासंदर्भात, प्रतिपृष्ठ रु.२/- हा दर शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.आर.टी.आय.२००५/सी.आर.३१५/०५,५,दि. ११.१०.२००५ रोजीच्या अधिसूचनेप्रमाणे निश्चित केला असताना, तक्रारदाराकडून एका पृष्ठाकरिता रु.१६/- इतकी रक्कम घेण्याची उत्तरवादी यांची कृती चुकीची आहे. सबब उत्तरवादी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीकडून त्यांना माहिती अधिकारी अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती देण्यासाठी फक्त प्रतिपृष्ठ रु.२/- याप्रमाणे दर आकारणे आवश्यक होते. त्यांच्याकडून या प्रकरणी जास्तीचे शुल्क आकारले गेले असल्यास उर्वरित रक्कम त्यांनी तक्रारदारास हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावी. अधीक्षक भूमी अभिलेख, जिल्हा उस्मानाबाद यांनी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १६.१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे दिलेल्या माहितीची छानननी त्यांनी स्वतः करुन तक्रारदारास हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत त्यांना देय होणारी संपूर्ण माहिती विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर तक्रारदाराची तक्रार निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१) तक्रारदाराची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

३. उत्तरवादी यांनी या प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीपोटी जास्तीचे शुल्क आकारले गेले असल्यास, उर्वरित रक्कम तक्रारदारास हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावी.

४. अधीक्षक, भूमी अभिलेख, उस्मानाबाद यांनी तक्रारदारास जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. १६.१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे देण्यात आलेल्या माहितीची स्वतः छाननी करुन तक्रारदारास हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत देय होणारी संपूर्ण बिनचूक माहिती विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक ०४-१२-२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अमर अंबादास कदम (परमेश्वर), परमेश्वर वाडा,तुळजापूर जि.उस्मानाबाद.

२. उत्तरवादी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, तुळजापूर जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. अधीक्षक भूमी अभिलेख, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९५७
निर्णय दिनांक ०४-१२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शामराव तवाजी डोईफोडे,<br>रा.पैठण, जि.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग,औरंगाबाद. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ,औरंगाबाद | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी श्री.शामराव तवाजी डोईफोडे अनुपस्थित आहेत, तर जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २१.०९.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश दिल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः विलंबाने व अर्धवट माहिती दिली त्यानंतर जवळजवळ चार महिन्याने माहिती मिळाल्याचे नमूद करुन माहिती देण्यास कसूर केल्याने योग्य ते शासन करावे, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १८.४.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे- श्री. एस.के.ताजी, तत्कालीन उपविभागीय अभियंता, सा.बां.उपविभाग पैठण यांच्या काळात पैठण उपविभागात वाटप झालेल्या कामासंबंधी सन २००६-०७ या कालावधीतील काही माहिती मागितली होती. या माहितीमध्ये - वाटप झालेली कामे, एजन्सींची नावे, अंदाजीत रक्कम, कामाची नावे, देयके मंजूर अथवा नामंजूर, त्याबाबतचा आमदार,खासदार फंड वगळून झालेल्या कामांचा तपशील - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ११.७.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.८.२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भात आपले आदेश दि. १८.८.२००७ रोजी पारित केले आहेत. या आदेशाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस १५ दिवसांच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १८.८.२००७ रोजी माहिती पुरविली. अपिलार्थीस ही माहिती प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांनी, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून उशीरा माहिती प्राप्त झाल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांना योग्य ते शासन व्हावे, अशी आयोगास विनंती केली आहे. उपरोक्त कागदपत्रांवरुन व आज रोजी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांनी सादर केलेल्या त्यांच्या लेखी निवेदनावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने माहितीसाठीचा प्रथम

अर्ज दि. १८.४.२००७ रोजी केला असता, अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि. १८.८.२००७ रोजी उपलब्ध करुन दिली. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, ती अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने ज्या प्रकारची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती, तिचे स्वरुप व व्याप्ती लक्षात घेता, ती माहिती अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित मुदतीत म्हणजेच दि.१७.५.२००७ रोजी अगर तत्पूर्वी देणे, जन माहिती अधिकारी यांना फार अवघड अथवा अशक्य होते, असे आयोगास वाटत नाही. त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी स्वतः होऊन कोणत्याही टप्प्यावर त्यांना सकारात्मक प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थीस माहिती देण्याची कार्यवाही देखिल त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या आदेशानंतर केली आहे. अधिनियमातील कलम ७(२) मध्ये अधिनियमातील विहित तरतुदीमध्ये अर्जदारास विहित मुदतीत माहिती न दिल्यास ती नाकारल्याचे समजण्यात येईल, अशी तरतुद आहे, हे पाहता, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले आहे, असे समजण्यास काहीही प्रत्यावाय नाही. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे.

या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील कर्मचाऱ्यांकडून उपलब्ध करुन तद्नंतर ती अपिलार्थीस द्यावयाची होती. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांना देखिल जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतुद आहे, हे पाहता, अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी व

अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे सर्व सहायक हे जबाबदार ठरत आहेत. सबब, सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांना, संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यास त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांचेवर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस, त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील करण्यापूर्वीच माहिती प्राप्त झाली असल्याचे त्यांच्या अपील अर्जात नमूद केल्याने, माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांना, संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०४-१२-२००८** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शामराव तावजी डोईफोडे,४६९,नाथगल्ली, पैठण ता.पैठण जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,

औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९५८
निर्णय दिनांक ०४-१२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शरच्चंद्र माधव पंडित,<br>रा.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग,औरंगाबाद. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ,औरंगाबाद | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत, तर अपिलार्थी श्री.शरच्चंद्र माधवराव पंडित अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २०.०९.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अपिलार्थी यांनी, जन अपिलीय अधिकारी यांच्या दि.३०.७.२००७ रोजीच्या आदेशाविरुध्द केल्याचे दिसून येत आहे. तथापि या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने निश्चित स्वरुपाची कोणतीही विनंती आयोगास केलेली नाही व ते आज सुनावणीस गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही आवश्यक असल्याचे अनुमान काढून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १६.५.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे- त्यांच्या कार्यालयातील भांडार शाखेमधून मान्यता दिलेल्या मंजूर कोटेशनची प्रत व खरेदी केलेल्या मोजमापपुस्तिकेतील नोंदीसह बीलांच्या प्रतीची व नोंदी घेण्यासाठी स्टॉक रजिस्टरची मागणी केलेली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सन २००६-२००७ या वर्षाशी संबंधित होती. अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस प्रथमतः दि. १८.७.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली. ही माहिती अपिलार्थीने दि.२३.७.२००७ रोजी प्राप्त करुन घेतली, तथापि यापूर्वीच त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दि. २.७.२००७ रोजी प्रथम अपील केले होते. अपिलार्थीच्या या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.७.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. ३०.७.२००७ रोजी पारित केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस १५ दिवसांच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१८.७.२००७ रोजीच्या सुनावणीमध्ये सूचित केल्यानंतर अपिलार्थीने प्रथमतः दि. २३.७.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती व्यक्तिशः उपलब्ध करुन घेतली, तथापि त्यांना सदर माहिती अर्धवट वाटल्याने, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २१.९.२००७ रोजी परत पत्र देऊन उर्वरित माहिती उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली. तद्नंतर अपिलार्थीने दि. २८.९.२००७ रोजी त्यांनी माहितीचे अवलोकन करुन ती अर्धवट असल्याचे वाटल्यावरुन, "कृपया मागितलेली पूर्ण माहिती देण्यात यावी", असे अभिप्राय जन माहिती अधिकारी यांच्या दि. २१.९.२००७ रोजीच्या पत्रावर लिहिले व त्यानंतर ही माहिती व्यक्तिशः उपलब्ध करुन घेण्यास ते जन माहिती

अधिकारी यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित झाले नाहीत. (असा उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी युक्तिवाद केला.)

वरील सर्व घटनाक्रमासंबंधीच्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप मोठे होते. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याची प्रथमतः दि. १८.८.२००७ रोजी तयारी दर्शविली. त्याप्रमाणे अपिलार्थीने दि. २३.७.२००७ रोजी स्वीकार केला, त्यानंतर अपिलार्थीने ही माहिती अर्धवट असल्याचे जन माहिती अधिकारी यांना दि.३०.७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे कळविल्यावरुन त्यांनी अपिलार्थीस परत उर्वरित माहिती दि. २१.९.२००७ रोजी उपलब्ध करुन दिली, ती माहिती अपिलार्थीने दि.२८.९.२००७ रोजी अवलोकन करुन, "कृपया मागितलेली पूर्ण माहिती देण्यात यावी", असे अभिप्राय लिहून दिले, परंतु या माहितीचा स्वीकार केला नाही.

जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगासमोर केलेल्या युक्तिवादावरुन अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे तयार असून अपिलार्थी यांनी व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही व ही माहिती तयार असल्याचे त्यांना अवगत असूनही, त्यानंतर ती माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित राहिले नाहीत, असा युक्तिवाद जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केला आहे, या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नसल्याने जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद मान्य करण्यात येऊन, अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्यास ते स्वतःच जबाबदार असल्याचे अनुमान काढण्यात येत आहे व अपिलार्थी यांना असे सूचित करण्यात येते की,त्यांनी दि. १६.५.२००७ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून, हे आदेश त्यांना प्राप्त होताच

तीस दिवसांच्या आत ही माहिती उपलब्ध करुन घ्यावी. या कालावधीनंतर त्यांना या माहितीसाठी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत नव्याने, स्वतंत्र अर्ज करावा लागेल.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. १६.५.२००७ रोजीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याने मुख्य अभियंता, सा.बां.प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यास जबाबदार असलेले त्यांचे सर्व सहायक जे अधिनियमातील कलम ५(५) अनुसार 'जन माहिती अधिकारी' आहेत. या सर्वांवर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंग विषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देऊ करण्याची संपूर्ण माहिती आयोगास दाखविली. यावरुन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार असल्याचे दिसून येते. तथापि अपिलार्थी हे माहिती हस्तगत करण्यासाठी व्यक्तिशः उपस्थित राहिले नाहीत, त्यामुळे माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वतःच जबाबदार असल्याचे अनुमान काढण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती हे आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत, विनामूल्य उपलब्ध करुन घ्यावी.

३) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शरच्चंद्र माधवराव पंडित, एन-३, प्लॉट क्र.७४, सिडको,औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य अभियंता,सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९५९
निर्णय दिनांक ०४-१२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. महंमद साबेर उर्फ बाबुराज<br>रा.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा),<br>तहसील कार्यालय, नांदेड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, नांदेड<br>जि.नांदेड | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी ,जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.१०.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना त्यांच्या दि. ७.६.२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जास प्रतिसाद न मिळाल्याने, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०८.७.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.७.२००७ रोजी प्रथम सुनावणी ठेवली होती. तथापि या ठिकाणी जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर असल्यामुळे ही

सुनावणी होऊ शकली नाही. अशाप्रकारे त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे त्यांना देण्यास टाळाटाळ करीत आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. ७.६.२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १८.६.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तीस वर्षापूर्वीची व अतिशय जुनी असल्याचे कळविले, तसेच अपिलार्थीने ज्या त्रयस्थपक्षाविषयी ही माहिती मागितली होती, "त्या त्रयस्थपक्षाच्या नावाने कोणताही परवाना चालू नाही",असे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये दि. ८.७.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यांनी दि. २३.७.२००७ रोजी प्रथमतः या अपील अर्जासंदर्भात सुनावणी ठेवली होती, तथापि त्या दिवशी जन अपिलीय अधिकारी दौऱ्यावर असल्याने त्यांनी सुनावणीची तारीख दि.३.८.२००७ रोजी निश्चित केली व अपिलार्थीच्या अपील अर्जासंदर्भात निर्णय दिला.

अपिलार्थीने आज रोजी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या गैरहजेरीत सदर सुनावणी घेतली असून त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना दिली नाही. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाची कागदपत्रे पाहता, जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३.८.२००७ रोजी सुनावणी निश्चित केलेले सुनावणीचे पत्र त्यांनी अपिलार्थीस पाठविले नव्हते. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपिलावर सुनावणी घेताना जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी फक्त उपस्थित होते. यावरुन अपिलार्थीस त्यांचे म्हणणे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे मांडण्याची संधी उपलब्ध झ ाली नसल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता,

अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देऊन सुनावणी घेणे इष्ट राहील, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन त्यांनी अपिलार्थीच्या दि. ८.७.२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन या संदर्भात आपले निर्णय पारित करावेत. अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी पारित केलेला निर्णय मान्य न झाल्यास, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये ते राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर, हे आदेश त्यांना प्राप्त होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांचे आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. महंमद साबेर ऊर्फ बाबुराज,श्रीकृष्णा कॉम्प्लेक्स, १ ला माळा, मौलाना आझाद चौक, एम.जी.रोड,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,नांदेड

यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नांदेड जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९६०
निर्णय दिनांक  ०४-१२-२००८

१ श्री. उरुज अहमद सिद्दीकी, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जकात अधीक्षक,
महानगरपालिका,औरंगाबाद.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
आयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद
प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी: उपआयुक्त (महसूल),
महानगरपालिका,औरंगाबाद.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०६.०८.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पुरविलेली माहिती चुकीची असल्याचे नमूद केले. अपिलार्थी यांच्या मते महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नात दरवर्षी नैसर्गिक वाढ गृहीत धरले जाते, परंतु जन माहिती अधिकारी यांनी जी माहिती पुरविलेली आहे, त्यावरुन महानगरपालिकेच्या उत्पन्नात घट झाली आहे, असे

दिसून येते. त्यामुळे ही माहिती चुकीची आहे, असे त्यांनी म्हटले आहे. तसेच या अपील अर्जामध्ये पुढे राज्य माहिती आयोगाला संबंधित कागदपत्रे मागवून, पुरविलेल्या माहितीची शहानिशा करुन व सत्यता पडताळून अपिलार्थीस योग्य ती माहिती पुरविण्याचे आदेश जन माहिती अधिकारी यांना देण्याचे व संबंधितांवर कायद्याने योग्य ती कारवाई करण्याचे आदेश देण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. २३.४.२००७ रोजीच्या प्रथम अर्जाद्वारे (जन माहिती अधिकारी यांना दि. २४.४.२००७ रोजी प्राप्त) सन २००४-२००५, २००५-२००६ व २००६-२००७ या आर्थिक वर्षातील रहदारी फीबाबत मिळालेल्या उत्पन्नासंदर्भात एकूण चार मुद्यांद्वारे माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या अर्जामध्ये - रहदारी शुल्कापासून महानगरपालिका,औरंगाबादला मिळालेले एकूण उत्पन्न, प्रतिवर्षी उपयोगात आणलेल्या १०० पावत्या असलेल्या पावती पुस्तकांची संख्या, १०० पावत्या असलेल्या पुस्तकांसाठी स्टेशनरीवर झालेला खर्च व मनपाने सा.बां.विभागाला अदा केलेली रहदारी फी- या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २२.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना पुरविल्याचे दिसून येते. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २२.६.२००७ रोजी अधिनियमातील कलम १९(१) अन्वये अपील दाखल केले. जन अपिलीय अधिकारी यांनी या अपिलावर दि. २८.६.२००७ रोजी सुनावणी घेऊन दि. ५.९.२००७ रोजी आपले आदेश पारित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील या आदेशाद्वारे फेटाळून लावले. यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात म्हटल्याप्रमाणे द्वितीय अपील केले आहे.

अपिलार्थीच्या द्वितीय अपील अर्जासंदर्भात अपिलार्थीने असे म्हणणे मांडले आहे की,जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती चुकीची आहे, कारण महापालिकेच्या आर्थिक उत्पन्नात दरवर्षी २० टक्के नैसर्गिक वाढ गृहित धरली जाते, परंतु जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीमध्ये त्यांच्या उत्पन्नात घट झाल्याचे दर्शविले आहे. येथे मूळात असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेली माहिती चुकीची वाटल्याप्रित्यर्थ त्यांनी जे गृहितक मांडले आहे, त्या गृहितकाप्रमाणे प्रत्यक्षात महानगरपालिकेचे उत्पन्न न वाढल्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती दिली आहे, असे वाटत आहे. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असा खुलासा केला की, अपिलार्थीस त्यांनी पुरविलेली माहिती महानगरपालिकेच्या अधिकृत अभिलेख्यावरुन घेतली असून अपिलार्थीस या माहितीबाबत जर काही शंका असतील तर सदर अभिलेखे अपिलार्थी यांच्या निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यास ते तयार आहेत. कोणतीही प्रक्रिया सुरु करीत असताना जी गृहितके मांडली जातात, त्या गृहितकाप्रमाणेच निष्कर्ष निघतील अथवा उत्पन्नात वाढ होईल याची कोणीही खात्री देऊ शकत नाही, तसेच त्यांनी असेही स्पष्ट केले की, दरवर्षी महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये २० टक्के नैसर्गिक वाढ गृहित धरण्याचे कोणतेही आदेश अथवा परिपत्रक त्यांना प्राप्त झालेले नाही. यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती चुकीची वाटत असल्याप्रित्यर्थ, त्यांनी जे गृहितक मनात धरले आहे. त्या गृहितकासच मूळात कोणताच आधार नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी दिलेल्या माहितीतील आकडेवारी उपलब्ध कागदपत्रांवरुन दिली आहे, त्यासंबंधातील सर्व संबंधित कागदपत्रे अपिलार्थीस तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्यासाठीची तयारी दर्शविली आहे,तसेच अपिलार्थी यांनी, त्यांना प्राप्त झालेली माहिती चुकीची असल्याबाबत जे समर्थन,कारण त्यांच्या आयोगाकडील सुनावणीमध्ये दिले आहे, त्या समर्थनास कोणताही ठोस आधार नाही, त्यांच्या

महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये दरवर्षी २० टक्के वाढीच्या गृहीतकाला कोणताही आधार नाही, हे पाहता, अपिलार्थी यांना असे सूचित करण्यात येते की,जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती त्यांना चुकीची वाटत असेल तर त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी ज्या कागदपत्रांच्या आधारे माहिती दिली आहे, त्या कागदपत्रांची तपासणी, त्यांच्या कार्यालयात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींनुसार स्वतंत्र अर्ज करुन, करावी.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपलब्ध माहिती अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत दिली असल्याने त्यांच्यावर कोणतीही कार्यवाही न करता अथवा प्रस्तावित न करता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. उरुज अहमद सिद्दीकी, घर नं. ३-९-१८, वजीर मंजिल, किराणा चावडी,औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा जकात अधीक्षक,मध्यवर्ती नाका, बायजीपूरा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयक्त (महसूल), मुख्य कार्यालय, महानगरपालिका,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९६१
निर्णय दिनांक ०४-१२-२००८

१ श्री. उरुज अहमद सिद्दीकी, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जकात अधीक्षक,
महानगरपालिका,औरंगाबाद.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
आयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद
प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारीः उपआयुक्त (महसूल),
महानगरपालिका,औरंगाबाद.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत, तर अपिलार्थी श्री. उरुज अहेमद सिद्दीकी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०६.०८.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर आधारित काही निष्कर्ष काढले असून, त्यांच्या मते संबंधित अधिकाऱ्यांनी महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान केल्याने त्यांच्यावर आयोगातर्फे योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २७.४.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - औरंगाबाद महानगरपालिकेच्या जकात विभागाकडून मे.अगरवाल अँड कंपनी यांच्याकडून कमी जकात आकारल्याच्या संदर्भात - एकूण ७ मुद्यांवर माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २३.५.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३८२/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे त्यांना सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या पत्रामध्ये अपिलार्थीस पुरविण्यात येणाऱ्या माहितीची पृष्ठ संख्या व ती पुरविण्याचा प्रतिपृष्ठ दर याचा माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(३)(क) च्या तरतुदीप्रमाणे उल्लेख केला आहे. अपिलार्थीने सदर शुल्काची रक्कम जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. २.६.२००७ रोजी भरल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती त्याच दिवशी पुरविली. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २७.६.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २८.६.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपला निर्णय दि. ५.७.२००७ रोजी पारित केला. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जातील मुद्दा क्र. ४ संदर्भात जन माहिती अधिकारी यांना "माहिती पुनश्च तपासुन योग्य तो खुलासा तात्काळ करावा " असे सूचित केले. या आदेशात त्यांनी पुढे असेही नमूद केले आहे की, "अर्जदार हे मिळालेल्या माहितीच्या आधारे कर्मचाऱ्यांच्या चुकां बाबत अथवा त्यांना निदर्शनास आलेल्या बाबींबाबत सक्षम प्राधिकाऱ्याकडे वेगळा अर्ज करुन दाद मागू शकतात." जन अपिलीय अधिकारी यांच्या या

निर्णयानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १९.७.२००७ रोजी आवश्यक तो खुलासा केला. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले आहे.

उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २७.४.२००७ रोजी केलेल्या अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ७ मुद्यांवर माहिती मागितली होती.या ७ मुद्यांपैकी अपिलार्थीने ४ (३ पूर्णतः व १ अंशतः) मुद्यांद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृती/निर्णयासंबंधी कारणे विचारली होती. माहिती अधिकार अधिनियमामध्ये कोणाही अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या निर्णयाबद्दल कोणताही खुलासा,कारणे अथवा स्पष्टीकरण विचारणे अभिप्रेत नाही. अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी कोणाही अर्जदाराने त्यांना माहिती मागितल्यास त्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे, त्या स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास देणे अभिप्रेत असल्याचे दिसून येते. सबब अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ अंशतः २,३ व ५ द्वारे विचारलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना देय होत नाही. मात्र उर्वरित मुद्दा क्र. १ अंशतः, ४,६ व ७ शी संबंधित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय ठरते. जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीस दि. २.६.२००७ रोजी सशुल्क पुरविली आहे. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील त्यांच्या प्रथम अपील अर्जाच्या सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मुद्दा क्र.४ च्या संदर्भात अतिरिक्त खुलासा अपेक्षित केल्याचे दिसून येते. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना अधिनियमाद्वारे खुलासा करण्याची तरतुद नसताना देखिल जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील माहिती

संदर्भात खुलासा करण्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केले व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. १९.७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक तो खुलासा केला आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ द्वारे- "मे.अग्रवाल अँड कंपनी वर्षाला दोन कोटी पेक्षा जास्त जकात भरते त्या पावत्यांची प्रत देण्यात यावी",- अशी माहिती मागितली आहे. या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मे. अग्रवाल आणि कंपनी यांच्याकडील पावतीच्या झेरॉक्स प्रती पुरविल्या. या पावत्यांवर निर्देशित केलेल्या जकात रकमांची बेरीज केली असता, ती रु. ९४,६७,३६५/- इतकी भरते. अपिलार्थीस यांचे म्हणणे असे आहे की, अग्रवाल आणि कंपनी ही वर्षाला २ कोटी पेक्षा जास्त जकात भरतात, असे त्यांना महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी सांगितले आहे. या संदर्भात अपिलार्थीने कोणताही पुरावा आयोगासमोर सादर केला नाही. कोणीतरी सांगितले म्हणून तीच माहिती सत्य असल्याचे गृहीत धरुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली व अपिलार्थीस दिलेली अधिकृत माहिती असत्य असल्याचे अपिलार्थीचे म्हणणे, आवश्यक त्या पुराव्याअभावी आयोग फेटाळून लावत आहे.

वरील घटनाक्रमाचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जावर व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर अधिनियमातील विहित केलेल्या कालावधीमध्ये योग्य ती कार्यवाही केली आहे. अपिलार्थीस, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवरुन आयोगाकडून संबंधित अधिकाऱ्यावर योग्य ती कारवाई व्हावी, असे अपेक्षित आहे, तथापि या संदर्भात अपिलार्थीचे काही म्हणणे असल्यास त्यांनी आयुक्त,महानगरपालिका,औरंगाबाद यांच्याकडे वेगळा अर्ज करुन आपल्या गाऱ्हाण्याची तड लावावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये वरीलप्रमाणे महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यावर आपले दैनंदिन कर्तव्य पार पाडत असताना केलेल्या प्रशासकीय

अनियमिततेबाबत, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीपेक्षा वेगळया कारणास्तव कारवाई करण्याची कोणतीही अधिकारिता आयोगास नसल्याने अपिलार्थी यांनी द्वितीय अपील अर्जामध्ये याबाबत केलेली मागणी, आयोग मान्य करीत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन द्वितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. उरुज अहमद सिद्दीकी, घर नं. ३-९-१८, वजीर मंजिल, किराणा चावडी,औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा जकात अधीक्षक,मध्यवर्ती नाका, बायजीपूरा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयक्त (महसूल), मुख्य कार्यालय, महानगरपालिका,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२००१
निर्णय दिनांक ०५-१२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. गणपत गुणवंत पिसाळ,<br>रा.मुरुड ता.जि.लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>जनता विद्या मंदिर,मुरुड ता.जि.लातूर | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय शिक्षण उपसंचालक,<br>लातूर. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. माणिक राघुराव रोहिले | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>जनता विद्या मंदिर,मुरुड, ता.जि.लातूर |
| २. | श्री. महारुद्र त्र्यंबकआप्पा बोळेगावे, सहा.शिक्षण उपनिरीक्षक | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर यांचे प्रतिनिधी |

अपिलार्थी श्री. गणपत गुणवंतराव पिसाळ हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०८.०८.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची व विसंगत माहिती दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलावर कोणताही निर्णय दिला नाही तसेच त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. ३०.६.२००७ रोजी जी माहिती दिली ती विलंबाने दिली असून ती खोटी,चुकीची व दिशाभूल करणारी आहे. संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या कृतीकरिता त्यांच्यावर अधिनियमाप्रमाणे कारवाई करण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने दि. १७.३.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे उच्च माध्यमिक विभागाच्या सन २००४ ते २००५, २००५ ते २००६ व २००६ ते २००७ या कालावधीतील सेवाजेष्ठयता सूची व त्रयस्थ पक्ष श्री. रोहिले माणिक राघुराव यांच्या एम.पी.एड बाबतची माहिती मागितली होती, यामध्ये श्री. रोहिले यांनी - एम.पी.एड प्रवेश घेतलेले वर्ष, महाविद्यालयाचे नाव, विद्यापीठाचे नाव,परीक्षा दिलेले वर्ष, परीक्षा क्रमांक व एम.पी.एड रेग्युलर केले की व्हॅकेशनल केले - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रथमतः कोणताही प्रतिसाद दिला नसल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १०.५.२००७ रोजी विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर यांच्याकडे या संदर्भात प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. १८.५.२००७ रोजीच्या पत्राद्वारे निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्वरित उपलब्ध करुन देण्याचे सूचित करुन त्या पत्राची एक प्रत अपिलार्थीस देऊन या संदर्भात संबंधित संस्थेचे अध्यक्ष/सचिव हे जन अपिलीय

अधिकारी असल्याने त्यांच्याकडे प्रथम अपील करण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि विभागीय शिक्षण उपसंचालक तथा जन अपिलीय अधिकारी यांचा हा निर्णय अपिलार्थीस प्राप्त न झाल्याने (अपिलार्थी यांच्या म्हणण्याप्रमाणे) व्यथित होऊन त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न होता, ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. ३०.६.२००७ रोजी प्राप्त झाली आहे. त्यांना प्राप्त झालेली माहिती चुकीची आहे. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. ३०.६.२००७ रोजी प्राप्त झालेली माहिती चुकीची कशी आहे, हे अपिलार्थीस विचारले असता, त्यांनी आयोगास असे स्पष्ट केले की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ३०.६.२००७ रोजी दिलेल्या माहितीमध्ये श्री. रोहिले यांनी एम.पी.एड व्हॅकेशनल केले आहे, अशी माहिती दिली आहे, तर त्यांनी संबंधित कॉलेजच्या (बाबासाहेब परांजपे कॉलेज ऑफ फिजीकल एज्यूकेशन,अंबाजोगाई) प्राचार्यांकडून या संबंधी प्रमाणपत्र घेतले असता, संबंधित प्राचार्यांनी श्री. रोहिले यांनी त्यांच्या महाविद्यालयातून एम.पी.एड हे नियमितपणे केले असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेली ही माहिती असत्य आहे. अपिलार्थी यांनी दुसरा असाही मुद्दा उपस्थित केला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना सन २००४ ते २००५, २००५ ते २००६ व २००६ ते २००७ च्या जेष्ठयतासूचीमध्ये त्यांचा प्रथम नेमणूक दिनांक वेगळा दाखवला आहे. सन २००४ ते २००५ व २००५ ते २००६ मध्ये हा दि. १८.८.१९८६ असा दर्शविला असून सन २००६ ते २००७ च्या दोन याद्या प्राप्त झाल्या असून एका यादीवर सदर दि. १८.८.१९८६ असा व दुसऱ्या यादीमध्ये १८.८.१९८६/११.११.१९८९ असा उल्लेख आहे व त्यांचा सेवाजेष्ठयता २००६-२००७ च्या

यादीमध्ये क्रमांक २ वरुन ७ वर आणण्यात आला आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विलंबाने व चुकीची माहिती दिल्याचे सिध्द होत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः एम.पी.एड च्या मुद्यावर चुकीची व विलंबाने माहिती दिल्याचे आयोगासमोर मान्य केले आहे. मात्र अपिलार्थीच्या प्रथम नेमणूकी व सेवाजेष्ठयते संदर्भात त्यांनी असा खुलासा केला की, त्यांच्या शाळेमध्ये, शिक्षण विभागाकडून संबंधितांच्या नेमणूकीसाठी संच मान्यता जसजशी उपलब्ध होते, त्याप्रमाणे त्यांची सेवाजेष्ठता ठेवली जाते, या प्रकरणामध्ये अपिलार्थीच्या संच मान्यतेस शिक्षण विभागाकडून ज्याप्रमाणे मान्यता देण्यात आली, त्याप्रमाणे त्यांनी सदर सेवाजेष्ठयता सूची तयार केली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंचा युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दि.१७.३.२००७ रोजी माहितीची मागणी केली असता, जी माहिती अपिलार्थीस दि.२०.४.२००७ (त्रयस्थ पक्षाकरिता ५ दिवस अधिक) रोजी अगर तत्पूर्वी देय होती, ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ३०.६.२००७ रोजी दिली आहे. सदर माहिती त्यांनी अपिलार्थीस देण्याकरिता ७० दिवसांचा विलंब लावला आहे. या विलंबाचे समर्थन आज जन माहिती अधिकारी, त्यांना पूरेशी संधी देऊनही आयोगासमोर करु शकले नाहीत किंबहुना या विलंबाचे कोणतेही समर्थन असू शकत नाही, कारण अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे उपलब्ध होती. अपिलार्थीस चुकीची माहिती दिल्याचे आज रोजी सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी कबूल केले आहे. मात्र अपिलार्थीच्या सेवाजेष्ठयतेसंदर्भात राज्य माहिती आयोग कोणतेही भाष्य करु इच्छित नाही. सेवाजेष्ठयतेसंदर्भात काही हरकत असल्यास अपिलार्थीने योग्य त्या प्राधिकरणाकडे आपली तक्रार नोंदवावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे. या प्रकरणाचे वैशिष्टय हे आहे

की, त्रयस्थ पक्ष म्हणजे स्वतः जन माहिती अधिकारी हे आहेत, अपिलार्थीने मागणी केलेली सर्व माहिती, त्यांच्या स्वतःकडे उपलब्ध असून देखिल त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः विलंबाने व चुकीची दिली. त्यांनी अपिलार्थीस माहिती देताना ही माहिती चुकीची आहे हे जन माहिती अधिकारी यांना माहित होते, तथापि सत्य माहिती उपलब्ध असताना, अपिलार्थीस चुकीची माहिती देण्याच्या त्यांच्या या कृतीचे कोणतेही समर्थन, आयोगाच्या मते, असू शकत नाही.

अशाप्रकारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने व चुकीची माहिती दिल्याचे सिध्द झाल्याने ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत. आज रोजी संबंधित जन माहिती अधिकारी आयोगासमोर उपस्थित आहेत. अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्याबाबतच्या या कृतीबाबत त्यांना पुरेशी संधी देऊनही ते कोणतेही समर्थन देऊ शकत नाहीत, हे पाहता त्यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) प्रमाणे कारवाई करणे गरजेचे वाटते. सबब असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यास लावलेल्या ७० दिवसांच्या विलंबासाठी प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे रु.१७,५००/- (रु.सतरा हजार पाचशे) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीच्या रकमेचा शासकीय कोषागारात त्यांनी पुढील लेखाशीर्षाखाली जास्तीत जास्त पाच हप्त्यात भरणा करावा.

**लेखाशीर्ष-**"००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) "

सदर शास्तीचा संबंधित जन माहिती अधिकारी शासकीय कोषागारात नियमितपणे भरणा करतील, असे जन अपिलीय अधिकारी यांनी पहावे.

अपिलार्थीस सत्य माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, हे आदेश प्राप्त होताच त्यांना, सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३) जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रतिदिनी रु. २५०/- याप्रमाणे ७० दिवसांसाठी एकूण रुपये १७,५,००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे.सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे शासकीय कोषागारात करावा.

४) जन अपिलीय अधिकारी यांनी, संबंधित जन माहिती अधिकारी हे वरील आदेश क्र.३ चे अनुपालन करतील असे पहावे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०५-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गणपत गुणवंत पिसाळ,रा. आदर्शनगर, मुरुड, ता.जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,जनता विद्या मंदिर,मुरुड ता.जि.लातूर - यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक,लातूर. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हा कोषागार अधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/२३८
निर्णय दिनांक ०५-१२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. एम.बी.पेडगावकर,<br>रा.परभणी | : | तक्रारदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, सारंग स्वामी<br>विद्यालय,विवेकनगर,परभणी | : | उत्तरवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित आहेत.

| | |
|---|---|
| १. श्री. एस.बी.चलवदे | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>सारंग स्वामी विद्यालय,<br>विवेकनगर,परभणी. |

अपिलार्थी श्री. लक्ष्मण बाबूराव पेडगावकर हे उपस्थित आहेत.

या प्रकरणी उपरोक्त तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये कलम १८ अन्वये दि. १०.१२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे अशी तक्रार केली की, त्यांचे द्वितीय अपील क्र.५६३/२००७ ची दि.१३.११.२००७ रोजी सुनावणी होऊन यासंबंधीचे राज्य माहिती आयोगाचे आदेश दि. १५.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये निर्गमित झालेले आहेत. सदर आदेश तक्रारदार यांनी जन

माहिती अधिकारी यांना दि.२२.११.२००७ रोजी दिला तरीही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी सदर आदेशाचे अनुपालन, तक्रारीच्या दिनांकापर्यंत म्हणजेच दि. १०.१२.२००७ पावेतो केले नाही व त्यांना त्यांच्या नेमणूकीची प्रत किंवा एफ.आय.आर.ची प्रत मिळाली नाही, त्याचबरोबर त्यांनी या तक्रार अर्जामध्ये, "श्री.घाळे व इतर बऱ्याच नेमणूका तक्रारदार कार्यरत असताना पूर्वीच्या तारखेत केल्या, संस्थेच्या सभासदांची संख्या ही बेकायदेशीर वाढविली व राज्य माहिती आयोगाच्या निर्णयाचा अवमान केला", असेही त्यांनी म्हटले आहे.

उत्तरवादी यांनी त्यांचे या प्रकरणातील लेखी म्हणणे सुनावणीच्या वेळी आयोगासमोर सादर केले असून, त्यामध्ये तक्रारदार यांनी मागणी केलेली माहिती गहाळ झाल्याबाबत पोलीस निरीक्षक, नवा मोंढा पोलीस स्टेशन,परभणी यांच्याकडे जन माहिती अधिकारी यांनी दि. २.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे तक्रार दाखल केली आहे व या पत्राची प्रत तक्रारदार यांना स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविली असल्याचे आयोगास अवगत केले. तथापि या पत्राची प्रत तक्रारदार यांना प्राप्त झाली नाही, असे तक्रारदार यांचे म्हणणे आहे.

आज सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी सदर पत्राची प्रत तक्रारदार यांना देण्यास ते तयार असल्याचे आयोगासमोर सांगितले. त्याप्रमाणे सदर पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली.

या परिस्थितीत, अपिलार्थीस एफ.आय.आर.ची प्रत मिळाल्याने त्यांची आयोगाकडे दाखल केलेली तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. तक्रारदाराची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक ०५-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. एल.बी.पेडगावकर,२५,शिवरामनगर,डॉ.सुब्बाराव समोर, वसमतरोड,परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. सारंग स्वामी विद्यालय,विवेकनगर, परभणी जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सरचिटणीस, सारंग स्वामी शिक्षण प्रसारक मंडळ, मंत्रीमंगल कार्यालयासमोर,शिवरामगर,परभणी जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९६४
निर्णय दिनांक ०५-१२-२००८

१ श्री. भाई सुरेश झुंबरलाल तापडीया, : अपिलार्थी
रा. उस्मानाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
जिल्हा अधीक्षक कृषिअधिकारी कार्यालय
उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा
कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि
अधिकारी कार्यालय
जि.उस्मानाबाद.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय उस्मानाबाद.

जन अपिलीय अधिकारी: जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, उस्मानाबाद.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. जयंत शामराव कांबळे | जन माहिती अधिकारी तथा कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, उस्मानाबाद. |
| २. | श्री. विठ्ठल भगवान मोरे | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा प्र.कृषि उपसंचालक जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, उस्मानाबाद |

अपिलार्थी श्री. भाई सुरेश झुंबरलाल तापडीया हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०५.१०.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना जाणूनबुजून माहिती दिली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ६.८.२००७ रोजी चर्चेला बोलावून त्यावेळी अपिलार्थीने तोंडी व लेखी म्हणणे जन अपिलीय अधिकारी यांना सादर केल्यानंतरही अपिलीय अधिकारी यांनी यासंदर्भात कोणताही निर्णय दिला नाही. यावेळी जन अपिलीय अधिकारी यांनी "एवढीच माहिती उपलब्ध आहे", असे म्हणून त्यांना अपूर्ण माहिती दिली व उर्वरित माहिती तालुका कृषि अधिकारी यांना अपिलार्थीस देण्याबाबत कळविल्याचे सांगितले व अपिलार्थीस परत पाठवले, असे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने दि. २१.६.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील दि. १.३.२००७ ते ३१.५.२००७ या कालावधीतील रोजगार हमी योजनेच्या कामासंदर्भात एकूण ९ मुद्यांद्वारे रजिस्टर्ड टपालाने माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - रो.ह.यो. कामांची ठिकाणे,निरीक्षकांची यादी,रोहयो वेतन कायद्यानुसार मजूरीचे वाटप करण्यात आले आहे काय? किमान व कमाल मजूरी, चावडी वाचन करण्यात आले काय?, तसेच कोणती व कशी पध्दत वापरली, प्रत्येक कामावर झालेला खर्च,या कालावधीत रोहयो निधीतून पाळणे, प्रथमोपचार पेटया, रांजण, इतर अवजारे यावर झालेला खर्च व त्याबाबतच्या खरेदीबीलाच्या छायाप्रती. - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथमत: अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील

कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २१.७.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलाची जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता या प्रकरणी अपिलार्थीस दि. ३०.७.२००७ रोजी पत्र पाठवून दि. ६.८.२००७ रोजी चर्चेला बोलावले. अपिलार्थी जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहिले असता, त्यांनी दि.६.८.२००७ रोजी त्यांच्या कार्यालयाशी संबंधित मुद्दा क्र. १ व ७ या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस व्यक्तिशः हस्तांतरित केली. सदर माहिती अपिलार्थीस दि. ६.८.२००७ रोजी प्राप्त झाल्याप्रित्यर्थची जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील दि. ६.७.२००७ अशी दिनांक टंकलिखित केलेल्या पत्राच्या स्थळप्रतीवरील सही तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास दाखवली. यावरुन अपिलार्थीस दि. ६.८.२००७ रोजी त्यांनी मागणी केलेल्या ९ मुद्यांपैकी मुद्दा क्र. १ व ७ या दोन मुद्यांवरील माहिती दिल्याचे व उर्वरित मुद्दा क्र. १ ते ६ व मुद्दा क्र. ८ व ९ या मुद्यांशी संबंधित माहिती संबंधित तालुका कृषि अधिकारी यांच्याकडून घेण्याचे किंवा संबंधित तालुका कृषि अधिकारी यांच्याकडून प्राप्त होताच पुरविण्याचे आश्वासित केले. अशाप्रकारे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस उर्वरित माहिती तालुका कृषि अधिकारी यांच्याशी संबंधित असल्याचे विदीत केले. एवढे करुनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र. १ व ७ शी संबंधित माहिती त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध होती, ती त्यांनी दि. ६.८.२००७ रोजी पुरविली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी उर्वरित माहिती तालुका कृषि अधिकारी यांच्याशी संबंधित असल्याने अपिलार्थीस ती माहिती तालुका कृषि

अधिकाऱ्याकडून घेण्याचे त्यांनी सूचित केले व त्याप्रमाणे अपिलार्थीने प्रथम अपील करण्यापूर्वी यासंदर्भात त्यांच्याकडील दि. ११.७.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सर्व तालुका कृषि अधिकाऱ्यांना सूचना दिल्या होत्या, असे दिसून येते. अपिलार्थीच्या दि. २१.६.२००७ रोजीच्या अर्जास जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २०.७.२००७ रोजी अशाप्रकारे उत्तर देऊन अपिलार्थीचा अर्ज निकाली काढल्याचे त्यांना कळविले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. २१.६.२००७ रोजीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी दि. २०.७.२००७ रोजी प्रथम प्रतिसाद दिला आहे. तथापि हे पत्र अपिलार्थीस पाठविल्याचा कोणताही पुरावा ते आज आयोगासमोर सादर करु शकले नाहीत तसेच या पत्रातील मजकूर पाहता, अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती तालुका कृषि अधिकारी यांच्याकडून घेण्याचे सूचित करुन त्यांनी अपिलार्थीचा अर्ज निकाली काढला. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र. १ व ७ शी संबंधित माहिती त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध होती, असे कबूल केले आहे. परंतु असे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस तालुका कृषि अधिकारी यांच्याकडून माहिती घेण्याचे सूचित करण्याची त्यांची कथित दि. २०.७.२००७ रोजीच्या पत्रातील कृती सर्वथा अवैध व गैर आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेली माहिती जर त्यांच्या कार्यालयाशी संबंधित नव्हती तर त्यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) प्रमाणे अपिलार्थीच्या प्रथम अर्जाची प्रत सर्व संबंधितांकडे पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे त्यांना भाग होते, तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती केल्याचे आयोगास आढळून येत नाही. जन अपिलीय

अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) नुसार अपिलार्थीने दि. २१.७.२००७ रोजी केलेल्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ६.७.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस निर्णय दिल्याचे दिसून येते. तथापि ही तारीख चुकीची आहे. कारण अपिलार्थीने मूळात दि. २१.७.२००७ रोजी अपील केले असताना व सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला असताना अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी हे दि. ६.७.२००७ रोजी म्हणजेच, अपिलार्थी यांचा अपील अर्ज प्राप्त होण्यापूर्वीच निर्णय देणे शक्य नाही, म्हणून या पत्राची दि. ६.८.२००७ अशी तारीख गृहीत धरण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ व ७ शी संबंधित माहिती, त्यांनी दि. ६.८.२००७ रोजी म्हणजेच एकूण ४४ दिवसांच्या विलंबाने दिल्याचे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात देण्यासाठी त्यांच्याकडील दि. ११.७.२००७ रोजीच्या पत्रान्वये सूचना दिली होती, तथापि आजतागायत म्हणजेच अपिलार्थीच्या द्वितीय अपील अर्जाच्या सुनावणीपर्यंत देखील अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील माहिती देण्याचे साधे सौजन्यही संबंधित जन माहिती अधिकारी (तालुका कृषि अधिकारी) यांनी दाखवले नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मर्यादित कालावधीशी संबंधित असून या माहितीची व्याप्ती व स्वरुप इतके मोठे नव्हते की, जी माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी व त्यांच्या सहायक यांच्या कार्यालयातील साधनसामग्री मोठया प्रमाणात वळवावी लागली असती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या अर्जातील एकूण ९ मुद्यांद्वारे जरी जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारली होती तरी या अर्जातील मुद्दा क्र. ३ व ५ वगळता उर्वरित माहिती अपिलार्थीस देय ठरते, कारण ही माहिती वेगळया तऱ्हेने मांडल्यास ती प्रश्नार्थक स्वरुपाची होऊ शकत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा

क्र. ३ व ५ शी संबंधित माहिती मात्र अपिलार्थीस देय नाही, कारण अपिलार्थीने मुद्दा क्र. ३ द्वारे - मजूरांना रोहयो वेतन कायद्यानुसार मजूरीचे वाटप करण्यात आहे आहे काय?- व मुद्या क्र. ५ द्वारे - हजेरीपत्रकाचे चावडी वाचन करण्यात आले आहे काय? - अशा स्वरुपाची माहिती विचारली, या दोन्ही प्रश्नांसंदर्भातील माहिती अपिलार्थीस, मजूरांच्या हजेरी पत्रकांच्या प्रतींवरुन व त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ६ च्या संदर्भात देण्यात येणाऱ्या प्रस्तावित माहितीवरुन अपिलार्थीस मिळू शकेल. याचबरोबर अपिलार्थीने मागणी केलेली या दोन्ही मुद्यावरील माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. त्यामुळे ती अपिलार्थीस देय होत नाही. मात्र उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक यांच्याकडून देय ठरत आहे. या प्रकरणी अपिलार्थीस प्रथमतः अर्धवट व त्यानंतर कोणतीही माहिती न दिल्याने अपिलार्थी हे त्यांना अपेक्षित असलेली माहिती मिळण्यापासून दीर्घकाळासाठी वंचित राहिल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे.

वरील घटनाक्रमाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती मिळण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ काळासाठी वंचित ठेवण्यास संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे इतर सहायक निश्चितपणे जबाबदार आहेत, अशी आयोगाची खात्री झाली आहे.

आज रोजी सुनावणीस उपस्थित असलेले जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीने ज्या वेळी माहितीची मागणी केली, त्यावेळी जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत नव्हते, त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यास त्यांना सहाय्य कारणारे इतर अधिकारी/कर्मचारी, ज्यांना अधिनियमातील कलम ५(५) नुसार जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतुद आहे, या सर्वांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती न दिल्याबद्दल त्यांना अधिनियमातील कलम २०(१)

प्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत आयोगास सरळ सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी. या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व तत्कालीन तालुका कृषि अधिकारी हे या संदर्भात आयोगास वेळेत खुलासा सादर करतील असे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, उस्मानाबाद यांनी पहावे असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

आज रोजी अपिलार्थीच्या अनुपस्थितीमुळे, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. ६.८.२००७ रोजी मुद्दा क्र. १ व ७ शी संबंधित पुरविलेली माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे अनुमान काढण्यात येऊन उर्वरित ५ मुद्यांवरील (मुद्दा क्र.२,४,६,८ व ९ शी संबंधित) माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी, असे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित ५ मुद्यांवरील (मुद्दा क्र.२,४,६,८ व ९ शी संबंधित) माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३) जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्याप्रित्यर्थ कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अधिनियमातील विहित कालावधीपेक्षा जास्त कालावधीसाठी वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर

प्रतिदिनी रु. २५०/- याप्रमाणे एकूण रुपये २५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

४) जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, उस्मानाबाद यांनी, संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक हे वरील आदेश क्र.३ चे विहित मुदतीत अनुपालन करतील असे पहावे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०५-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भाई सुरेश झुंबरलाल तापडीया, छत्रपती शिवाजी हायस्कूलजवळ, उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांचे कार्यालय, उस्मानबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक,कृषि अधिकारी,उस्मानबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९६५
निर्णय दिनांक ०५-१२-२००८

१ श्री. अरविंद रामभाऊ ताकपेरे, : अपिलार्थी
मु.पो.बोर्डा, ता. कळंब, जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळंब,
जि. उस्मानाबाद.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, उस्मानाबाद.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित आहेत.

| | |
|---|---|
| १. श्री. प्रमोद बनसोडे | जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,कळंब,जि. उस्मानाबाद. |
| २. श्री.सुधीर भातलवंडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी | जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांचे प्रतिनिधी |

अपिलार्थी श्री. अरविंद रामभाऊ ताकपेरे हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०५.१०.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अपिलार्थी यांनी, दि. १५.६.२००७ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने केले असल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १५.६.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थपक्ष श्री. एस.एम.हारके, सहायक आरेखक पंचायत समिती कार्यालय, कळंब यांची जानेवारी २००६ ते जून २००७ पर्यंतची हजेरीपुस्तिकेची व त्यांना देऊ केलेल्या पगाराची माहिती टपालाद्वारे मागितली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने केलेल्या अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचा उल्लेख केल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जास त्यांच्याकडील दि. २७.६.२००७ रोजीच्या पत्राद्वारे, अपिलार्थीस या संदर्भातील पुरावा सादर करण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अशाप्रकारचा कोणताही खुलासा सादर न करता अधिनियमातील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ९.८.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ५.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे आपला निर्णय देऊन अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ८(ञ) नुसार देण्याचे नाकारले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले आहे.

उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची प्रत सादर केली आहे, त्यामध्ये ते दारिद्रय रेषेखालील व्यक्ती आहेत किंवा कसे, याचा कोणताही खुलासा केलेला नाही. मात्र त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करताना ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीने मागणी

केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. ५.९.२००७ रोजीच्या निर्णयामध्ये म्हटल्याप्रमाणे ही माहिती जरी त्रयस्थ पक्षाशी संबंधित असली तरी, ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या ताब्यात असल्याने, तसेच सार्वजनिक प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना मिळणारे वेतन हे संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाने अधिनियमातील कलम ४(१)(ख)(१०) प्रमाणे स्वयंप्रेरणेने प्रसिध्द करण्याची तरतुद असल्याने अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही खाजगी स्वरुपाची माहिती न राहता, सार्वजनिक स्वरुपाची होत आहे, त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती देय आहे. तथापि मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या माहितीसाठीच्या अर्जाप्रमाणे अपिलार्थीने, ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे आवश्यक ते प्रमाणपत्र त्यांच्याकडे सादर न केल्याने अपिलार्थीचा मूळ अर्जच आता अवैध ठरत असल्याने, या अर्जाच्या अनुषंगाने राज्य माहिती आयोगाने द्वितीय अपील अर्जावर सुनावणी घेण्याचे कोणतेही कारण आयोगास दिसत नाही. अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जर जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक असेल तर त्यांना या माहितीसाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे परत नव्याने अधिनियमातील कलम ६ नुसार अर्ज सादर करावा लागेल.

अपिलार्थी यांच्या वर्तनातील विसंगती लक्षात घेता, या परिस्थितीत अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०५-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अरविंद रामभाऊ ताकपेरे, मु.पो.बोर्डा, ता.कळंब जि.उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळंब, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९६६
निर्णय दिनांक ०५-१२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. हेमंत शिवाजीराव वडणे,<br>रा.तुळजापूर, जि.उस्मानाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>प्रशासन अधिकारी,<br>शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण),<br>महाराष्ट्र राज्य, पुणे-१ | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षण संचालक (उच्च शिक्षण),<br>महाराष्ट्र राज्य, पुणे-१ | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित आहेत.

| | |
|---|---|
| १. श्री. लक्ष्मण दत्तात्रय कोकाटे | जन माहिती अधिकारी तथा<br>प्रशासन अधिकारी,<br>शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण),<br>महाराष्ट्र राज्य, पुणे-१. |

अपिलार्थी श्री. हेमंत शिवाजीराव वडणे हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०८.१०.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना दिली नाही व सहसंचालक उच्च शिक्षण,औरंगाबाद विभाग यांना पत्र देऊन वेळ घालवला, तर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाचे नुतनीकरण झाल्याचे कारण पुढे करुन अपिलार्थीस माहिती उपलब्ध होऊ शकत नाही, असे कळवून अपिलार्थीस महाराष्ट्र राज्यातील संबंधित महाविद्यालयांकडे माहिती विचारण्याचा सल्ला दिल्याचे नमूद केले आहे. जर संबंधित महाविद्यालयाकडून माहिती घेणे, शिक्षण विभागाला अभिप्रेत असेल तर शिक्षण संचालक कार्यालयाची आवश्यकता का आहे? असा प्रश्न या अपील अर्जामध्ये त्यांनी उपस्थित केलेला आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १६.७.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे- कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,बदनापूर जि.जालना व आदर्श महाविद्यालय उमरगा जि.उस्मानाबाद येथील महाविद्यालयातील जाहीरातीमधील रिक्त अधिव्याख्याता रसायनशास्त्र पदासाठी विहित पध्दतीद्वारे निवड करण्यास किती महाविद्यालयांना 'ना-हरकत' प्रमाणपत्र देण्यात आले.त्या महाविद्यालयाच्या नावानुसार खुल्या व मागासवर्गीय उल्लेखासह यादी तसेच जून १९९८ ते जून १९९९ या कालावधीत किती अतिरिक्त रसायनशास्त्र अधिव्याख्यात्यास इतर महाविद्यालयात सामावून घेण्याचे आदेश दिले, त्या महाविद्यालयाची यादी व त्यांचे स्वतःचे नाव यासह यादी- या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीचा प्रथम अर्ज दि. १६.७.२००७ रोजी केला असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३०.८.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्राद्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती न देता, ना-हरकत प्रमाणपत्र व अतिरिक्त अधिव्याख्याता यांना कायमस्वरुपी अधिव्याख्याता म्हणून कशी नेमणूक दिली जाते, या कार्यपध्दतीचे वर्णन केले आहे. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली

माहिती विषयनिहाय समावेशन केलेल्या महाविद्यालयाकडून अपिलार्थीस मिळू शकेल, असा अपिलार्थीस सल्ला दिलेला आहे.जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ५.९.२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. मात्र त्यांनी यासंदर्भात अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. १८.९.२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांच्या कार्यालयाचे नुतनीकरण केले असल्यामुळे अपिलार्थीने मागितलेली माहिती संचालनालयामध्ये उपलब्ध होऊ शकत नाही, असे कळविले व त्याचबरोबर प्रत्येक महाविद्यालयामध्ये जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांची नेमणूक केली असल्याने ना-हरकत प्रमाणपत्र व विषयनिहाय समावेशन केलेल्या अधिव्याख्यात्यांची नावे त्या-त्या महाविद्यालयांकडे प्राप्त होऊ शकत असल्याने अपिलार्थीस संबंधित महाविद्यालयाशी संपर्क साधण्याचे सूचित केले.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी या प्रकरणाची पार्श्वभूमी समजावून घेतली असता, उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, संचालनालयाच्या कार्यालयामध्ये आवश्यक त्या कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. त्यांनी आयोगास पुढे असेही स्पष्ट केले की, शिक्षण संचालनालयामध्ये, महाविद्यालयाला कर्मचारी भरती प्रकरणी ना-हरकत प्रमाणपत्र देणे व अतिरिक्त कर्मचा-यांचे समावेशन करणे या दोन्हीही बाबीसंदर्भातील प्रकरणांत दोन वेगवेगळया स्वतंत्र विभागामार्फत कार्यवाही केली जाते. अपिलार्थीने मागणी

केलेली माहिती ८-९ वर्षापूर्वीची होती व त्यांच्या इमारतीचे नुतनीकरण चालू असल्यामुळे, ती त्यांना अपिलार्थीस वेळेत देता आली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूनी केलेला युक्तिवाद ऐकून, जन माहिती अधिकारी यांच्या वरील युक्तिवाद आयोग अमान्य करीत आहे. कारण प्रत्येक महाविद्यालयास त्यांचे कर्मचारी भरती करताना शिक्षण संचालकाकडून ना-हरकत प्रमाणपत्र दिले जाते व अधिव्याख्याता/प्राध्यापकांचे समावेशन देखिल शिक्षण संचालनालयामार्फत केले जात असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांच्याकडे ही माहिती उपलब्ध असणे अनिवार्य आहे. या प्रकरणी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठी त्यांच्या पातळीवर प्रत्येक महाविद्यालयाकडे जाण्याचा सल्ला दिलेला आहे. मूळात अपिलार्थीस कोणकोणत्या महाविद्यालयास रिक्त अधिव्याख्याता रसायनशास्त्र पदावर समावेशन आदेश देण्यात आले आहेत या विषयासंदर्भात कोणतीही माहिती नसल्याने त्यांनी ही माहिती शिक्षण संचालनालयाकडे विचारली आहे. मात्र शिक्षण संचालनालयाने ही माहिती ज्या महाविद्यालयात अशाप्रकारचे समावेशन झाले आहे, त्यांच्याकडून घ्यावी, अशा प्रकारचे हास्यास्पद उत्तर दिले आहे. जन माहिती अधिकारी यांनी तर त्यांच्या कार्यालयाचे नुतनीकरण झाले असल्याने ही माहिती देता येऊ शकत नसल्याचे कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद न देऊन व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर सुनावणी न घेता, दि. १८.९.२००७ रोजी अपिलार्थीस बेजबाबदारपणे पत्र पाठवून दिलेले उत्तर, त्यांच्या अशाप्रकारची कार्यशैली त्यांनी माहिती अधिकार अधिनियमाची केलेली पायमल्ली दर्शवित आहे, असे आयोगाचे मत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्याप्रमाणे जर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधित विभागाकडे आता उपलब्ध नसेल तर शिक्षण संचालनालयातील सक्षम अधिकाऱ्याने, ज्या अधिकारी/कर्मचाऱ्याच्या ताब्यात ही माहिती

जतन करण्याची व उपलब्ध करुन ठेवण्याची जबाबदारी दिलेली आहे, त्यांच्यावर शासकीय अभिलेखे गहाळ केल्याप्रकरणी फौजदारी कार्यवाही करण्याचा विचार करावा, असे त्यांना या टप्प्यावर सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही शासकीय अभिलेख्यामधील कोणत्या प्रवर्गात मोडते, याची माहिती उपस्थित जन माहिती अधिकारी हे आयोगास देऊ शकले नाहीत. आयोगाच्या मते शिक्षण संचालनालयाकडे उपलब्ध असलेल्या माहितीचे व्यवस्थापन व्यवस्थितपणे नसणे व त्यांच्या मनातील ईच्छाशक्तीचा अभाव हीच कारणे अपिलार्थीस माहिती न देण्यासाठी असावीत, असे वाटते.

जन माहिती अधिकारी यांचा उपरोक्त युक्तिवाद अमान्य करुन त्यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जावर जरी दि. ३.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम कार्यवाही केली असली तरी, अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेली मुदत व्यपगत झाल्यानंतर प्रत्यक्ष प्रतिसाद देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. सबब शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) म.रा.पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३) शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) म.रा. पुणे यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०५-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. हेमंत शिवाजीराव वडणे, रा. गपाट निवास, सेवासुविधा, टेलिफोन भवनजवळ, तुळजापूर, जि.उस्मानाबाद-४१३ ६०१.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत,पुणे-४११ ००१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्र.२०४५/२००७ व २०४६/२००७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०४५ व २०४६
निर्णय दिनांक ०६-१२-२००८

१ श्री. शेख सय्यद मो.इब्राहीम, : अपिलार्थी
रा.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्राचार्य,ऑक्सीलीयम कॉन्वेंट स्कूल
(AUXILIUM CONVENT HIGH SCHOOL)
सावेडी, अहमदनगर
ता.जि.अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी तथा
सचिव,ऑक्सीलीयम कॉन्वेंट स्कूल
(AUXILIUM CONVENT HIGH SCHOOL)
सावेडी, अहमदनगर
ता.जि.अहमदनगर

**निर्णय**

वरील दोन प्रकरणांची सुनावणी आज दिनांक ०६.१२.२००८ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

आज रोजी अपिलार्थी यांची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०३.०१.२००८ रोजी दाखल झालेली दोन द्वितीय अपिले आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्ज करुनही त्यांच्या मूळ अर्जानुसार

संबंधित शाळेने त्यांना कोणतीही माहिती पुरविली नसल्याचे नमूद केले आहे. या प्रकरणी जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी यांचेशी संपर्क साधला असला त्यांनी देखील अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले होते, तथापि तरी देखील त्यांना शाळेकडून त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होऊ शकली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपरोक्त दोनही द्वितीय अपिलाशी संबंधित अपिलार्थी यांच्या मूळ माहितीसाठीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ४.७.२००७ रोजी केला होता, यापैकी अपील क्र.२०४५/२००७ च्या संदर्भात मूळ माहितीसाठीच्या अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००२-२००३ ते २००७-२००-- या कालावधीतील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये- संबंधित संस्थेच्या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पूर्ण नावे, शैक्षणिक पात्रता, सेवा कालावधी यापैकी कायम व तात्पुरत्या शिक्षकांची संख्या, त्यांना बँकेमार्फत वेतन दिले जाते काय, असल्यास बँकेचे नाव व बँक खातेक्रमांक, जर वेतनपटाद्वारे वेतन रोखीने दिले जात असेल तर त्या वेतनपटाची सत्यप्रत, सय्यद सरांच्या प्राव्हीडंट फंडाचा अनुक्रमांक, भविष्य निर्वाह खाते क्रमांक, ज्या शिक्षकांनी मुक्त विद्यापीठ, व्होकेशनलअथवा नियमित विद्यापीठातील बी.एड ची पदवी घेतली आहेत,त्यांची नावे, पदव्युत्तर पदवी प्राप्त केलेल्या शिक्षकांची नावे व शाखा, संस्थेच्या मुख्य कार्यालयाचा पत्ता आणि स्वाक्षरीकरिता अधिकारपत्र प्राप्त झालेल्या अधिकाऱ्याचे/कर्मचाऱ्यांचे नाव व हुद्दा - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या अपील क्र. २०४६/२००७ च्या संबंधातील मूळ माहितीसाठीच्या अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे शैक्षणिक वर्ष २००६-२००७ या

कालावधीशी संबंधित त्यांच्या शाळेतील इ.८ ए व ८ बी (सन २००६-२००७ बॅच) च्या सर्व विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकांची यादी मागितली होती.

अपिलार्थीने मूळ माहिती रजिस्टर्ड पोस्टाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या वरील दोनही अपिलातील मूळ माहितीसाठीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, मात्र त्यांच्या दि. १.१०.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांच्या शाळेला शासनाकडून कोणतेही अनुदान प्राप्त होत नसल्याने माहिती अधिकार अधिनियम त्यांना लागू होत नसल्याचे कळवून अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी वरील दोन्ही अपील अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांची शाळा ही खाजगी असून या शाळेला शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान प्राप्त होत नसल्याने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी त्यांना लागू होत नाही. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देणे आवश्यक नाही. त्यांच्या शाळेविषयी माहिती देताना त्यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांच्या शाळेमध्ये इयत्ता १ ली ते १० वी असे वर्ग असून त्यांच्या शाळेची तपासणी जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांकडून नियमाप्रमाणे केली जाते. त्यांच्या शाळेतील विद्यार्थी महाराष्ट्र शासनाच्या नियंत्रणाखालील एस.एस.सी.(माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा) परीक्षेसाठी बसतात. त्यांच्या शाळेची धर्मादाय आयुक्त यांच्याकडे जून १९९८ मध्ये 'VLS/१०९८/(३८१/९६)/(१)/३' या क्रमांकाने नोंदणी झालेली आहे.

अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही आवश्यक आहे. त्यांनी सईदसर नावाच्या ज्या

व्यक्तीच्या भविष्य निर्वाह निधीसंदर्भात माहिती मागितली आहे, ती व्यक्ती म्हणजे ते स्वतः आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे, पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने ज्या शिक्षण संस्थेकडे आपल्या मूळ अर्जाद्वारे माहितीची मागणी केली आहे, ती शिक्षण संस्था पूर्णतः खाजगी असून त्यांना शासनाकडून शाळा चालविण्यासाठी कोणत्याही प्रकारचे प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व शासनाकडून केवळ वित्तीय सहाय्य प्राप्त होत नसल्याने, या संस्थेची अशी धारणा झाली आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील मूळ तरतुदी त्यांच्याकरिता लागू होत नाहीत. ही संस्था स्थापन होत असताना या संस्थेची नोंद धर्मादाय आयुक्तांकडे झालेली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील नोंदणी प्राधिकारी या नात्याने धर्मादाय आयुक्त यांना शाळेचे सर्व आर्थिक हिशोब पहाण्याचे व तपासणी करण्याचे पूर्ण अधिकार आहेत. या शाळेकडील कोणतीही कागदपत्रे धर्मादाय आयुक्त यांना ज्या वेळी आवश्यक वाटले त्यावेळी उपलब्ध करुन देणे शाळेस अनिवार्य आहे तसेच अधिनियमातील कलम २(च) मध्ये 'माहिती' या शब्दाची व्याख्या खालीलप्रमाणे स्पष्ट केलेली आहे.

**“ ‘माहिती’ याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो.”**

वरील परिच्छेदाच्या ‘‘त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो.’’ या प्रकरणी संबंधित मूळ अर्जाशी संबंधित मुद्यांचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, जी माहिती धर्मादाय आयुक्त, जे स्वत: एक स्वतंत्र सार्वजनिक प्राधिकरण आहे, त्यांना या संस्थेची माहिती मिळविता येते, व त्यांना या संस्थेकडून प्राप्त होऊ शकणारी माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये माहिती या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत आहे. तसेच या शाळेचे विद्यार्थी शासनाच्या अंतर्गत असलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण होऊन पुढील उच्च शिक्षण घेण्यास पात्र होतात व या शाळेची नियमित तपासणी जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी यांच्याकडून केली जात असते हे पाहता, असे दिसून येते की, या शाळेवर धर्मादाय आयुक्त व जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी यांचे दुहेरी नियंत्रण असल्याने अधिनियमातील कलम २(H)(d)(i) प्रमाणे संबंधित संस्था ही सार्वजनिक प्राधिकरण ठरत आहे, त्यामुळे त्यांनी अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस अधिनियमातील विहित तरतुदीप्रमाणे देणे भाग आहे. अपिलार्थीने दि. ४.७.२००७ रोजी केलेली दोन मूळ माहितीसाठीच्या अर्जांचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, अपिलार्थीचे अपील क्र. २०४६/२००७ मधील मूळ अर्जाद्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे, तर अपील क्र. २०४५२००७ मधील मूळ माहितीसाठीच्या अर्जातील या शाळेच्या शिक्षकांचे बँक खाते क्रमांक ही माहिती वगळता उर्वरित संपूर्ण माहिती अपिलार्थीस देय ठरते. शाळेच्या शिक्षकांच्या बँक खाते क्रमांक अपिलार्थीस दिल्याने अपिलार्थी कोणतेही व्यापक जनहित साध्य करुन शकणार नाहीत, याची आयोगास खात्री झ ाल्याने व ही माहिती अपिलार्थीस उघड केल्याने संबंधित शिक्षकांच्या खाजगी बाबीमध्ये

आगंतुक हस्तक्षेप होऊन अधिनियमातील कलम ८ (१) (ञ) चा निश्चितपणे भंग होत असल्याचे आयोगास वाटत असल्यामुळे माहितीचा हा भाग जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय राहणार नाही. मात्र उर्वरित माहिती त्यांना अपिलार्थीस द्यावी लागेल. उपरोक्त प्रकरणी संबंधित संस्थेने या शाळेमध्ये जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या मूळात, माहिती अधिकार अधिनियम त्यांच्या शाळेला लागू होत नसल्याच्या त्यांच्या धारणेमुळे नेमणूका केल्या नसल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याचे कोणतेही आदेश आयोग देत नाही. परंतु शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) जिल्हा परिषद, अहमदनगर यांना सदर शाळा त्याचप्रमाणे त्यांच्या नियंत्रणाखालील इतर खाजगी शाळांमध्ये जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत होतील, याची त्यांनी दक्षता घ्यावी. या संदर्भात शिक्षण विभागाच्या शिक्षण संचालनालयाने राज्यातील सर्व शिक्षणाधिकारी यांना विनाअनुदानित शाळांमध्ये जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूका करण्यासंदर्भात दि.२७.११.२००७ अन्वये आदेश दिले होते. शिक्षण संचालनालयाच्या या आदेशाची पूर्तता जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्याकडून झाली नसल्याचे दिसून येते म्हणून शिक्षण संचालक,पुणे यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी दि. २७.११.२००७ च्या राज्यातील सर्व शाळांमध्ये माहिती अधिकारी यांच्या नेमणूका त्यांच्या सूचनेप्रमाणे केल्या गेल्या आहेत किंवा कसे याबाबत आढावा घेऊन सर्व विनाअनुदानित शाळांमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या नेमणूका होतील, असे पहावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील क्र. २०४५/२००७ अंशतः मान्य व अपील क्र. २०४६/२००७ मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील क्र. २०४५/२००७ अंशतः मान्य करण्यात येऊन अपील क्र. २०४६/२००७ मान्य करण्यात येत आहे.

२) मुख्याध्यापिका, ,ऑक्सीलयम कॉन्व्हेंट हायस्कूल (AUXILIUM CONVENT HIGH SCHOOL) स.नं.३२१/२, सावेडी, अहमदनगर यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. ४.७.२००७ रोजीच्या दोनही मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती (त्यांच्या शाळेतील शिक्षकांच्या बँक खाते क्रमोक वगळून) अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य द्यावी.

३) शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व विनाअनुदानित शाळेमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या नेमणूका हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसांच्या आत पूर्णतः केल्या जातील, असे पहावे.

**अहमदनगर**
**दिनांक : ०६-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख सईद मोहंमद इब्राहिम, असिस्टंट टीचर,ऑक्सीलयम कॉन्व्हेंट हायस्कूल (AUXILIUM CONVENT HIGH SCHOOL) ५१८२-A,५१८१-D, म्युनिसिपल कार्पोरेशन ऑफीस रोड, पाचपीर चावडी, अहमदनगर ता.जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,ऑक्सीलयम कॉन्व्हेंट हायस्कूल (AUXILIUM CONVENT HIGH SCHOOL) स.नं.३२१/२, सावेडी, अहमदनगर ता.जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य,१७,डॉ.आंबेडकर मार्ग यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०४७
निर्णय दिनांक ०६-१२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. विठ्ठल मारुती जाधव<br>रा.ता.जि.अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>विभागीय नियंत्रक,<br>राज्य परिवहन महामंडळ,अहमदनगर<br>जि.अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय नियंत्रक,<br>राज्य परिवहन महामंडळ,अहमदनगर<br>जि.अहमदनगर | | |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी,
विभागीय नियंत्रक,
राज्य परिवहन महामंडळ कार्यालय,
अहमदनगर जि.अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.१२.२००८ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २७.०५.२००८ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थी यांनी सदर अपील अर्जामध्ये, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या सेवापुस्तिका व उपदानाच्या रकमेचा तपशील ते सेवानिवृत्त होऊन गेल्यानंतरही दिला नव्हता त्यामुळे त्यांनी दि. १६.५.२००८ रोजी अपील केले असता जन अपिलीय अधिकारी यांनी माहितीसाठी रु.९०/- इतक्या रकमेची मागणी केली. जन माहिती अधिकारी यांनी एस.टी.च्या श्री. रमेश गवळी, श्री. रामदास विठ्ठल जाधव यांना देखील विनामूल्य माहिती पुरविली आहे, मात्र फक्त त्यांच्या माहितीसाठी रु.९०/- इतक्या शुल्काची मागणी केली आहे. यावरुन त्यांची आर्थिक अडवणूक करण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आयोगास अशी विनंती केली आहे की, त्यांना आयोगाने न्याय द्यावा व माहिती माहिती अधिकाराखाली एस.टी.महामंडळामडून होणारी अडवणूकीचा प्रकार बंद करुन संबंधिताविरुध्द कार्यवाही करावी, अशी विनंती केली आहे.

आज रोजी सुनावणीच्या अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या तर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीच्या दि. २.१२.२००८ रोजी पुरविली असून या संदर्भात अपिलार्थीची आता कोणतीही तक्रार उरलेली नाही व तसे अपिलार्थी यांनी दि. २.१२.२००८ रोजी लिहून दिलेले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २४.३.२००८ रोजीचा अर्ज त्यांनी त्यांना सेवानिवृत्तीनंतर दिल्या गेलेल्या उपदानाच्या रकमेच्या तपशीलाचे प्रकरणी माहितीसाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला होता. या अर्जावर अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही, म्हणून त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १६.५.२००८ रोजी

प्रथम अपील केले. सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्या दि. २४.३.२००८ रोजी पत्र पाठवून अपिलार्थीकडून त्यांनी माहिती देण्यासाठी रु. ९०/- इतक्या शुल्काची मागणी केली. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय दिल्याचे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. मात्र यानंतर राज्य माहिती आयोगाच्या द्वितीय अपील सुनावणीची सूचना प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दि.२.१२.२००८ रोजी त्यांना आवश्यक असलेली संपूर्ण माहिती विनामूल्य उपलब्ध करुन दिली आहे. सदर माहिती प्राप्त झाल्याचे व अपिलार्थीची काही तक्रार नसल्याचे अभिप्रायाची सत्यप्रत त्यांनी आयोगास आज सुनावणीच्या वेळी सादर केली आहे, यावरुन अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे दिसून येते. एवढे जरी असले तरी या घटनाक्रमामध्ये असे स्पष्ट होत आहे की, अपिलार्थीच्या दि. २४.३.२००८ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन अधिनियमातील कलम ७(१) चा भंग केला आहे. अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती दि. २३.४.२००८ रोजी प्राप्त होणे देय असताना अपिलार्थीस ही माहिती २२३ दिवसांच्या प्रदीर्घ विलंबाने प्राप्त झाली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगास स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांनी ही माहिती त्यांच्या सहायकांकडून घेऊन नंतर ती अपिलार्थीस पुरवावयाची होती, तथापि संबंधित सहायक कर्मचाऱ्यांनी या प्रकरणी वेळीच कार्यवाही न केल्याने अपिलार्थीस ही माहिती विलंबाने प्राप्त झाली. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) मधील तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास संपूर्ण माहिती देण्यास सहकार्य करणाऱ्या सर्व सहायक कर्मचारी/अधिकारी यांना जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद आहे, हे पाहता, अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त होण्यासाठी जन माहिती अधिकारी व त्यांचे

सहकारी जबाबदार ठरत आहेत. अपिलार्थीस त्यांनी अधिनियमातील तरतुदीपेक्षा विलंबाने माहिती देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. सबब विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, अहमदनगर विभाग यांनी या प्रकरणी सर्व संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, अहमदनगर यांनी या प्रकरणाशी संबंधित सर्व जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : ०६-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.विठ्ठल मारुती जाधव, माळीवाडा, भोपळेगल्ली,जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी,विभागीय नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ कार्यालय, अहमदनगर जि.अहमदनगर यांना या

निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ कार्यालय, अहमदनगर जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१०१

निर्णय दिनांक : ०६-१२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. अशोक रामदास कोकाटे,<br>रा.चिंचोडी पाटील ता.जि.अहमदनगर. | : | तक्रारदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ सचिव,<br>आदर्श दुग्ध उत्पादक संस्था मर्यादित,<br>अहमदनगर | : | उत्तरवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी तक्रारदार उपस्थित आहेत, तर उत्तरवादी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी आयोगास उद्देशून दि. २२.१०.२००७ रोजीच्या त्यांच्या तक्रारअर्जाद्वारे आयोगाचे असे निदर्शनास आणले आहे की, त्यांच्या द्वितीय अपील अर्जावर आयोगाने दि. १६.१.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांना तक्रारदार यांना दहा दिवसांच्या आत त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना देण्याचे सूचित केले होते. तथापि आदेशातील कालावधी व्यपगत होऊन गेल्यानंतरही आजतागायत त्यांना उत्तरवादी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. आज रोजी उत्तरवादी विनापरवानगी गैरहजर आहेत. आज रोजी त्यांनी राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयातून लेखी दि. २६.११.२००८ रोजीच्या सूचनापत्राद्वारे व

दूरध्वनी संदेशाद्वारे सूचित करुनही उत्तरवादी आयोगासमोर सुनावणी हजर राहिले नाहीत, हे पाहता, तक्रारदार यांचे म्हणणे सत्य असल्याचे अनुमान काढण्यात येत आहे. तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, आजच्या दि. ६.१२.२००८ रोजीच्या सुनावणीच्या दिनांकापर्यंत देखील त्यांना उत्तरवादी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. आयोगाने आदेश देऊनही उत्तरवादी यांनी तक्रारदारास माहिती न देऊन स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. आज रोजी उत्तरवादी सुनावणीस गैरहजर असल्यामुळे त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्याच्या दृष्टीने सचिव,आदर्श दुग्ध उत्पादक संस्था,मर्यादित,चिंचोडी पाटील ता.जि.अहमदनगर यांना राज्य माहिती आयोगाने आदेश देऊनही तक्रारदार श्री. अशोक रामदास कोकाटे यांना माहिती न पुरविल्याबद्दल एकूण रु. २५,०००/- शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश त्यांना प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत आयोगास सरळ सादर करावा. सदर खुलासा त्यांच्याकडून विहित मुदतीत प्राप्त न झाल्यास हेच आदेश अंतीम केले जातील याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरीलप्रमाणे राज्य माहिती आयोगाने केलेल्या आदेशाचे उत्तरवादी यांनी अनुपालन न केल्याचे दिसून येते. सबब उत्तरवादी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत तक्रारदार यांना अपेक्षित असलेली संपूर्णमाहिती विनामूल्य देण्यात यावी.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदाराची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२.	उत्तरवादी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत तक्रारदार यांना अपेक्षित असलेली संपूर्णमाहिती विनामूल्य देण्यात यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक	०३-०६-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१	श्री. अशोक रामदास कोकाटे,मु.पो. चिंचोडी पाटील, ता.जि.अहमदनगर

२	जन माहिती अधिकारी तथा सचिव, आदर्श दुग्ध उत्पादक संस्था मर्यादित, अहमदनगर यांना  या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०४०
निर्णय दिनांक ०६-१२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शेख गनीभाई शक्करभाई<br>रा.अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग,नेवासा,<br>जि.अहमदनगर. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>रो.ह.यो. (कार्य) विभाग अहमदनगर. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.१२.२००८ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत, तर अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ११.०६.२००६ रोजी नोंदणी झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपिलामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, त्यांचा दि. २२.४.२००६ रोजीचा अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांनी स्वीकारला नसून त्यांना उडवाउडवीची

उत्तरे प्राप्त झाली आहेत. या अर्जामध्ये त्यांच्या मूळ माहितीची मागणी त्यांनी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. ३१.३.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००५-०६ या आर्थिक वर्षात त्यांनी खरेदी केलेल्या पातळ डांबर खरेदी व वाहतुकीच्या कागदपत्रांच्या प्रती मिळणेबाबत एकूण ६ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - गेट पास व बील, डांबर खाली करताना केलेल्या वजन काटयाच्या पावत्या, वाहतुकीच्या बिलाच्या प्रती,डांबर ज्या कामासाठी वापरले त्या कामांच्या कार्यारंभ आदेश व निविदेमधील शेडयुल अ व ब च्या प्रती व त्यासंबंधी मोजमाप पुस्तकातील पानांच्या छायाप्रती, वाहतुक ठेकेदारास दिलेल्या कार्यारंभ आदेशाच्या प्रती,डांबराचे चलन रजिस्टरचे संबंधित कालावधीतील पानाच्या झेरॉक्स प्रती- या मुद्यांचा समावेश होता.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये दि. २२.४.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे अथवा या संदर्भात अपिलार्थीशी पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले आहे.

आज रोजी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा दि. ३१.३.२००६ रोजीचा अर्ज व त्यावरील त्यांनी केलेला दि. २२.४.२००६ रोजीचा अपील अर्ज त्यांच्या कार्यालयात प्राप्त झालेला नाही. अपिलार्थीने काही माहिती मागितली आहे व या संदर्भात त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे, याबाबतची माहिती, त्यांना राज्य माहिती आयोगाकडून या द्वितीय अपिलावरील सुनावणीस उपस्थित राहण्याच्या दि. २६.११.२००८ रोजीच्या सूचनापत्रासोबत जोडलेल्या कागदपत्रातील अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाच्या व त्यावरील प्रथम अपील अर्जाच्या झेरॉक्स प्रतीवरुन मिळाली आहे. तसेच अपिलार्थीने दि. ३१.३.२००६ रोजी माहितीसाठीचा अर्ज केल्यानंतर अपिलार्थीने अधिनियमाद्वारे विहित केलेली मुदत व्यपगत होण्यापूर्वीच म्हणजे दि. २२.४.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले आहे. अपिलार्थीची ही कृती विसंगत आहे. त्यांनी अशाप्रकारे आयोगाची फसवणूक करण्याचा देखिल प्रयत्न केला आहे. आयोगास अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून आले की, अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज व अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज ज्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्याकडे हस्तांतरित केला आहे, त्या कर्मचाऱ्याच्या पोचसहया व कार्यालयाचे शिक्के या प्रतींवर नाहीत, तसेच अपिलार्थीने हे दोनही अर्ज पोस्टाने पाठविले होते किंवा कसे, हे कळण्यास अपिलार्थीच्या अनुपस्थितीमुळे कोणताही मार्ग नाही. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तीवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता जन माहिती अधिकारी यांच्या वरील युक्तिवादामध्ये तथ्यांश असल्याचे आढळून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांच्या दि. ३१.३.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे त्यांना अपेक्षित असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन

घेण्यासाठी आता माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेगळ्याने नवीन अर्ज करावा लागेल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : ०६-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख गनीभाई शक्करभाई, रा.६३३, तोफखाना, अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम उपविभाग,नेवासा, जि.अहमदनगर.यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, रो.ह.यो. (कार्य) विभाग अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०४१
निर्णय दिनांक ०६-१२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शेख गनीभाई शक्करभाई<br>रा.अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग,शेवगाव,<br>जि.अहमदनगर. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>रो.ह.यो. (कार्य) विभाग अहमदनगर. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.१२.२००८ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत, तर अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे केलेले दि. ०५.०६.२००६ रोजीचे आयोगाकडे दि.११.०६.२००६ रोजी नोंदणी झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, त्यांचा दि. २२.४.२००६ रोजीचा अपील संबंधित अर्ज प्राधिकरणाने स्वीकारला नाही व उडवाउडवीची

उत्तरे दिली, या कारणास्तव त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले असल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी उपस्थित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, या प्रकरणी अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २२.४.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले नाही व सदर अपील अर्ज दाखल करण्यासाठी अपिलार्थी व्यक्तिशः त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित राहिले नाहीत व अपिलार्थीस त्यांनी या प्रकरणातील अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती दि. २९.३.२००६ रोजी सशुल्क उपलब्ध करुन दिली आहे. त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये पुढे असेही सांगितले की, अपिलार्थीच्या दि. १२.१२.२००५ रोजीच्या अर्जास त्यांनी दि. ९.१.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क रु. ५०/- जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने दि. १६.३.२००६ रोजी रु. ५८/- इतक्या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात केल्यानंतर त्यांनी दि. २९.३.२००६ रोजी अपिलार्थीस पूर्णतया माहिती दिली आहे व अपिलार्थीने तसे त्यांच्या दि. २.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे जन अपिलीय अधिकारी यांना लेखी लिहून देऊन, प्राप्त झालेल्या माहितीबाबत कोणतीही तक्रार नसल्याचे व अपील निकाली काढण्याबाबत जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे, या पत्राची सत्यप्रत त्यांनी आयोगास सादर केली.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केल्याचा कोणताही पुरावा आयोगासमोर सादर केलेला नाही. त्यांचे, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे (अपिलार्थीचे) प्रथम अपील स्वीकृत करण्यास नकार दिला हे विधान, केवळ वादाच्या प्रयोजनार्थ जरी खरे मानले तरी अपिलार्थीचे त्यांचे प्रथम अपील रजिस्टर्ड पोस्टाने जन

अपिलीय अधिकारी यांच्याकडे पाठविण्याचा मार्ग त्यांच्याकडे उपलब्ध होता. या मार्गाचा त्यांनी अवलंब का केला नाही, हे सांगण्यास व जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या युक्तीवादाचे खंडण करण्यासाठी अपिलार्थी हे आज रोजी आयोगासमोर सुनावणीसाठी उपस्थित नाहीत, हे पाहता, अपिलार्थीने त्यांच्याकडे प्रथम अपील केले नाही, हे जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे आयोग ग्राहय धरत आहे. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील न करता राज्य माहिती आयोगाकडे सरळ द्वितीय अपील दि. ५.६.२००६ रोजी सादर केले. याच अपिलासंदर्भात त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना पूर्ण माहिती मिळाल्याचे व प्राप्त माहिती संदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे लिहून देऊन त्यांचे अपील निकाली काढण्याची विनंती केली आहे. ही सर्व वस्तुस्थिती पाहता, अपिलार्थीचे आज विचाराधीन असलेले राज्य माहिती आयोगाकडील द्वितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०६-१२-२००८** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख गनीभाई शक्करभाई, रा.६३३, तोफखाना, अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,शेवगाव, जि.अहमदनगर.यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, रो.ह.यो. (कार्य) विभाग अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०४२
निर्णय दिनांक ०६-१२-२००८

१ श्री. नारायण दशरथ देशमुख : अपिलार्थी
रा.चास, ता.अकोले,
जि.अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्य कार्यकारी अधिकारी,
अहमदनगर जिल्हा देखरेख संघ मर्यादित,
अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
अहमदनगर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.१२.२००८ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २२.०८.२००६ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थी यांनी सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. २२.५.२००६ रोजीच्या निर्णयाविरुध्द केले असून यामध्ये असे म्हटले आहे की, सदर निर्णय जन अपिलीय अधिकारी यांनी नैसर्गिक न्यायाच्या विरुध्द दिलेला आहे. दि. १८.५.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे झालेल्या सुनावणीच्यावेळी अपिलार्थीची फक्त सही

घेतली आणि त्यांना असे सांगितले की, या प्रकरणाची सुनावणी पुढील तारखेस घेऊन ही तारीख अपिलार्थीस नंतर कळविण्यात येईल, परंतु दुदैवाने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांचे कार्यालय सोडल्यानंतर रोजनाम्याच्या शेवटच्या भागामध्ये अपिलार्थीच्या गैरहजेरीत त्यांचा अभिप्राय अहवाल नोंदवला. जन अपिलीय अधिकारी यांची, ही कृती नैसर्गिक न्यायाच्या विरुध्द आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे खरे मानून अंतीमतः चुकीचा निर्णय दिला. त्यांनी सदर निर्णय देताना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील अभिलेखे तपासले नाहीत, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे सादर केलेल्या अहवालावरुनच फक्त त्यांनी हा निर्णय दिलेला आहे. या अपील अर्जामध्ये, अपिलार्थीने पुढे जन अपिलीय अधिकारी यांची प्रत्येक मुद्यावर कशाप्रकारे चूक झ ाली असल्याचे त्यांना वाटते, याचे त्यांनी सविस्तर निवेदन करुन आयोगास, त्यांचे अपील मान्य करावे,अशी विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १६.२.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे सन १९८६-२००२, व १९९५-२००५ या कालावधीशी संबंधित त्यांच्या स्वतःच्या सेवाविषयक बाबी संबंधित एकूण ५ मुद्यावर नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २८.२.२००६ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात त्यांना काही माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दि. १२.४.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर दि. १८.५.२००६ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. २२.५.२००६ रोजी पारित केले. या

आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी दि. २८.२.२००६ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे संपूर्ण माहिती अपिलार्थीस पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या दि. २८.२.२००६ रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. २८.२.२००६ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक असलेली माहिती दिली नाही. मात्र अपिलार्थीच्या रजा नाकारणे, त्यांना पदोन्नती नाकारणे इत्यादी प्रकरणातील त्यांनी घेतलेल्या निर्णयाचे समर्थन त्यांनी या पत्रामध्ये केल्याचे दिसून येते. तसेच या पत्राबरोबर त्यांनी दि.१ डिसेंबर १९९१ ते दि. २८.६.२००५ पर्यंतचे जॉईंट काँट्रीब्युशन फंडाच्या खतावणीचे उतारे दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या नियमित वेतनवाढी का देण्यात आल्या नाहीत, पदोन्नती का डावलली, याची कारणे जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारली आहेत. अशाप्रकारची जन माहिती अधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयाची कारणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत नाहीत. कारण माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमधील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या निर्णयाबद्दल खुलासा अथवा स्पष्टीकरण अपेक्षित करुन माहिती विचारणे अभिप्रेत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील बहुतांश माहितीद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे वेतनवाढी संदर्भात व रजा मंजूरी संदर्भात खुलासा विचारला आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या निर्णयाबाबत खुलासा देणे आवश्यक नाही.एवढे असूनही जन माहिती

अधिकारी यांनी त्यांच्या दि. २८.२.२००६ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस आवश्यक तो खुलासा केला आहे. मात्र या पत्रासोबत त्यांनी अपिलार्थीने ज्या कागदपत्रांची मागणी केली होती, ती कागदपत्रे, जी अधिनियमातील कलम २ (च) मधील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत आहेत, ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली नाही. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती तीस दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगास कबूल केले आहे.अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. 'A' मधील,"माझे इन्क्रीमेंट व पदोन्नती डावलणेबाबत आपल्या देखरेख संघाने घेतलेल्या निर्णयाची अस्सल नक्कल द्यावी", मुद्दा क्र. 'B'बी मधील ,"चास व पिंपळदरी पि का.से.सह.सो.लि. या संस्थांचे ता. १.४.१९९५ ते ३१.१०.२००५ अखेरचे बाबवार खतावणीचे उतारे", मुद्दा क्र. ' E ' मधील- "माझ्या समकक्ष सचिवांकडे किती रकमेच्या व्यवहाराच्या संस्थांचा पदभार दिला जातो सन १९९५ ते २००५ चा तपशील" ही माहिती अपिलार्थीस देय ठरते. अपिलार्थीस मुद्दा क्र. 'A' मधील अंशतः माहिती अपिलार्थीस वर उल्लेखिल्याप्रमाणे देय होत नाही.मुद्दा क्र. 'C' संदर्भात अपिलार्थीने परत जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना पगार न देण्याची कारणे व त्याबाबतच्या निर्णयाची प्रत मागितली आहे. या माहितीतील कारणे हा भाग अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय नाही,मात्र याबाबत जन माहिती अधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयाची प्रत त्यांनी अपिलार्थीस देणे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना अनिवार्य आहे. याच अर्जातील मुद्दा क्र. 'D' द्वारे अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप मोघम आहे, त्यामुळे या मुद्यांची माहिती अपिलार्थीस ती मोघम स्वरुपाची असल्याने व स्पष्ट अशा स्वरुपात मागितली नसल्याने देय होत नाही. थोडक्यात, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. 'A' अंशतः,मुद्दा क्र. 'B',मुद्दा क्र. 'C' अंशतः, मुद्दा क्र. 'E' या मुद्यांशी संबंधित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय ठरत आहे. ही माहिती अपिलार्थीस तीस दिवसांच्या आत देण्याचे जन माहिती

अधिकारी यांनी आयोगासमोर मान्य केले आहे, सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील दि. २२.५.२००६ रोजीच्या निर्णयासंदर्भात उपस्थित केलेल्या मुद्यांवर अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर असल्याने आयोगास कोणताही ऊहापोह करता येत नाही, त्यामुळे अपिलार्थीच्या या मुद्यावर आयोगाचे कोणतेही भाष्य नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील, निर्णयामध्ये स्पष्ट केलेली उर्वरित माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०६-१२-२००८** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नारायण दशरथ देशमुख रा.चास ता.अकोले,जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,अहमदनगर जिल्हा देखरेख

सहकारी संस्था मर्यादित,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्र.२०४३/२००७ व २०४४/२००७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०४३ व २०४४
निर्णय दिनांक ०६-१२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. नारायण तुलसीभाई परमार,<br>रा.अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>सचिव, मोहन को-ऑपरेटीव्ह हाऊसिंग<br>सोसायटी, बुरुडगाव रोड,अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था,अहमदनगर<br>जि.अहमदनगर | | |

**निर्णय**

वरील दोन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक ०६.१२.२००८ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी उपस्थित आहेत.

आज रोजी अपिलार्थी यांची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०९.०७.२००७ रोजी दाखल झालेली दोन द्वितीय अपिले आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जांमध्ये अपिलार्थी यांनी त्यांना मोहन को-ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटी, अहमदनगर यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जाद्वारे अपेक्षिलेली माहिती त्यांना विनामूल्य मिळवून देण्याची व त्याचबरोबर त्यांची या संदर्भातील नुकसान भरपाई देण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थी हे मोहन को-ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटी,अहमदनगर या सोसायटीचे सदस्य असून त्यांनी संबंधित सोसायटीकडे दोन वेगवेगळया अर्जाद्वारे प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण दोन मुद्यावर वेगवेगळी माहिती मागितली आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये- मोहन को-ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटीचे संचालक मंडळ सभा दि. १५.३.२००६ रोजीच्या विषय व ठराव ६-६ च्या कागदपत्रांच्या सत्यप्रतींची मागणी केली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती दि. १५.३.२००६ रोजीच्या दरम्यानच्या कालावधीशी संबंधित असून या माहितीमध्ये त्यांनी श्री. ठोकळ यांच्या ड्रेनेजलाईनबाबतच्या अर्जाची छायांकित प्रत, संचालक मंडळ सभेच्या दि. १५.३.२००६ च्या ठरावाची प्रत, चोकअप झालेल्या ड्रेनेजलाईनशी संबंधित फ्लॅटची संख्या, ड्रेनेजलाईन संबंधित केलेल्या खर्चाच्या संपूर्ण कागदपत्रांच्या छायाप्रती- या मुद्यांचा समावेश होता.तसेच अपिलार्थी यांनी याच दिनांकाच्या (दि.२७.१.२००७) दुसऱ्या अर्जाद्वारे मोहन को-ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटीच्या काही सदस्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे दि. ६.११.२००६ रोजी केलेल्या तक्रारीबाबत माहितीची मागणी केली होती. त्यांनी मागणी केलेल्या माहितीमध्ये - सोसायटीच्या एकूण सभासदांची नामावली, तक्रार अर्जातील सभासदांचे पूर्ण नाव, तक्रार अर्जातील सभासदांचे शेअर्स नंबर, तक्रार अर्जातील सभासदांचे फ्लॅट नं. व इमारत नं., तक्रार अर्जातील सभासदांचे नमुना आय व नमुना जे मधील नोंदी - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या माहितीच्या मूळ अर्जास संबंधित सोसायटीने अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे दोनही अपिलामध्ये दिसून येते. संबंधित सोसायटीकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) नुसार दि. १.३.२००७ रोजी दोन स्वतंत्र प्रथम अपिले सादर केली, या अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.३.२००७ रोजी

निर्णय देऊन अपिलार्थीची दोनही अपिले मान्य करुन अपिलार्थीस तीस दिवसांचे आत माहिती देण्याचे संबंधित सोसायटीस सूचित केले. तालुका उपनिबंधक सहकारी संस्था,अहमदनगर यांनी दोनही प्रकरणात आदेशित करुनही संबंधित मोहन को-ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटीने,अपिलार्थीस कोणतीही माहिती न पुरविल्याने अपिलार्थीने व्यथित होऊन वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना ही माहिती आवश्यक असल्याचे त्यांनी आयोगास सांगितले.

मोहन को-ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटीच्या सचिवांतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी हे त्यांना माहिती दिल्यास ते त्या माहितीचा दुरुपयोग करुन सोसायटीस त्रास देतील, अशी शंका वाटल्याने त्यांनी अपिलार्थीस माहिती दिली नाही. तसेच अपिलार्थीने सोसायटीविरुध्द सहकार न्यायालयात दावा दाखल केला असून त्या दाव्याचा निर्णय देखील अपिलार्थी यांच्याविरुध्द लागला आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने संबंधित सोसायटीला विचारलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत आहे. तसेच अपिलार्थीस हीच माहिती महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ३२ व त्याखालील नियम ३० प्रमाणे सोसायटीकडून मागता येते. तथापि या प्रकरणी असे दिसून येते की, संबंधित सोसायटीने ही माहिती अपिलार्थीस अद्यापही दिली नाही. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जात मागणी केलेली माहिती न देण्याची कारणे मोहन को-ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटीच्या सचिवांनी आपल्या युक्तीवादामध्ये स्पष्ट केली आहेत. ही कारणे आयोगास मान्य करता येणार नाहीत. एकदा त्यांच्याकडे कोणत्याही अर्जदाराने माहितीसाठीची मागणी केल्यास त्यांना ही माहिती

अर्जादारास देण्यासंदर्भात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये निर्णय घेणे अनिवार्य आहे. सदर संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० नुसार स्थापन झाली असल्याने व अधिनियमातील कलम २ (ज) (ग) मधील तरतुदींची पूर्तता करीत असल्याने ही संस्था सार्वजनिक प्राधिकरण ठरत आहे. त्यामुळे त्यांना अपिलार्थीस, त्यांनी मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार देणे भाग आहे. त्यांच्या विरुध्द सहकार न्यायालयात निर्णय लागता आहे व अपिलार्थी प्राप्त माहितीचा दुरुपयोग करतील, अशा अवास्तव शंका स्वतःच्या मनात निर्माण करुन अपिलार्थीस माहिती न देण्याची संबंधित सोसायटीची कृती पूर्णतः बेकायदेशीर आहे. सबब सचिव, मोहन को-ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटी,अहमदनगर यांना असे आदेशित करण्यात येते की,अपिलार्थीने त्यांच्या दि.२७.१.२००७ रोजीच्या दोन वेगवेगळया अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसांच्या आत अर्जनिहाय स्वतंत्रपणे व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. संबंधित सहकारी संस्था अपिलार्थीस ही माहिती उपरोक्त कालावधीमध्ये देईल, याची खात्री जन अपिलीय अधिकारी तथा तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील क्र. २०४३/२००७ व २०४४/२००७ मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी तथा सचिव, मोहन को-ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटी,अहमदनगर यांनी अपिलार्थीस, त्यांच्या दि. २७.१.२००७ रोजीच्या दोनही मूळ अर्जांद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३) तालुका उपनिबंधक सहकारी संस्था, अहमदनगर यांनी सचिव, मोहन को-ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटी, अहमदनगर हे उपरोक्त आदेश क्र.२ चे विहित मुदतीत पालन करतील, असे पहावे.

**अहमदनगर**
**दिनांक : ०६-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नारायण तुलसीभाई परमार, मोहन को-ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटी, बुरुडगाव रोड, आनंद हॉस्पीटलजवळ, अहमदनगर ता.जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव,मोहन को-ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका उपनिबंधक सहकारी संस्था,नगर ता.अहमदनगर जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

**क्रमांक १९७६, १९७७ व १९७८**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९७६, १९७७ व १९७८

निर्णय दिनांक १०-१२-२००८

१ श्री. अंकुश एम. पवार, अपिलार्थी
प्लॉट नं. एफ-४१/१२, एन-७, सिडको,
अयोध्यानगर, औरंगाबाद

**विरुध्द**

१ अपील क्रमांक १९७६/०७ प्रतिवादी
जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन),
उपविभाग अंबड, जिल्हा जालना

२ अपील क्रमांक १९७७/०७
जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन),
उपविभाग बदनापूर, जिल्हा जालना

३ अपील क्रमांक १९७८/०७
जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन),
उपविभाग मंठा, मुख्यालय परतूर, जिल्हा जालना

४ जन अपिलीय अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन),
विभाग जालना

## निर्णय

वरील तीन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १०-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. बाबासाहेब नाथाजी सानप | जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन), उपविभाग अंबड, जिल्हा जालना |
| २ | श्री. संजय दत्तात्रय मोडवान, शाखा अभियंता | जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन), उपविभाग बदनापूर यांचे प्रतिनिधी |
| ३ | श्री. उदय दिनकरराव पुराणकर | जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन), विभाग जालना |

अपिलार्थी श्री. अंकुश एम. पवार उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-१०-२००७ रोजीची दोन व ०९-१०-२००७ रोजी नोंदणी झालेले एक अशी एकूण तीन व्दितीय अपिले आयोगाच्या विचाराधीन असून या तीनही अपील अर्जामधील मूळ विषय एकाच स्वरुपाचा आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलांवर कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी ही व्दितीय अपिले आयोगाकडे केली आहेत असे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी, अंबड यांच्याकडे दिनांक ०१-०२-२००७ ते ३०-०४-२००७ या कालावधीमधील, जन माहिती अधिकारी, बदनापूर यांच्याकडे दिनांक ०१-०१-२००७ ते ३०-०३-२००७ या कालावधीमधील व जन माहिती अधिकारी, मंठा यांच्याकडे दिनांक ०१-०१-

२००७ ते १७-०३-२००७ या कालावधीमधील त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत माहिती मागितली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीमध्ये, त्यांच्या कार्यालयांतर्गत केल्या गेलेल्या रोजगार हमी योजनेतील कामांची हजेरीपटे, मोजमाप पुस्तिका, रोखपुस्तिका व वरिष्ठांनी पाया तपासणी केलेला अहवाल, यांच्या छायांकीत प्रती मागितल्या होत्या.

आज रोजी अपिलार्थी यांनी त्यांचे म्हणणे त्यांच्या दिनांक १०-१२-२००८ रोजीच्या लेखी पत्राच्या स्वरुपात सादर केले असून त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले असता जन अपिलीय अधिकारी यांनी या अपिलावर कोणताही निर्णय दिला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथमतः दिनांक ३०-०८-२००७ रोजी सुनावणी ठेवली त्यानंतर दिनांक ०४-०९-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि त्या दिवशी सुनावणी होऊ शकली नाही व उलट त्यांनी अपिलार्थीस जिवे मारण्याची धमकी देऊन दमदाटी केली, त्यामुळे त्यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द पोलीस स्टेशन, जालना येथे गुन्हा दाखल केला आहे. या अर्जामध्ये त्यांनी पुढे असे नमूद केले आहे की, अपिलीय अधिकारी यांनी अंबड, बदनापूर, जालना येथे कामे केली परंतु मजुरांचा पगार दिला नाही तो पगार मिळवून देण्याकरिता त्यांनी संघटनेच्या वतीने कामगारांच्या हितासाठी सचिव, विभागीय आयुक्त यांना लेखी निवेदन सादर केले, परंतु त्याचा काहीही उपयोग झाला नाही. याच अर्जामध्ये त्यांनी पुढे आयोगास अशी विनंती केली आहे की, जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार २५,००० रुपये इतकी शास्ती लावण्यात यावी व त्यांना तात्काळ मोफत माहिती देण्यात यावी. याच पत्रामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलावर कोणताही निर्णय दिला नसल्याचा पुनरुच्चार केला असून त्यांचेविरुध्द योग्य ती कारवाई करावी अशी विनंती केली आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांचे म्हणणे लेखी स्वरुपात सादर केले असून त्याचा सारांश वरील परिच्छेदात नमूद केला आहे.

विचाराधीन अपील प्रकरणातील तीन जन माहिती अधिका-यांपैकी जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन), उपविभाग अंबड यांनी असा खुलासा केला की, अपिलार्थीच्या अर्जास त्यांनी दिनांक १६-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेली कामे त्यांच्या कार्यालयाअंतर्गत घेण्यात आली नसल्याचे कळविले. सदर पत्र त्यांनी अपिलार्थीस अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टाने पाठविल्याचे दिसून येते. त्यांच्या म्हणण्यापृष्ट्यर्थ त्यांनी त्यांच्या कार्यालयाच्या जावक नोंदवहीची प्रत आयोगास सादर केली असून त्याचबरोबर अपिलार्थीस पत्र पाठविल्याप्रीत्यर्थ अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टाची पावती देखील त्यांनी आयोगास सादर केली आहे.

जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन), उपविभाग बदनापूर यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधीत कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता यांच्याकडे असल्याने व ती त्यांनी जन माहिती अधिका-यास न दिल्याने ते अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरवू शकले नाहीत. आता अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ते अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत देण्यास तयार आहेत.

जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन), उपविभाग मंठा, मुख्यालय परतूर हे सुनावणीसाठी उपस्थित राहिले नसल्याने त्यांचा युक्तिवाद नोंदवून घेता आला नाही.

उपरोक्त तीनही व्दितीय अपिले अपिलार्थीने त्यांच्या ज्या मूळ अर्जासंदर्भात केली आहेत त्या अर्जांचे अवलोकन केले असता अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देणे हे जन माहिती अधिकारी यांना फारसे अवघड अथवा क्लीष्ट काम होते असे नाही, तथापि उपरोक्त जन माहिती अधिकारी, बदनापूर व मंठा यांनी अपिलार्थीस माहिती दिली नाही तर जन माहिती अधिकारी अंबड यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत योग्य तो प्रतिसाद दिला आहे. तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, जन माहिती अधिकारी, अंबड यांचे पत्र

त्यांना प्राप्त झाले नाही, तथापि जन माहिती अधिकारी अंबड यांनी अपिलार्थीस माहिती पुरविल्याप्रीत्यर्थ पुरावा (पोष्टाची अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगची पावती व जावक नोंदवहीची साक्षांकीत प्रत) सादर केला असून सदर पुरावा आयोग ग्राह्य धरीत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस नाकारण्यासाठी जन माहिती अधिकारी, बदनापूर व मंठा यांच्याकडे कोणतेही कारण नव्हते, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती सरळ व सोपी होती. एवढे असूनही जन माहिती अधिकारी, बदनापूर व मंठा यांनी अपिलार्थीस माहिती न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे असे आयोगाचे मत आहे. सबब सचिव (जलसंपदा) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव अशा प्रकारे स्पष्ट केल्यामुळे त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी, बदनापूर व मंठा यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे सुनावणीच्या वेळी सादर केलेल्या लेखी निवेदनामध्ये जन अपिलीय अधिकारी यांच्याविरुध्द कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे, तथापि अधिनियमातील तरतुदीमध्ये जन अपिलीय अधिकारी यांच्याविरुध्द कारवाई करण्याची कोणतीही तरतूद नसल्याने अपिलार्थीची ही विनंती आयोग फेटाळून लावत आहे.

जन माहिती अधिकारी, बदनापूर यांना त्यांच्याकडील कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता यांनी माहिती न दिल्याने ते अपिलार्थीस अंतीमतः माहिती पुरवू शकले नाहीत हा त्यांनी केलेला युक्तिवाद आयोग अमान्य करीत असून या प्रकरणी कार्यकारी अभियंता यांनी स्वतः लक्ष घालून सकारात्मक कारवाई करण्याची गरज आहे असे आयोगास वाटते. जन माहिती अधिकारी यांना अर्जदारास माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे संबंधीत कर्मचारी / अधिकारी यांना जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद अधिनियमातील कलम ५ (५) मध्ये आहे हे पाहता,

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्या सर्व संबंधीत सहाय्यकावर, त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी उप अभियंता यांच्याकडे माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील क्रमांक १९७६/२००७ फेटाळून लावण्यात येत आहे व अपील क्रमांक १९७७/२००७ व १९७८/२००७ ही व्दितीय अपिले अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्रमांक १९७६/२००७ हे फेटाळून लावण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक १९७७/२००७ व १९७८/२००७ ही अंशतः मान्य करण्यात येत आहेत.

३. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन), उपविभाग बदनापूर व मंठा यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

४. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन), उपविभाग अंबड यांनी अपिलार्थीस याविषयासंदर्भातील त्यांच्या दिनांक १६-०६-२००७ च्या पत्राची प्रत (रजिस्टर्ड पोस्टाने) परत विनामूल्य पुरवावी.

५. सचिव (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई यांना संबंधीत जन माहिती अधिकारी (बदनापूर व मंठा) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना संबंधीत जन माहिती अधिकारी (बदनापूर) यांच्या सर्व संबंधीत सहाय्यकावर, प्रचलीत सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १०-१२-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अंकुश एम. पवार, प्लॉट नं. एफ-४१/१२, एन-७, अयोध्यानगर, सिडको, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन), उपविभाग अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन), उपविभाग बदनापूर, जिल्हा जालना

४ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन), उपविभाग मंठा, मुख्यालय परतूर, जिल्हा जालना

५ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन), विभाग जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ सचिव (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १९७९, १९८०, १९८१ व १९८२**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९७९, १९८०, १९८१ व १९८२

निर्णय दिनांक  १०-१२-२००८

१ सौ. कोमल एस. विटेकर, अपिलार्थी
प्लॉट नं. बी-३५/६, साईनगर, सिडको, वाळुज
महानगर, औरंगाबाद

**विरुध्द**

१ अपील क्रमांक १९७९/०७ प्रतिवादी
जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन),
उपविभाग परतूर, जिल्हा जालना

२ अपील क्रमांक १९८०/०७
जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन),
उपविभाग जालना, जिल्हा जालना

३ अपील क्रमांक १९८१/०७
जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन),
उपविभाग मंठा, मुख्यालय परतूर, जिल्हा जालना

४ अपील क्रमांक १९८२/०७
जन माहिती अधिकारी

तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन),
उपविभाग अंबड, जिल्हा जालना

५ जन अपिलीय अधिकारी — प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन),
विभाग जालना

## निर्णय

वरील चार प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १०-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. संजय दत्तात्रय मोडवान, शाखा अभियंता, | जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन), उपविभाग जालना यांचे प्रतिनिधी |
| २ | श्री. बाबासाहेब नाथाजी सानप | जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन), उपविभाग अंबड, जिल्हा जालना |
| ३ | श्री. उदय दिनकरराव पुराणकर | जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन), विभाग जालना |

अपिलार्थी सौ. कोमल एस. विटेकर या उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८ व ०९-१०-२००७ रोजी नोंदणी झालेली चार व्दितीय अपिले आयोगाच्या विचाराधीन आहेत. या सर्व अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलांवर कोणताही निर्णय दिला नसल्याने आयोगाकडे ही व्दितीय अपिले केली असल्याचे नमूद केले असून त्यामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

अपिलार्थीने उपरोक्त चारही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधीत दिनांक ०१-०२-२००७ ते ३०-०४-२००७, ०१-०१-२००७ ते १७-०३-२००७, ०१-०१-२००७ ते ३०-०३-

२००७ या वेगवेगळ्या कालावधीतील एकाच प्रकारची माहिती मागविली होती. अपिलार्थीने त्यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीमध्ये त्यांच्या कार्यक्षेत्रातील रोजगार हमी योजनेंतर्गत झालेल्या कामांची हजेरीपटे, मोजमाप पुस्तिका, रोखपुस्तिका व वरिष्ठांनी पाया तपासणी केलेला अहवाल -- या चार मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने सदर माहिती प्रत्यक्ष व रजिस्टर्ड पोस्टाव्दारे अपेक्षिली होती.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांचे म्हणणे लेखी स्वरुपात सादर केले असून याशिवाय त्यांना काहीही सांगावयाचे नाही. या अपील प्रकरणातील अपिलार्थी व यापुर्वीच्या अपील क्रमांक १९७६/२००७, १९७७/२००७ व १९७८/२००७ मधील अपिलार्थी श्री. अंकुश एम. पवार या दोघांच्या सहीने एकच दिनांक १०-१२-२००८ रोजीचे निवेदन आयोगास दिले असून त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले असता जन अपिलीय अधिकारी यांनी या अपिलावर कोणताही निर्णय दिला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथमत: दिनांक ३०-०८-२००७ रोजी सुनावणी ठेवली त्यानंतर दिनांक ०४-०९-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि त्या दिवशी सुनावणी होऊ शकली नाही व उलट त्यांनी अपिलार्थीस जिवे मारण्याची धमकी देऊन दमदाटी केली, त्यामुळे त्यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द पोलीस स्टेशन, जालना येथे गुन्हा दाखल केला आहे. या अर्जामध्ये त्यांनी पुढे असे नमूद केले आहे की, अपिलीय अधिकारी यांनी अंबड, बदनापूर, जालना येथे कामे केली परंतु मजुरांचा पगार दिला नाही तो पगार मिळवून देण्याकरिता त्यांनी संघटनेच्या वतीने कामगारांच्या हितासाठी सचिव, विभागीय आयुक्त यांना लेखी निवेदन सादर केले, परंतु त्याचा काहीही उपयोग झाला नाही. याच अर्जामध्ये त्यांनी पुढे आयोगास अशी विनंती केली आहे की, जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार २५,००० रुपये इतकी शास्ती लावण्यात यावी व त्यांना तात्काळ मोफत माहिती

देण्यात यावी. पत्रामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलावर कोणताही निर्णय दिला नसल्याचा पुनरुच्चार केला असून त्यांचेविरुध्द योग्य ती कारवाई करावी अशी आयोगास अंतिमतः विनंती केली आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांचे म्हणणे लेखी स्वरुपात सादर केले असून त्याचा सारांश वरील परिच्छेदात नमूद केला आहे.

विचाराधीन अपील प्रकरणातील जन माहिती अधिका-यांपैकी जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन), उपविभाग अंबड यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दिनांक १२-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील पत्र क्रमांक ४३१, दिनांक १६-०६-२००७ अन्वये प्रतिसाद दिला असून अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात संदर्भित केलेली कामे त्यांच्या कार्यालयातर्फे रोजगार हमी योजनेखाली केली गेली नसल्याचे त्यांना कळविले आहे. अपिलार्थीस सदर पत्र त्यांनी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टाने पाठविले असून त्यांच्या या विधानापृष्ट्यर्थ त्यांनी त्यांच्या कार्यालयाच्या जावक नोंदवहीची प्रत आयोगास सादर केली असून त्याचबरोबर अपिलार्थीस पत्र पाठविल्याप्रीत्यर्थ अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टाची पावती देखील त्यांनी आयोगास सादर केली आहे, यावरुन त्यांनी अपिलार्थीस दिनांक १६-०६-२००७ रोजी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास प्रतिसाद दिल्याचे सिध्द होत आहे.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन), उपविभाग परतूर व मंठा यांच्याकडे या दोन तालुक्यातील कामासंदर्भात माहिती मागविली होती. ते आज रोजी आयोगासमोर गैरहजर आहेत, तथापि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे दिसून येत आहे.

जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन), उपविभाग जालना यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या शाखा

अभियंत्याच्या ताब्यात होती, त्यांनी जन माहिती अधिका-यास अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन न दिल्याने त्यांना अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरविता आली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी, अंबड वगळता उर्वरित तीनही जन माहिती अधिका-यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत पुरविणे जन माहिती अधिकारी यांच्या दृष्टीने फार अवघड व क्लीष्ट काम होते, असे आयोगास वाटत नाही. त्यांच्या कार्यक्षेत्रात रोजगार हमी योजनेच्या झालेल्या कामाच्या व मोजमाप पुस्तिकाच्या फक्त झेरॉक्स प्रती काढून त्या अपिलार्थीस पुरविणे एवढेच काम त्यांनी करावयाचे होते, तथापि जन माहिती अधिकारी यांनी ते काम वेळेत केल्याचे आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जालना यांनी वर केलेला युक्तिवाद आयोगास मान्य नाही, कारण त्यांना त्यांच्या ज्या सहाय्यकाकडून अपिलार्थीस देण्यासाठी माहिती घ्यावयाची होती ते सर्व सहाय्यक (शाखा अभियंता व इतर) त्यांच्या नियंत्रणाखाली नियमीतपणे कार्यरत आहेत. संबंधीत सहाय्यकांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस पुरविता येत नसल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या वरिष्ठांशी यासंदर्भात कुठलाही पत्रव्यवहार केल्याचे आढळून येत नाही व आज रोजी आयोगासमोर उपस्थित असलेले जन अपिलीय अधिकारी यांनी त्यास दुजोरा दिला आहे हे पाहता, उपरोक्त अपील प्रकरणाशी संबंधीत असलेले जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, परतूर व जालना यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जास कोणत्याही प्रकारे प्रतिसाद न देण्याच्या त्यांच्या कृतीव्दारे त्यांच्या स्वतःच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ३ नुसार अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मागण्याचा हक्क आहे व अधिनियमातील कलम ७ प्रमाणे कारवाई करणे हे

जन माहिती अधिकारी यांचे कर्तव्य आहे. अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे कर्मचारी / सहाय्यक त्यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे हे पाहता, उपरोक्त सर्व प्रकरणी (अंबड उपविभाग वगळता) उर्वरित तीनही जन माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक जबाबदार ठरत आहेत. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सहाय्यक हे जिल्हा परिषदेचे कर्मचारी आहेत त्यांच्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांचे नियंत्रण आहे व उप अभियंता यांच्यावर सचिव (जलसंपदा) यांचे प्रशासकीय नियंत्रण आहे हे पाहता, सचिव (जलसंपदा) व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी, जालना व परतूर यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन), विभाग जालना यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस विहित मुदतीत (३० दिवसात) माहिती देतील असे पहावे. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन), उपविभाग अंबड यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिल्याचे वरील प्रमाणे सिध्द झाले असल्याने अपिलार्थीने त्यांच्याविरुध्द केलेले व्दितीय अपील क्रमांक १९८२/२००७ हे फेटाळण्यात येत आहे, तथापि त्यांनी दिनांक १६-०६-२००७ रोजी अपिलार्थीस पाठविलेल्या पत्राची प्रत परत रजिस्टर्ड पोस्टाने अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पाठवावी असे त्यांना या टप्प्यावर सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे, तथापि अधिनियमामध्ये तशी तरतूद नसल्याने, अपिलार्थीची ही विनंती अमान्य करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील क्रमांक १९८२/२००७ हे फेटाळण्यात येत आहे व अपील क्रमांक १९७९/२००७, १९८०/२००७ व १९८१/२००७ ही व्दितीय अपिले अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक १९७९/२००७, १९८०/२००७ व १९८१/२००७ ही अंशतः मान्य करण्यात येत आहेत.

२. अपील क्रमांक १९८२/२००७ हे फेटाळण्यात येत आहे.

३. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन), उपविभाग परतूर, जालना व मंठा यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

४. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन), उपविभाग अंबड यांनी अपिलार्थीस दिनांक १६-०६-२००७ रोजीच्या पत्राची प्रत (रजिस्टर्ड पोस्टाने) हे आदेश प्राप्त होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

५. सचिव (जलसंपदा) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी (जालना, परतूर व मंठा) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना संबंधीत जन माहिती अधिकारी

यांच्या या प्रकरणाशी संबंधित सर्व सहाय्यकांवर, प्रचलीत सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक १०-१२-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ सौ. कोमल एस. विटेकर, प्लॉट नं. बी-३५/६, साईनगर, सिडको, वाळुज महानगर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन), उपविभाग परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन), उपविभाग जालना, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन), उपविभाग मंठा, मुख्यालय परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन), उपविभाग अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन), विभाग जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ सचिव (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

९ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक २००२, २००३ व २००४**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२००२, २००३ व २००४

निर्णय दिनांक ११-१२-२००८

१ श्री. अंकुश एम. पवार, अपिलार्थी
प्लॉट नं. एफ-४१/१२, एन-७, सिडको,
अयोध्यानगर, औरंगाबाद

**विरुध्द**

| | जन माहिती अधिकारी | जन अपिलीय अधिकारी |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक २००२/०७<br>तालुका कृषि अधिकारी, मंठा, जिल्हा जालना | उपविभागीय कृषि अधिकारी,<br>परतूर, जिल्हा जालना |
| २ | अपील क्रमांक २००३/०७<br>तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद, जिल्हा जालना | उपविभागीय कृषि अधिकारी,<br>जालना |
| ३ | अपील क्रमांक २००४/०७<br>तालुका कृषि अधिकारी भोकरदन, जिल्हा जालना | उपविभागीय कृषि अधिकारी,<br>जालना |

**निर्णय**

वरील तीन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक ११-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. नामदेव मारोती माघाडे | जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंठा, जिल्हा जालना |
| २ | श्री. सदाशिव चंद्रभान | तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, |

| | | |
|---|---|---|
| | मुंढे | मंठा, जिल्हा जालना |
| ३ | श्री. बोईनवाड माधव सुभाषराव | जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद, जिल्हा जालना |
| ४ | श्री. भगवान नरसिंगू बोंदरवाड | जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी भोकरदन, जिल्हा जालना |
| ५ | श्री. उमेश रमाकांत घाटगे | जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर |
| ६ | श्री. नंदकुमार अनंतराव टाक, तंत्र अधिकारी | जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना यांचे प्रतिनिधी |

अपिलार्थी श्री. अंकुश एम. पवार उपस्थित आहेत.

**<u>अपील क्रमांक २००२/२००७</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-१०-२००७ रोजी दाखल केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर कुठलाच निर्णय न दिल्याचे नमूद करुन त्यांनी आपल्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्याकडील दिनांक ११-०६-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील रोजगार हमी योजनेर्तंगत घेण्यात आलेल्या एकूण ५ कामासंदर्भात दिनांक ०१-०१-२००७ ते २१-०४-२००७ या कालावधीतील माहिती मागविली होती. या माहितीमध्ये संबंधीत कामावरील हजेरीपट, मोजमाप पुस्तिका, रोखपुस्तिका व वरिष्ठांनी पाया तपासणी केलेला अहवाल या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन

अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती तयार करण्याचे काम सुरु आहे परंतु त्यांच्या कार्यालयातील कर्मचारीवर्ग अपुरा असल्याने माहिती तयार करण्यासाठी विलंब लागणार असल्याचे कळविले व माहिती तयार होताच माहितीपोटीच्या लागणा-या शुल्काचा तपशील त्यांना कळविण्यात येईल, असे त्यांना आश्वासीत केले. सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही असे अपिलार्थीने आज सुनावणीमध्ये सांगितले. अपिलार्थीस हे पत्र पाठविल्याप्रीत्यर्थ जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील जावक नोंदवहीची संबंधीत प्रत आयोगास दाखविली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही, मात्र त्यांनी त्यांच्या दिनांक १२-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने सुनावणीमध्ये कबूल केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही अपिलार्थीस माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे हे अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, तालुका कृषि अधिका-यांचे दिनांक २१-०६-२००७ रोजीचे पत्र त्यांना प्राप्त झाले नाही, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांना सुनावणीसाठी पत्र पाठवून देखील जन अपिलीय अधिकारी यांनी यासंदर्भात कोणतीही सुनावणी घेतली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १२-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे सूचना देऊनही जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंठा यांच्याकडून त्यांना कोणतीही माहिती आजतागायत प्राप्त होऊ शकली नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे शास्ती लावावी, अशी त्यांनी आयोगास शेवटी विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जास त्यांनी प्रथमत: दिनांक २१-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तयार करण्याचे काम चालू आहे व काम पूर्ण होताच त्यांना शुल्क कळविण्यात येईल व तदनंतर दिनांक ०३-१०-२००७ रोजी अपिलार्थीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती उपलब्ध आहे तेव्हा ती त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून घेऊन जाण्याचे कळविले. तथापि अपिलार्थी ही माहिती घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात व्यक्तिश: कधीही उपस्थित झाले नाहीत, त्यामुळे अपिलार्थीस माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०३-१०-२००७ रोजी पाठविलेल्या पत्रासंदर्भात त्यांच्या कार्यालयातील जावक नोंदवही व पोस्टाची पावती आयोगास दाखविली. सदर पत्र जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाच्या ९०३ या क्रमांकाने दिनांक ०३-१०-२००७ रोजी अपिलार्थीस पाठविल्याचे यावरुन सिध्द होत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या अर्जातील मागणी केलेली माहिती ५ दिवसाच्या आत पुरविण्याचे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले होते.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. सदाशिव चंद्रभान मुंढे यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती कर्मचा-यांच्या अनुपलब्धतेमुळे अपिलार्थीस ते विहित मुदतीत पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या सहाय्यकांकडे ठेवली जात असते, ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांना त्यांच्या सहाय्यकांची मदत घेणे आवश्यक आहे. अपिलार्थीने ज्या कालावधीमध्ये माहितीची मागणी केली होती तो काळ पीकांच्या लागवडीचा असल्यामुळे नित्य दैनंदिन कार्यभार सांभाळून ही माहिती त्यांना अपिलार्थीस पुरविता आली नाही.

**अपील क्रमांक २००३/२००७**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-१०-२००७ रोजी दाखल केलेले व्दितीय

अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांनी ठेवलेल्या सुनावणीत समाधानकारक निर्णय प्राप्त न झाल्याने त्यांनी व्दितीय अपील केल्याचे नमूद केले आहे. तसेच या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती कायम ठेवल्याचे दिसून येते.

या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-०६-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील रोजगार हमी योजनेंतर्गत झालेल्या कामासंदर्भात दिनांक ०१-०१-२००७ ते २१-०४-२००७ या कालावधीशी संबंधीत एकूण ५ कामासंदर्भात माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये गटनिहाय झालेल्या कामाचे हजेरीपट, मोजमाप पुस्तिका, रोखपुस्तिका व वरिष्ठांनी पाया तपासणी केलेला अहवाल या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद दिला. जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे दिनांक ०५-०७-२००७ रोजीचे हे पत्र त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील मंडळ कृषि अधिकारी यांना लिहिले असून त्यांच्याकडून ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांच्या कार्यालयात सादर करण्याच्या सूचना त्यांना दिलेल्या आहेत. सदर पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस पाठविल्याचे यामध्ये नमूद केले आहे. हे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने आज सुनावणीमध्ये कबूल केले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीने या प्रथम अपील अर्जावर तारखेचा उल्लेख केलेला नाही, तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २५-०७-२००७ रोजीच्या पत्रावरुन अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज दिनांक २३-०७-२००७ रोजी त्यांच्याकडे प्राप्त झाल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-०८-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपला निर्णय दिनांक ०७-०९-२००७ रोजी पारित केला. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या

कार्यालयातील त्यांच्या सोईची तारीख कळवून माहिती पाहून घ्यावी असे अपिलार्थीस निर्देश दिले. सदर निर्देश देतांना त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती लिखित स्वरुपात उपलब्ध करुन देणे अडचणीचे असल्यामुळे त्यांच्याकडील संबंधीत अभिलेखे अपिलार्थीस विनामूल्य तपासणीसाठी दिल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे हे अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे या प्रकरणाशी संबंधीत प्रथम अपील केले असता या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना विनामूल्य माहिती पाहण्यासाठी आदेशित केले होते, तथापि त्यांना प्रत्यक्षात माहिती आवश्यक असल्याने त्यांना जन अपिलीय अधिकारी यांचे आदेश मान्य नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी त्यांच्याशी कोणताही पत्रव्यवहार न केल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ८ दिवसात विनामूल्य माहिती देण्याची व त्यांच्यावर दंड आकारण्याची कारवाई व्हावी, अशी आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती मोठ्या प्रमाणात असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांच्या कार्यालयात येऊन पाहण्यासाठी सूचित केले, तथापि सदर माहिती पाहण्यासाठी अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात उपस्थित झाले नाहीत व तदनंतर अपिलार्थीने त्यांना माहिती लिखित हवी असल्याचे परत कधीही कळविले नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आज रोजी त्यांच्याकडे तयार आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप मोठे होते, तसेच अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या सहाय्यकांकडे ठेवली जाते त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती देतांना त्यांच्या सहाय्यकांची मदत घेणे त्यांना आवश्यक होते.

**अपील क्रमांक २००४/२००७**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-१०-२००७ रोजी दाखल केलेले व्दितीय

अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. सदर अपील अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना प्रथम अपिलासंदर्भात समाधानकारक निर्णय न दिल्याने केले असल्याचे नमूद करुन आपल्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असते. जन माहिती अधिकारी यांनी निर्देशित केलेल्या ग्राम पाणलोट समितीवर त्यांच्या कार्यालयातील कृषि पर्यवेक्षकाची नेमणूक केलेली असते. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अद्यापपर्यंत पुरविण्यात आलेली नाही. त्यांनी मूळ अर्ज करुन दीड वर्षाहून जास्त काळ ओलांडून गेल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती देण्याबाबत कोणतीही सकारात्मक कारवाई झालेली नाही. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी १५ दिवसाच्या आत देण्याची तसेच जन माहिती अधिकारी यांच्यावर उचित कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २१-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या अर्जास त्यांनी दिनांक २२-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहिती त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी केदारखेडा, दानापूर, बरजंळा सावळे, देहेड, वडशेद, भायडी ही माहिती पाणलोट समितीशी संबंधीत होती त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस पाणलोट समितीच्या अध्यक्षांकडून ही माहिती घेण्यासाठी सूचित केले. त्यांच्याकडे उपलब्ध असलेली व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने त्याकरिता बराच कालावधी लागणार असल्याचे त्यांनी अपिलार्थीस दिनांक २२-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

**अपील क्रमांक २००२/२००७**

या अपिलासंदर्भात आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती, स्वरुप व अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचा कालावधी पाहता, ही माहिती मर्यादित स्वरुपाची असल्याचे दिसून येते. तथापि या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी जरी त्यांच्या दिनांक २१-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी तो सकारात्मक नाही. त्यांच्या दिनांक २१-०६-२००७ रोजीच्या पत्रात त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तयार करण्याचे काम चालू असून ते पूर्ण होताच आवश्यक ते शुल्क अपिलार्थीस कळविण्यात येईल, असे अपिलार्थीस कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती बरोबर नसून अपिलार्थीने अर्ज केल्यापासून ३० दिवसाच्या आत त्यांच्या अर्जावर त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचा अथवा न देण्याचा निर्णय घेणे, माहितीपोटीचे निश्चित शुल्क भरण्यासाठी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अंदाजे किती पृष्ठांची होईल हे ठरविण्याकरिता, जन माहिती अधिका-यास ३० दिवस एवढा कालावधी पुरेसा होईल असे आयोगास वाटते, त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २१-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये सकारात्मक प्रतिसाद दिला नसल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीच्या दिनांक ११-०७-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस ५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले आहे, तथापि या ५ दिवसातही जन माहिती अधिकारी अपिलार्थीस माहिती देऊ शकले नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०३-१०-२००७ रोजीच्या पत्र क्रमांक ९०३ व्दारे कळविले याचा अर्थ, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही निर्णय दिला नाही व विहित कालावधी व्यापगत झाल्यानंतर अपिलार्थीस दिनांक ०३-१०-२००७ रोजी सकारात्मक प्रतिसाद दिला. जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-१०-२००७ रोजी माहिती तयार होती असे जरी गृहीत धरले तरी या प्रकरणी

अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा ८४ दिवस इतका विलंब लावल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात म्हटल्याप्रमाणे त्यांना त्यांच्या सहाय्यकाकडून ही माहिती गोळा केल्यानंतर ती अपिलार्थीस द्यावयाची होती त्यामुळे अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा जास्त विलंब लावण्यासाठी जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहाय्यक हे एकत्रितणे दोषी ठरत आहेत. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी या प्रकरणी एकूण ८४ दिवस इतका विलंब लावला आहे. अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्याच्या त्यांच्या या कृतीव्दारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे कर्मचारी / अधिकारी यांना जन माहिती अधिकारी समजावे अशी अधिनियमातील कलम ५ (५) मध्ये तरतूद आहे हे पाहता, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक हे एकत्रितपणे जबाबदार ठरत आहेत. सबब जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक यांना एकत्रितपणे विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे (८४ दिवसाकरिता) एकूण रुपये २१००० (अक्षरी रुपये एकवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. या शास्तीची कर्मचारीनिहाय विभागणी उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर यांनी हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत करावी. या शास्तीचा भरणा सर्व संबधितांनी जास्तीत जास्त ५ हप्त्यामध्ये शासकीय कोषागारात पुढील लेखशिर्षामध्ये करावा.

लेखाशीर्ष- "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) "

सदर शास्तीचा संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक शासकीय कोषागारात नियमितपणे भरणा करतील, असे उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर यांनी पहावे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती मोठ्या प्रमाणात असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांच्या कार्यालयात येऊन

पाहण्यासाठी सूचित केले, तथापि सदर माहिती पाहण्यासाठी अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात उपस्थित झाले नाहीत व तदनंतर अपिलार्थीने त्यांना माहिती लिखित हवी असल्याचे परत कधीही कळविले नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आज रोजी त्यांच्याकडे तयार आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप मोठे होते तसेच अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या सहाय्यकांकडे ठेवली जाते त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती देतांना त्यांना त्यांच्या सहाय्यकांची मदत घेणे त्यांना आवश्यक होते.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे कबूल केले आहे हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती १० दिवसाच्या आत विनामूल्य द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच १० दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच १० दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक यांना विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे (८४ दिवसाकरिता) एकूण रुपये २१००० (अक्षरी रुपये एकवीस हजार) रुपये इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे शासकीय कोषागारात करावा.

४.	उपविभागीय कृषि अधिकारी परतूर यांनी या शास्तीची कर्मचारीनिहाय विभागणी हे आदेश प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत करावी व सर्व अधिकारी / कर्मचारी हे सदर शास्तीचा भरणा नियमीतपणे शासकीय कोषागारात करतील याची दक्षता घ्यावी.

**<u>अपील क्रमांक २००३/२००७</u>**

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक २१-०६-२००७ रोजीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी जरी त्यांच्याकडील दिनांक ०५-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद दिला असला तरी तो सकारात्मक नाही, कारण त्यांच्या दिनांक ०५-०७-२००७ रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता हे पत्र त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील मंडळ कृषि अधिका-यांना उद्देशून लिहिलेले असून या पत्राची फक्त एक प्रत त्यांनी अपिलार्थीस दिल्याचे दिसते. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (१) मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडून अशा प्रकारचा प्रतिसाद अर्जदारास देणे अभिप्रेत नाही. तदनंतर अपिलार्थीच्या अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी लिहिलेल्या त्यांच्या दिनांक २५-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस अतिशिघ्रतेने माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते. तथापि दीड वर्षाचा कालावधी ओलांडून गेल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणतीही सकारात्मक कारवाई केल्याचे आयोगास आढळून आले नाही. जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीमध्ये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तयार असल्याचे नमूद करुन ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी ३० दिवसांचा कालावधी लागेल असे सांगितले हे पाहता व अपिलार्थीस माहिती देण्यासाठीचा व्यपगत झालेला विहित कालावधी पाहता, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य द्यावी लागेल. सबब असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या

मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य द्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील मंडळ कृषि अधिकारी यांचे सहाय्य घ्यावे लागणार होते व त्यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर ती अपिलार्थीस त्यांना पुरवावी लागणार होती. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे कर्मचारी / अधिकारी यांना जन माहिती अधिकारी समजावे अशी अधिनियमातील कलम ५ (५) मध्ये तरतूद आहे हे पाहता, अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती प्राप्त होण्याकरिता कोणत्याही समर्थनीय कारणांशिवाय वंचित ठेवण्यासाठी संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधीत सर्व सहाय्यक हे सर्वजण एकत्रित जबाबदार ठरत आहेत. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी लावलेल्या विलंबाचे कोणतेही समर्थन जन माहिती अधिकारी यांना आज सुनावणीमध्ये पूर्ण संधी देऊन देखील देता आले नाही, हे पाहता जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक हे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत.

सबब असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणांशिवाय माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक यांना एकत्रितपणे विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे एकूण रुपये २५००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) रुपये इतकी शास्ती लावण्यात येत आहे. या शास्तीची कर्मचारीनिहाय विभागणी उपविभागीय कृषि अधिकारी, जालना यांनी हे आदेश त्यांना प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत करावी. या शास्तीचा भरणा सर्व संबधितांनी जास्तीत जास्त ५ हप्त्यामध्ये शासकीय कोषागारात पुढील लेखशिर्षामध्ये करावा.

लेखाशीर्ष- "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) "

सदर शास्तीचा संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक शासकीय कोषागारात नियमितपणे भरणा करतील, असेही उपविभागीय कृषि अधिकारी, जालना यांनी पहावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक यांना विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे एकूण रुपये २५००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे शासकीय कोषागारात करावा.

४. उपविभागीय कृषि अधिकारी, जालना यांनी या शास्तीची कर्मचारीनिहाय विभागणी हे आदेश प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत करावी व सर्व अधिकारी / कर्मचारी हे सदर शास्तीचा भरणा नियमीतपणे शासकीय कोषागारात करतील याची दक्षता घ्यावी.

**अपील क्रमांक २००४/२००७**

अपिलार्थीच्या दिनांक २१-०६-२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २२-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे दिलेला प्रतिसाद पाहता हा प्रतिसाद सकारात्मक असल्याचे म्हणता येणार नाही, कारण या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती संबंधीत गावाच्या पाणलोट समितीकडून घेण्याचे सूचित केले व त्यांच्याकडील उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस देण्यास बराच कालावधी लागणार असून ती तयार होताच त्यांना शुल्क भरण्याबाबत कळविण्यात येईल, असे अपिलार्थीस कळविले. सुनावणीच्या वेळी पाणलोट समितीची रचना जन माहिती अधिकारी यांनी आयोगास विषद केली असून यावरुन असे

दिसते की, ग्रामस्तरावरील अशा प्रकारच्या पाणलोट समितीचे अध्यक्ष हे ग्रामस्थांनी निवडून दिलेली व्यक्ती असते व या समितीचे सचिव मंडळ कृषि अधिकारी यांच्या कार्यालयातील पर्यवेक्षक हे असतात. त्या पर्यवेक्षकावर तालुका कृषि अधिकारी यांचे नियंत्रण असते. अध्यक्ष पाणलोट समिती यांना कृषि विभागातील ग्रामीण स्तरावरील जन माहिती अधिकारी म्हणून नेमले गेलेले नाही, त्यांच्यावर समितीच्या कामासंदर्भातील कागदपत्रे जतन करुन ठेवण्याची जबाबदारी सोपविली नाही याहीपेक्षा हे महत्वाचे आहे की ते सार्वजनिक प्राधिकरणाचे नियमित कर्मचारी नसून ते पूर्णतः खाजगी व्यक्ती आहेत. कोणत्याही समितीशी संबंधीत कागदपत्रे तयार करण्याची व ती ठेवण्याची जबाबदारी सर्वसाधारणपणे संबंधीत समितीच्या सचिवाकडे सोपविलेली असते. या प्रकरणी पाणलोट समितीचे सचिव हे मंडळ कृषि अधिकारी यांच्या नियंत्रणखालील कर्मचारी आहेत हे पाहता, जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस आवश्यक असलेली, माहिती पाणलोट क्षेत्र समितीच्या अध्यक्षाकडून घेण्यासाठी सूचित करण्याची त्यांची कृती, चुकीची आहे. या प्रकरणी पाणलोट समितीकडून माहिती घेऊन ती अपिलार्थीस देण्याची जन माहिती अधिकारी यांनी तयारी दर्शविली असती तर ते माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीच्या पार्श्वभूमीवर अधिक उचित ठरले असते. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांच्याशी प्रत्यक्ष संबंधीत असलेली माहिती देण्यासाठी देखिल जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा सकारात्मक प्रयत्न विहित मुदतीत केल्याचे दिसून येत नाही. आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे हे पाहता, संबंधीत जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. सदर माहिती अपिलार्थीने आयोगासमोर झालेल्या सुनावणीमध्ये त्यांना रजिष्टर पोस्टाने हवी असल्याची विनंती केली आहे. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती रजिष्टर पोस्टाने पाठवावी. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती

अधिकारी यांना त्यांच्या सहाय्यकांची मदत घ्यावी लागणार होती. त्यामुळे अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे त्यांचे सर्व सहाय्यक यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजण्यात येत असून अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न होण्यासाठी जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहाय्यक हे एकत्रितपणे जबाबदार ठरत आहेत, असे आयोगाचे मत आहे. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न देऊन त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे हे पाहता असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणांशिवाय माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक यांना एकत्रितपणे विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे एकूण रुपये २५००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. या शास्तीची कर्मचारीनिहाय विभागणी उपविभागीय कृषि अधिकारी, जालना यांनी त्यांना हे आदेश प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत करावी. या शास्तीचा भरणा सर्व संबधितांनी जास्तीत जास्त ५ हप्त्यामध्ये शासकीय कोषागारात पुढील लेखशिर्षामध्ये करावा.

लेखाशीर्ष- "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) "

सदर शास्तीचा संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक शासकीय कोषागारात नियमितपणे भरणा करतील, असे उपविभागीय कृषि अधिकारी, जालना यांनी पहावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक यांना विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे एकूण रुपये २५००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे शासकीय कोषागारात करावा.

४. उपविभागीय कृषि अधिकारी, जालना यांनी या शास्तीची कर्मचारीनिहाय विभागणी हे आदेश प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत करावी व सर्व अधिकारी / कर्मचारी हे सदर शास्तीचा भरणा नियमीतपणे शासकीय कोषागारात करतील याची दक्षता घ्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ११-१२-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अंकुश एम. पवार, प्लॉट नं. एफ-४१/१२, एन-७, सिडको, अयोध्यानगर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंठा, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०१०

निर्णय दिनांक ११-१२-२००८

१ सौ. कोमल एस. विटेकर, अपिलार्थी

प्लॉट नं. बी-३५-६, साईनगर, सिडको, वाळुज

महानगर, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद,

जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित आहेत.

१ श्री. बोईनवाड माधव सुभाषराव जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद, जिल्हा जालना

१ श्री. नंदकुमार अनंतराव टाक तंत्र अधिकारी, जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना यांचे प्रतिनिधी

अपिलार्थी सौ. कोमल एस. विटेकर उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-१०-२००७ रोजी दाखल केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीमध्ये समाधानकारक निर्णय न दिल्याने त्यांनी व्दितीय अपील केल्याचे नमूद करुन त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-०६-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०१-२००७ ते २१-०४-२००७ या कालावधीशी संबंधीत त्यांच्या कार्यक्षेत्रातील रोजगार हमी योजनेच्या दहा कामांची माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये गटनिहाय झालेल्या कामाचे हजेरीपट, मोजमाप पुस्तिका, रोखपुस्तिका व वरिष्ठांनी पाया तपासणी केलेला अहवाल या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद दिला. सदर पत्र म्हणजे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील मंडळ कृषि अधिकारी यांना दिलेले पत्र असून त्यामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात सादर करण्यासाठी सूचना त्यामध्ये दिल्याचे दिसून येते. या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस पाठविल्याचे यामध्ये नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक २३-०७-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याच्या सूचना त्यांच्याकडील दिनांक २५-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये दिल्या व तदनंतर

दिनांक २८-०८-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपला आदेश दिनांक ०७-०९-२००७ रोजी पारित केला. या आदेशाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस तात्काळ माहिती देण्याचे आदेशित केले आहे. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीस माहिती कशा प्रकारे व किती कालावधीमध्ये द्यावयाची याचा उल्लेख केलेला नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे हे अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रतिसाद त्यांना प्राप्त झाला असून त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित मुदतीत माहिती न दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस तात्काळ माहिती देण्याची सूचना देऊनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त झालेली नाही, त्यामुळे सदर माहिती त्यांना आता जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य द्यावी व अधिनियमाव्दारे विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करावी, अशी त्यांनी आयोगास शेवटी विनंती केली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या अर्जाव्दारे ते कोणते व्यापक जनहित साध्य करणार असे विचारले असता त्यांनी माहिती मिळालीच नसल्याने त्या सद्यःस्थितीत याबाबत सांगू शकत नाहीत असे त्यांनी आयोगास सांगितले.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा दिनांक २१-०६-२००७ रोजीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दिनांक ०५-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या अधिपत्याखालील ज्या मंडळ कृषि अधिका-यांच्या ताब्यात होती त्यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यासाठी प्रथमतः प्रयत्न केले. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप मोठे असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस

दिनांक ०३-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयामध्ये येऊन पाहण्यासाठी सूचित केले. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून ते अपिलार्थीस ती विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २१-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जासंदर्भात जरी अधिनियमाव्दारे विहित मुदतीत प्रथम प्रतिसाद दिला असला तरी तो पूर्णतः सकारात्मक नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०५-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रथम प्रतिसाद पाहता जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या सहाय्यकास अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात सादर करण्याची सूचना दिली आहे, असे दिसून येते. या प्रकरणी असेही दिसून येते की, अपिलार्थीस, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २५-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये व अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाच्या सुनावणीसंदर्भात दिनांक ०७-०९-२००७ रोजीच्या दिलेल्या आदेशान्वये जन माहिती अधिकारी यांना, त्यांच्या वरिष्ठांकडून त्वरित माहिती देण्याची सूचना प्राप्त झाल्यानंतरही त्यावर जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कारवाई केलेली नाही. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप विस्तृत असल्याचे आयोगास स्पष्ट केले आहे. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण दहा कामांच्या हजेरीपटाच्या प्रती, मोजमाप पुस्तिकेच्या प्रती इत्यादी तपशीलाची मागणी केली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या कालावधीतील माहिती मागितली होती तो कालावधी अपिलार्थीने अर्ज करण्याच्या कालावधीशी नजिकचा असल्याने, ही माहिती अपिलार्थीस देण्यास जन माहिती अधिकारी यांना विशेष परिश्रम अथवा कष्ट घ्यावे लागले असते अशी कोणतीही बाब, संभवत नाही. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे स्पष्टपणे नाकारले नसले तरी त्यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत

दिली नाही हे सत्य शेवटी उरत आहे हे पाहता, जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या सहाय्यकांची देखील मदत घ्यावी लागणार होती. अधिनियमातील कलम ५ (५) मध्ये जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे कर्मचारी / अधिकारी यांना देखील जन माहिती अधिकारी समजावे अशी तरतूद आहे हे पाहता, अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देण्यासाठी जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक हे सर्व जण जबाबदार असल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित मुदतीत माहिती न देण्याच्या त्यांच्या या कृतीव्दारे त्यांनी अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस स्वत:ला पात्र ठरविले आहे. सबब सचिव (कृषि) यांना संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच, अधिनियमातील विहित कालावधी आता व्यापगत झाल्याने १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (कृषि) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ११-१२-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ सौ. कोमल एस. विटेकर, प्लॉट नं. बी-३५-६, साईनगर, सिडको, वाळुज महानगर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (कृषि) मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०११

निर्णय दिनांक ११-१२-२००८

१ सौ. कोमल एस. विटेकर, अपिलार्थी
प्लॉट नं. बी-३५/६, साईनगर, सिडको, वाळुज
महानगर, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका कृषि अधिकारी, मंठा,
जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर,
जिल्हा जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. नामदेवराव मारोती माघाडे | जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंठा, जिल्हा जालना |
| २ | श्री. सदाशिव चंद्रभानराव मुंढे | तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंठा, जिल्हा जालना |
| ३ | श्री. उमेश रमाकांत घाटगे | जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर, जिल्हा जालना |

अपिलार्थी सौ. कोमल एस. विटेकर ह्या उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-१०-२००७ रोजी दाखल केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलावर कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार व कुठलाच निर्णय न दिल्यामुळे त्यांनी व्दितीय अपील केल्याचे नमूद केले आहे. तसेच या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-०६-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधीत ०१-०१-२००७ ते २१-०४-२००७ या कालावधीतील त्यांच्या कार्यालयातर्फे रोजगार हमी योजनेखाली केलेल्या एकूण सहा कामासंदर्भात माहिती मागविली होती. त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणी केलेल्या माहितीमध्ये गावनिहाय गटनिहाय झालेल्या कामांच्या हजेरीपटाच्या प्रती, मोजमाप पुस्तिकाच्या प्रती इत्यादी मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने सदर माहिती "प्रत्यक्ष व रजिस्टर्ड टपालाने" अपेक्षित असल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती तयार करण्याचे काम चालू असल्याचे कळविले तसेच या पत्रामध्ये त्यांनी त्यांच्या कार्यालयामध्ये ही माहिती देण्याकरिता अपुरा कर्मचारीवर्ग असल्याने संपूर्ण माहिती तयार झाल्यानंतर अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या किती प्रती होतात व ही माहिती देण्यासाठी किती शुल्क भरावे लागेल हे वेगळ्या पत्राव्दारे कळविण्याचे अपिलार्थीस आश्वासीत केले.

अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, जन माहिती अधिकारी यांचे दिनांक २१-०६-२००७ रोजीचे कथित पत्र त्यांना प्राप्त झाले नाही, तथापि जन माहिती अधिकारी यांनी हे पत्र त्यांच्या कार्यालयाच्या ६१० या क्रमांकाने अपिलार्थीस पाठविल्याचा योग्य तो पुरावा सादर केला आहे.

यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पत्र पाठविल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही, मात्र त्यांनी यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडील दिनांक १८-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस ५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले व त्या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस अग्रेषित केलेली आहे, तथापि तदनंतरही अपिलार्थीस आजतागायत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी त्यांना जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारचे पत्र प्राप्त झाले नाही. त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना ३० दिवसाच्या आत न दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले होते, तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी कोणतीही सुनावणी घेतली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न दिल्याने त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे शास्तीची कारवाई करण्यात यावी व ८ दिवसाच्या आत त्यांना माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे, अशी त्यांनी आयोगास आपल्या युक्तिवादाच्या शेवटी विनंती केली आहे. सदर माहिती अपिलार्थीने रजिस्टर्ड पोस्टाव्दारे अपेक्षिली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील मंडळ कृषि अधिकारी यांच्या ताब्यात होती व अपिलार्थीने ज्यावेळी माहितीची मागणी केली तो कालावधी खरीप हंगामाचा असल्यामुळे संबंधीत

कृषि मंडळ अधिकारी नियमित कामांमध्ये व्यग्र असल्यामुळे तसेच अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती मोठी असल्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना पुरविण्यासाठी विलंब लागणार, याची कल्पना त्यांनी अपिलार्थीस दिनांक २१-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे दिली आहे. तदनंतर त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०३-१०-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती तयार असून सदरची माहिती अपिलार्थीने स्वतः घेऊन जाण्यासाठी अपिलार्थीस या पत्राव्दारे विनंती केली. अपिलार्थीस हे पत्र जन माहिती अधिकारी यांनी ९०४ या क्रमांकाने पाठविले असून अपिलार्थीस हे पत्र पाठविल्याप्रीत्यर्थ आवश्यक तो पुरावा आयोगासमोर सादर केला आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०३-१०-२००७ रोजीचे पत्र पाठविल्याचे सिध्द होत आहे. हे पत्र देखील अपिलार्थीने त्यांना प्राप्त झाले नसल्याचे आज सुनावणीमध्ये आयोगास सांगितले आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आता तयार असून ते ती अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत सशुल्क देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक ११-०६-२००७ रोजीच्या अर्जास जरी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी हा प्रतिसाद सकारात्क नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीस त्यांच्या अर्जान्वये मागितलेली माहिती तयार करण्याचे काम सुरु असल्याचे या पत्राव्दारे त्यांनी कळविले आहे. तसेच तदनंतर दिनांक ०३-१०-२००७ रोजी माहिती तयार झाल्यानंतर त्यांनी ही माहिती अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातून घेऊन जाण्याचे कळविले आहे. या प्रकरणी असे दिसून येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये ५ दिवसाच्या आत अपिलार्थीस माहिती देण्याची सूचना जन माहिती अधिकारी यांना दिली होती, तथापि या ५ दिवसातही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरविली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती

जन माहिती अधिकारी यांना त्यांच्यातर्फे त्यांच्या नियंत्रणाखालील मंडळ कृषि अधिकारी यांच्याकडून घेऊन तदनंतर ती एकत्रित करुन ती अपिलार्थीस द्यावयाची होती. संबंधीत मंडळ कृषि अधिकारी यांच्या व्यग्रतेचा जन माहिती अधिकारी यांनी वरील परिच्छेदात केलेला युक्तिवाद आयोगास मान्य नाही, कारण माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार काम करणे हा आता त्यांच्या दैनंदिन कर्तव्याचा एक अविभाज्य भाग आहे, त्यामुळे दैनंदिन काम सांभाळून माहिती देण्यास विलंब लागला, हे जन माहिती अधिकारी यांचे विधान पटण्यासारखे नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये मुख्यत्वेकरुन हजेरीपटाच्या व मोजमाप पुस्तिकांच्या झेरॉक्स प्रती, जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या सहाय्यकाकडून घ्यावयाच्या होत्या तथापि ही कारवाई करण्यासाठी देखील त्यांना ३ महिन्याहून जास्त कालावधी लागला आहे. या प्रकरणी अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-१०-२००७ रोजी माहिती तयार होती असे जरी गृहीत धरले तरी अपिलार्थीने माहितीसाठीचा केलेला अर्ज व माहिती तयार करण्यासाठी जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक यांनी घेतलेला कालावधी हा निश्चितच अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा जास्त आहे, असे दिसून येईल. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी हा त्यांनी प्रथम अर्ज केलेल्या कालावधीच्या नजिकचा असल्यामुळे ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस देणे जन माहिती अधिकारी अथवा त्यांच्या सहाय्यकांना फारच अवघड होते, अशातली बाब येथे संभवत नाही. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहाय्यक यांनी अधिनियमातील विहीत मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात पूर्णत: अनास्था दाखविली असल्याचे आढळून येते. अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न पुरवून जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक या सर्वांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे असे आयोगाचे मत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस स्वत:ला पात्र ठरविले आहे. सबब सचिव (कृषि) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधीत असलेले त्यांचे सहाय्यक यांच्यावर प्रचलीत

सेवनियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ते अपिलार्थीस सशुल्क देण्यास तयार आहेत. अपिलार्थीस माहिती देण्याचा विहित कालावधीत आता व्यपगत झाला असल्यामुळे अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य द्यावी लागेल हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य द्यावी असे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (कृषि) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधीत असलेले त्यांचे सहाय्यक यांच्यावर प्रचलीत सेवनियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ११-१२-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ सौ. कोमल एस. विटेकर, प्लॉट नं. बी-३५/६, साईनगर, सिडको, वाळुज महानगर,

औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंठा, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (कृषि) मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०१२

निर्णय दिनांक ११-१२-२००८

१ सौ. कोमल एस. विटेकर, अपिलार्थी
प्लॉट नं. बी-३५/६, साईनगर, सिडको, वाळुज
महानगर, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका कृषि अधिकारी, भोकरदन,
जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. भगवान नरसिंगू बोंदरवाड | जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, भोकरदन, जिल्हा जालना |
| २ | श्री. नंदकुमार अनंतराव टाक, तंत्र अधिकारी | जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना यांचे प्रतिनिधी |

अपिलार्थी सौ. कोमल एस. विटेकर उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-१०-२००७ रोजी दाखल केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांनी ठेवलेल्या सुनावणीमध्ये समाधानकारक निर्णय न दिल्याने त्यांनी व्दितीय अपील केल्याचे नमूद केले आहे. तसेच या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी सर्वप्रथम अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २१-०६-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत, रोजगार हमी योजने अंतर्गत मराठवाडा पाणलोट नदी खोरे विकास या योजनेअंतर्गत केल्या गेलेल्या एकूण दहा कामांची, ०१-०३-२००७ ते २१-०५-२००७ या कालावधीतील काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये गटनिहाय कामाचे हजेरीपट, मोजमाप पुस्तिका, रोखपुस्तिका व वरिष्ठांनी पाया तपासणी केलेला अहवाल या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने सदर माहिती प्रत्यक्ष व रजिस्टर्ड पोस्टाने मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २२-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली व त्यांच्या कार्यालयाशी प्रत्यक्षतः संबंधीत असलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे बराच कालावधी लागणार असल्याचे, माहिती तयार होताच अपिलार्थीस फी भरण्याबाबत कळविण्याचे आश्वासित केले व उर्वरित माहिती संबंधित गावामधील पाणलोट समितीच्या अध्यक्षांकडून घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले. जन माहिती अधिकारी यांचे सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नसल्याचे अपिलार्थीने आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगास सांगितले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन

अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथमतः जन माहिती अधिकारी यांना दिनांक २५-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सूचित केले व तदनंतर दिनांक २८-०८-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक ०७-०९-२००७ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत पुरविण्याचे सूचित केले व अपिलार्थीने मागणी केलेली जी माहिती संबंधीत गावाच्या पाणलोट समितीकडे ठेवली जाते ती माहिती, संबंधीत गावाच्या पाणलोट समितीच्या अध्यक्षांकडून घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांच्या दिनांक २१-०६-२००७ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले होते. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिका-यास अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले होते व तदनंतर दिनांक २८-०८-२००७ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये तालुका कृषि अधिकारी भोकरदन यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत देण्याचे सूचित केले होते, तथापि तदनंतरही जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी हे व्दितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना काही कामांची माहिती संबंधीत गावाच्या पाणलोट समितीच्या अध्यक्षांकडून घेण्याचे सूचित केले आहे तथापि ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असल्याने ती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस पुरविणे भाग आहे. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना तात्काळ विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाने हवी आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त

प्रकरणी लावलेल्या विलंबाबाबत त्यांच्यावर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे शास्ती लावण्याची कारवाई करावी अशी त्यांनी अखेरीस आयोगास विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या एकूण दहा कामांपैकी अनुक्रमांक ३, ४, ५, ६ व ९ शी संबंधीत माहिती त्यांच्या कार्यालया-कडे उपलब्ध होती व उर्वरित माहिती पाणलोट नदी खोरे विकास या योजनेअंतर्गत झ ाालेल्या कामांशी संबंधीत होती. सदर माहिती त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नव्हती म्हणून त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती संबंधीत पाणलोट समितीच्या अध्यक्षांकडून घेण्यासाठी सूचित केले. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-०९-२००७ रोजी पारित केलेल्या आदेशाप्रमाणे अपिलार्थीस दिनांक ०८-०९-२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांना आवश्यक असलेली माहिती घेऊन जाण्याचे त्यांनी सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सदर पत्र त्यांच्या कार्यालयातील १४४१ या क्रमांकाने पाठविल्याची त्यांच्या कार्यालयातील जावक नोंदवहीची प्रत आयोगास दाखविली. यावरुन त्यांनी हे पत्र अपिलार्थीस पाठविल्याचे दिसून येत आहे. तथापि अपिलार्थीने त्यांना हे पत्र प्राप्त झाले नसल्याचे म्हटले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी जरी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत दिनांक २२-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद दिला असला तरी हा प्रतिसाद सकारात्मक नसून त्यांनी अपिलार्थीस अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्यासाठी बराच कालावधी लागणार असल्याची कल्पना देण्याबाबतचे हे पत्र असल्याचे दिसून येते. अपिलार्थीस त्यांनी प्रथमतः त्यांच्याकडील दिनांक ०८-०९-२००७ रोजीच्या पत्रान्वये माहिती तयार असल्याचे व ती घेऊन जाण्यासाठी पत्र पाठविले. जन माहिती अधिकारी यांचा प्रथम सकारात्मक प्रतिसाद अपिलार्थीस अशा प्रकारे दिनांक ०८-०९-२००७ रोजी दिल्याचे

दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या अधिपत्याखालील संबंधीत मंडळ कृषि अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावयाची होती. या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत असलेली माहिती देण्यासाठी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने प्रतिसाद दिल्याचे येथे नि:संशयपणे दिसून येत आहे. अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहाय्यक जबाबदार आहेत, असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या एकूण पाच कामांशी संबंधीत माहिती ही संबंधीत गावाच्या पाणलोट समितीच्या अध्यक्षांकडे उपलब्ध असते, असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले. संबंधीत पाणलोट समितीचे अध्यक्ष हे सार्वजनिक प्राधिकरणाचे कर्मचारी नसून ते त्या त्या गावातील ग्रामस्थांमधून निवडून दिलेली खाजगी व्यक्ती आहे व तसेच जन माहिती अधिकारी म्हणून नेमले गेलेले नाहीत हे पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाणलोट समितीच्या अध्यक्षांकडून माहिती घेण्यासाठी दिलेली सूचना आयोगास योग्य वाटत नाही. ग्रामपातळीवरील पाणलोट समितीचे सचिव हे तालुका कृषि अधिकारी यांच्या नियंत्रणाखालील कृषि सहाय्यक असतात. सर्वसाधारणत: अशा प्रकारच्या समितीच्या सचिवांकडे माहितीचे संकलन करणे, बैठका आयोजित करणे, कामाचे संनियंत्रण करणे अशा प्रकारची कामे सोपविली जातात. या समितीवर तालुका कृषि अधिकारी यांचे पूर्ण नियंत्रण असल्याने व ही माहिती संबंधीत पाणलोट समितीकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी सर्वसाधारण परिस्थितीत सकारात्मक प्रयत्न करावयास हवा होता, तथापि अशा प्रकारची कोणतीही कृती त्यांच्याकडून घडलेली नाही. आज रोजी झालेल्या सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधीत पाणलोट समितीकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस देण्याचे कबूल केले आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठीचा विहित कालावधी आता व्यपगत झाला असल्याने जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य द्यावी लागेल हे पाहता, जन माहिती अधिकारी

यांना अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेऊन जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधीत त्यांचे सर्व सहाय्यक यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. सबब सचिव (कृषि) यांना संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधीत सर्व सहाय्यक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची व ग्रामपाणलोट समितीच्या सचिवांची (ग्रामसेवक) ग्रामपातळीवरील या विषयाशी संबंधीत जन माहिती अधिकारी म्हणून नियुक्ति करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (कृषि) यांना संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची व ग्रामपंचायतीमधील ग्रामसेवकाची ग्रामपातळीवरील, या विषयाशी संबंधित जन माहिती अधिकारी म्हणून नियुक्ती करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ११-१२-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ सौ. कोमल एस. विटेकर, प्लॉट नं. बी-३५/६, साईनगर, सिडको, वाळुज महानगर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (कृषि) मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

**क्रमांक २०१८, २०१९, २०२०, २०२१**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०१८, २०१९, २०२०, २०२१

निर्णय दिनांक ११-१२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ | सौ. कोमल एस. विटेकर,<br>प्लॉट नं. बी-३५/६, साईनगर, सिडको, वाळुज महानगर, औरंगाबाद | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | जन माहिती अधिकारी | जन अपिलीय अधिकारी |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक २०१८/०७<br>जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, लातूर जिल्हा लातूर | उपविभागीय कृषि अधिकारी, लातूर |
| प्रत्यक्ष | कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, लातूर, जिल्हा लातूर | तालुका कृषि अधिकारी, लातूर, जिल्हा लातूर |
| २ | अपील क्रमांक २०१९/०७<br>जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, अहमदपूर, जिल्हा लातूर | उपविभागीय कृषि अधिकारी, उदगीर, जिल्हा लातूर |
| प्रत्यक्ष | कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर | तालुका कृषि अधिकारी, अहमदपूर, जिल्हा लातूर |
| ३ | अपील क्रमांक २०२०/०७<br>तालुका कृषि अधिकारी कार्यालय, औसा, जिल्हा | उपविभागीय कृषि अधिकारी, लातूर |

| | | |
|---|---|---|
| | लातूर | |
| प्रत्यक्ष | कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, औसा, जिल्हा लातूर | तालुका कृषि अधिकारी, औसा, जिल्हा लातूर |
| ४ | अपील क्रमांक २०२१/०७ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, उदगीर, जिल्हा लातूर | उपविभागीय कृषि अधिकारी, उदगीर, जिल्हा लातूर |
| प्रत्यक्ष | कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर | तालुका कृषि अधिकारी, उदगीर, जिल्हा लातूर |

## **निर्णय**

वरील चार प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक ११-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. नंदकिशोर बाळासाहेब पाठक | जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, लातूर, जिल्हा लातूर |
| २ | श्री. खानापुरे चंद्रशेखर नारायण | जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर |
| ३ | श्री. माधव भागवतराव बावगे | जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, औसा, जिल्हा लातूर |
| ४ | श्री. नरसिंग गोविंदराव मंतलवाड | तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर |
| ५ | श्री. दिलीप चंदरराव साळूंके | जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, लातूर, जिल्हा लातूर |
| ६ | श्री. विजयकुमार व्यंकटराव पाटील | जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, अहमदपूर, जिल्हा लातूर |

| | | |
|---|---|---|
| ७ | श्री. दीपक विश्वनाथराव बिराजदार | जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, औसा, जिल्हा लातूर |
| ८ | श्री. भारत ज्ञानोबा काळे | जन अपिलीय अधिकारी तालुका कृषि अधिकारी, उदगीर, जिल्हा लातूर |
| ९ | श्री. सी. डी. पाटील | उपविभागीय कृषि अधिकारी, लातूर |

अपिलार्थी श्रीमती कोमल एस. विटेकर या उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०८-२००७ रोजी दाखल झालेली २०१८/२००७, २०१९/२००७, २०२०/२००७ व २०२१/२००७ या क्रमांकाची व्दितीय अपिले आयोगाच्या विचाराधीन आहेत. या अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे ही व्दितीय अपिले केली असल्याचे म्हटले आहे. याचबरोबर त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी या अपील अर्जांमध्ये कायम ठेवली आहे.

त्यांनी मागणी केलेल्या माहितीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील रोजगार हमी योजनेअंतर्गत झालेल्या कामांची वरिष्ठांनी पाया पाहणी केलेला अहवाल, मजुरांची नावे लिहिलेले हजेरीपट व मोजमाप पुस्तिका, या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने सर्व जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, लातूर यांनी त्यांच्या दिनांक ०२-०४-२००७ रोजीच्या मूळ अर्जासंदर्भात त्यांच्याशी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला नाही व

जन माहिती अधिकारी लातूर यांच्याकडून त्यांना यासंदर्भात कोणतेही पत्र प्राप्त झाले नाही. यासंदर्भात त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले असता त्यांच्या अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी घेतली नाही. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, अहमदपूर व औसा यांच्यासंदर्भातही असाच प्रकार घडल्याचे त्यांनी आयोगास सांगितले. जन माहिती अधिकारी उदगीर यांच्याकडून त्यांच्या अर्जाला कोणत्याच प्रकारचा प्रतिसाद प्राप्त झाला नाही. यानंतर जन अपिलीय अधिकारी उदगीर यांच्याकडे प्रथम अपील केले असता त्यांनी जन माहिती अधिकारी यांना विनामूल्य माहिती देण्याची सूचना करुनही त्यांनी माहिती दिली नाही. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे कोणत्याच प्रकारची कारवाई न झाल्याने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून ८ दिवसाच्या आत माहिती मिळावी व त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याचे आदेशित करावे अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी लातूर यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा दिनांक ०२-०४-२००७ रोजीचा अर्ज त्यांच्याकडे प्रथम प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दिनांक २६-०४-२००७ रोजी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३०२० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे पत्राव्दारे सूचित केले. त्यांच्या या विधानाच्या पृष्ठ्यर्थ त्यांनी अपिलार्थीस दिनांक २६-०४-२००७ रोजी ७०६ या क्रमांकाने पत्र पाठविल्याचा पुरावा आयोगासमोर सादर केला. अपिलार्थीस त्यांनी या पत्रानंतर दिनांक ०६-०७-२००७ रोजी परत एक स्मरणपत्र पाठविले. यासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने पत्र पाठविल्याबद्दल लातूर पोस्टाची ०६-०७-२००७ या दिनांकाची व ०६७८ या क्रमांकाची पावती आयोगास दाखविली.

जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी अहमदपूर यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी दिनांक ३०-०४-२००७ रोजी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४९३५ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे अंडर सर्टिफिकेट ऑफ पोटींगने त्यांच्या कार्यालयाचे ७२७ या क्रमांकाचे पत्र पाठविले. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी त्यांच्या कार्यालयाची जावक नोंदवही आयोगास दाखविली असता त्यांनी ७२७ या एकाच क्रमांकाने दोन

पत्रे पाठविली असल्याचे दिसून येते. आयोगाने विचारणा केली असता ७२७ या दुस-या क्रमांकाचे पत्र ते आयोगास दाखवू शकले नाहीत व या प्रकरणी एकाच क्रमांकाची दोन पत्रे पाठविण्याचे प्रयोजन आयोगास न आढळल्याने आयोग त्यांचा हा युक्तिवाद अमान्य करीत आहे.

तालुका कृषि अधिकारी औसा यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २०-०४-२००७ रोजीच्या ७३७ या क्रमांकाच्या पत्राने अपिलार्थीस त्यांना कोणत्या पध्दतीने माहिती हवी आहे याचा बोध होत नसल्याचे कळविले. सदर पत्र अपिलार्थीस पाठविल्याचा पुरावा त्यांनी आयोगासमोर सादर केला आहे. त्यांच्या या विधानाच्या पृष्ठ्यर्थ अपिलार्थीने त्यांच्याकडे सादर केलेल्या दिनांक ०२-०४-२००७ रोजीच्या अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थीने अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व ५ समोर 'प्रत्यक्ष व रजिस्टर्ड' असे शब्द लिहिल्याचे दिसून येते. त्यामुळे माहिती अधिका-यास अपिलार्थीस माहिती टपालाने हवी आहे किंवा व्यक्तिशः हवी आहे याचा बोध होत नसल्याचे दिसून येत आहे.

जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी उदगीर यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांच्या कार्यालयाकडील ५७२ या क्रमांकाच्या पत्राने अपिलार्थीस दिनांक १३-०४-२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना कोणत्या पध्दतीने हवी आहे हे कळविण्याचे सूचित केले. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या त्यांच्या दिनांक ०३-०४-२००७ रोजीच्या प्रथम अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थीने त्या अर्जामध्ये मुद्दा क्रमांक ४ व ५ समोर 'प्रत्यक्ष व रजिस्टर्ड' असा उल्लेख केला आहे त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे अपिलार्थीस कोणत्या पध्दतीने माहिती हवी आहे या मुद्दयावर संभ्रमीत होणे स्वाभाविक आहे.

जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी उदगीर यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक ०७-०८-२००७ रोजी त्यांच्या प्रथम माहितीसंदर्भात एका साध्या अर्जाव्दारे विनंती केली होती, त्यावर २० रुपये इतक्या किंमतीचे कोर्ट

फी स्टॅम्प डकविले नव्हते. एवढे असून त्यांनी दिनांक ०३-०९-२००७ रोजी सुनावणी ठेवली असता सदर सुनावणीसाठी अपिलार्थी हे गैरहजर राहिले. तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे असे पडले की, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील अर्ज विहित नमुन्यात केला असून त्यावर २० रुपये किंमतीचे कोर्ट फी स्टॅम्प चिकटविले होते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीचा प्रथम अर्ज दाखल करतांना हा अर्ज व्यवस्थितपणे न भरता मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ - 'माहिती टपालाने पाहिजे की प्रत्यक्ष' यासमोर - माहिती प्रत्यक्ष हवी असल्याचे नमूद केले तर मुद्दा क्रमांक ५ - 'टपालाने पाहिजे असल्यास' यासमोर - रजिस्टर्ड असे नमूद केले आहे. यावरुन सर्व जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या शंकेचे निरसन होण्याच्या दृष्टीने अधिनियमातील विहित तरतुदीमध्ये अपिलार्थीस प्रतिसाद दिला आहे. कृषि अधिकारी लातूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०२-०४-२००७ रोजीच्या अर्जास त्यांच्याकडील दिनांक २६-०४-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस हव्या असलेल्या माहितीपोटीचे एकूण शुल्क रुपये ३०२० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे त्यांच्याकडील ७०६ क्रमांकाच्या पत्राव्दारे कळविले आहे. अपिलार्थीस त्यांनी हे पत्र पाठविल्याप्रीत्यर्थ आवश्यक तो पुरावा त्यांनी सादर केला आहे, त्यामुळे कृषि अधिकारी लातूर यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे सिध्द होत असल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी लातूर यांच्याकडून माहितीची आवश्यकता असल्यास त्यांनी आवश्यक ते माहितीपोटीचे शुल्क भरुन आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. कृषि अधिकारी अहमदपूर यांनी जरी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी त्यांनी दिनांक ३०-०४-२००७ रोजीची ७२७ या एकाच क्रमांकाची दोन पत्रे वेगवेगळी पाठविली असल्याचे दिसून येते. यापैकी एक पत्र अपिलार्थीस उद्देशून लिहिले आहे . सदर पत्र अपिलार्थीस ३०-०४-२००७ रोजी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविले आहे. तथापि एकाच क्रमांकाची पत्रे दोन ठिकाणी

पाठविण्याची त्यांची कृती काहीशी संशयास्पद वाटते. सबब जन माहिती अधिकारी, अहमदपूर यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०३-०४-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. तालुका कृषि अधिकारी औसा यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ७३७ या क्रमांकाने दिनांक २०-०४-२००७ रोजी पत्र पाठविले असून त्यामध्ये अपिलार्थीस नक्की कोणत्या स्वरुपात माहिती पाहिजे आहे याचे स्पष्टीकरण विचारले आहे. त्यांनी अपिलार्थीस हे पत्र पाठविल्याबाबत अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगच्या पावतीव्दारे आयोगासमोर योग्य तो पुरावा सादर केला आहे. सदर पुरावा ग्राह्य धरण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या पत्रामध्ये त्यांना कोणत्या पध्दतीने माहिती हवी आहे याचा त्यांच्या प्रथम अर्जावरुन बोध होत नसल्याचे म्हटले आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता या अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना "प्रत्यक्ष" व "रजिस्टर्ड" पोस्टाने माहिती हवी असल्याचे म्हटले आहे. अपिलार्थीने त्यांचा जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेला प्रथम अर्ज व्यवस्थित न भरल्यामुळे जन माहिती अधिकारी हे संभ्रमीत झाले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. अपिलार्थीकडून त्यांना कोणतेही पत्र प्राप्त झाले नाही असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास स्पष्ट केले. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस जर जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापही त्यांच्याकडील मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपेक्षित असेल तर अपिलार्थीने दिनांक २०-०४-२००७ रोजीच्या जन माहिती अधिकारी यांच्या पत्रास योग्य ते उत्तर देऊन जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेणे उचित राहील. जन माहिती अधिकारी उदगीर यांच्याकडील पत्र क्रमांक ५७२ दिनांक १३-०४-२००७ रोजीचे अवलोकन केले असता त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसंबंधी आवश्यक ती रक्कम अपिलार्थीस नंतर कळविण्याचे आश्वासीत केले आहे, तसेच या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांना प्रत्यक्ष की पोस्टाने माहिती हवी आहे याचा खुलासा विचारला आहे. अपिलार्थीने यासंदर्भात कोणताही खुलासा संबंधीतांकडे सादर केल्याचे दिसून येत नाही.

उपरोक्त प्रकरणी सर्व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला आहे. जन माहिती अधिका-यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे स्पष्टपणे कोणत्याही प्रकरणात नाकारल्याचे दिसून येत नाही, तसेच त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत प्रतिसाद दिल्याचे आयोगासमोर सिध्द केले असल्याने अपिलार्थीची संबंधितांच्या विरुध्द दंडात्मक कारवाई करण्याची मागणी आयोगास मान्य करता येणार नाही, मात्र कृषि अधिकारी, अहमदपूर यांनी एकाच क्रमांकाची दोन पत्रे लिहिली असल्याने, सदर बाब आयोगास संशयास्पद वाटत असल्याने, त्यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०३-०४-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. उर्वरित अर्जासंदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी कृषि अधिकारी लातूर यांच्याकडे आवश्यक त्या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात करुन त्यांच्याकडून ही माहिती प्राप्त करुन घ्यावी. कृषि अधिकारी औसा, उदगीर यांच्यासंदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी माहिती मागण्याचा प्रथम अर्ज व्यवस्थित भरुन त्यांना आवश्यक असलेली माहिती संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कारवाई करुन प्राप्त करुन घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील क्रमांक २०१८/२००७ फेटाळण्यात येत आहे. अपील क्रमांक २०१९/२००७ अंशतः मान्य करण्यात येत आहे व अपील क्रमांक २०२०/०७ व २०२१/०७ निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **<u>आदेश</u>**

१. अपील क्रमांक २०१८/२००७ फेटाळण्यात येत आहेत.

२. अपील क्रमांक २०१९/२००७ अंशतः मान्य करण्यात येत आहे.

३. अपील क्रमांक २०२०/०७ व २०२१/०७ ही निकाली काढण्यात येत आहेत.

४. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, अहमदपूर यांनी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०३-०४-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ११-१२-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ सौ. कोमल एस. विटेकर, प्लॉट नं. बी-३५/६, साईनगर, सिडको, वाळुज महानगर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, लातूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, औसा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, लातूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, औसा, जिल्हा लातूर यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

९ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१० निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक २०२२ व २०२३**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०२२ व २०२३

निर्णय दिनांक ११-१२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. अंकुश एम. पवार,<br>प्लॉट नं. एफ-४१/१२, एन-७, सिडको,<br>अयोध्यानगर, औरंगाबाद | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | जन माहिती अधिकारी | जन अपिलीय अधिकारी |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक २०२२/०७<br>तथा तालुका कृषि अधिकारी,<br>औसा, जिल्हा लातूर | उपविभागीय कृषि अधिकारी, लातूर |
| प्रत्यक्ष | कृषि अधिकारी, तालुका कृषि<br>अधिकारी कार्यालय, औसा,<br>जिल्हा लातूर | तालुका कृषि अधिकारी, औसा, जिल्हा<br>लातूर |
| २ | अपील क्रमांक २०२३/०७<br>तथा तालुका कृषि अधिकारी,<br>उदगीर, जिल्हा लातूर | उपविभागीय कृषि अधिकारी, उदगीर,<br>जिल्हा लातूर |
| प्रत्यक्ष | कृषि अधिकारी, तालुका कृषि<br>अधिकारी कार्यालय, उदगीर,<br>जिल्हा लातूर | तालुका कृषि अधिकारी, उदगीर, जिल्हा<br>लातूर |

# निर्णय

वरील दोन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक ११-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. माधव भागवतराव बावगे | जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, औसा, जिल्हा लातूर |
| २ | श्री. नरसिंग गोविंदराव मंतलवाड | तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर |
| ३ | श्री. दीपक विश्वनाथ बिराजदार | जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, औसा, जिल्हा लातूर |
| ४ | श्री. भारत ज्ञानोबा काळे | जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, उदगीर, जिल्हा लातूर |
| ५ | श्री. सी. डी. पाटील | उपविभागीय कृषि अधिकारी, लातूर |

अपिलार्थी श्री. अंकुश एम. पवार हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०८-२००७ रोजी दाखल केलेली २०२२/२००७ व २०२३/२००७ या क्रमांकाची दोन व्दितीय अपिले आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांच्या जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या दिनांक २३-०५-२००७ रोजीच्या प्रथम अपिलासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही. याच अपील अर्जांमध्ये त्यांनी आपल्या मूळ अर्जांव्दारे मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्या दिनांक ०२-०४-२००७ व दिनांक ०३-०४-२००७ रोजीच्या अर्जास अनुक्रमे जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, औसा व उदगीर यांनी कोणताही प्रतिसाद

दिला नाही, त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, लातूर व उदगीर यांच्याकडे प्रथम अपील अर्ज केले असता त्या अपील अर्जांवर संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही व यासंदर्भात कोणतेही निर्णय पारित केले नाहीत. जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे शास्ती लावण्यात यावी व त्यांना विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करण्यात यावे, अशी त्यांनी आपल्या युक्तिवादाच्या शेवटी आयोगास विनंती केली. त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये आयोगास असेही विदित केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविलेले पुरावा पत्र बनावट असून हे पत्र त्यांनी मागील तारीख टाकून दिलेले आहे. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, औसा यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०२-०४-२००७ रोजीच्या अर्जास विहित मुदतीत कोणतीही माहिती दिली नाही व कोणताही पत्रव्यवहार केला नाही.

जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, औसा यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक २०-०४-२००७ रोजी त्यांच्याकडील ७३८ या क्रमांकाच्या पत्राने प्रतिसाद दिला असून या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस कोणत्या पध्दतीने माहिती हवी आहे याचा खुलासा मागविला आहे. अपिलार्थीने त्यांच्याकडे माहितीसाठी केलेल्या मूळ अर्जामध्ये मुद्दा क्रमांक ४ व ५ च्या समोर अनुक्रमे प्रत्यक्ष व रजिस्टर्ड असे अभिप्राय दिले आहेत, त्यामुळे ते संभ्रमित झाले व त्यांनी अपिलार्थीस त्यांना कोणत्या पध्दतीने माहिती हवी आहे हे विचारले. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, उदगीर यांनी देखील असाच युक्तिवाद करुन अपिलार्थीस दिनांक १३-०४-२००७ रोजी त्यांच्याकडील ५७१ या क्रमांकाच्या पत्राने प्रतिसाद दिल्याचे सांगितले.

जन अपिलीय अधिकारी, औसा व उदगीर यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांना प्राप्त झाला नाही, त्यामुळे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांना कोणताही निर्णय घेता आला नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या या

युक्तिवादावरुन अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी होणे आयोगास या टप्प्यावर गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या दिनांक २३-०५-२००७ रोजीच्या दोनही प्रकरणातील प्रथम अपील अर्जांवर त्यांनी हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन त्यावर आपले निर्णय पारित करावेत. अपिलार्थीस सदर निर्णय मान्य न झाल्यास ते अधिनियमातील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे केलेली अपील क्रमांक २०२२/२००७ व २०२३/२००७ ही निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक २०२२/२००७ व २०२३/२००७ ही निकाली काढण्यात येत आहेत.

२. संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापीत करुन हे आदेश त्यांना प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन त्यावर आपले आदेश पारित करावेत.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ११-१२-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अंकुश एम. पवार, प्लॉट नं. एफ-४१/१२, एन-७, अयोध्यानगर, सिडको, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, औसा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, औसा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०२४

निर्णय दिनांक ११-१२-२००८

१ श्री. सुग्रीव एन. विटेकर, अपिलार्थी
प्लॉट नं. बी-३५/६, साईनगर, सिडको, वाळुज
महानगर, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका कृषि अधिकारी, भोकरदन,
जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. भगवान नरसिंगू बोंदरवाड | जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, भोकरदन, जिल्हा जालना |
| २ | श्री. नंदकुमार अनंतराव टाक, तंत्र अधिकारी | जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना यांचे प्रतिनिधी |

अपिलार्थी श्री. सुग्रीव एन. विटेकर उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-१०-२००७ रोजी दाखल केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांनी ठेवलेल्या सुनावणीमध्ये समाधानकारक निर्णय न दिल्याने त्यांनी व्दितीय अपील केल्याचे नमूद केले आहे. तसेच या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी सर्वप्रथम अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २१-०६-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत, रोजगार हमी योजने अंतर्गत मराठवाडा पाणलोट नदी खोरे विकास या योजनेअंतर्गत केल्या गेलेल्या एकूण दहा कामांची, ०१-०३-२००७ ते २१-०५-२००७ या कालावधीतील काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये गटनिहाय कामाचे हजेरीपट, मोजमाप पुस्तिका, रोखपुस्तिका व वरिष्ठांनी पाया तपासणी केलेला अहवाल या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने सदर माहिती प्रत्यक्ष व रजिस्टर्ड पोस्टाने मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २२-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली व त्यांच्या कार्यालयाशी प्रत्यक्षतः संबंधीत असलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे बराच कालावधी लागणार असल्याचे व माहिती तयार होताच अपिलार्थीस फी भरण्याबाबत कळविण्यात येईल, असे सूचित केले व उर्वरित माहिती संबंधित गावामधील पाणलोट समितीच्या अध्यक्षांकडून घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले. जन माहिती अधिकारी यांचे सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नसल्याचे अपिलार्थीने आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगास सांगितले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या

तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथमतः अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व तदनंतर दिनांक २८-०८-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक ०७-०९-२००७ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत पुरविण्याचे सूचित केले व अपिलार्थीने मागणी केलेली जी माहिती संबंधीत गावाच्या पाणलोट समितीकडे ठेवली जाते ती माहिती संबंधीत गावाच्या पाणलोट समितीच्या अध्यक्षांकडून घेण्याचे सूचित केले. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांच्या दिनांक २१-०६-२००७ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले होते. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिका-यास अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले होते व तदनंतर दिनांक २८-०८-२००७ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये तालुका कृषि अधिकारी भोकरदन यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत देण्याचे सूचित केले होते, तथापि तदनंतरही जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी हे व्दितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना काही कामांची माहिती संबंधीत गावाच्या पाणलोट समितीच्या अध्यक्षांकडून घेण्याचे सूचित केले आहे तथापि ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असल्याने ती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस पुरविणे भाग आहे. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना तात्काळ विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाने हवी आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त

प्रकरणी लावलेल्या विलंबाबाबत त्यांच्यावर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे शास्ती लावण्याची कारवाई करावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या एकूण दहा कामांपैकी अनुक्रमांक १० शी संबंधीत माहिती त्यांच्या कार्यालया-कडे उपलब्ध होती व उर्वरित माहिती पाणलोट नदी खोरे विकास या योजनेअंतर्गत झालेल्या कामांशी संबंधीत होती. सदर माहिती त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नव्हती म्हणून त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती संबंधीत पाणलोट समितीच्या अध्यक्षांकडून घेण्यासाठी सूचित केले. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-०९-२००७ रोजी पारित केलेल्या आदेशाप्रमाणे अपिलार्थीस दिनांक ०८-०९-२००७ रोजी त्यांना आवश्यक असलेली माहिती घेऊन जाण्याचे त्यांनी सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सदर पत्र त्यांच्या कार्यालयातील १४४२ या क्रमांकाने पाठविल्याची त्यांच्या कार्यालयातील जावक नोंदवहीची प्रत आयोगास दाखविली. यावरुन त्यांनी हे पत्र अपिलार्थीस पाठविल्याचे दिसून येत आहे. तथापि अपिलार्थीने त्यांना हे पत्र प्राप्त झाले नसल्याचे म्हटले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी जरी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत, दिनांक २२-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद दिला असला तरी हा प्रतिसाद सकारात्मक नसून त्यांनी अपिलार्थीस अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्यासाठी बराच कालावधी लागणार असल्याची कल्पना देण्याबाबतचे हे पत्र असल्याचे दिसून येते. अपिलार्थीस त्यांनी प्रथमतः त्यांच्याकडील दिनांक ०८-०९-२००७ रोजीच्या पत्रान्वये माहिती तयार असल्याचे व ती घेऊन जाण्यासाठीचे पत्र पाठविले. जन माहिती अधिकारी यांचा प्रथम सकारात्मक प्रतिसाद अपिलार्थीस अशा प्रकारे दिनांक ०८-०९-२००७ रोजी दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या अधिपत्याखालील संबंधीत मंडळ कृषि अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावयाची होती. या

प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत असलेली माहिती देण्यासाठी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने प्रतिसाद दिल्याचे येथे निःसंशयपणे दिसून येत आहे. अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहाय्यक जबाबदार आहेत असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या एकूण नऊ कामांशी संबंधीत माहिती ही संबंधीत गावाच्या पाणलोट समितीच्या अध्यक्षांकडे उपलब्ध असते, असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले. संबंधीत पाणलोट समितीचे अध्यक्ष हे सार्वजनिक प्राधिकरणाचे कर्मचारी नसून ते त्या त्या गावातील जनतेमधून निवडून दिलेल्या खाजगी व्यक्ती आहेत हे पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाणलोट समितीच्या अध्यक्षांकडून माहिती घेण्यासाठी दिलेली सूचना आयोगास योग्य वाटत नाही. ग्रामपातळीवरील पाणलोट समितीचे सचिव हे तालुका कृषि अधिकारी यांच्या नियंत्रणाखालील कृषि सहाय्यक असतात. या समितीवर तालुका कृषि अधिकारी यांचे पूर्ण नियंत्रण असल्याने व ही माहिती संबंधीत पाणलोट समितीकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी सर्वसाधारण परिस्थितीत प्रयत्न करावयास हवा होता, तथापि अशा प्रकारची कोणतीही कृती त्यांच्याकडून घडलेली नाही. आज रोजी झालेल्या सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधीत पाणलोट समितीकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस देण्याचे कबूल केले आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठीचा विहित कालावधी आता व्यपगत झाला असल्याने जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य द्यावी लागेल हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेऊन जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधीत त्यांचे सर्व सहाय्यक यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे.

सबब सचिव (कृषि) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधीत सर्व सहाय्यक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (कृषि) यांना संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ११-१२-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुग्रीव एन. विटेकर, प्लॉट नं. बी-३५/६, साईनगर, सिडको, वाळुज महानगर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (कृषि) मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १९८३, १९८४, १९८५ व १९८६**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९८३, १९८४, १९८५ व १९८६

निर्णय दिनांक १२-१२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. अंकुश एम. पवार,<br>प्लॉट नं. एफ-४१/१२, एन-७, सिडको,<br>अयोध्यानगर, औरंगाबाद | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | जन माहिती अधिकारी | जन अपिलीय अधिकारी |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक १९८३/०७<br>उप अभियंता, ल. पा. (स्थानिक स्तर),<br>उपविभाग अंबड, जिल्हा जालना | कार्यकारी अभियंता, ल. पा.<br>(स्थानिक स्तर), जालना |
| २ | अपील क्रमांक १९८४/०७<br>उप अभियंता, ल. पा. (स्थानिक स्तर),<br>उपविभाग, जालना | कार्यकारी अभियंता, ल. पा.<br>(स्थानिक स्तर), जालना |
| ३ | अपील क्रमांक १९८५/०७<br>उप अभियंता, ल. पा. (स्थानिक स्तर),<br>उपविभाग, बदनापूर, जिल्हा जालना | कार्यकारी अभियंता, ल. पा.<br>(स्थानिक स्तर), जालना |
| ४ | अपील क्रमांक १९८६/०७<br>उप अभियंता, ल. पा. (स्थानिक स्तर),<br>उपविभाग, भोकरदन, जिल्हा जालना | कार्यकारी अभियंता, ल. पा.<br>(स्थानिक स्तर), जालना |

## <u>निर्णय</u>

वरील चार प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १२-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. ब्रम्हप्रकाश | उपविभागीय अभियंता, घनसावंगी, जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, ल. पा. (स्थानिक स्तर), अंबड यांचे प्रतिनिधी |
| २ | श्री. भास्कर काशिनाथराव जाधव | जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, ल. पा. (स्थानिक स्तर), उपविभाग, जालना |
| ३ | श्री. भास्कर काशिनाथराव जाधव | जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, ल. पा. (स्थानिक स्तर), उपविभाग, बदनापूर, जिल्हा जालना |
| ४ | श्री. बालाजी जयवंतराव पांचाळ | जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, ल. पा. (स्थानिक स्तर), उपविभाग, भोकरदन, जिल्हा जालना |
| ५ | श्री. रघुनाथराव गणपतराव यादव | कार्यकारी अभियंता, ल. पा. (स्थानिक स्तर), जालना |

अपिलार्थी श्री. अंकुश एम. पवार हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-१०-२००७, ०९-१०-२००७ व १७-१०-२००७ रोजी नोंदणी झालेली चार व्दितीय अपिले आयोगाच्या विचाराधीन आहेत. या चारही अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे जास्तीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांनी कळविल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ल. पा. (स्थानिक स्तर), जालना यांच्याकडे अपील व विनंती अर्ज देऊन सुध्दा या अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा निर्णय न दिल्याने त्यांनी ही व्दितीय अपिले राज्य माहिती आयोगाकडे केल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने दिनांक १२-०६-२००७ रोजी एक अंबड येथे दिनांक ११-०६-२००७ रोजी जालना व बदनापूर येथे व दिनांक २१-०६-२००७ रोजी एक भोकरदन येथे असे एकूण चार वेगवेगळे अर्ज संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे केले होते. अपिलार्थीने या अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीमध्ये उपरोक्त सर्व जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रामधील रोजगार हमी योजनेतंर्गत झालेल्या पाझर तलावासंदर्भात माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये कामावरील मजुरांची नांवे लिहिलेले हजेरीपट, मोजमाप पुस्तिका, रोखपुस्तिका व वरिष्ठांनी पाया तपासणी केलेला अहवाल या चार मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी अंबड व जालना यांच्याकडे मागणी केलेली माहिती दिनांक ०१-०१-२००७ ते ३०-०५-२००७ या कालावधीशी संबंधीत आहे तर जन माहिती अधिकारी बदनापूर व भोकरदन यांच्याकडे मागणी केलेली माहिती ०१-०१-२००७ ते ३०-०४-२००७ या कालावधीशी संबंधीत आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी, अंबड यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १८३०५ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी, जालना यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २०-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे एकूण रुपये ४५१५ इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले, जन माहिती अधिकारी, जालना (बदनापूर) यांनी त्यांच्या दिनांक २०-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस रुपये १७५५५ इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले व जन माहिती अधिकारी, भोकरदन यांनी त्यांच्या दिनांक २५-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने मागणी केलेली माहितीपोटी रुपये ७५००० इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि वरील सर्व जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले शुल्क अपिलार्थीस मान्य नसल्याने त्यांनी या सर्व प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ल. पा. (स्थानिक स्तर), जालना यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये दिनांक २३-०७-२००७ रोजी प्रथम अपिले केली. तथापि या अपील अर्जांवर

जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी न घेण्याचे कारण जन अपिलीय अधिकारी यांना विचारले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जांवर दिनांक २६-१०-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती व अपिलार्थीस या सुनावणीची कल्पना त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ११-१०-२००७ रोजीच्या पत्रान्वये दिली होती. तथापि अपिलार्थी या दिवशी गैरहजर राहिल्याने त्यांनी सुनावणी घेतली नाही व कोणतेही आदेश पारित केले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांचा, केवळ अपिलार्थी हे गैरहजर राहिल्याने त्यांच्या अपिलावर ते सुनावणी घेऊ शकले नाहीत, हा मुद्दा आयोग अमान्य करत असून अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप व जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद पाहता अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेणे गरजेचे आहे असे आयोगास वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या विचाराधीन चारही अपिलांवर त्यांनी, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश त्यांना प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन त्यावर आपले निर्णय पारित करावेत. अपिलार्थीस हे निर्णय मान्य नसल्यास ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील क्रमांक १९८३, १९८४, १९८५ व १९८६ हे निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील क्रमांक १९८३/०७, १९८४/०७, १९८५/०७ व १९८६/०७ ही निकाली काढण्यात येत आहेत.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जांवर (अपील क्रमांक १९८३/०७, १९८४/०७, १९८५/०७ व १९८६/०७) झालेला व संभाव्य विलंब क्षमापीत करुन, या अपिलांवर हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन त्यावर आपले आदेश पारित करावेत.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १२-१२-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अंकुश एम. पवार, प्लॉट नं. एफ-४१/१२, एन-७, अयोध्यानगर, सिडको, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, ल. पा. (स्थानिक स्तर), अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, ल. पा. (स्थानिक स्तर), उपविभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, ल. पा. (स्थानिक स्तर), उपविभाग, बदनापूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, ल. पा. (स्थानिक स्तर), उपविभाग, भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ल. पा. (स्थानिक स्तर), जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १९८७, १९८८, १९८९ व १९९०**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९८७, १९८८, १९८९ व १९९०

निर्णय दिनांक १२-१२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ | सौ. कोमल एस. विटेकर,<br>प्लॉट नं. बी-३५/६, साईनगर, सिडको, वाळुज<br>महानगर, औरंगाबाद | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | जन माहिती अधिकारी | जन अपिलीय अधिकारी |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक १९८७/०७<br>जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,<br>ल. पा. (स्थानिक स्तर), उपविभाग, जालना | कार्यकारी अभियंता, ल. पा.<br>(स्थानिक स्तर), जालना |
| २ | अपील क्रमांक १९८८/०७<br>जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,<br>ल. पा. (स्थानिक स्तर), उपविभाग,<br>जाफ्राबाद, जिल्हा जालना | कार्यकारी अभियंता, ल. पा.<br>(स्थानिक स्तर), जालना |
| ३ | अपील क्रमांक १९८९/०७<br>जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,<br>ल. पा. (स्थानिक स्तर), उपविभाग,<br>घनसावंगी, जिल्हा जालना | कार्यकारी अभियंता, ल. पा.<br>(स्थानिक स्तर), जालना |
| ४ | अपील क्रमांक १९९०/०७<br>जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, ल. | कार्यकारी अभियंता, ल. पा.<br>(स्थानिक स्तर), जालना |

पा. (स्थानिक स्तर), उपविभाग अंबड, जिल्हा जालना

**निर्णय**

वरील चार प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १२-१२-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थत आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. भास्कर काशिनाथराव जाधव | जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, ल. पा. (स्थानिक स्तर), उपविभाग, जालना |
| २ | श्री. बी. जे. पांचाळ | जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, ल. पा. (स्थानिक स्तर), उपविभाग, जाफ्राबाद, जिल्हा जालना |
| ३ | श्री. ब्रम्हप्रकाश | जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, ल. पा. (स्थानिक स्तर), उपविभाग, घनसावंगी, जिल्हा जालना |
| ४ | श्री. ब्रम्हप्रकाश | उपविभागीय अभियंता, घनसावंगी, जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, ल. पा. (स्थानिक स्तर), अंबड यांचे प्रतिनिधी |
| ५ | श्री. रघुनाथराव गणपतराव यादव | कार्यकारी अभियंता, ल. पा. (स्थानिक स्तर), जालना |

अपिलार्थी सौ. कोमल एस. विटेकर या अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-१०-२००७, १७-१०-२००७ व ०९-१०-२००७ (२) रोजी नोंदणी झालेली चार व्दितीय अपिले आयोगाच्या विचाराधीन आहेत. या चारही अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना पुरविण्यात येणा-या माहितीपोटीचे शुल्क जास्त वाटल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील अर्ज व तदनंतर विनंती अर्ज देऊन देखील जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी कोणताच निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन व्दितीय अपिले आयोगाकडे सादर केली

आहेत. त्यांच्या या विनंतीबरोबर त्यानी प्रत्येक अपिलामध्ये त्या त्या अपिलाशी संबंधीत मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने वरील चारही जन माहिती अधिका-याकडे दिनांक ११-०६-२००७, २२-०६-२००७ १२-०६-२००७ रोजी (दोन) असे चार वेगवेगळे माहितीसाठीचे अर्ज केले होते. अपिलार्थीने या चारही अर्जांमध्ये संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रामधील रोजगार हमी योजना कामासंदर्भात दिनांक ०१-०१-२००७ ते ३०-०५-२००७ व ०१-०१-२००७ ते ३०-०४-२००७ या कालावधीशी संबंधीत माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये संबंधीत पाझर तलावाच्या कामावरील मजुरांची नांवे लिहिलेले हजेरीपट, मोजमाप पुस्तिका, रोखपुस्तिका व वरिष्ठांनी पाया तपासणी केलेला अहवाल या चार मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी, जालना यांनी दिनांक २०-०६-२००७ रोजी, जन माहिती अधिकारी, भोकरदन यांनी दिनांक ०५-०७-२००७ रोजी, जन माहिती अधिकारी, घनसावंगी यांनी दिनांक १८-०६-२००७ रोजी व जन माहिती अधिकारी, अंबड यांनी दिनांक २१-०६-२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क अनुक्रमे रुपये ६६२७५, रुपये ७५०००, रुपये २१००० व रुपये १९२७० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि वरील सर्व जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले शुल्क अपिलार्थीस मान्य नसल्याने त्यांनी या सर्व प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ल. पा. (स्थानिक स्तर), जालना यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये दिनांक २३-०७-२००७ रोजी प्रथम अपिले केली.

जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (स्थानिक स्तर) उपविभाग, अंबड यांच्यासंदर्भात त्यांच्या कार्यालयात दिनांक ३०-११-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि सदर सुनावणीसाठी अपिलार्थी हे गैरहजर राहिले असल्याने त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०४-०१-२००८ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी आवश्यक त्या

शुल्काचा भरणा न केल्याने त्यांना माहिती देता आली नसल्याचे कळविले व त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क भरुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती हस्तगत करण्याचे सूचित केले. उर्वरित तीनही प्रकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीशी त्यांच्या अपील अर्जासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार केल्याचे अथवा यासंदर्भात सुनावणी ठेवल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. उपरोक्त सर्व प्रकरणांमध्ये (अपील क्रमांक १९९०/०७ वगळता) जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे अभिप्रेत असलेली कारवाई पार पाडली नसल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमामध्ये कलम १९ (१) प्रमाणे प्रथम अपिलावर सुनावणी होणे हा या संपूर्ण प्रक्रियेमध्ये एक महत्वाचा टप्पा आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतांना अपिलार्थी व जन माहिती अधिकारी या दोघांनाही एकत्रित बोलावून, त्यांचे म्हणणे नोंदवून घेऊन, त्यावर आपला ठोस निर्णय पारित करणे हे या प्रक्रियेमध्ये अभिप्रेत आहे, तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी आपली जबाबदारी पार पाडली नसल्याचे दिसून येते तर जन माहिती अधिकारी, अंबड उपविभागाच्या प्रकरणात केवळ अपिलार्थी गैरहजर होते म्हणून अपिलार्थीस उपविभागाकडून माहिती प्राप्त करुन घेण्याचे कळविले, हा निर्णय देतांना त्यांनी जन माहिती अधिकारी, अंबड यांचे म्हणणे लक्षात घेतले नसल्याचे तसेच जन माहिती अधिकारी, अंबड यांनी कळविलेल्या शुल्काची शहानिशा केली नसल्याचे दिसून येते. उर्वरित तीनही अपिलासंदर्भात त्यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही. या सर्व बाबी पाहिल्या असता, उपरोक्त चारही अपील प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २३-०७-२००७ रोजीच्या चारही प्रथम अपील अर्जावर निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे दाखल केलेल्या दिनांक २३-०७-२००७ रोजीच्या उपरोक्त चारही प्रथम अपील अर्जावर झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन त्यावर आपले निर्णय पारित करावेत. अपील सुनावणीसाठी बोलवितांना अपिलार्थी व संबंधीत जन माहिती अधिकारी यांना त्यांनी किमान १०

दिवस अगोदर सुनावणीसाठी उपस्थित राहण्याच्या सूचना प्राप्त होईल असे पहावे. अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांचे निर्णय मान्य नसल्यास ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील क्रमांक १९८७, १९८८, १९८९ व १९९० हे निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्रमांक १९८७/०७, १९८८/०७, १९८९/०७ व १९९०/०७ ही निकाली काढण्यात येत आहेत.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २३-०७-२००७ रोजीच्या चार (अपील क्रमांक १९८७/०७, १९८८/०७, १९८९/०७ व १९९०/०७) प्रथम अपील अर्जांवर झालेला व संभाव्य विलंब क्षमापीत करुन, या अपिलांवर हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १२-१२-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ सौ. कोमल एस. विटेकर, प्लॉट नं. बी-३५/६, साईनगर, सिडको, वाळुज महानगर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, ल. पा. (स्थानिक स्तर), उपविभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, ल. पा. (स्थानिक स्तर), उपविभाग,

जाफ्राबाद, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, ल. पा. (स्थानिक स्तर), उपविभाग, घनसावंगी, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, ल. पा. (स्थानिक स्तर), उपविभाग अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ल. पा. (स्थानिक स्तर), जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्र.१९९१,१९९२,१९९३,१९९४,१९९५,१९९६,१९९७,१९९८,१९९९/२००७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/
१९९१,१९९२,१९९३,१९९४,१९९५,१९९६,१९९७,
१९९८ व १९९९
निर्णय दिनांक १५-१२-२००८

१ श्री. नागराज चांदबा गायकवाड, रा.औरंगाबाद : अपिलार्थी

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | **जन माहिती अधिकारी तथा** | **जन अपिलीय अधिकारी तथा :** | प्रतिवादी |
| १ | प्राचार्य, डी.एड.कॉलेज (डि.आर.पी.)औरंगाबाद | सचिव, डी.एड.कॉलेज (डि.आर.पी.)औरंगाबाद | |
| २ | प्राचार्य, अमरज्योती डी.एड,कॉलेज,औरंगाबाद | सचिव, अमरज्योती डी.एड,कॉलेज,औरंगाबाद | |
| ३ | प्राचार्य, शिशु विकास अध्यापक विद्यालय, औरंगाबाद | सचिव, शिशु विकास अध्यापक विद्यालय, औरंगाबाद | |
| ४ | प्राचार्य, न्यु अझीम ऊर्दू डी.एड.कॉलेज फातिमा गर्ल्स् हायस्कुल,औरंगाबाद | सचिव, न्यु अझीम ऊर्दू डी.एड.कॉलेज फातिमा गर्ल्स् हायस्कुल,औरंगाबाद | |
| ५ | प्राचार्य, मॉडेल,अध्यापक विद्यालय (इंग्रजी माध्यम),औरंगाबाद | सचिव, मॉडेल,अध्यापक विद्यालय (इंग्रजी माध्यम),औरंगाबाद | |
| ६ | प्राचार्य,संत गाडगे महाराज अध्यापक विद्यालय,औरंगाबाद | सचिव,संत गाडगे महाराज अध्यापक विद्यालय,औरंगाबाद | |
| ७ | प्राचार्य,सावित्रीबाई फुले अध्यापक विद्यालय,औरंगाबाद | सचिव,सावित्रीबाई फुले अध्यापक विद्यालय,औरंगाबाद | |
| ८ | प्राचार्य,अलाना ऊर्दू डि.एड.कॉलेज, कुंजखेडा,ता.कन्नड | सचिव,अलाना ऊर्दू डि.एड.कॉलेज, कुंजखेडा,ता.कन्नड | |

| | | |
|---|---|---|
| ९ | प्राचार्य,हाजी जान मोहंमद मोतीवाला इकरा ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन द्वारा इरफान रेसीडेन्शीयल स्कुल,सुलीभंजन,खुलताबाद जि.औरंगाबाद. | सचिव,हाजी जान मोहंमद मोतीवाला इकरा ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन द्वारा इरफान रेसीडेन्शीयल स्कुल,सुलीभंजन,खुलताबाद जि.औरंगाबाद. |

## निर्णय

वरील नऊ प्रकरणांची सुनावणी आज दिनांक १५.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी हे उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सोबतच्या यादीप्रमाणे उपस्थित आहेत.

आज रोजी अपिलार्थी यांची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.०२.२००७ रोजी दाखल झालेली नऊ द्वितीय अपिले आयोगाच्या विचाराधीन आहेत.

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या या सर्व अपील अर्जांमध्ये त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता शासकीय माहिती अधिकारी यांच्याकडून योग्य व न्याय्य निवाडा झाला नाही, त्यांनी मागणी केलेली माहिती व्यापक जनहिताशी संबंधित आहे,ही बाब संबंधित जन माहिती अधिकारी यांनी विचारात घेतली नाही. त्यांनी मागणी केलेल्या माहितीने अधिनियमातील कलम ८(१) मधील तरतुदीचा भंग होत नसल्याने ही माहिती त्यांना देय ठरते. तसेच या सर्व संस्थांवर महाराष्ट्र शासनाचा अंकुश असल्याने त्य संस्था जरी खाजगी विनाअनुदानित असल्यातरी त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी लागू होत आहेत, त्यामुळे संबंधित संस्थाचालकांना या कायद्याबाबत उदासिनता त्यांची माहिती अधिकाराचे प्रती आहे, असे नमूद करुन आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम

ठेवली आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जामध्ये त्यांना एकूण २७ मुद्यांवरील माहिती अपेक्षित असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या नऊ प्रकरणात प्रथमतः त्यांच्या दि. २४.८.२००६, २५.८.२००६ व ५.९.२००६ रोजीच्या प्रथम वेगवेगळया अर्जाद्वारे जन माहिती आकिारी यांच्याकडून त्यांच्या संस्थेसंदर्भात शैक्षणिक वर्ष २००५-२००६ या कालावधीशी संबंधित माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास प्राचार्य, डी.आर.पी.ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन,औरंगाबाद यांनी दि. ६.९.२००६ रोजीच्या पत्राद्वारे, प्राचार्य अमरज्योती डी.एड कॉलेज,औरंगाबाद यांनी दि. २३.९.२००६ रोजीच्या पत्राद्वारे प्राचार्य मॉडेल अध्यापक विद्यालय,(इंग्रजी माध्यम)औरंगाबाद यांनी दि. २.९.२००६ रोजीच्या पत्राद्वारे, संत गाडगे महाराज कॉलेज ऑफ एज्युकेशन,औरंगाबाद यांनी दि. २०.९.२००६ रोजीच्या पत्राद्वारे, प्राचार्य, सावित्रीबाई फुले अध्यापक विद्यालय,औरंगाबाद यांनी दि. २०.९.२००६ रोजीच्या पत्राद्वारे प्राचार्य, अलाना ऊर्दू डी.एड,कॉलेज, कुंजखेडा,कन्नड यांनी दि. २२.९.२००६ रोजीच्या पत्राद्वारे व प्राचार्य, हाजी जान मोहम्मद मोतीवाला, एकरा ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन ता.खुलताबाद जि.औरंगाबाद यांनी त्यांच्या दि. ८.९.२००६ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद दिला यातील प्राचार्य मॉडेल अध्यापक, औरंगाबाद वगळता उर्वरित सर्व प्राचार्यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी त्यांच्या संस्थेस अथवा शाळेस लागू होत नसल्याने, त्यांच्या संस्था विनाअनुदानित असल्याने, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी नाकारली. प्राचार्य, मॉडेल अध्यापक विद्यालय यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती तयार करण्याची कार्यवाही चालू असून ती पूर्ण होताच पाठविण्यात येईल, असे कळवून अपिलार्थीस माहिती देण्याचे आश्वासित केले. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार

अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये दि. ४.११.२००६ रोजी संस्थेच्या सचिवांकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर एकाही जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी ठेवून अपिलार्थीच्या अर्जासंदर्भात निर्णय दिल्याचे आढळून येत नाही. मात्र राजाराम सांस्कृतिक क्रीडा मंडळ,संत गाडगे महाराज अध्यापक विद्यालय,औरंगाबाद व सावित्रीबाई फुले अध्यापक विद्यालय,औरंगाबाद या संस्थेच्या सचिवांनी अपिलार्थीस दि. २१.११.२००६ रोजी पत्र पाठवून त्यामध्ये अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देणे त्यांना बंधनकारक नसल्याचे कळविले. थोडक्यात अपिलार्थीचे अपील त्यांनी फेटाळून लावले. तर सर्व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने काही प्रकरणी त्यांनी दिलेल्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने वेगवेगळी नऊ द्वितीय अपिले सादर केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने संबंधित प्राचार्यांकडे माहिती मागवून ते दारिद्रय रेषेखालील व्यक्ति असल्याचे नमूद केले होते, तथापि या संदर्भात कोणताही ठोस पुरावा त्यांच्या अर्जासोबत जोडण्यात आला नाही. अपिलार्थीने अशाचप्रकारची माहिती मराठवाडा क्षेत्रातील वेगवेगळया महाविद्यालयाकडून यापूर्वी मागितली होती, त्यासंबंधीच्या द्वितीय अपिलाच्या सुनावणीचे वेळी अपिलार्थीच्या, ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याच्या प्रकरणाबाबत प्रश्न निर्माण झाला होता, आज रोजीही अपिलार्थीस त्यांच्याकडे ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याबाबतचे वैध प्रमाणपत्राबाबत विचारणा केली असता, सदर प्रमाणपत्र त्यांना येत्या १ ते २ दिवसात औरंगाबाद महानगरपालिकेकडून मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले, त्यामुळे आज रोजी अपिलार्थीचे ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचा मुद्दा आयोग मान्य करीत नाही.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना सर्व जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी मूळ अर्जाद्वारे

मागणी केलेली माहिती अपेक्षित आहे.तसेच  त्यांनी द्वितीय अपील अर्जामध्ये दिलेल्या अभिप्रायांची त्यांनी पुनरुक्ती केली.

सर्व जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे सर्वसाधारणपणे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी हे त्यांच्या सर्व संस्थांकडून अशाप्रकारची मोठी व्याप्ती असलेल्या माहितीची वारंवार मागणी करीत असतात. अशाप्रकारच्या माहितीची मागणी करण्यामध्ये कोणतेही व्यापक जनहित त्यांना साध्य करण्याचा त्यांचा उद्देश नसून केवळ संस्थेला त्रास देणे व त्यातून काही आर्थिक फायदे मिळवून घेण्याचा त्यांचा प्रयत्न असून तसेच त्यांच्या सर्व संस्था ग्रामीण विभागात, विनाअनुदानित असल्याने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी त्यांच्या संस्थेला लागू होत नाही. जर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस द्यावयाची म्हटले तर त्यांच्याकडे अशाप्रकारचे अनेक अर्जदारांचे अर्ज प्राप्त होण्याची शक्यता नाकारता येणार नाही व त्यांना माहिती पुरविण्यास त्यांच्या संस्थेचे नियमित कामकाज करणे अत्यंत कठीण होईल व हे माहिती अधिकार म्हणजे फार मोठे व अनपेक्षितपणे उद्‌भवणाऱ्या संकटाचे (Pandoras box)उगमस्थान होईल.

अपिलार्थीने याबाबत अशाप्रकारची माहिती प्राचार्य डॉ. झाकीर हुसेन अध्यापक विद्यालय,म्हैसमाळ रोड, खुलताबाद यांच्याकडे मागितली होती व ही माहिती अपिलार्थीस संबंधित प्राचार्यांने देण्याचे नाकारल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले होते. त्यांनी द्वितीय अपील आयोगाने दि. १८.९.२००७ रोजी निर्णय देऊन त्यामध्ये संबंधित संस्थेवर माहिती अधिकार अधिनियमाच्या कार्यकक्षेत कशाप्रकारे येतात याच्या वस्तुस्थितीचे विवरण केले आहे. हा निर्णय देताना राज्य माहिती आयोगाने शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत विचारात घेतले होते. विचाराधीन प्रकरणी अशाचप्रकारच्या अपील असल्याने अपील क्र.२५०/दि.१८.९.२००७ रोजीच्या प्रकरणात आयागाने दिलेला निणृय या प्रकरणी तंतोतं लागू होत आहे. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाने त्यांना आवश्यक

असलेल्या एकूण २७ मुद्यांवर माहिती आवश्यक असल्याचे नमूद केले आहे व हे सर्व २७ मुद्दे त्यांनी आपल्या द्वितीय अपील अर्जामध्ये जोडले आहेत.

आयोगास असेही आढळून आले आहे की, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करताना त्यांची मूळ माहितीची व्याप्ती वाढवून जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे वेगवेगळया वाढीव माहितीची मागणी केली आहे. अपिलार्थी यांची अशाप्रकारची कृती चुकीची आहे. त्यामुळे अपिलार्थीने राज्य माहती आयोगाकडे त्यांच्या द्वितीय अपिलामध्ये निर्देशित केलेल्या फक्त २७ मुद्दे आयोग विचारात घेत आहे. या २७ मुद्यांचे अवलोकन केले असता त्यांनी मुद्दा क्र.८,१७,१९ व २३ हे मुद्दे माहिती अधिकार अधिनियमातील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मध्ये माहिती या शब्दाची व्याख्या पुरेशा प्रमाणात स्पष्ट केली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने माहिती मागणे व जन माहिती अधिकारी ते अर्जदारास देणे या या संपूर्ण प्रक्रियेमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या निर्णयाबद्दल अथवा कोणत्याही कृतीबद्दल कारणे, खुलासे व स्पष्टीकरण मागणी अभिप्रेत नाही. माहिती देण्याच्या प्रक्रियेमध्ये केलेली माहिती ज्या स्वरुपात त्यांच्याकडे उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती अपिलार्थीस देण अशाप्रकारची प्रक्रिया अभिप्रेत आहे, हे पाहता, अपिलार्थीने या मुद्याद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दल कारणे विचारली आहेत. ती माहिती, सदर विवेचन पाहता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय ठरत नाही. अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जातील मुद्दा क्र.१५द्वारे संस्थेकडील कार्यरत शिक्षकांचे बँक खाते क्रमांक व शैक्षणिक वर्ष २००५-२००६ चे बँक विवरणाच्या प्रती मागितल्या आहेत. आयोगाच्या मते सदर माहिती पूर्णतः संबंधित शिक्षकांच्या खाजगी बाबीत आगंतुकपणे हस्तक्षेप होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. थोडक्यात ही माहिती अपिलार्थीस दिल्याने अधिनियमातील कलम ८ (ञ) चा भंग होईल,

असे आयोगास वाटते. बाकी उर्वरित २२ मुद्यांवरील माहिती संबंधित शैक्षणिक संस्था सार्वजकि प्राधिकरण ठरत असल्याने संबंधित संस्थेच्या प्राचार्यांना अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीनुसार देणे भाग आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करताना ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचा पुरावा सोबत जोडला नाही. आज रोजी सुनावणीच्या वेळी देखील सदर प्रमाणपत्र त्यांच्याकडे उपलब्ध नाही, हे पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती सशुल्क प्राप्त करुन घ्यावी लागणार आहे. अपिलार्थीने मागणी केल्या माहितीची व्याप्ती पाहता अपिलार्थीस माहिती देण्यास तीस दिवसांच्या कालावधी पुरेसा होईल, असे आयोगास वाटते. सबब उपरोक्त नऊ प्रकरणातील सर्व प्राचार्यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या त्यांच्या द्वितीय अपील अर्जातील मुद्दा क्र.८,१५,१७,१९ व २३ हे पाच मुद्दे वगळता उर्वरित २२ मुद्यांवरील माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत सशुल्क (एकूण पृष्ठ संख्या व प्रतिपृष्ठ दर याबाबतच्या हिशोबासह) उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यासाठी निश्चित शुल्काची रक्कम कळवून त्यांना देण्यात येणाऱ्या माहितीच्या पृष्ठांची संख्या व माहितीच्या पृष्ठांचा दर याचा उल्लेख संबंधित प्राचार्यांनी या पत्रामध्ये करणे अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना अनिवार्य असेल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील क्र. १९९१,१९९२,१९९३,१९९४,१९९५,१९९६,१९९७,१९९८ व १९९९/२००७ निकाली येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील क्र. १९९१,१९९२,१९९३,१९९४,१९९५,१९९६,१९९७,१९९८ व १९९९/२००७ निकाली काढण्यात येत आहे.

२) उपरोक्त प्रकरणातील सर्व प्राचार्यांनी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जातील मुद्दा क्र.८,१५,१७,१९ व २३ हे पाच मुद्दे वगळता उर्वरित २२ मुद्यांवरील संपूर्ण माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत सशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १५-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नागराज चांदबा गायकवाड, न्यू पहाडसिंगपूरा, लेणी रोड, घर नं.१/६/९९, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, डी.एड.कॉलेज (डि.आर.पी.)औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, अमरज्योती डी.एड,कॉलेज,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, शिशु विकास अध्यापक विद्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, न्यु अझीम ऊर्दू डी.एड.कॉलेज फातिमा गर्ल्स् हायस्कुल,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, मॉडेल,अध्यापक विद्यालय (इंग्रजी माध्यम),औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,संत गाडगे महाराज अध्यापक विद्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,सावित्रीबाई फुले अध्यापक विद्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

९. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,अलाना ऊर्दू डि.एड.कॉलेज, कुंजखेडा,ता.कन्नड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१०. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,हाजी जान मोहंमद मोतीवाला इकरा ज्युनिअर कॉलेज

ऑफ एज्युकेशन द्वारा अल इरुान रेसीडेन्शीयल स्कुल,सुलीभंजन,खुलताबाद जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

११. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

१२. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, अमरज्योती डी.एड,कॉलेज,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

१३. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, शिशु विकास अध्यापक विद्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

१४. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, न्यु अझीम ऊर्दू डी.एड.कॉलेज फातिमा गर्ल्स् हायस्कुल,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

१५. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, मॉडेल,अध्यापक विद्यालय (इंग्रजी माध्यम),औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

१६. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव,संत गाडगे महाराज अध्यापक विद्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

१७. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव,सावित्रीबाई फुले अध्यापक विद्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

१८. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव,अलाना ऊर्दू डि.एड.कॉलेज, कुंजखेडा,ता.कन्नड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

१९. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, अमरज्योती डी.एड,कॉलेज,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

२० निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त यांचेकडे दिनांक १५-१२-२००८ रोजी सुनावणीशी संबंधित उपस्थित (९) प्रकरणाशी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यादी

| अ.क्र. | अपिल क्रमांक | जन माहिती अधिकारी यांचे पदनाम (* उपस्थित जन माहिती अधिकारी) | जन अपिलीय अधिकारी यांचे पदनाम (* उपस्थित जन अपिलीय अधिकारी) | |
|---|---|---|---|---|
| ०१ | १९९१/ २००७ | | | अनुपस्थित |
| ०२ | १९९२/ २००७ | | | अनुपस्थित |
| ०३ | १९९३/ २००७ | सौ.मिनाकुमारी व्ही.श्रीसुंदर, प्राचार्या, शिशु विकास अध्यापक विद्यालय, औरंगाबाद | श्री विजय सी.श्रीसुंदर शिशु विकास अध्यापक विद्यालय, औरंगाबाद | * |
| ०४ | १९९४/ २००७ | सौ. सिद्दीकी मेहजबीन, प्राचार्या न्यु अझीम ऊर्दू डी.एड.कॉलेज फातिमा गर्ल्स् हायस्कुल,औरंगाबाद | डॉ.एम.ए.अजीज,अध्यक्ष, न्यु अझीम ऊर्दू डी.एड.कॉलेज फातिमा गर्ल्स् हायस्कुल,औरंगाबाद | * |
| ०५ | १९९५/ २००७ | श्री. ए.एन.काकडे, ॲडव्होकेट मॉडेल,अध्यापक विद्यालय (इंग्रजी माध्यम),औरंगाबाद | श्री. ए.एन.काकडे, ॲडव्होकेटमॉडेल,अध्यापक विद्यालय (इंग्रजी माध्यम),औरंगाबाद | * |
| ०६ | १९९६/ २००७ | सौ. टी.ए.पांडे,प्राचार्य संत गाडगे महाराज अध्यापक विद्यालय,औरंगाबाद | सचिव, राजाराम सांस्कृतिक क्रीडा मंडळ,सिडको,एन-६,औरंगाबाद | * |
| ०७ | १९९७/ २००७ | श्री. सय्यद नईम, प्राचार्य, सावित्रीबाई फुले अध्यापक विद्यालय,औरंगाबाद | सचिव, राजाराम सांस्कृतिक क्रीडा मंडळ,सिडको,एन-६,औरंगाबाद | * |
| ०८ | १९९८/ २००७ | सय्यद अख्तर हुसैन अ.प्राचार्य, अलाना ऊर्दू डि.एड.कॉलेज, कुंजखेडा,ता.कन्नड | शेख मुख्तार शेख सत्तार प्रतिनिधी अलाना ऊर्दू डि.एड.कॉलेज, कुंजखेडा,ता.कन्नड | * |
| ०९ | १९९९/ २००७ | खान नईम खान अ.रहिम खान,प्राचार्य, हाजी जान मोहंमद मोतीवाला इकरा ज्युनिअर कॉलेज | श्री.गुलाम रहमनी, सचिव, हाजी जान मोहंमद मोतीवाला इकरा ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन | * |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ऑफ एज्युकेशन<br>द्वारा इरफान रेसीडेन्शीयल<br>स्कुल,सुलीभंजन,खुलताबाद<br>जि.औरंगाबाद. | द्वारा इरफान रेसीडेन्शीयल<br>स्कुल,सुलीभंजन,खुलताबाद<br>जि.औरंगाबाद. |

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२११८
निर्णय दिनांक १६-१२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. बिपीन राजाराम थोरात,<br>रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>निवासी उपजिल्हाधिकारी,औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी,औरंगाबाद | | |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: महसूल सहायक,
जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी: निवासी उपजिल्हाधिकारी,औरंगाबाद

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी ,जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०.११.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील करण्याची कारणे,- मुद्दा सोडून दिशाभूल करणे व चुकीचा निर्णय-अशी दर्शविली आहेत. या अर्जामध्ये त्यांनी माहितीचा तपशील या मुद्यापुढे - "धारकाकडून ६ वर्षीय राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र (N.S.C.)

परवान्याकरिता व 'नुतनीकरणासाठी जमा करण्यात आलेल्या N.S.C.ची माहिती देणे" -असे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्या दि. ६.७.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९८८ पासून त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल केलेल्या ६ वर्षीय राष्ट्रीय बचत प्रमाणपत्राच्या नकलेची मागणी केली होती. अपिलार्थीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ९.७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अर्जामध्ये संदर्भित केलेले राष्ट्रीय बचत पत्र त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे कळविले. या पत्रामध्ये त्यांनी मूळात अपिलार्थीने सदरची प्रमाणपत्र त्यांच्या कार्यालयात दाखल केले होते किंवा कसे, याबाबतचा पुरावा व इतर संबंधित माहिती सादर करण्याचे अपिलार्थीस कळविले होते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १०.९.२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांना दि. १८.९.२००७ रोजी प्राप्त झाला. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ६.१०.२००७ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दि.९.१०.२००७ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील मंजूर केले आहे. या आदेशामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी असे म्हटले आहे की, अपिलार्थीने त्यांच्या विचाराधीन अर्जात नमुद केलेली बचत प्रमाणपत्रे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असल्यास त्यांची नक्कल त्यांनी अपिलार्थीस द्यावी व ती उपलब्ध नसल्यास तसे अपिलार्थीस सविस्तरपणे कळवावे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, सन १९८८ साली वर्षी महसूल विभागाच्या करमणूककर  शाखेच्या अधिकाऱ्यांनी त्यांना रु.५०००/- इतक्या किंमतीचे राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे घेण्यासाठी भाग पाडले. सदर प्रमाणपत्रे घेतल्याशिवाय त्यांना त्यांच्या व्हिडीओ पार्लरचा परवाना मिळणार नव्हता व तसे महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्यांना तोंडी सांगितले होते. त्यांच्या मते त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात विना कार्यवाही तशीच आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. ६.७.२००७ रोजीच्या अर्जास त्यांनी दि. ९.७.२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीस कळविले आहे व ती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने त्यांनी अपिलार्थीकडे सदरची प्रमाणपत्रे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दाखल केल्याबाबतचा पुरावा व त्यास अनुषंगिक माहिती मागितली होती. तथापि सदर पुरावा अपिलार्थी यांच्याकडे अद्यापही अप्राप्त आहे. अपिलार्थीस राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे देण्याच्या दृष्टीने या संदर्भात पोस्टमास्तर,फाजलपूरा कार्यालय,औरंगाबाद यांना दि.३१.७.२००७ रोजी पत्र पाठवून याबाबत माहिती मागितली होती. सदर पत्रामध्ये त्यांनी, "श्री. बिपीन राजाराम थोरात यांचे राष्ट्रीय किसान विकास पत्र क्र.६ एनएस एफ ८-७६८९८४,दि.२१ मार्च १९८८ रुपये ५०००/- चे राष्ट्रीय किसान विकास पत्र वटविले किंवा कसे, वटविले असल्यास कोणत्या तारखेला वटविण्याल आले. सदरील बचत पत्र कोणत्या व्यक्तीने वटविले, वटविण्याच्या वेळी साक्षीदार म्हणून कोणची सही व नाव आहे, तसेच वटविताना संबंधिताची स्वाक्षरीची खात्री केली होती काय याबाबतचा अहवाल सादर करावा.", असे नमूद केले होते. तथापि ावर संबंधित पोस्टमास्तरने त्यांना काहीही कळविले नाही.

आज रोजी अपिलार्थीने मागणी केलेली त्यांचे राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूनी केलेला युक्तिवाद पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे कथित प्रमाणपत्र सादर केल्याचा कोणताही पुरावा जन माहिती अधिक्‍ारी अथवा राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेला नाही. मात्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविण्याच्या दृष्टीने फाजलपूरा पोस्ट कार्यालयाशी दि. ३१.७.२००७ रोजीच्या पत्रान्वये व दि. १८.९.२००७ रोजीच्या स्मरणपत्रान्वये दोन वेळा संपर्क साधल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्याकडे चौकशी केली असता, त्यांनी अपिलार्थीने संदर्भित केलेल्या राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे ही अपिलार्थी यांच्या नावाने काढलेली असून व सर्वसाधारण परिस्थितीत राष्ट्रीय बचत योजनेला प्रोत्साहन मिळावे म्हणून संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सदर प्रमाणपत्र खरेदी करण्याच्या सूचना केल्या असाव्यात, असे अनुमान निघत आहेत. सदर बचत प्रमाणपत्रे अपिलार्थीच्या नावाने असल्याने ही प्रमाणपत्रे अपिलार्थी यांच्याकडेच उपलब्ध असावयास हवी. तथापि अपिलार्थी यांचे म्हणण्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संदर्भिय प्रमाणपत्रासंदर्भात पोस्टमास्तर, फाजलपूरा पोस्ट ऑफीस यांच्याशी परत संपर्क साधून अपिलार्थीच्या मूळ राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रांच्या सद्यस्थितीची माहिती प्राप्त करुन घ्यावी व त्याचबरोबर जर राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र कोणत्याही व्यक्तीकडून गहाळ झाली असल्यास, अशाप्रकरणी करावयाच्या पुढील कार्यवाहीचीही माहिती त्यांनी पोस्टमास्तर यांच्याकडून उपलब्ध करुन घ्यावी व त्याबाबतची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येते.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी पोस्टमास्तर, फाजलपूरा यांच्याशी संपर्क साधून अपिलार्थीच्या राष्ट्रीय बचत प्रमाणपत्राची सद्यस्थितीची माहिती घ्यावी व ती गहाळ झाली असल्यास, अशाप्रकरणी करावयाच्या कार्यवाहीची सविस्तर माहिती घेऊन ती अपिलार्थीस विनामूल्य व हे आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १६-१२-२००८** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बिपीन राजाराम थोरात, १५-ब, सरस्वती कॉलनी, औरंगपूरा, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा महसूल सहायक, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३२१
निर्णय दिनांक १६-१२-२००८

१ श्री. जगनराव बाबूराव चोरगे, : अपिलार्थी
रा. वाळुज औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,
औरंगाबाद जि.औरंगाबाद
२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,
अंधेरी, मुंबई.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.०७.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये, अपिलार्थी यांनी त्यांना अर्धवट,चुकीची व दिशाभूल करणारी माहिती पाच दिवसांच्या विलंबाने दिल्याचे नमूद केले असून जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी जन अपिलीय

अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीन्वये दि. २७.४.२००७ रोजी प्रथम अपील केले असता त्यांनी या अपिलासंदर्भात त्यांच्या कार्यालयाने दि. २३.५.२००७ रोजी प्रथमतः सुनावणी ठेवली परंतु सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी हे त्यांच्या कार्यालयात उपस्थित नव्हते व त्यांनी दूरध्वनीवरुन त्यांच्या स्वीय सहायकाला रोजनामा तयार करण्यासाठी सूचित केले., जन अपिलीय अधिकारी यांच्या स्वीय सहायक यांनी ते सुनावणीसाठी उपस्थित राहिल्याबद्दलचे प्रमाणपत्र त्यांना देण्यास नकार दिला, तसेच त्यांना जन अपिलीय अधिकारी यांचे पत्र विलंबाने प्राप्त झाले त्यावरुन जन अपिलीय अधिकारी हे त्यांना हेतुपूरस्सर त्रास देण्याची कृती करीत आहेत, त्यामुळे जन माहिती व अपिलीय अधिकारी या दोघांवरही अधिनियमातील तरतुदीप्रमाणे योग्य ती कारवाई करावी. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही आजतागायत जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची माहिती पुरविली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर कोणतीही दंडात्मक अथवा शिस्तभंगाची कारवाई केलेली नाही. त्यांनी जन माहिती अधिकारी यांना पाठीशी घातले, या सर्व प्रकारामध्ये जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे योग्य ती कारवाई करावी, अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी त्यांच्या दि. २७.२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण १६ मुद्यांद्वारे जयंती केमिकल्स, प्लॉट नं. सी-९९ शी संबंधित दि. १.७.२००१ ते जन माहिती अधिकारी यांनी उत्तर देईपर्यंतच्या कालावधीपर्यंतची माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३.४.२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस पुरविली, तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दि.

२७.४.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २३.५.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भात आपले दि. १३.६.२००७ व २५.६.२००७ रोजी दोन वेगवेगळे निर्णय दिलेले आहेत. यातील दि. १३.६.२००७ रोजीच्या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकाऱ्यास अपिलार्थीस नेमकी व मुद्देसूद माहिती देण्याचे सूचित केले, तर दि. २५.६.२००७ रोजीच्या निर्णयाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढल्याचे नमूद केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना वेळेत माहिती पुरविली नाही, जी माहिती पुरविली ती चुकीची पुरविली असल्याने त्यांच्यावर शिक्षेची कार्यवाही व्हावी. जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना आता पुन्हा नव्याने माहिती प्राप्त झाली आहे. तथापि या माहितीचे त्यांना अवलोकन करता न आल्यामुळे त्यांना ही माहिती सत्य आहे किंवा कसे हे सांगता येणार नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. २७.२.२००७ रोजीच्या मूळ अर्जास त्यांनी दि. ३.४.२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन संपूर्ण माहिती दिलेली आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. १३.६.२००७ रोजीच्या आदेशासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना विचारणा केली असता, त्यांनी असे सांगितले की,या आदेशामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना अपिलार्थीस बऱ्याच मुद्यावर माहिती देण्याचे सूचित केले होते. त्यांनी दि.३.४.२००७ रोजी दिलेली माहिती कशी योग्य आहे, याची जन अपिलीय अधिकारी यांना खात्री पटवून दिल्यानंतर त्यांनी माहितीचे अवलोकन करुन दि. २५.६.२००७ रोजीच्या निर्णयाद्वारे अपिलार्थीचे अपील निकाली काढले.

अपिलार्थीच्या त्यांना प्राप्त झालेल्या मुद्यांचे निरसन करुन त्यांनी अपिलार्थीस दि. २५.७.२००७ रोजी पुनश्च् माहिती दिली आहे. या दि. ३.४.२००७ रोजी अपिलार्थीस पुरविलेली माहिती प्रश्नोत्तराच्या स्वरुपात होती. त्यांनी दि. २५.५.२००७ रोजी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधित कागदपत्रांच्या प्रतीच्या स्वरुपात त्यांना पुरविली आहे, त्यामुळे अपिलार्थीस आता माहिती देण्याचे काहीही शिल्लक राहिलेले नाही. अपिलार्थीने या माहितीसंदर्भात त्यांच्याकडे दि. १२.७.२००७ रोजी अभिलेखे तपासणीसाठी अर्ज दिला होता, त्यानुसार दि. २०.७.२००७ रोजी संबंधित अभिलेखे उपलब्ध करुन दिलेले आहेत. आयोगाच्या सूचनेवरुन अपिलार्थीस दि. २७.८.२००८ रोजी परत हीच माहिती दिली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २७.२.२००७ रोजीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे १६ मुद्याद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांना मुद्दा क्र.b,g,j,k अंशत:व l या ५ मुद्यांद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना देय होत नाही. कारण अपिलार्थीने या मुद्यांद्वारे जन माहिती अधिकारी यांचे स्पष्टीकरण व अभिप्राय अपेक्षिले आहेत. जे अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाहीत. उर्वरित काही मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे काही प्रमाणात प्रश्न स्वरुपात जरी माहिती विचारली असली तरी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या कागदपत्रांमध्ये उपलब्ध आहे, अशा कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि.३.४.२००७ रोजीच्या पत्राद्वारे पुरविली नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणाही अर्जदारास माहिती अधिकाराखालील माहिती देताना अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या कागदपत्रांमध्ये उपलब्ध आहे, त्या कागदपत्रांच्या प्रती अर्जदारास देणे ही प्रक्रिया येथे अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अभिप्रेत होती. तथापि आयोगाच्या असे निदर्शनास

आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रश्नास दि. ३.४.२००७ रोजी उत्तरे दिली.सदर उत्तरे जन अपिलीय अधिकारी यांना प्रथमतः मोघम स्वरुपात वाटल्यामुळे त्यांनी दि.१३.६.२००७ रोजी अपिलार्थीस नेमकी माहिती देण्याची जन माहिती अधिकारी यांना सूचना केली. तदनंतर जन अपिलीय अधिकारी व माहिती अधिकारी यांच्यामध्ये काही पत्रव्यवहार झाला. जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी दि. २५.६.२००७ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. आज रोजी आयोगासमोर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी दि. २७.८.२००८ रोजी विनामूल्य दिलेली माहिती दाखविली. तथापि या माहितीचे अद्यापपर्यंत अपिलार्थीने अवलोकन केले नसल्याचे त्यांनी आयोगास सांगितले. या माहितीचे अवलोकन करता, आयोगाच्या मते अपिलार्थीच्या ज्या प्रश्नांची उत्तरे जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहेत, ती या माहितीमध्ये त्यांना मिळू शकतील. या प्रकरणाचे हे वैशिष्टय आहे की, अपिलार्थीने या प्रकरणासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून अभिलेखे तपासणीची दि.१२.७.२००७ रोजी मागणी केली असता, या प्रकरणाशी संबंधित सर्व अभिलेखे दि. २०.७.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांनी तपासणीसाठी त्यांना उपलब्ध करुन दिली आहेत.

या संपूर्ण घटनाक्रमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास कोणत्याही असद्हेतूने माहिती देण्यास टाळाटाळ केली अथवा अपिलार्थीपासून माहिती दडवून ठेवली, असा प्रकार आयोगास आढळून आला नाही. येथून पुढे अशाप्रकारच्या माहितीसाठीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रतिसाद देताना प्रश्नांना उत्तरे न देता अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या कागदपत्रांमध्ये उपलब्ध आहे, त्या कागदपत्रांच्या प्रती देण्याची कार्यवाही करावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. २७.८.२००८ रोजी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती दिल्याचे व ही माहिती प्राप्त झाल्याप्रित्यर्थ अपिलार्थीने जन माहिती अधिकारी

यांच्याकडे पोच दिली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात राज्य माहिती आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत. मात्र जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे येथून पुढे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर सतर्कतेने कार्यवाही करावी, अशी ताकीद त्यांना आयोगातर्फे देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांना ताकीद देण्यात येत आहे

**औरंगाबाद**
**दिनांक : १६-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जगनराव बाबूराव चोरगे, प्लॉट नं.सी-९९, एमआयडीसी,वाळुज,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, उद्योग-सारथी, महाकाली गुफा रोड, अंधेरी (ई),मुंबई-९३ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२११२
निर्णय दिनांक १६-१२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. केशव विश्वनाथ गायकवाड,<br>रा.पंढरपूर,वळदगाव ता. जि.औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,<br>औरंगाबाद जि.औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,<br>औरंगाबाद जि.औरंगाबाद | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी हे उपस्थित आहेत, तर अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १३.११.२००७ रोजी दाखल झालेले (दि. ३०.१.२००७ रोजीचे) द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये, अपिलार्थी यांनी दि. २८.११.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे त्यांनी मागणी केलेली माहिती मिळाली नसल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीच्या दि. २८.११.२००६ रोजीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती

अधिकारी यांच्याकडे - मौ.वळदगाव ता. औरंगाबाद येथील गट नं.१७५ व १७१ मध्ये मिळून संपादित केलेल्या जमिनीचा ताबा पावती व १९८१ साली एम.आय.डी.सी. वाळुजचा तयार केलेला मूळ नकाशा गटासह - अशी माहिती मागितली होती.

आज रोजी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या दोन्ही मुद्यावरील माहिती दिल्याचे आयोगास अवगत केले व अपिलार्थीस त्यांनी दिलेली माहिती आयोगास दाखविली. यावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती दि. १५.१.२००७ व २५.१.२००७ रोजी दिली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत आहे. अपिलार्थीस ही माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांनी रु.२/- इतके शुल्क लावलेले आहे व नकाशाची प्रत विनामूल्य दिलेली आहे. अपिलार्थीच्या दि. २८.११.२००६ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २७.१२.२००६ रोजी अगर तत्पूर्वी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविणे गरजेचे होते. तथापि अशाप्रकारची कृती जन माहिती अधिकारी यांनी न करता अपिलार्थीस अधिनियमातील विहित कालावधी व्यपगत झाल्यानंतर माहिती देऊन त्यांच्याकडून माहितीपोटीचे शुल्क रु.२/- इतके त्यांनी स्वीकारले आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची असून अपिलार्थीकडून त्यांनी स्वीकारलेले माहितीपोटीचे शुल्क रु.२/- इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

आजच्या सुनावणीस अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत, हे पाहता अपिलार्थी यांचे या प्रकरणी कोणतेही म्हणणे नाही, असे गृहीत धरुन अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून स्वीकारलेले माहितीपोटीचे शुल्क रु.२/- त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १६-१२-२००८** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. केशव विश्वनाथ गायकवाड, महात्मा फुले नगर, पंढरपूर, ता.जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,औरंगाबाद जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,औरंगाबाद जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२११३
निर्णय दिनांक १६-१२-२००८

१ श्री. ज्ञानोबा बाबाराव पवार, : अपिलार्थी
रा.वझुर ता.पूर्णा जि.परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हाधिकारी, परभणी
२ जन अपिलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी, परभणी.
प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः जिल्हा खनिकर्म अधिकारी, परभणी

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी हे उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ११.१०.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, जन माहिती अधिकारी यांच्याकडून चुकीची व अस्पष्ट माहिती देण्यात आल्याचे, सदर माहिती त्यांना ३० दिवसांच्या आत प्राप्त झाली नसल्याचे आणि जन अपिलीय अधिकारी यांनी चुकीचा निर्णय देऊन त्यांचे प्रथम अपील फेटाळल्याचे नमूद केले आहे. याच अपील अर्जामध्ये त्यांनी अंतिमतः जन माहिती अधिकारी माहिती देण्याचे टाळाटाळ करीत असल्याने त्यांच्यावर कलम २० (१) व २०(३) नुसार योग्य

ती कारवाई करण्याची विनंती करुन त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या प्रथम अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - मौ. वझूर, ता. पूर्णा, जि.जिल्हा परभणी येथील बंधाऱ्यावरिल वाहतुक बंद करण्याबद्दल केलेल्या कार्यवाही बाबत - कार्यवाहीस विलंब, कोण अधिकारी नेमले, नाव हुद्दा काय कार्यवाही केली, परवाना धारकास घालून दिलेले नियम व अटी, बंधाऱ्यावरुन वाहतुक करण्यास परवानगी दिली आहे का- या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीने त्यांचा मूळ माहितीसाठीचा अर्ज दि. ४.६.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला होता. या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २८.६.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती दिली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३१.७.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर, जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.८.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. २१.८.२००७ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील खारीज केले, या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. ४.६.२००७ रोजीच्या प्रथम माहितीसाठीच्या अर्जास त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत दि. २८.६.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने मौ. वझूर ता.पूर्णा येथील अवैध वाहतुकीसंदर्भात वेगळयाने अर्ज केला होता. अपिलार्थीच्या अर्जास अनुसरुन अपर जिल्हाधिकारी, परभणी यांनी स्वतः या स्थळास भेट देऊन यासंदर्भात अलाहिदा निर्णय दिला आहे. या संदर्भात श्री. उत्तम काशिनाथ डोंबे यांना

रु.९,०१,०००/- इतका दंड ठोठावला आहे. सदर कार्यवाही ऑक्टोबर, २००७ मध्ये करण्यात आली. अपिलार्थीने अर्ज करते वेळी सदर कार्यवाही झाली नव्हती, त्यामुळे त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस या कार्यवाहीनंतर पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २८.६.२००७ रोजीच्या पत्राद्वारे जो प्रथम प्रतिसाद दिला आहे, त्यामध्ये अपिलार्थीने अपेक्षित केलेल्या, कार्यवाहीस विलंब करण्यास कोण अधिकारी नेमला, त्यांचे नाव या प्रकरणी काय कार्यवाही केली, ही माहिती अपिलार्थीस पुरविलेली नाही. तेव्हा यादृष्टीने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिल्याचे सिध्द होत आहे. अर्थात ही माहिती दडवून ठेवण्यामागे जन माहिती अधिकारी यांचा कोणताही असद्हेतू असावा, असे आयोगास वाटत नाही. त्यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीमध्ये संबंधित अधिकाऱ्याचा फक्त हुद्दा दिलेला आहे, परंतु नाव दिलेले नाही. तसेच अपिलार्थी यांच्यामते त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती वाचनीय नसून ती पुसट व अस्पष्ट आहे. अपिलार्थीस अस्पष्ट माहिती मिळाल्याची ही वस्तुस्थिती लक्षात घेता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस उर्वरित माहिती व त्यांच्या दि. २८.६.२००७ रोजीच्या पत्राची प्रत स्पष्ट व वाचनीय स्वरुपात अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उर्वरित माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत स्पष्ट स्वरुपात व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. ज्ञानोबा बाबाराव पवार, मौ.वझुर ता.पूर्णा जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२११४
निर्णय दिनांक १६-१२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. अंगुल महादेव बनसोडे,<br>उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>शांतीसागर प्राथमिक विद्यामंदिर, उस्मानाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>सचिव, शांतीसागर शिक्षण प्रसारक मंडळ,<br>उस्मानाबाद. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी यांचे प्रतिनिधी हे उपस्थित आहेत.

वरील अपिलाच्या सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांना उद्देशून लिहिलेली, नोटराईज केलेली दि. १५.१२.२००८ रोजीची दोन पत्रे आयोगास सादर केली असून या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांचे अपील क्र. २११४, दि.२४.१०.२००७ (आयोगाचे कार्यालयात दि.२९.१०.२००७ रोजी दाखल) संदर्भात मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची आता त्यांना आवश्यकता नसल्याचे व भविष्यातही त्याची गरज पडणार नसल्याचे नमूद केले असून त्यांनी अपील अर्ज मागे घेत असल्याचे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना लेखी कळविले आहे.

खुद्द अपिलार्थी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेला अर्ज व अपील अर्ज स्वखुषीने मागे घेत असल्याने तसेच अपिलार्थीची आज सुनावणीस अनुपस्थिती पाहता अपिलार्थीस हे अपील चालविण्यामध्ये स्वारस्य उरले नसावे, असे दिसून येत आहे.

सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील क्र. २११४/२००७ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अंगुल महादेव बनसोडे, द्वारा माणिक सखाहरी बनसोडे, 'मिथाली निवास', भिमनगर,उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शांतीसागर प्राथमिक विद्यामंदिर,बौध्दनगर, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, शांतीसागर शिक्षण प्रसार मंडळ,वैराग नाका, बौध्दनगर,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२११५
निर्णय दिनांक  १६-१२-२००८

१ श्री. रेणूकादास भगवंतराव वाकोडीकर, : अपिलार्थी
रा.परभणी.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
अधीक्षक अभियंता,
पाटबंधारे परिमंडळ कार्यालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता दक्षता पथक,औरंगाबाद
परिमंडळ पाटबंधारे विभाग,औरंगाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: उपविभागीय अभियंता दक्षता पथक,औरंगाबाद परिमंडळ पाटबंधारे विभाग,औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी: अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, औरंगाबाद परिमंडळ पाटबंधारे विभाग,औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०५.१०.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने, त्यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपेक्षित माहिती न दिल्याने केले

असल्याचे नमूद केले आहे व महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,खंडपीठ,औरंगाबाद यांनी याचिका क्र.२३८६ सन १९९१ दि. ३०.३.२००७ रोजी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत त्यांनी माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. १०.७.२००७ रोजीच्या प्रथम अर्जाद्वारे महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,औरंगाबाद यांच्या दि. ३०.३.२००७ रोजीच्या निर्णयाची अंमलबजावणीबाबत एकूण ६ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.२९.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या प्रकरणाचा या पत्रामध्ये ऊहापोह करुन अपिलार्थीकडून ते ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झाले आहेत, त्या कार्यालयाकडून मूळ सेवापुस्तिका व गोपनीय अहवाल मागविले असल्याचे त्यांना कळविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २१.८.२००७ रोजी प्रथम अपील केले.या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही. अथवा या संदर्भात अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार केल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशाप्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाकडून जन माहिती अधिकारी यांना, त्यांनी दाखल केलेल्या अपिलासंदर्भात, तीन महिन्याच्या आत त्यांच्या सेवानिवृत्तीबाबत व पदोन्नतीबाबत कार्यवाही पूर्ण करण्याचा आदेश देऊनही त्यांनी ही कार्यवाही अद्यापपावेतो पूर्ण केली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी सेवाजेष्ठयतेचा प्रश्न सोडविला आहे, तथापि त्यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या निर्णयानुसार अपेक्षित असलेली पदोन्नती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापही दिलेली नाही. या प्रकरणी त्यांनी मा.उच्च न्यायालयामध्ये अवमान याचिका दाखल केली असता, जन माहिती अधिकारी यांनी तेथे खोटे शपथपत्र दाखल केले. त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये अंतिमतः महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने जन माहिती अधिकारी यांना आदेशित केल्याप्रमाणे त्यांना पदोन्नती देऊन त्यानंतरचे संपूर्ण फायदे त्वरित उपलब्ध करुन द्यावेत अशी अपेक्षा व्यक्त केली.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा सेवाजेष्ठयतेचा प्रश्न त्यांनी सोडविला असून अपिलार्थीस भांडार निरीक्षक या पदावर हव्या असलेल्या पदोन्नती संदर्भात त्यांनी शासनास दि. १५.११.२००८ रोजी प्रस्ताव सादर केला असून, शासनाकडून आदेश आल्यानंतर या संदर्भात कार्यवाही त्वरित करण्यात येईल, तसेच या प्रकरणाच्या प्रगतीचे ते स्वतः निरीक्षण करीत असून अपिलार्थीस महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या आदेशाप्रमाणे न्याय देण्यासंदर्भात ते प्रयत्नशील आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी हे त्यांचा वैयक्तिक प्रश्न सोडवून घेण्यासाठी माहिती अधिकार अधिनियमाचा उपयोग करु पाहत आहेत. अपिलार्थी यांच्या दि. १०.७.२००७ रोजीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, या अर्जामध्ये अपिलार्थीने एकूण ६ मुद्यांवर माहिती मागविली आहे. या ६ मुद्यांपैकी मुद्दा क्र.६ - जन अपिलीय अधिकारी यांचे पदनाम व फोन नंबर- वगळता उर्वरित ५ ही मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने दिलेल्या निकालाची कार्यवाही करण्यास उशिर का झाला, कार्यवाही न करण्याची कारणे, कार्यवाही कधी होईल, कोणत्या कारणास्तव कार्यवाही करण्याचे थांबले आहे, प्रकरणी सर्वतोपरी

माहिती घेण्याचे, अशाप्रकारचे जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासे व बांधिलकी (Commitment) अपेक्षित केल्याचे दिसून येत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मध्ये 'माहिती' या शब्दाची व्याख्या पुरेशा प्रमाणात स्पष्ट केली आहे. माहिती अधिकार अधिनियमामध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबाबत खुलासे, कारणे व स्पष्टीकरणे मागणे अपेक्षित नसल्याचे या व्याख्येचे अवलोकन करता दिसून येईल. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींनुसार अर्जदाराने माहिती मागविल्यास ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत निर्णय घेणे, अशाप्रकारची प्रक्रिया अभिप्रेत आहे, हे पाहता, मूळात अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती (मुद्दा क्र.६ वगळता) ही,अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.६ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे जन अपिलीय अधिकारी यांचे पदनाम व फोन नंबर ही माहिती मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लिहिलेल्या त्यांच्या दि. २९.८.२००७ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीच्या या मुद्यांची त्यांनी दखल घेतली नसल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. २९.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे पुरविलेली माहिती- दिलेले उत्तर हे अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे वाचन न करता दिल्याचे, अपूर्ण व विसंगत असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने या प्रकरणी दि. २१.८.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असल्याने अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी कोण आहेत, याची माहिती असावी, असे अनुमान काढण्यात येत आहे. तरीही जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली मुद्दा क्र.६ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना तीन

दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.या प्रकरणी ही माहिती अपिलार्थीस न देण्याचा जन माहिती अधिकारी यांचा कोणताही असद्हेतू असावा, असे आयोगास दिसून येत नाही. त्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही कारवाईचे आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ६ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रेणूकादास भगवंतराव वाकोडीकर,'शैलेश', रंगनाथ महाराजनगर, परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,दक्षता पथक,औरंगाबाद परिमंडळ,पाटबंधारे विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, दक्षता पथक,औरंगाबाद परिमंडळ, पाटबंधारे विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२११६
निर्णय दिनांक १६-१२-२००८

१ श्री. मुनवरखान सरदारखान : अपिलार्थी
रा.परभणी.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापिका,
सरहद्द गांधी प्राथमिक शाळा, परभणी
२ जन अपिलीय अधिकारी तथा
सचिव, मदिना एज्युकेशन सोसायटी,परभणी

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.१०.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थीने आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले आहे की, आयोगाकडील विचाराधीन अपिलावर आयोगाने दि. २२.२.२००८ रोजी निर्णय दिला असून, त्या निर्णयाप्रमाणे अपिलार्थीचे अपील मान्य केले आहे. अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर

यापूर्वी निर्णय झाल्याने अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर पुन्हा विचार करण्याची या टप्प्यावर आवश्यकता नाही, असे आयोगाचे मत आहे.

तथापि जन माहिती अधिकारी यांना आयोगाने आदेश देऊनही अपिलार्थीस अद्यापही जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झालेली नाही. अपिलार्थीस या संदर्भात असे सूचित करण्यात येते की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून यानंतरही माहिती प्राप्त न झाल्यास, अधिनियमातील कलम १८ नुसार वेगळी तक्रार ते आयोगाकडे दाखल करु शकतात.

या पार्श्वभूमीवर अपिलार्थीच्या मूळ द्वितीय अपिलावर यापूर्वीच निर्णय झाल्यामुळे अपिलार्थीचे अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील क्र.२११६, दि.०१.१०.२००७ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुनवर खान सरदार खान, रा. विद्यानगर,परभणी-४३१४०१

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका,सरहद्द गांधी प्राथमिक शाळा, मदिनानगर, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, मदिना एज्युकेशन सोसायटी,मदिनानगर, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२११७
निर्णय दिनांक १६-१२-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. भगवान पुंजाराम बनकर,<br>रा.गंगापूर जि.औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता,<br>विशेष प्रकल्प (सा.बां.) उपविभाग,<br>गंगापूर, जि.औरंगाबाद<br>२ जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम (पश्चिम),<br>औरंगाबाद. | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.१२.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी हे उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.०५.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २०.७.२००६ रोजी जुने अगर वाडगाव ते वझर रस्ता व शंकरपूर ते शेवाळे

वस्ती भाग-एक व रा.मा.६० ते लखमापूर भाग तीन व जूनीपुरी ते कोडापूर वस्तीशाळा-या रस्त्यासंदर्भात काही माहिती मागितली असता जन माहिती अधिकारी यांनी त्यांना उडवाउडवीचे उत्तर दिले व त्यांना माहिती देण्यास टाळाटाळ केली. जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या प्रतिसादामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २८.१२.२००६ रोजी रितसर अपील दाखल केले. सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ७.३.२००७ रोजी सुनावणी ठेवून या संदर्भातील आपला निर्णय दि. २०.३.२००७ रोजी पारित केला. या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस ८ दिवसांच्या आत माहिती देण्याचे सूचित करुनसुध्दा जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती दिली नाही व अंदाजे १५ ते २० दिवसांच्या अंतराने अर्धवट व चुकीची माहिती दिली आहे. त्यांना प्राप्त झालेली माहिती अर्धवट व चुकीची असल्याचे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या निदर्शनास आणले असता, त्यांना राज्य माहिती आयोगाकडे जाण्याचा जन अपिलीय अधिकारी यांनी सल्ला दिला. त्यामुळे त्यांनी सदर अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी दि. २०.७.२००६ रोजी केलेल्या आपल्या दोनही मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर आहेत. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना दि. १४.३.२००७ व १६.३.२००७ रोजी त्यांनी दिलेली असून या संदर्भात अपिलार्थीची काही तक्रार नसल्याचे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे लेखी पत्र व पोचपावती दिली आहे.त्यांनी पुढे आयोगास असे अवगत केले आहे की, अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या दोन्ही अर्जावर ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले होते. तथापि या संदर्भातील आवश्यक तो पुरावा त्यांनी त्यांच्या प्रथम अर्जासोबत लावला नव्हता, त्यामुळे त्यांनी अपिलार्थी हे खरोखरीच दारिद्रयरेषेखालील व्यक्ती आहेत किंवा कसे, हे तपासण्याकरिता गट

विकास अधिकारी यांच्याकडे दि. २४.७.२००६ रोजी त्यांचे अभिप्राय मागितले असता, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर यांनी त्यांच्या दि. ३१.७.२००६ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांना असे कळविले आहे की, "सन १९९७-९८ ची दारिद्रयरेषेखालील कुटुंब सर्वेक्षण यादी सध्या चालू आहे, त्यानंतर सन २००२-०३ मध्ये दारिद्रयरेषेखालील कुटुंबाचे सर्वेक्षण झालेले असून या यादीस शासनाची मान्यता नाही" अपिलार्थी हे खरोखरीच दारिद्रयरेषेखालील व्यक्ती आहेत किंवा कसे या संदर्भात जन माहिती अधिकारी हे संभ्रमित राहिले, त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस दि. ११.९.२००६ रोजीच्या पत्राद्वारे एका अर्जासंदर्भात माहितीपोटीचे रु. ४९७/- इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. अपिलार्थीच्या दुसऱ्या अर्जासंदर्भात अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे, याचा त्यांना बोध न झाल्याने ते अपिलार्थीबरोबर या अर्जासंदर्भात पत्रव्यवहार करीत राहिले व अंतिमतः त्यांनी अपिलार्थीस दि. १४.३ व १६.३.२००७ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी आज रोजी सुनावणीस अपिलार्थी हे उपस्थित नाहीत.

अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त होण्याकरिता ते स्वतःच जबाबदार असून त्यांनी प्रथमतः ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचा पुरावा जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केला नाही. प्रथम अर्जाद्वारे त्यांना निश्चित कोणती माहिती हवी आहे, हे जन माहिती अधिकारी यांना कळविले नाही. त्यांनी माहितीसाठीच्या अर्जामध्ये फक्त कामाचे नावच लिहिलेले आहे, हे पाहता विलंबाने माहिती मिळण्यासाठी अपिलार्थी हे स्वतःच जबाबदार असल्याचे दिसून येते.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य माहिती पुरविली आहे, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६-१२-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भगवान पुंजाराम बनकर,रा.शिवाजी चौक,गंगापूर जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,विशेष प्रकल्प (सा.बां.) उपविभाग,गंगापूर, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम (पश्चिम), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.